म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ३०६६.

REFBK-0024402

4 JUL 1992
2 JAN 1985
13 NOV 1985
3 FEB 1985
15 DEC 1985
20 FEB 1985
22 DEC 1985
10 MAR 1985
5 MAY 1985
9 MAY 1985
12 MAY 1985
16 AUG 1987
26 MAY 1985
17 JUL 1985
28 FEB 1988
31 JUL 1985
12 NOV 1988
29 SEP 1985
10 NOV 1985
8 JUL 1992
17 OCT 1992

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
३७८२
दा. क्र. २७७२
दिनांक २८/११/९०
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

संदर्भ
जिवंत
३०६६
२४४०२
२४११८४

दरवाजा बंद दरवाजा बंद दरवाजा बंद

दरवाजा बंद दरवाजा बंद दरवाजा बंद

प्रकाशक :
दिनकर गांगल, चिटणीस,
'ग्रंथाली' वाचक चळवळ
३४/९०२, नेहरूनगर
मुंबई ४०००२४

मुद्रक :
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४, टिळक रोड
पुणे ४११०३०

मुखपृष्ठ व मांडणी :
आमची पंधरावी कला

© शशी लक्ष्मण माने
४४४, मंगळवार पेठ,
सातारा.

प्रकाशन क्रमांक ३८
प्रसिद्धी : ९ सप्टेंबर १९८४

किंमत ३० रुपये

ज्यांच्या मदतीशिवाय बंद दरवाजा
ठोठावताच आला नसता त्या
फोर्ड फौंडेशन, न्यूयॉर्क,
भटक्या विमुक्त जातीसंघटना, महाराष्ट्र,
रविवार 'सकाळ', पुणे
आणि
महात्मा जोतीराव फुले समता प्रतिष्ठान, पुणे
या संस्थांना—



अनुक्रमणिका

मनोगत / आठ
प्रस्तावना / तेरा
तुटलेली नाळ / १ गिरजाक्का / ११ बळी आणि बळींचे बॉस / १८

सोलापूरचे उजाड सेटलमेंट / २७
जनतेच्या कोर्टात / ३३ बारशादिवशी बाशिंग / ४०
पालं गोपाळांची / ४९ गोपाळांची जातपंचायत / ५७
पूजा / ६७ हत्तीची गोष्ट / ७३ औरंगाबाद परिषद / ७९

माणसं आता बोलायला लागलीत / ८७
जो देगा तन, वही देगा कफन ? / ९६
उद्याच्या सूर्यासाठी – आजचे व्याकूळ सूर / १०३
कात टाकून उभे राहिलेले वैदू / ११२

लातूरचा कत्ती - हतोडा मोर्चा / ११९
जोगवा दे अंबे, आनंद दे ! / १२८
आम्हाला माणूस म्हणून जगू दे ! / १३८
अंधारातून प्रकाशाकडे / १४९

कंजारभाटांची सुहागरात / १५७
सस्ता बाजार / १६९ गाढवगोती सोनार / १७६
समाज हा बंद दरवाजा किलकिला करील ? / १८६

मनोगत

उजाडेल ! नक्की उजाडेल ....

लक्ष्मण माने



मराठी ग्रंथ संग्रहालय नागपूर
३०६६
दा. क्र. २३१०२
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

'उपरा' हा माझ्या भावजीवनाचा, जडणघडणीचा सुखदुःखांचा मीच घेतलेला माझा शोध होता. एका अर्थानं व्यक्तिगत जीवनपट आणि त्या अंगानं येणारं सामाजिक जीवन 'उपरा'त आलं होतं. आणि आपल्याच सारख्या असंख्यांचा शोध घेण्याची मनात तीव्र इच्छा होती.

भटक्या विमुक्तांचे जग अभ्यासण्याची, त्यांच्यात मिसळून जाण्याची संधी 'फोर्ड फौंडेशन, अमेरिका' या संस्थेमुळे मला मिळाली. फोर्ड फौंडेशनची दोन लाख रुपयांची अभ्यास शिष्यवृत्ती जाहीर झाली आणि अचानकपणे एक मोलाची संधी मिळाली. माझ्याप्रमाणेच अनेक मित्रांना, वाचकांना आनंद झाला. मी आणि माझे स्नेही डॉ. अनिल अवचट प्रा. अ. भि. शहा यांचेकडे गेलो होतो, त्यावेळी प्रा. शहांनी मला बजावलं, "हे बघ, तू तरुण आहेस आणि एक मोलाची संधी तुला मिळालीय. ज्या कामासाठी ही शिष्यवृत्ती मिळाली त्याच कामासाठी ती खर्च झाली पाहिजे. त्यातला एक पैसाही इतरत्र खर्च करायचा नाही." शिष्यवृत्तीचा कालावधी आता संपला आहे. दर तीन महिन्याला शिष्यवृत्तीचा हप्ता येत होता. दोन वर्षांचे कामाचे संक्षिप्त अहवाल, हिशोबपत्रके चार्टर्ड अकौंटंटकडून तपासून प्रमाणित करून पाठवली आहेत. अंतीम अहवाल तयार करण्याचे काम चालू आहे.



गेली दोन वर्षं जवळपास ७५ हजार कि. मी. प्रवास झाला. वाडया, वस्त्या, तांडे, बिऱ्हाडे हिंडलो. अलिबाबाच्या गुहेसारखं आत आत जात राहिलो. कल्पनाही करता आली नसती येवढं भयावह जीवन पाहिलं. आणि जवळपास बीस-बावीस जमातींचा अभ्यास करू शकलो. आज जवळपास साठ कॅसेट, फोटोग्राफ्सचं नवं संकलन उपलब्ध झालं आहे. शासकीय सूचीप्रमाणे ४२ जमाती भटक्या विमुक्त आहेत. माझ्या दोन वर्षांच्या काळात या शिवाय ११ जमातींची नवीन नोंद करता आली– ज्या तशा शासनालाच काय, मलाही माहित नव्हत्या. या सगळ्यांचं वेगळं संकलन करण्याचं काम चालू आहे.

या माझ्या भ्रमंतीच्या काळात जे पहात होतो, अनुभवत होतो ते मित्रांशी बोलत होतो. पुण्याच्या रविवार 'सकाळ'चे संपादक आणि माझे स्नेही सदा डुंबरे म्हणाले, "तुझ्या या फिरण्याचा, जीववेण्या अनुभवांचा, भटक्या विमुक्तांचा आणि समाजाचा संवाद आपण चालू करू. समाजाने या जमातींना बहिष्कृत केलंय. एका अर्थाने समाजाने यांच्यासाठी आपला दरवाजा बंद केलाय आणि या जमातींनीही आपल्या अलग संस्कृतीच्या दारात स्वतःला बंद करून घेतलंय. हा दरवाजा ठोठावण्याचं काम तू आणि तुझ्या भटक्या विमुक्तांच्या चळवळीतले मित्र कार्यकर्ते करता आहात. तर 'बंद दरवाजा' नावानेच तू लिही." खरंच आज असं वाटतं, 'सकाळ'चे संपादक मा. श्री. ग. मुणगेकर. वा. दा. रानडे, सदा डुंबरे, अरुण खोरे या मित्रांनी हे सहकार्य देऊ केलं नसतं, फोर्ड फौंडेशनची शिष्यवृत्ती मिळाली नसती, डॉ. बाबा आढाव, डॉ. अनिल अवचट, आणि माझ्या भटक्या विमुक्त जाती संघटनेचे कार्यकर्ते माझ्या पाठीशी उभे राहिले नसते तर हा दरवाजा मी ठोठावू शकलो असतो का? या सगळ्यांचं सहकार्य मिळालं आणि या बंद दरवाजावर धडक मारण्याचं काम नोंदलं जाऊ लागलं.

या सदराचा उपयोग भटक्या विमुक्तांच्या चळवळीला व्हावा, ती वाढावी या अपेक्षेने हा स्तंभ सुरू केला आणि त्याचा चळवळीला निश्चितच उपयोग झाला. अनेक ठिकाणी शासकीय यंत्रणा हलू लागली. काही ठिकाणी अत्याचाराला वाचा फुटू लागली, काही ठिकाणच्या प्रश्नांचा गुंता वाढू लागला, आणि चळवळीला गती येवू लागली. मुंढव्याच्या सेटलमेंटचा प्रश्न, सोलापूरच्या सेटलमेंटचा प्रश्न, आणि त्यांच्या शेकडो एकर जमीनींचा प्रश्न आज समाजाच्या न्यायालयात आलाय आणि समाज जागृतीचं, प्रबोधनाचं कामही होत आहे. आणि माझ्या कामाचा जवळपास अहवालच समाजासमोर मांडला गेला, असे मला वाटते.

शिष्यवृत्ती जाहीर झाल्यावर जो आनंद झाला त्यापेक्षा मनःस्ताप जास्त झाला. अभावग्रस्त समाजात पैसा आणि तोही जाहीरपणे मिळणे त्रासाचेच होते. एक प्राध्यापक मित्र 'बंगला' बघायला आले होते. एक मित्र जमीनजुमला मिळवल्याचं

सांगत होते. कुणी सोनंनाणं घ्यायचा सल्ला देत होते, तर काही 'अजून पायीच चालता ?' असं विचारत होते. कुणी आयुष्याची ददात कशी मिटेल याचे व्यावहारिक मंत्र देत होते. पण आजही मी भाडयाच्या घरात रहातो. आणि किरकोळ बदल सोडला तर काहीही नवीन झालेलं नाही. याचं श्रेय मुख्यतः शशीला दिलं पाहिजे. हा अचानक झालेला बदल तिनं सहज घेतला. आणि माझे पाय मातीवर रहातील, हे पाहिलं. मी महिन्यातून तीन तीन आठवडे घरी नसताना सारा प्रपंचाचा गाडाही तिनं एकटीनंच ओढला. अर्थात आम्हा दोघांना जमिनीवर पाय ठेवून जगायला मित्रांनी मोलाची मदत केली हेही तेवढंच खरं. नातेवाईक आणि जमातीतील माणसं यांचाही त्रास खूप झाला. बरं, कुणालाही 'नाही' म्हणणं शक्य नसायचं पण या सगळ्यातून आज आम्ही मुक्त झालो आहोत. आणि मोठ्या जोखमीच्या जबाबदाऱ्याही येऊन पडल्या आहेत.

भटक्या विमुक्तांच्या विकासासाठी पठडीबद्धपणे न जाता त्यांना समजावून घेऊन त्यांना पुढं नेलं पाहिजे. त्यांच्या कलाने, त्यांच्यासाठी विकास-योजना कशा असाव्यात, कशा राबवाव्यात आणि त्यांचा हा वेगळा सांस्कृतिक प्रवाह मुख्य प्रवाहात कसा आणता येईल याचा विचार व्यवहार व्हावा यासाठी आत्तापर्यंतच्या कामाचा पुढचा भाग म्हणून 'भारतीय भटके विमुक्त विकास व संशोधन संस्था' या नावाची संस्था स्थापन केली आहे. माननीय खासदार यशवंतरावजी चव्हाण यांनी या संस्थेचे अध्यक्षस्थान आनंदाने स्वीकारले असून डॉ. बाबा आढाव, प्रा. मे. पुं. रेगे व प्रा. मोतीराज राठोड या मित्रांनी उपाध्यक्षपदाची जबाबदारी घेतली आहे. रचना, प्रबोधन आणि संघर्ष या तिन्ही आघाड्यांवर हा बंद दरवाजा ठोठावतो आहे. त्यासाठी असंख्य मित्रांची मदत हवी आहे. अनेकजण मदत करीत आहेत. त्या सगळ्यांचा उल्लेख करणे शक्य नाही. त्यांच्या ऋणातच राहणे बरे.

शेवटी 'सकाळ'च्या मुद्रण विभागातील कर्मचारी मित्रांचे आभार मानले पाहिजेत. त्यांनी माझं 'दिव्य' हस्ताक्षर आणि कधी कुठूनही पाठवलेला मजकूर अक्षरशः अक्षर लावून जुळवला.

हस्तलिखीत तयार करत असताना माझे स्नेही प्रमोद कोपर्डे, डॉ. नरेंद्र दाभोळकर यांचीही प्रेमाची मदत झाली. त्यांचे औपचारीक आभार मानणे त्यांना रुचणार नाही. अशा अनेकांच्या सहकार्यानं दरवाजा ठोठावणं चालू आहे. आवाज वाढतो आहे. आताशी कुठं तांबडं फुटतंय. उजाडेल, नक्की उजाडेल. दरवाजा नुसताच किलकिला होणार नाही तर तो सताड उघडेल हा विश्वास आहेच.

सातारा,
१४ जुलै, १९८४





लक्ष्मण माने यांचे 'बंद दरवाजा' हे दुसरे पुस्तक. 'उपरा' या त्यांच्या पहिल्याच पुस्तकाने अनेक विक्रम केलेले आहेत. 'उपरा' या पुस्तकामुळे फोर्ड फौंडेशनने लक्ष्मण माने यांना त्यांच्या पुढच्या पुस्तकासाठी पाहणी करून माहिती मिळवता यावी म्हणून दोन लक्ष रुपये अनुदान दिले. अनेकांना अनुदाने मिळतात आणि त्यांचे पुढे काय होते हे कुणाला कळतच नाही. माने यांनी मात्र या अनुदानाचा पुरेपूर उपयोग करून त्यातून निष्पन्न झालेले काम आपल्यापुढे ठेवले आहे.

'उपरा' या पुस्तकापेक्षा 'बंद दरवाजा'चे स्वरूप अगदी वेगळे आहे, हे वाचकांनी पुस्तक वाचण्यापूर्वीच ध्यानात घ्यावे. 'उपरा'मध्ये लक्ष्मण मान्यांनी स्वतःची जन्मापासून आजपर्यंतची हकीगत सांगितली आहे. उघड्यावर जन्मलेला एक कैकाडी मुलगा अनेक अडचणींना तोंड देत, चाकोऱ्या तोडत मध्यमवर्गीय जीवनात दाखल होतो याची प्रत्यक्षतः खरी असलेली पण एखादी कादंबरीच वाटावी अशी कहाणी 'उपरा'मध्ये आहे. त्यात आतून पाहिलेले व जगलेले कैकाडी जीवन आहे, जिवंतपणे उभी राहिलेली अनेक माणसे आहेत, पंचवीसेक वर्षांचा बदलत जाणारा कालखंड आहे. आणि शेवटी जातपंचायत नायकाला जातीपुढे नाक घासायला लावते असा विदारक शेवटही आहे. त्यामुळे उपरा ही एक अनेक-पदरी, समृद्ध कलाकृती बनली आहे.

या उलट 'बंद दरवाजा'मध्ये लेखकाची भूमिका अनेक भटक्या जमातींची परिस्थिती 'पाहण्या'ची आहे. याला सुरुवातीचे दोन लेख अपवाद, कारण ते आत्मचरित्रपर आहेत. एकूण 'बंद दरवाजा'तील लेख हे पुण्याच्या 'रविवार सकाळ' या

प्रस्तावना

अनिल अवचट

वर्तमानपत्रात वर्षभर छापून येत होते. त्यामुळे ते वर्तमानपत्रासारखे त्रोटकही आहेत. माने हे भटक्या समाजातले असले तरी ते 'कैकाडी' आहेत. त्यामुळे इतर भटक्या जातींमध्ये त्यांना प्रवेश मिळणे हे आपल्याला जसे अवघड आहे, तसे त्यांनाही ते अवघडच आहे. माने जेव्हां इतर भटक्या जमातींमध्ये प्रवेश करतात तेव्हां त्यांना घडलेले त्या त्या जमातींचे दर्शनही पृष्ठभागाचेच आहे. आणि ते साहजिकच आहे. म्हणून 'उपरा'त जे जीवनदर्शन घडते तितके सखोल दर्शन इतर जमातींचे त्यांना घडू शकलेले नाही.

पण मान्यांनी ही मर्यादा ओलांडण्याचा आटोकाट प्रयत्न मात्र केलेला आहे. लक्ष्मण माने हे भटक्या समाजातील तरुण तडफदार कार्यकर्ते आहेत. भटक्या विमुक्त जाती संघटनेचे ते कार्याध्यक्ष झालेले आहेत. त्यांच्याकडे खिळवून टाकणारे वक्तृत्व आहे. त्यांची खळबळजनक विधाने महाराष्ट्राला परिचित आहेतच. स्वाभाविकच भटक्याविमुक्तांमध्ये लक्ष्मण माने यांना मोठेच ग्लॅमर आहे. भटक्या विमुक्तांमधले तरुण कार्यकर्ते ठिकठिकाणी परिषदा भरवतात. त्यापूर्वी मान्यांची तारीख घेतात. त्यांच्याबरोबर दौऱ्यात राहायला मिळावे म्हणून प्रयत्नही करतात. त्यामुळे भटक्या विमुक्तांमधल्या सगळ्या जमातींमधल्या सुशिक्षित तरुणांपर्यंत मान्यांचे नाव पोहोचलेले आहे. अशा तरुण कार्यकर्त्यांमार्फत लक्ष्मण माने हे त्या समाजाची माहिती घेताना दिसतात, प्रवेश मिळवायची धडपड करताना दिसतात.

पण अशा कित्येक जमाती आहेत ज्यांच्यात कुणी सुशिक्षितही नाही आणि कुणी कार्यकर्ताही नाही. तिथे लक्ष्मण माने सरळ त्यांच्यात जाऊन माहिती घ्यायचा प्रयत्न करतात. मुंबईच्या बसस्टॉपवर उभे असताना समोर फूटपाथवर भटक्यांची कुटुंबं उतरलेली दिसल्यावर कामं सोडून ते तिथं जाऊन बोलणं काढतात. हे कसलं संकट असा विचार करून तिथली बाई त्यांना कसलीही माहिती देत नाही. पण कुठून तरी पुरुष उगवतो. मग फूटपाथवरच फाटकी गोधडी अंथरली जाऊन त्यावर गप्पा सुरू होतात. बऱ्याचदा भटक्या विमुक्तांच्या ह्या भागातल्या एखाद्या परिषदेची माहिती सांगायच्या निमित्ताने त्या जातीतल्या ओळखीच्या कार्यकर्त्याला घेऊन माने त्यांच्यात जातात व तिथले जीवन पाहतात. एकदा मुंबईला एस. टी. ने जाताना गाढवं दिसतात, त्यांत ओळखीचा कैकाडी दिसतो. माने खोपोलीला एस. टी. सोडून देऊन गाढवांची वाट पाहत बसतात. आणि रात्री त्यांची पालं लागल्यावर त्यांच्यात जाऊन बसतात. गोपाळांच्या पालात तर त्यांची डाळ शिजेना म्हणून वाजंत्रीचा आधार सापडल्यावर माने त्यांना बँड वाजवून दाखवतात व त्यांचा विश्वास संपादन करतात. शिवाजीनगर स्टेशनवर उतरल्यावर ढोलकी विकणारे ढोलकिये या भटक्या जातीचे लोक दिसल्यावर ढोलकी विकत घेण्याच्या मिषाने त्यांची माहिती घेतात.

सामाजिक प्रश्नांची पाहणी करणाऱ्या 'इन्व्हेस्टिगेटर्स'मध्ये आणि लक्ष्मण

मान्यांमध्ये हा फार मोठा फरक आहे. त्यांच्या 'ॲप्रोच 'मध्ये साधेपणा आणि सहजपणा आहे. ते जे जीवन बघतात ते तसेच्या तसे पुढे ठेवतात. त्यांना भेटलेल्या माणसांच्या संवादामधून आपल्याला त्या जीवनातल्या गमती कळतात, दुःख कळते आणि भीषणताही प्रत्ययाला येते. बंजारांवरील एकच लेख तेवढा पुस्तकी माहिती पुरवणारा आहे. उदा. बंजारा पूर्वी कोण होते, त्यांच्यात किती प्रकार आहेत, त्यांच्यात कुणात रोटी-बेटी व्यवहार होतो, कुणात होत नाही, इत्यादी. यात तपशील आहेत पण प्रत्यय नाही. पण हा लेख सोडता इतर लिखाण मात्र प्रत्यय देणारे आहे.

हे लिखाण वाचताना लक्ष्मण माने यांची भाषेकडे पाहायची इतरांपेक्षा वेगळी वृत्ती आहे हे ध्यानात येते. 'उपरा'च्या प्रकाशनाच्या वेळी हा भाषेचा प्रश्न समोर आला होता. काहींचे म्हणणे असे होते, 'एकतर सगळे पुस्तक नागरी भाषेत लिहा, किंवा पूर्णपणे ग्रामीण भाषेत लिहा. किंवा लेखकाचे निवेदन नागरी भाषेत ठेवा आणि त्यातल्या खेडूत पात्रांचे संवाद ग्रामीण ठेवा. पण ही अशी सर्रास सरमिसळ करणे चूक आहे.' माझे मत मात्र असे होते की लेखकाचे जीवन जसे बदलत गेले आहे तशी त्याची निवेदनाची भाषाही बदलत गेली आहे. ते साहजिक मानून आहे तशी ठेवली पाहिजे. 'बंद दरवाजा 'मध्ये तशी हळूहळू बदलत जाणारी भाषा नाही. इथे एखाद्या लेखात लेखक ग्रामीण भाषेत निवेदन करतो तर दुसऱ्या लेखात पूर्णपणे शहरी भाषेत. आणि तसे करणे कुठे खटकत नाही. भाषा वापराचे रूढ साचे बाजूला ठेवून मनःस्थितीला साजेशी भाषा–पद्धत ते स्वीकारतात आणि नंतर ते तिचं काम संपल्यावर ती सोडूनही देतात. हे ते काही प्रयोग करायचा म्हणून करीत नाहीत. ते आपोआप घडत आहे, आणि ते 'मराठी 'ला पुढे नेणारं आहे.

खेडूत आणि शहरी या दोन्ही भाषांवर त्यांची चांगली हुकमत आहे. खेड्यातल्या भाषेचे वैशिष्ट्य म्हणजे तिच्यातली दृश्यमयता. सोलापूरच्या सेटलमेंटच्या दगडी भक्कम खोल्यांचे ते 'खंडुबाच्या यात्रेतल्या लुटीतल्या खोबऱ्यासारख्या मजबूत' असे वर्णन करतात. मुंढव्याच्या मोर्चाच्या तयारीला माने सगळीकडे बैठका घेऊ लागले, तेव्हा प्रत्येक ठिकाणी लोक व्यथा सांगू लागले, त्याविषयी माने लिहितात, 'जाईल तिथं गळू पिकलेलं. गेलं आन् जरा शब्दांची टाचणी लागली की व्यवस्थेच्या "पुवाचा" पूर वहायचा.' गोपाळांच्या पालांकडे माने गेले तेव्हांचं ते लिहितात, 'मी सडक सोडून बिराडांकडे सराकलो आन् झाडावरलं कावळं उडावं तसं माणसं उठून उबी र्‍हायली.' कैकाडवाड्याकडे निघालेले माने लिहितात, 'कैकाडवाडा जवळ यायला लागला तसं डुकरांच्या लिदीची वर्दळ वाढली. नाकालाही कैकाडवाडा जवळ आल्याचं कळत होतं.' यात सूक्ष्म निरीक्षणाबरोबर अनुभवाचा मोठा भाग आहे.

खेडूत भाषेतलं म्हणी हे वैशिष्ट्य मान्यांच्या भाषेत उतरलं आहे. सेटलमेंटच्या सरकारी ओसाड इमारती लोकांनी ओरबडून नेल्या त्याबाबत लिहिताना ते म्हणतात,

'धनी ना जत्रा, कारभारी सत्रा.' गिरिजाक्काचं वर्णन करताना ते लिहितात, 'तवा गिरिजाक्का म्हंजी, सूर्याला म्हणायची उगवू नगं आन् चंदराला म्हनायची मावळू नगं.' तसेच अनेक इंग्रजी शब्द खेड्यातील भाषेत खेडूत रूप घेऊन जाऊन बसले आहेत, त्यांचेही दर्शन मान्यांच्या भाषेत होते. उदा. लायरी (लॉरी), रेडिव (रेडिओ) लकाप (लॉकअप), कारनिट (क्लॅरिओनेट) इ.

शहरी भाषाही ते चांगल्या रीतीने वापरतात. कोयनानगरच्या मागच्या दुर्गम डोंगराळ भागातल्या भटक्या धनगरांचं जीवन पाहून परतताना समोरच्या दरीकडे पाहून ते लिहितात, 'थांबून समोर पाहिलं तर सोन्यासारखा पिवळा धमक सूर्याचा गोळा समोरच्या सुळक्याच्या आड लपत होता. खाली दऱ्यांत सावली अंधारून पडली होती. तर दूरदूर पाण्याचा विस्तीर्ण चिंचोळा शिवसागर स्वप्नातल्यासारखा धुक्याला कवटाळीत संधिप्रकाशात न्हाऊन निघाला होता. एका बाजूला चैतन्यशील निसर्ग आणि दुसरीकडं उघडं बोडकं ओरबाडलेलं भूमिपुत्रांचं मरणप्राय अंधःकारमय जीवन. काळजात कालवाकालव होत होती. एका बाजूला सामान्य माणसाचा पुरुषार्थ, दुसऱ्या बाजूला समृद्ध निसर्ग आणि समोरच ओसाड मानवी जनसमूहाचा चोळामोळा झालेला. आत्मविश्वासहीन पशुतुल्य जीवन.'

मान्यांची भाषा अस्सल आहे याचं कारण मान्यांची भटक्या समाजाकडे जाण्याची, त्यांचं जीवन बघण्याची, त्यांचं जीवन बदलण्याची ओढही अस्सल आहे. जीवन पाहताना स्वतःच्या मनात उमटलेले भाव ते मोकळेपणाने नोंदवताना दिसतात. रस्त्यावरच्या दिव्याच्या अंधुक प्रकाशात कपड्याअभावी 'ती' छोट्या मुलाला घेऊन नग्नावस्थेतच झोपलेली दिसली. माने खाकरले तसं अंगावर धडपं गुंडाळून ती अंधारात उभी राह्यली. माने लिहितात, " मला काही केल्या तिच्याकडे बघवत नव्हतं. मी तसा सुन्न झालो होतो. भारतमातेच्या अंगावरची कापडं उतारल्यासारखी तिची अवस्था झाली होती." जवळपास प्रत्येक लेखाच्या शेवटी स्वतःला किंवा समाजाला उद्देशून केलेले, हे सगळं कसं बदलणार या अर्थाचे उद्वेगपूर्ण प्रश्न ते विचारतात.

'बंद दरवाजा'त होणारे भटक्या विमुक्तांच्या परिस्थितीचे दर्शन विलक्षण व भीषण आहे. ते आजच्या वाचकाला आजवर माहीत नसलेले आहे. महाराष्ट्रातल्या कित्येक लाख लोकांच्या जीवनपद्धती इतरांना माहीतही नसाव्यात, याचं राहून राहून आश्चर्य वाटत राहतं. कंजारभाटांमधल्या पूजेचं वर्णन पुस्तकात आलं आहे. पिंपरीतल्या झोपडपट्टीतल्या खोलीत देवरुषी मंत्र म्हणत विस्तवावर चमच्याने तूप ओतत असतो. जाळ पेटत नाही म्हणून सगळे अस्वस्थ असतात. कारण जाळ करण्यासाठी वारा किंवा फूंक घालायची नसते. तसा आपोआप जाळ पेटला नाही तर सगळ्या जमातीसाठी करून ठेवलेलं जेवण सगळं वाया जाणार असतं. देवरुषी जे मंत्र म्हणत असतो ते तर फारच विलक्षण असतात. तो म्हणतो, " जगदंबे, सगळे लोग तेरा गू

खायेल. तेरी गांड चाटेल...'' जगदंबेची आराधना करताना तिला खूष करण्यासाठी असे कुणी म्हणू शकेल हे तो लेख वाचण्यापूर्वी मनातही येऊ शकले नसते.

तीस-चाळीस भटक्या विमुक्त जातींचा एक धावता पटच या पुस्तकात पहायला मिळतो. तुरळक शिक्षणाने किंवा बदलत्या परिस्थितीमुळे वरवरचे पापुद्रे सुटलेले असले तरी आतला जातीचा घट्ट गोळा तसाच कठीण राहिलेला आहे. जातीचा आधारही आहे आणि भयही आहे. आधारापेक्षा भयच जास्त आहे, हे या पुस्तकावरून जाणवते. पंचायत काय म्हणेल या विचाराने भिऊन लोक वागताना दिसतात. विशेषतः स्त्रियांचे जीवन या जातपंचायतीच्या वरवंट्याखाली भरडून निघत आहे. त्यांना विकायची वस्तू समजले जाते. 'काडतुशी' नावाच्या पारधी स्त्रीची विलक्षण हकीगत पुस्तकात आली आहे. ती तीन वर्षांची असताना बापानं तिला ५० रुपयाला एकाला विकली. तो हिचा पहिला नवरा. त्याच्यापासून दोन पोरं आणि दोन पोरी झाल्या. त्यानं पोरी ठेवून घेतल्या, कारण ते उत्पन्नाचे साधन. आणि काडतुशीला दुसऱ्याला विकली. त्याच्याबरोबर तिने सात वर्षे संसार केला. त्याने तिला तिसऱ्याला विकली. त्यानं चार वर्षांनं आणखी कुणाला विकली. हे सगळं वाचताना आपण हादरून तर जातोच पण त्या जीवनाची कल्पना करायला आपल्या जीवनाविषयीच्या कल्पना, आडाखे किती अपुरे पडतात हेही जाणवते. सात वर्षे संसार करून बाईला जो नवरा 'विकू' शकतो त्यांचं सांसारिक जीवन कसं असेल? नवराबायकोतलं हळूवार नातं असेल की नाही? असलंच तर ते कसं व्यक्त होत असेल? असे अनेक प्रश्न पडतात.

काडतुशीच्या बाबतीतली आणखी विलक्षण घटना म्हणजे शेवटी पहिल्या नवऱ्यापासून झालेल्या मुलाबरोबर ती शरीरसंबंध ठेवते. आणि ती ते नाकारीत नाही. त्यासाठी पंच आई-मुलाला स्वतःच्या मुतात मातीची भाकरी थापायला लावतात, पंचाहत्तर हजार रुपये दंड ठोठावतात (तो त्यांच्या पिढ्यान्‌पिढ्यांनी चुकता करायचा असतो). हे सगळं पाहिल्यावर प्राणी-जीवनाच्या अवस्थेत हे समूह आजही राहत असल्याचा हादरा बसतो.

स्त्रीजीवनाच्या फरपटीचे दर्शन बऱ्याचदा या पुस्तकात होते. एखाद्या स्त्रीस बदचालीची ठरवून तिला उकळत्या तेलातला रुपया काढायचं 'परमान' पंच फर्मावतात. ती बाई जिवाचा धडा करून हात घालते आणि नंतर तो हात वांग्यासारखा टरारतो. गिरिजाक्का नावाची मान्यांची आत्या दारुड्या नवऱ्याच्या त्रासाने पिचून तशीच मुलं जगवत संसाराचा गाडा ओढत असते. आणि गर्भारशी राहिल्यावर पोलिसासमोर मुद्दाम गुन्हा करून पकडून घेते. हिच्या अवस्थेकडे पाहून कोर्ट फक्त दोन महिने शिक्षा देते तशी कोर्टापुढं हात पसरून जास्त शिक्षेची मागणी करते. कारण तिला तिचं बाळंतपण तुरुंगात करायचं असतं. कोर्ट अवाक् होऊन तिला चार महिन्यांची शिक्षा देतं.

वाचत असताना वाटतं की खरंच, या लोकांचं या देशाशी, समाजाशी नेमक नातं काय आहे? इतर लोक सरकारपाशी हक्क मागतात, नोकऱ्या मागतात. ही माणसं त्याही अवस्थेच्या खालच्या अवस्थेत जगताना दिसतात. सरकारकडं मागण्याइतकी हिंमत तर त्यांच्यात नाहीच, पण सरकारचा, पोलिसांचा, गावोगावच्या धटिंगणांचा त्रास चुकवीत स्वतःला आकसून घेऊन कसंबसं हे जगत असतात. औरंगाबादच्या परिषदेला आलेल्या वैदूच्या हातात ट्रॅझिस्टर असतो म्हणून हा चोरीचाच असणार म्हणून पोलिस त्यांना बेदम हाणून लॉकअपमधे बंद करून ठेवतात. पारध्यांच्या हालांना तर सीमाच नाही. नवऱ्याला नांदेड जिल्हा बंद तर बायकोला जालना जिल्हा बंद. एकमेकांना भेटायचं असलं तरी औरंगाबाद जिल्ह्यात जाऊन भेटायचं. काय या जीवनाला म्हणायचे? सत्याग्रहात मोठ्या जेलमधे पाठवायच्या आधी एखादी रात्र लॉकअपमध्ये मी काढतो तेव्हा मला केवढा जुलूम वाटतो. (तरी वागणूक चांगली.) या पारध्यांचे तर काय होत असेल? नक्षलवाद्यांच्या अटकांबद्दल किंवा जेलमधल्या हालांबद्दल काही लोक आवाज उठवताना दिसतात. तो उठवलाच पाहिजे. पण त्याही आधी कित्येक वर्षे पारध्यांवर पोलिसांकडून, जेलात जे अत्याचार चाललेत त्याकडे आमचे लक्षही गेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. हा दोष फक्त पोलिसांवर टाकता येणार नाही. भटक्या विमुक्तांना कुत्र्यासारखे वागवायला आणि मारायला समाजात मान्यता आहे, म्हणूनच पोलिस इतक्या सर्रासपणे अत्याचार करू शकतात.

ही माणसं सतत भ्यालेली दिसतात. बाहेरचं कुणी येताना दिसलं तरी उंदीर बिळात दडावेत तसे दडून बसतात. मग ओळख पटल्यावर कुणी झाडावरनं खाली उतरतो, कुणी ओढ्यातून वर येतो, कुणी उसाच्या शेतातून बाहेर येतो. ही काय अवस्था आहे?

हे भय, अत्याचार दूर करून त्यांना स्थिर करणं, त्यांचा विकास घडवून आणणं यासाठी माने आणि त्यांचे मित्र यांची जी धडपड चाललेली आहे त्याचेही चित्रण काही लेखांमध्ये आलेले आहे. यांच्या मोर्चांपुढे कलेक्टर सामोरे येणे राहोच, पण शिष्टमंडळाची भेट सुद्धा न घेता त्यांच्यासमोरून धुरळा उडवीत जातात. मुंढव्याच्या भटक्यांना त्यांच्या जागांवरून हुसकावण्याचे कारस्थान रचले जाते. त्याविरुद्ध त्यांनी लढा दिला त्यात कागदोपत्रांपासून आपसातल्या भांडणांपर्यंत अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. नोकरशाही यांच्या बाबतीत एकतर प्रतिकूल, नाहीतर थंडच असताना दिसते. पण तरीही माने आशावादी आहेत. ते लिहितात, "दरवाजा ठोठवायचे काम चालू आहे. आवाज वाढत जाईल. पक्ष, पंथ, जात, धर्म, लिंग या सगळ्यांच्या पलीकडे जाऊन माणूस आणि माणुसकीचा न्याय यांचा हा संघर्ष आहे. आम्ही जनतेच्या कोर्टात आलो आहोत."

या पुस्तकात 'गाढवी सोनार' या जातीवरचा लेख आला आहे. मान्यांनी आजवर इतर कुणाला माहीत नसलेली, कुठेही कागदोपत्री नोंदली न गेलेली जात शोधून काढली आहे. ही त्यांनी समाजशास्त्रीय ज्ञानात घातलेली भरच आहे. जसे घिसाडी लोखंडाच्या वस्तू बनवीत विकीत फिरतात तसे गाढवी सोनार हे सोनार-काम करीत फिरतात. पूर्वीसारखे सोन्याचांदीचं काम त्यांना कोणी करायला देत नाही. आता कानकोरणी करून दहा दहा पैशाला विकत पोट भरण्याची पाळी आली आहे. काळाबरोबर फरफटत चाललेल्या जातजीवनाची ही हकीगत करुण आहे.

मान्यांच्या या पुस्तकाला काही मर्यादाही आहेत. मान्यांचं व्यक्तिमत्त्व भावना-शील आहे. त्यामुळे एखादी पराकोटीची घटना ऐकली किंवा दृश्य पाहिले की ते भावनाविवश होऊन त्यांची प्रतिक्रिया लिहितात. ती उत्कट असल्याने चांगली वाटते. पण त्यामुळे तिच्या इतर बाजूंकडे पहायचे काम राहून जाते. माने तिथेच थांबतात. पण आपली उत्सुकता तशीच राहते. तसेच चळवळीच्या वृत्तांतांमधे व इतरत्रही माने भाषण दिल्यासारखे विधानेच्या विधाने लिहीत जातात (हाही त्यांच्या एरवीच्या जीवनाचा लिहिण्यावरचा परिणाम.) ती अस्थानी वाटतात. त्या जागी चळवळी-बाबतचे नजिकचे आणि दूरपल्ल्याचे चिंतन असायला हवे होते.

यातले काही लेख हे स्लाईड्स दाखवल्यासारखे वाटतात. स्लाईड जशी पडद्यावर येते आणि जाते, त्याने क्षणभर दृश्य दिसते, पण पूर्ण समाधान होत नाही. माने इतरांना अतिशय दुर्गम असलेल्या क्षेत्रात वावरत आहेत. त्यांना भाषेची देणगी आहे. भावनांनी भरलेले संवेदनाशील मन आहे. त्यांनी ते जीवन थंड डोक्याने, खोलवर जाऊन पहावे, अनेक बाजूंनी पहावे, अनुभवावे आणि आम्हा वाचकांपुढे पारदर्शक-पणे मांडावे. त्याने वाचकांचे डोळे उघडतील व चळवळीलाही पोषक अशी जाणीव निर्माण होईल.

भटका विमुक्त समाज हा आत्ता आत्ता जागृत होत असलेला समाज आहे. अशा जागृतीचे इतर जातीप्रमाणे याही जातीजमातीच्या बाबतीत टप्पे आहेत. पहिल्यांदा जागृतीचा फायदा, त्यातले श्रीमंत लोक, संघटित जाती घेत असतात, ते यांच्या बाबतीतही झाले. आमच्या जातीतला आमदार झाला पाहिजे, आमदार झाल्यास तो मंत्री झाला पाहिजे अशा मागण्या हा संघटित वर्ग सर्व जाती-जमातीच्या 'वतीने' करीत असतो. तसे या समाजात आमदार झाले, मुख्यमंत्रीही झाले. त्यांनी राजकीय पातळीवर घेतलेल्या किंवा घ्यायला लावलेल्या निर्णयाचा समाजाला फायदाही झाला. पण हा फायदा किती लोकांपुरता राहिला ? ते आज 'बंद दरवाजा 'त आलेले पोलिसी अत्याचाराचे, भटकत राहण्याविषयीचे, जातपंचायत वर्चस्वाचे, अंधश्रद्धा, अघोरी प्रथांचे प्रश्न आहे तिथेच राहिलेत. ते काही माणसे सत्तेत गेल्याने सुटणार नाहीत. त्या-साठी अन्यायग्रस्तांची अन्यायाविरुद्ध एकीकडे चळवळ उभारावी लागेल. तर दुसरी-

कडे या अनिष्ट प्रथांविरोधी निर्भीडपणे मते मांडणारी तरुण कार्यकर्त्यांची एक फळी या जातीजमातींमधे उभी राहिली पाहिजे. यातनं जागृतीची जी शक्ती उभी राहील तिच्यामुळे राजकीय फायदे आपोआप मिळतीलच.

आज वसंतराव नाईक, दौलतराव भोसले यांच्या पिढीनंतर लक्ष्मण माने-विलास वाडेकर यांची पिढी उदयाला आली आहे. आधीच्या पिढीने या नव्या दमाच्या, नव्या विचारांच्या कार्यकर्त्यांशी जुळवून घेतले हे चांगले झाले. आता सांस्कृतिक व आर्थिक प्रश्नांना त्यामुळे चळवळीत प्राधान्य आले. पूर्वी फक्त दलित जातींवरील अत्याचाराविरुद्ध आरडाओरड व्हायची. आता भटक्या विमुक्तांवरल्या अन्याय-अत्याचाराविरुद्ध हे कार्यकर्ते आवाज उठवतात, हे चांगले चिन्ह आहे.

'बंद दरवाजा' किलकिला करून नुसतं भयानक दर्शन घेऊन आपण थांबलो तर त्यातनं फायदा काहीच नाही. उलट काही होऊ शकत नाही असे नैराश्य येईल. तेव्हा कार्यकर्त्यांनी पुढाऱ्यांचे मॉडेल दूर ठेवून आपल्याला सुचेल तो, विचारांशी सुसंगत असेल तो मार्ग निवडून या प्रश्नांचा पाठपुरावा केला पाहिजे. या समाजातल्या आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी नवे रोजगार निर्माण करणाऱ्या विधायक काम करणाऱ्या संस्थांच्या उभारणीची आवश्यकता आहे. या कामात इतर जाती-धर्मांमधले समविचारी एकत्र येऊन मदत करू शकतील.

'उपरा'च्या अमाप यशानंतर लक्ष्मण माने लिहायचे थांबले नाहीत. हे अपेक्षा वाढवणारे नवे पुस्तक त्यांनी लिहिले. त्यासाठी अहोरात्र ते निवडुंगाच्या काट्यांमधून, डुकराच्या लिदीमधून किंवा शहरातल्या झोपडपट्टयांमधल्या डबक्यांमधून फिरले. अतिशय कष्ट घेऊन सामाजिक वास्तव वाचकांपुढे सर्वसामान्यांच्या भाषेत मांडण्याची मराठीतील नवी प्रेरणा त्यांनी पुष्ट करण्याचे चांगले काम केले आहे. अनुदानामुळे केलेल्या पाहाणीतून हे एक नुसते चांगले पुस्तकच निर्माण झाले, असे नसून भटक्या विमुक्त तरुणांची एक चांगली चळवळही उभी रहायला मदत झाली आहे. अनुदानाचा येवढा पुरेपूर उपयोग दुसऱ्या कुणी केला नसेल. लक्ष्मण माने आणि भटक्या-विमुक्तांच्या चळवळीला शुभेच्छा.

तुटलेली नाळ

पुणे-मुंबई महामार्ग. गाडीनं लोणावळा सोडला आणि सह्याद्रीच्या रांगांच्या वैभवात मी भान हरपून गेलो. रस्त्यात प्रचंड उतार अन् त्यात पाच पन्नास गाढवांचा ताफा एस. टी ला आडवा आलेला. मी गाढवांना पाहिलं आन् वळकीचं कुणी दिसतं का म्हण निरखून बगाय लागलो. वळखीचं कुणी दिसंना म्हण नाराज झालो. पुढं गेल्यावर आणखी दोन तीन पुट्ठे लागले. त्यातल्या एका पुठ्ठयात हातात लाव्हराची बागर घिऊन दुर्गप्पा चालताना दिसला. तसं मनात फारच हारकून गेलो. दुर्गप्पाला पाहिल्यापासून एक गम्मत आठवली.

दुर्गप्पाचं अन् आमचं बिराड एकत्रच फिरत व्हतं. मी लहान होतो. मूठ-मूठ फोका कापायचो. एकदा आसंच झालं. 'बा'संगं फोकाला गेलो व्हतो. दुर्गप्पाबी व्हता. फॉक कापून झालं. बिंडं बांदलं आन् वड्यापावतर आलो. वड्याजवळ आल्यावर

दुर्गप्पा म्हणाला. "बापूदा, उलीसं टेकू का वझं? पाणी बग कसं नुसतं निवाळसंक हाय. आन शनवारचा माजा उपास बी हाय." 'बा'नं हुंकारा भरला. वजं खाली टाकलं. मला तर काय गुदघुल्याच झालेल्या. समद्यांच्या आगोदर कापडं काढून मी वड्यात पोहायलाही लागलो होतो. 'बा'नं कापडं काडली. पाण्यात उतरला, 'आई, गंगे भागिरथी, काशी' असं काय काय बडबडत चिमणीसारखे न्हाया लागला. त्यावेळी दुर्गप्पा तरुण व्हता. त्याला काय लहर आली अन त्यो खेकडं धराय लागला. पाण्यात खेकडा हेरायचा, खेकडा पाण्यात मुरला का पाणी ढवाळतयं आन खेकडा गाळात जातो. जागा हेरायची आन् बचकन ढवाळलेल्या चिकलात हात घालायचा. हाताला लागंल ते धरायचं अन बाहेर टाकायचं. त्यानं खेकडा बाहेर टाकला का मी त्या खेकड्यासंगं खेळायचा. दोन कोरड्याश्याचं खेकडं झालं तरी दुर्गप्पाचं खेकडं धरणं चाललेलंच. 'बा'नं आंगोळ करून धोतार धुतलं. मदीच तो आमच्या दोगावर खेकसत होता. 'बा'नं धोतराचं एक टोक एका झुडपाला बांदलं. आता 'बा'नं नुसता लंगोटच नेसला होता. दुसरं टोक हातात धरलं. आन धोतराला वारं द्याया लागला. आमी निवांत होतो धोतर वाळंस्तवर बा बोलणार नव्हता. मी खेकड्यांसंगं खेळत व्हतो. खेकड्याला डिवचायचं. त्यानं नांगी वासली का नांगीत काटूक घालायचं खेकडा चवताळून ते काटूक आवळून धरायचा. काटी उचलून वर धरायची, गरागरा फिरवायची अन खेकड्याला मारायचं. मी रंगून गेलो व्हतो. तर दुर्गप्पा खेकड्यांच्या बिळात हात घालत व्हता. तेवढ्यात 'बा'चं धोतार सुकत आलं व्हतं. मी खेकड्याचा नादात होतो. तेवढ्यात तोंडाचा काहीसा आवाज करत दुर्गप्पानं दणकन काहीतरी टाकलं. खेकडा तर नव्हता. पायात वळवळाय लागलं. म्हण उटलो तर दुर्गप्पानं टाकलेला साप माज्या पायात वळवळत होता. मी ठो, ठो बोंबलत बाजूला पळालो. बा पळत आला. दुर्गप्पाला घाम फुटला व्हता. तो पाण्यातन बाहेर आला. 'बा'नं दगडाच्या एका ठोक्यात सापाला मारला. बा म्हणला, 'अळ गपखानी' (अरे गप बस). तवर माजी मुत्री चालू झाली होती. मी जाम घाबरलो होतो. 'बा' मला समजावत व्हता 'रडायला काय झालं. त्यो काय साप हाय. पाण्यात साप न्हातोय? येरुळा हाय येरुळा.' येरुळ्याचा शेपूट हालत असतोच. बा समजावत असतो तर माजं भ्या गेल्यालं नसतं. दुर्गप्पा मोठ्यानं खो-खो हसत मला समजावतो. सारं खेकडं कडाकडा नांग्या मोडून टोपीत भरतो. अन 'बा'ला म्हणतो कसा, 'च्या आयला, मला वाटलं बांबच हाय. अन हे भलतंच निगालं. चांगलं हातभर व्हतं. वाटलं किलो दोन किलो असंल. अन ह्योतर येरोळा निगाला.' बा धोतर नेसला. दुर्गप्पानं आवरलं. आता खरं म्हंजे तसा खेकड्याची टोपली घ्यायलाही मला भीती वाटत होती. तसा भित्राच होतो. पर 'बा'नं दम दिला. म्हण खेकडं हातात घेतलं.

दुर्गप्पाला बगितल्यापस्नं लहानपणाच्या कैक आठवणी डोळ्यापुढं तरळत होत्या

पेण, पनवेल, खोपोली, या गावांशी कैक आठवणी निगडीत आहेत. एकदाचा खोपोलीला पोहोचलो. मनात निश्चय केला होताच. खोपोली ते मुंबई तिकीट गेलं वाऱ्यावर. मुंबईची वाट सोडली अन शबनम अडकवून खाली उतरलो. बिराडं खाली पोचायला दोन तीन तास लागले असते. थोडा येळ निवांत व्हता. कसलीच घाई नव्हती.

खोपोली हेही तसं आपलंच गाव. आपल्याला कोणत्याच गावाचा अभिनिवेश नाही. सारा मुलूख आपलाच. पण खोपोलीत आपलं सारं लहानपण रस्त्यांच्या कडेला गेलेलं. आठवलं तसं तसं भटकायला लागलो. खोपोलीत आता खूप बदल झालाय. आमची बिराडं उतरायची त्या झाडाखाली कितीतरी वेळ बसलो. आई, बा, आप्पा, तात्या कनगी विनतायत. आपून डांबरी रस्त्यावर चकचकीचा खेळ खेळतोय, हे आठवलं. मामीवरचा अत्याचार आठवला आणि शंकर काकाचा म्हातारा बाप म्हंजी माजा चुलत आजा बी हतंच मेला. त्याची लई परवड झाली चार भाऊबंदांनी त्याला रस्त्याच्या कडंलाच खड्ड्यात पुरला. थोडे आठवणीचे कड आले. गोरापान म्हातारा लंगोटी लावायाचा. अंगात आगळपगळ अंगरट. डोक्शाला कोशा, पटका. कानात भीकबाळी. उजव्या हातात चांदीचं कडं. एका पोरावर सारा जलम घालवला व्हता त्यानं. काहीसा तुसडा पण माज्यावर लई जीव. म्हातारा उटला का तीन दगडाची चूल पेटवायचा आन समद्यांच्याई आगोदर 'चा' करायचा. 'चा' सारका प्यायचा. मी त्याचा लाडका म्हण त्यानं चा केला की पयला मला चा द्यायाचा. म्हाताऱ्याचा 'चा' प्यालो नायतर मी हाटून रुसून बसायचो. समदे बिराडकरी म्हाताऱ्याला दादा म्हणायचे. तर मी त्याला 'चानदादा' म्हणायचो. हा माजा चुलत आजा हितंच मेला. पुरलेली जागा आंदूक-आंदूक आठवत व्हती. रस्त्याच्या कडंला पुरलेलं अन त्याच्यावर एक खुनंचा दगड टेवलेला. आता मी नास्तिक झालोय. भुताखेतावर, देव-देवस्कीवर विश्वास नाई. पर म्हाताऱ्या आजाच्या हाडकांना आपणहूनच नमस्कार केला. त्या जागेची थोडी माती उचलून कपाळाला लावली. थोडंसं दाटून आलं. खरं म्हंजे आई-बा असते तर त्यांनी निवद-नारळच केलं असतं. मी नुसतीच कोरडी ठणठणीत माती कपाळाला लावली. थोडा वेळ बसलो. तसाच रस्त्याचा, झाडांचा दगडाचा निरोप घेऊन मागे फिरलो. हाटेलात एक कप चा घेतला आन बिराडांची वाट बगाय लागलो.

दिवस मावळतीला झुकला होता. खांबावरलं, लायटीचं दिवं लागाय लागलं. बगता-बगता सारं गाव लायटीनं खुलून गेलं. माझं मन भूतकाळ व वर्तमानकाळ यांच्या वावटळीत घावलं होतं. चहा घेतानाही चहात बोट बुडवून आजाला केव्हा चहा अर्पन केला होता हेही माज्या लक्षात आलं नाही.

तेवळ्यात 'आगइ्या, आगइ्या' करत गाडवांचं पुट्ठं याया लागलं. तसं आता मला

कुणी वळकत नव्हतं. पण मी वळखत व्हतो ना. माझ्या शिनंची तरणी पोरं पार बदलून गेली व्हती. तर तवाच्या काळात तरणीबांड दिसणारी माणसं म्हसणवाटीच्या तयारीला लागली व्हती. पर तोंडावळा आन तोंडाच्या टाकुळावरनं माणूस वळकायला येतंच. दुर्गप्पा त्यातलाच एक.

बिराडं आली तसा कालवा वाडला. गाडवावरच्या कंठाळ्या उतारल्या, वाकळा उतरल्या. कळंब-कासरं, पटाश्या, म्होरक्या, मुसक्या, मोकळ्या, दोऱ्या सुटल्या. खुंट्या ठोकल्या आणि गाढवं बांदली, कुणी पाण्याला गेलं तर कुणी दुकानाला पळालं. तर एक दोघं बेवड्याच्या दुकानाच्या बोळात घुसले. बायापोरांनी काटक्या कुटक्या येचायला सुरवात केली. कुणी बारीक सारीक कारणावरनं खेकसायचं तर कुणी पोरांच्या पाठीत धपका घालायचं. एखादा वर्दळीला यायचा. मारामारीच हुनार, पर कुणीतरी सोडवासोडवी करायचं. मिटवामिटवी करायचं. उसळलेला कालवा शांत व्हायचा. चुली पेटायला लागल्या, तवं वसाय लागलं. मी बिराडांच्या भवतीनं फिरायला लागलो होतो, तेवढ्यात दुर्गप्पाचं बिराड आलं.

दुर्गप्पा. वय साधारण साठीच्या आसपास. खंगलेला म्हातारा. दातांचं बोळकं झालेलं. डोक्याला टोपी. पण टोपीची रया झालेली. डोकं सारं उघडंच. नुसती चाळणीच्या पट्टीसारखी पट्टी उरल्याली. आमचा अन दुर्गप्पाचा लई घरोबा. तसं दुर्गप्पाबी कैकाडीच. पण त्यो आमच्यातला नव्हं. त्यो माकडवाला. त्यानला कुंची कोरवा म्हणत्यात. आमची त्यान्ची बोली एकच. रीतिरिवाज एकच. त्यांच्याबी दोन जाती : सातपिढे, अन कवाडे. आमच्या बी सातपिढे, कवाडे (सातपिढे, कवाडे कुलांचा आकडा आता माझ्या माहितीने १५०च्यावर गेलाय. या कैकाड्यांच्या पोटजाती). तर सांगत काय होतो. दुर्गप्पा आन आमी कैकाडी. पण त्यो कुंची कोरवा अन आमी कोरवा. तसं कैकाड्यांच्या आणखीन दोन तीन पोटजाती हायत. आमी गाव कैकाडी. गाव कैकाड्यांच्या दोन जाती. कोरवा अन कुंची कोरवा. म्हणजे कैकाडी अन माकडवाले. चोर कैकाड्यांच्या दोन जाती : एक पानलोर–पान म्हणजे आमच्या जातीत साप आणि लोर म्हंजे खेळ. म्हंजे साप गारूडी. ते सापाचा खेळ करत म्हणून ते साप कैकाडी, पानलोर. दुसरे चोर कैकाडी. त्यांना मुडगाळ म्हणतात. मुडगाळ, धोंतले हे सारे आमच्या भाषेतले शब्द अन त्यांचा अर्थ चोऱ्या करणारे. मराठीत उचल्या, भामटा, टकारी, म्हणतात—तर हे सारे कैकाडीच. त्यातही गमती खूप. कोणाचाही कोणाशी रोटी-बेटी येव्हार नाही. सारे रोटी-बेटी येव्हार सातपिढे, कवाडे, मानपाडे, अशा कुळयांवरती ठरतात. मायबाप सरकारचं तर काय सांगावं! 'आंधळं दळतं नि कुत्रं पीठ खातं' तशी सरकारची गत. आंध्रात कैकाड्यांना येरकुला म्हणतात. तिथं ते अनुसूचित जमातीत हायत. म्हणजे आदिवासी हायत. कर्नाटकात त्यांना कोरवा म्हणतात, बजंगी म्हणतात. कर्नाटकात ही जमात अनूसूचित जातीमधे म्हणजे

अस्पृश्य, आणि महाराष्ट्रात तर सारा उजेडच आहे. विदर्भातल्या आठ जिल्ह्यांत कैकाडी अनुसूचित (शेड्यूल कास्ट) म्हणजे अस्पृश्य, तर उरलेल्या महाराष्ट्रात कैकाडी गुन्हेगार जमातीत. एक गंमत आठवली म्हणून सांगतो. नारायण जाधव म्हणून माझे एक पाहुणे आहेत. सोलापुरात रेल्वे खात्यात नोकरी करतात. त्यांची बायको मला बहीण लागते. नारायण आंध्रातला. त्याची बायको म्हंजी माजी बहीन कर्नाटकातली. म्हणजे माजा मेहुणा आदिवासी अन् बहीन अस्पृश्य. अन ते दोघं रहातात सोलापुरात, मुलंबाळं झाली सोलापुरात म्हणून मुलांची जात गुन्हेगार जमातीत म्हणून मुलं गुन्हेगार! असं आहे आपल्या सरकारचं धोरण. हे नुसते कैकाड्यांचं नाय. सगळ्याच भटक्या जमातींची अशी तऱ्हा हाय. या प्रश्नाचा सरकारनं गंभीरपणे विचारच केला नाय. अर्थात तशी कधी गरज वाटली नाय. बोलणाराच्या आंबाड्या विकतात अन् बिन बोलणाराचे गहूही विकत नाहीत.

तर दुर्गप्पाचं बिराड उतरलं. सामसूम झाली. त्याचा थोरला पोरगा कर्ता झाल्याला. पोरांचा लेंढूर बिराडावर खेळत आसतो. दुर्गप्पाची बायको दिसत नव्हती. सून मातर पोरास्नी खेकसत जमीन लोटत व्हती.

मी जवळ गेलो अन् 'नला किरसा दुर्गप्पा खक्षी यंगीर?' असं म्हणालो. (दुर्गप्पा कसा हायस, म्हातारी कुठंय?) तसं म्हाताऱ्यानं वळून माज्याकडं संशयानं पाहिलं. "खग्या लाव थकीसनास बाबा, कानगा टणठणीत किरगा का इल्ला." (लई थकलास गड्या. डोळ्याला दिसत नाय.) मी जवळीक वाढवत गेलो. मी कुणाचा, काय करतो सारं बैजवार सांगितलं. बा, आई, नानी, आप्पा, तात्या, दत्तू, श्रीरंग, जयसिंग्या समद्यांची खुशाली सांगितली. तसं म्हातारा खुलला. समी माज्या पाठची भन. चार पोरांची आय हाय. आन् नवरा गेला मरून. समीच्या जलमाची चित्तर-कथा मी म्हाताऱ्याला सांगितली. म्हाताऱ्याचं डोळं पानावलं. पाच-सात वर्षांपूर्वी जत्रेत आई-बा गाठ पडले व्हते. म्हाताऱ्यानं आठवणीमुळं आवंढा गिळला. वळख पटली. त्यानं जवळ घेतलं. हातातोंडावरनं, पाठीवरनं हात फिरवला. आळबाळं घेतलं. कडाकडा बोटं मोडली. अन् सुनेला 'चा' करायचा हुकूम सोडला.

गवताची टोकं खालनं टोचत व्हती म्हण जरा शबनम मधला वर्तमानपत्राचा कागद टाकला अन् मांडी ठोकून बसलो. आता बदललो होतो तो मी. बोलणं, चालणं उठणं, बसणं, सारंच बदलून गेलं होतं ते माझं—जसा दुर्गप्पाच्या जगाशी माजा काय संबंधच नाय. आणि अजूनही त्याच जगात जगत होता दुर्गप्पा. त्याला बोलतं करावं म्हणून माजा जीव धडपडत व्हता. म्हातारा बोलाय लागला म्हंजी बरं व्हईल म्हणून माजी धडपड चालू होती. म्हातारा बोलता झाला. पंचवीस वर्षांपूर्वीच्या ऐन तरुणपणातल्या साऱ्या आठवणी काढू लागला. त्याच्या तरुणपणातून अन् माज्या नागड्या वयातून म्होरं सरकतच नव्हता. शंकर कैकाड्याच्या बापाच्या मैतीची आठ-

वण झाली तसं म्हातारा रडायला लागला. पारूमामीच्या जल्माचं वाट्टलं झालं. त्यानं म्हाताऱ्याला भडभडून आलं. "कशी चवळीच्या शेंगंवाणी व्हती वग. असराप (अश्राप). अंगा-खांद्यावर खेळवली व्हती. चित्रातल्या भावलीगत. म्हारत्या म्हंजी लई तरास. पोरीच्या जलमाचं वाळवण केलं." गेली बया. म्हातारा पुना रडू लागला.

जवळपास अंधार दाटला व्हता. नाई म्हणायला लांब रस्त्यावरल्या दिव्याचा अंधुक उजेड, चुलीम्होरल्या जाळाच्या लाल झळ्या, अन् आभाळात लुकलुकणाऱ्या चांदण्या सोडल्या तर बाकी सारा अंधारच होता. म्हाताऱ्यानं पाय लांबवला अन् बोलाय लागला. मी नुसता हुंकाऱ्यापुरता व्हतो. पंचवीस वर्षांपूर्वीचं सारं आयुष्य घडाघडा म्हातारा ताजं करत गेला. महागाई, दानत, भिकाऱ्यांच्या अडचणी, माणसांची नेहत. समदं झालं. झरा उपसावा तसं उपसत ऱ्हायलो. मी कुठंच आडवलं न्हाय, की विषय बदलला नाही. रस्त्यात जाणाऱ्या मोटारींचा आवाज अन् विराडावरचा कालवा चालूच व्हता. तेवढ्यात राकेल आणायला गेलेला दुर्गप्पाचा थोरला पोरगा आला. उंचाला, शिडशिडीत, काळासावळा कोय्याप्पा—माझा लहानपणचा दोस्त. आता बदलून गेलेला. ऐन तरुणपणात येताच्या काठीसारखा वाकलेला. खोल डोळ्यांचा कोय्याप्पा येऊन बसला. बरडूनच बायकोला बोलला, 'राकेल आणलंय. चिमणी लावा. पै-पावना आलावं तर अंधारात बसवलं व्हय?' पटकन त्याच्या बायकोनं चिमणी लावली. चिमणी म्हणजे काचंच्या बाटलीच्या टोपनात चिंदूकाची करून लावलेला ढणढणता टेंभा. साऱ्यांच्या चेहऱ्यावर दिव्याचा उजेड पडला. कोय्याप्पा माज्याजवळ येऊन बसला. लांब विराडावर कलांडलेली त्याची पोरगी बापाच्या मांडीवर येऊन झोपली. जवळच कुलांग कुत्रा कोय्याप्पाचा दुसरा पाय चाटत शेपटी हालवत पडला होता.

म्हातारा सांगत असतो, "लक्ष्मणा, आला गावा. आरं बाबा आमी बिनभिकार. भीक बी मिळत नाय. केरसुणी कुणी पुसंना. तवा बरं व्हतं. तुजा बा घाणेरी कापायचा. मी शिंदाडाच्या फांद्या हाणायचो. बापूदा उचलू लागायचा. लई बरं व्हतं."

"म्हाताऱ्या पर ही कुंची कवापसनं करत असत्याल बरं?"

"काय की. वाडवडील करत आले. सनगराला घोंगड्याला खळ लावायला गवताच्या काड्या लागत्यात. ते आमच्या पूर्वजांनं बगितलं अन् डोस्क्यात तेच घेतलं. रानात हारळी नायतर काशा गवताच्या मुळ्या असत्यात. त्या उपटून आणायच्या. भिजवायच्या. बैजवार बडवायच्या. गवताच्या मुळ्या मोकळ्या व्हत्याल. त्या कापून कुंच्या तयार कराच्या. कुंच्या केल्या का सनगराला विकायच्या. त्यानं लोक म्हणाय लागले, कुंचीवाला. तसे आपण सारे कैकाडी. आपल्या मुलखात आपल्याला कोरवी म्हणत्यात. म्हण आमाला कुंची कोरवी म्हणत्यात. आपण समदी कोरवीच. पर कंच्या

तरी डुईत काई माणसांनी आकरीत मांडलं. आपल्या वाडवडलांचा पायंडा मोडला तवाच्या काळी म्हणं. आपल्यात बाया कमी व्हत्या म्हण आपल्यातले काई लोक दुसऱ्या जातीतल्या बाया, पोरं उरसांड घ्याया लागले. जातीची रीत मोडली. आक्करमासे झाले. म्हण त्यानला बाजूला केलं. ते तुमी कैकाडी. तसं आक्करमासे नुसतं कैकाडीच नाई, पानलोर अन् मुडगाळ बी हाय. जातीची रीत मोडली म्हण ह्यो परकार झाला. आमच्यात उरसांड चालत न्हाई. (उरसांड म्हणजे दत्तक. दुसऱ्या जातीचा माणूस) आमच्या बाया लई न्ह्यातीच्या. जातीम्होरं लई झाडाझडती व्हती. त्यानं बाया सुदीनं वागत्यात.

तुळा म्हणून हतंच शंकरदाचा म्हातारा व्हता. लई ओकाळ्या (ओकाळ्या–जात-पंचायतीचा पुढारी, म्होरक्या). धा दिस कज्जा चालला व्हता. यल्लप्पाच्या बायकोचं सनंग लई भारी व्हतं. त्याच्याच चुलत्यासंगं ती व्हती. तसं पायलं बी व्हतं. यल्लप्पानं पंचात वडलं. पंचाम्होरं बाई शाप नाई म्हणली. शंकरदाच्या बापानं ईमान परमान केलं. हतंच पड्याल बिराड व्हतं. शंकरदाच्या आईनं कडाकडा त्याल कडावलं. माह्या बापानं कडईत बंदा रुपाया टाकला. समदे चित्रावाणी उभे व्हते. बाईला कडईतला रुपाया काढायला सांगितला. रुपाया आच्यात कडईतनं निगाला अन् हात नाय भाजला तर ती पतीची, गुन्हा नाशाबीत. पर हात भाजला, हाताला फोड आला तर गुन्हा शाबीत. यल्लप्पाच्या बायकोनं पदर खवला. डोळं गच्च मिटलं आन 'देवा परमेशरा' म्हण हात घातला आन रुपया काडला. आन बोंबलाय लागली. तिचा हात नुसता वांग्यावाणी किरवजला व्हता. नुसता कालवा झाला, 'बाई बेईमान'! यलप्पानं सोडून दिली. आता काय न्हायलं. पर आजून बी आमच्या बाया न्ह्यातीच्या हायत.

" आता व्हती का अशी शिक्षा ? पैलं बुडंल. आता कोण ऐकतंय ? कुणाचा पाय कुणाला न्हाई. समदं उस्कटलं. पर आजूनबी जातीला माणूस भितया. त्यानं सुदीनं वागतया.

" काका, पर कुंचीकडनं केरसुणीकडं कसं वळले ? " मी मूळचा धागा पकडला.

बापे कुंच्या करायचे, बाया इकायच्या, भीकबी मागायच्या. यर प्वाट भरंना कुंच्या करता करता. म्होरं शिंदीच्या फडाच्या केरसुण्या कराय लागले. केरसुण्या करता करता बायामाणसं बारक्या पोरास्नी खेळाय खुळखुळा, पाळणा, सुपं, दुरड्या, बारक्या पोरांच्या खेळायच्या टोपल्या कराय लागले अन् भीक बी मागाय लागले. 'सोन्याची आय, सीताची आय, लेकाची आय, लेकीची आय, वाढ गो माय' म्हणत फिरायचो. बिळोली वाजवायचो. नाचून दावायचं.

" पोट भरंना तवा काय बाय माणसं शिकारी करायचे. आमीबी आजून सकाळचा सैपाक करत न्हाय. सांजचा. चितर, ल्हावरं, बोकं, मांजरं–समदं भाजून

खायाचे. आता कुणी कुणी शिजवून बी खात्यात. पर शिजावलेल्या मटनापरीस भाजल्यालं मटण ग्वाड लागतंय. समद्या परीस मांजराचं, अन् सश्याचं मटन लई नामी. आमची शिकार बी नामी असती. चितूर, लाव्हा, पारवा आमी मारून धरत नाय; जिता धरतो जिता."

म्हातारा एकसारखं बोलत असतो. मधेच त्याचं शिकाऱ्याचं जाळं दाखवतो. त्या जाळ्यात बरोबर पाखरांचं डोकं कसं आडकतं ते दाखवतो. त्याची तार तोडायची न्हाई. गरजेपुरतं एखादा शब्द बोलायचा हे धोरण. मधेच त्याचा पोरगा तांब्यातनं काळळा (दारू) आणतो पाहुंचार म्हण. मी घेत नाय म्हणल्यावर दोगं बापलेक उखडतात. आतापर्यन्त शांत असलेला म्हातारा आईमाईवर येत म्हणतो, "तू बाप्याचा न्हाईस कारे? आरं, आई कंच्या वळणाची, बाप्या कंच्या वळणाचा हं?" मी गप्प बसतो. कोटप्पा म्हणतो, "लक्ष्मणा, आमी येडी माणसं. तू शिकला पर म्हाताऱ्याचा मान ठेव. एका घोटानं काय नाय व्हत." म्हताऱ्याकडं बगत वाटी मी नुसती उष्टावली. मी वाटी खाली ठेवली. म्हाताऱ्यानं तटकन वाटी हिस्कावून घेतली. "शिकला म्हण कारं नेभळट लेकाचा." कोट्याप्पानं तांब्या अर्धा केला व्हता. मी विषय टाळायचा म्हणून दुर्गप्पाच्या पोरीचा विषय काढला, तसा म्हातारा कातवला. डोळं पुशीत म्हणाला, "लेका, ती मेली. सात पोरं झाली, पर एकबी जगलं न्हाय. लई नवस सायास केलं. भुताखेताचं केलं. देवादिकाचं बगितलं. देव-देवरुखी केला. आठरा प्रकार केलं. पर माजी बाई जगली न्हाई. बाळतपणातच गेली. देवाची करणी तिथं आपलं काय चालतं?" म्हातारा लेकीच्या आठवणीनं उदास झाला. मी-ही आंवढा गिळला. लहानपणी ती तशी माझ्या परास चार वर्षांनी मोटी व्हती. आमी संगंच कैकदा भीक मागितली. आई-बानं मारलं तर ती माजी कड घ्यायची. मलाही थोडं दाटून आलं. गाडं मूळ पदावर आणावं म्हणून मी माकडांबद्दल विचारलं. तसं म्हातारा म्हणला, "काय बाय-माणसं दारू काढाय लागली. काय माणसं माकडांना खेळवाय लागली. काय बाय-माणसं खोक्यातनं बारक्या पोरानला चित्रांचं शिनेमी दाखवत भावल्या नाचवत फिराय लागली. प्वाट न्हील तिकडं जायाचं; प्वाट भरंल त्यो उद्योग करायचा. यात चार पैसं मिळंना का दुसरा करायचा. एका गावाला प्वाट भरंना का दुसऱ्या गावाला पळायचं." "दुर्गाकाका, तुजी राधी, भागी कुठं दिसत न्हाई." "लक्ष्मणा, दिस जाया लागले. काळबी फिरला. राधी, भागी दोन वर्सं झालं, गेली. राधी, भागी गेली, त्यांची हाय खाऊन त्याच साली माजी म्हातारी गेली. सारा परपंच उगडा झाला. आता खुरडतोय. तवा नवी माकडं घेतली नायत. मागंदी माकडानला शिकवायचो. राधी भागी नाचायची. खेळ करून दावायची. म्हण आमी माकडवाले. माकडंच आमची दौलत. आरे बाबा, माणसापरीस माकडच बरं. एकदा जीव लावला म्हणजी बिनघ्वार

प्वाट भरतंय. पर आता बरकत न्हाय. म्हण खेळ करत न्हाय. आता लई कष्ट बी व्हत नाईत. म्हण कुत्र्यांनला शिकवतो."

म्हाताऱ्याचा मूड बदलला व्हता.. त्यानं केलेल्या शिकारीच्या कथा. त्याच्या बहादुरीच्या कथा. त्यानं केलेले अचाट प्रयोग. म्हातारा म्हणतो, "सारा जलम खेळ केला. त्यानं जलमाचा खेळ झाला. म्या आसवाल खेळवलं, वानार खेळवलंय, मांजार खेळवलंय, माकाडबी खेळवलंय. समद्या जनावरानला शिकवला. साप तर कंचा बी असूदे. ते जनावर तर लई नामी. एकदा दात पाडला का गरीब गाय. ही मुकी जनावरं. माणसापरास मायाळू, निहीतवार असत्यात." आता दुर्गाकाका जनावरांच्या जगात गेला व्हता. एवढा झकास बोलत व्हता की रस्त्यात पोरं-माणसं गुमान उभी व्हती. मातीत खडं वेचत व्हतो. म्हातारा म्हणत व्हता, "लक्ष्मणा, माजा समद्यात लाडका शंकऱ्या गेला बग, नायतर आता तुला दावला असतो." मला शंकऱ्या माहीत नव्हता. मी जरा सावरून बसलो. म्हातारा म्हणाला, "आसा शाना व्हता, की विचारू नगं. केवढी बी गर्दी असू दे, शंकऱ्या बीनधडक आत घुसायचा माणसांत. बरोबर पाकीटवाला माणूस हेरायचा. गर्दीतल्या माणसाचं पाकीट तोंडात अलगद भाईर काडायचा आण तोंडात पाकिट घेऊन लांब जाऊन ऊभा न्हायचा. कुणी बगीतलंच तर पाकीट खायचा. पाकिटाचा मालक मागं पळाला तर टाकून पळायचा. तशात घावला तर मरस्तवर मारायचे तवा तो विराडात याचा न्हाय. पर सहीसलामत सुटला तर मातर हाळूच कुणी नाई असं बगून पाकीट माज्याजवळ आणून टाकायचा. तर काय सांगत व्हतो. शंकऱ्या लई गुणाचा व्हता बरं. तसं जनावर आता मिळायचं नाई. लई गिन्यानी (ज्ञानी), लई इमानी." आता माजा पुरता गोंधळ झालेला बगून हासत दुर्गाकाका म्हणाला, "लक्ष्मणा, शंकऱ्या आन् माणूस ह्यांत म्या कवा फरक केला न्हाय. माजा पोरगा, नातू, नात, अन् शंकऱ्या–एकच बग. पोटच्या पोरावाणी संभाळला व्हता."

आता मात्र मी पुरता खजील झालो. बरं हा शंकऱ्या कोण म्हणून विचारायची सोय नव्हती. तसं विचारलं असतं तर 'तू कुणाच्या पोटचा रं?' हे ऐकायला लागणार. आपण तुटलोय हे कळत असतं. पुन्हा नाळ जोडणं चालू असतं. म्हातारा म्हणतो, "शंकऱ्या मेला तवा त्याची शिंगं चाकूवाणी झाली व्हती. सागुती केली असती, पर लई लाडात व्हाडला व्हता, म्हण मिठात पुरला. पर तवापासन बोकाड म्हण शिकवायला जीव धजला न्हाय. आण आता उमेद बी वाटत न्हाय. तुज्या म्हाताऱ्यानं फिरायचं कमी केलं. तुमी कमवाय लागला. पोपट्या नोकरी कराय लागला. पर लक्ष्मणा, बापू मोठा नशीबवान बग. आमी का करावं. आमचं हे मागचे दिस म्होरं. आजचा दिस गेला. उद्याचा कुणी बगीतलाय! दिस तर लई वंगाळ याया लागलं. म्हागाई आभाळाला गेली. कोण दारात उभं करतं? न्हाई, आता कष्ट बी होत न्हाईत.

जुलमाचा राम-राम झालाय. समदी झाडाझडती भरल्याविगार, देव सुटनुका करणार न्हाय. पापाचा घडा भरला का जाईल मरून," म्हातारा बोलत असतो. मधीच आठवणीनं रडत असतो, रडवत असतो. माकडवाला, कुंची कोरवा, गाव कैकाडी, चोर कैकाडी, टकारी, भामटा, उचले, घंटीचोर, मुडगाळ, पानलोर सारे कोरवा कैकाडीच. म्हातारा तावातावानं बोलतो. रागावतो. चिडतो.

असेच दोन-तीन तास केव्हाच निगून गेलेले असतात. मधेच पोरानं आणलेली पनवती घेतो. सुनंनं, लेकानं आणलेलं शिळंपाकं, तार तुटत असेल असं खंग झालेलं तुकडं मीठ पाण्यात भिजवून खातो. मी जिवावर उदार होऊन तुकडा मोडतो. माझ्यासाठी चूल पेटवून भाकरी करावी, कोरड्यास करावं असं दुर्गाकाका सुनंला सारका सांगत असतो. मी उठेपर्यन्त असा सैपाक होत नाई. अंधारात चाचपडत म्हातारा तुकडं मोडतो. अंगातल्या हाडांत आता ती रग उरलेली नसते. जगत असतो, जीव जात नाई म्हणून—

मी उठलो. निरोप घेतला. म्हातारा उजेडापर्यन्त सोडाय आला. कोट्याप्पा नको नको म्हणत असतानाही झोकांड्या खात, म्हाताऱ्याला अचकट शिव्या देत स्टॅन्डपर्यन्त आला. 'आता काय करतोस?' कोट्याप्पा म्हणाला, "भागत नाई, गरीबी जात नाई, मुंबईला धाबीस जातवाले हैत. ततंच जाऊन न्हाईन म्हणतो. म्हाताऱ्याला आता व्हत न्हाई. आपूनबी काय बाय करावं भीक मागावी म्हण मंबई बरी. तू जरा कामधंदा मिळंल का बग की. मी मानेनंच होकारतो त्याचा निरोप घेतो. मिळेल ती गाडी पकडतो. आता गाडी मुंबईच्या वैभवाकडं निगालेली. वाटेनं नजर लागावी अशी मुंबापुरी. स्वप्नसुंदरी सारखी, दिव्यांच्या झगमगाटात झोपलेली. तर खोल खोल आत काळा-कुट्ट काळोख–जिथं दुर्गप्पाच्या म्हाताऱ्या दाढा फोडत असतात इटकं शिळं भाकरीचं तुकडं, रस्त्याच्या कडंला बेवारशी कुत्र्यागत.

●

गिरजाक्का

गिरजा अक्का तशी आपल्या लहानपणापास्नं आपल्याला वळकीची. तसं आपुन तिच्या आंगाखांद्यावर खेळल्यालू. बऱ्याच बिराडासंगतीनं तीजंबी बिराड असायचं. पर तवा गिरजा आक्का म्हंजी, सूर्याला म्हणायची उगवू नगं आन चंदराला म्हणायची मावळू नगं. पालावर आली की, आईची लई हूलघाल व्हायची. कुठं ठिवू आन कुठं नगं असं व्हायचं. तर गिरजा आक्का आईला म्हणायची, "वइन्स, तीन कप गलासी गंदारी बाय, शिक्यावर दही आन दैवात न्हाय. आसं नशीब रांडच्य लई द्वाड तथं दुसरं कोण काय करणार? आन्ये तुजं लई बरं हाय. आज बापूदा त्येला तरी मारत तरी न्हाय. पर माझ्या हाडाची काडं झाली. नुसतं ठेचा झालाय." त्यावर 'काय करावं बया आपले नशिबाचा भोग' आन आसंच कितीदा तरी दोगीचं चालू असायचं. मी ऐकत असायचो.

वावटळीनं पाला उडावा तसं कापूर उडल्यावाणी मदली सालं उडाली व्हती. कवाबवा आईच्या बोलण्यात यायचा तीचा इशय पर तेवढाच. पर एका सोमारी लईच घोळ झाला. आपला कार्यक्रम म्हंजी भाषण आसतया सोलापुरात. भाषण झालं तर भाषणाला लई मानसं येत्यात. कवाबवा वळकीची बी असत्यात. तर म्हाद्याबी आल्याला. भाषण झालं, अन पोरांची सह्यानला रेटारेटी झाली. नुसती मुरकुंड वळल्याली. त्यातच म्हाद्या तसा उलीकसा तुटाकच उभं राहून बगत व्हता. मीबी कान्या नजरनं बगत व्होतो. पर दोगंबी चिंतागती पडल्यालू. त्याची माझी एक-दोन डाव नजरानजर झालीबी. पण त्यो काय बोलंना, आन माझ्या भवतीचा गराडा काय हटंना. त्यो तथं ताटकळल्याला. आकिर गर्दी हाटली. अन मी उठलो. आता कार्यकर्त्यांचा घोळका आसतू. म्हाद्या बराच येळ गप व्हता. पण कार्यकर्ते बोलाय लागलं तसं समदं आवसान गोळा करीत म्हाद्या म्हणतो कसा, 'लक्षा निंक आय बुटीरा' (लक्षा, तुला आईनं बोलावलंय.) मी वळक पटल्याचं लक्षात आनायला त्याच्या भाषेतनंच इचारपूस केली. तर म्हाद्या गिरजाक्काचा थोरला पोरगा. तसा पयल्यापास्नं उचल्याच, पर आता दिसत तर चांगला व्हता. कार्यकर्त्यांचा घोळका हाटला आन गिरजा आक्काला भेटायला तिच्या बिराडावर गेलो.

तीजं बिराड सोलापुरातल्या रेल्वे टेसनाच्या बाजूला. रस्ता, रेल्वेरूळ अन गटार ह्याच्या बेचक्यात विनभिकारांची पाचपन्नास पालं पडल्याली. येळ तशी रातची अन लक्षा लई मोठा झालाय, त्यो कशाचा इतूया म्हण बिराडावरलं सारी माणसं झाकूपाकून कल्यांडल्याली. तर म्हाद्यानं हाळी दिल्याबरुबर गिरजा अक्का धडपडत उठली. बसायला टाकलं रकटं अन गालाचा मुका घेत हाताची बोटं कानशिलावनं उतरवून कडाकडा मोडत तोंडातल्या तोंडात पुटपुटायला लागली. मी बगत व्होतो. मधल्या इस वर्षानं आक्काचं पार बांगं भाजल्यालं आसतया. तवा गिरजा आक्का चवळीच्या शेंगंवाणी खुडून खावी तसी नुसती देकनी. आज इस वर्षांत तिच्या कंबरंचा काटा न् काटा ढिला झाल्याला. म्हाद्याच्या बायकूनं तवर च्या केला. तर म्हाद्या खिंजाळला. आसा च्या द्यायला मी परका नव्हतो. पर त्याला गिरजाक्कानं दाबला. म्या म्हाद्याच्या बाची इचारपूस कराया लागलो तसं गिरजाक्का दातव्हट खात म्हणती कशी, "त्याजी गेली डोली वडयाला. त्याला खाल्ला पिलिगानं. त्याजं म्हसनवाट्यात तीन दिसाचं जेवलू. त्यो न्हेला तीकडं तीन वाटंला. त्याजं नाव नकू काडू." मी गप्प झालू. पर त्याजी माहिती पायजी तर व्हतीच. मी जरा येळानं पुन्हा म्हाद्याच्या बावर घसरलो. आता जरा मी बी त्वांड सोडलं त्यावर. तसं आक्का सुतावाणी सरळ झाली. आक्का सांगत व्हती तीजी ममईची गोष्ट. म्हाद्याचा बा म्हंजी 'गावा' (आमच्या भाषेत बापाला गावा म्हणत्यात.). आक्का सांगत व्हती. " बिराडं मंबईला व्हती. अन तवापास्नं ह्यो जे त्वांडं काळं करून गेलाया त्यो आज दहा वर्सं

बेपत्ता हाय. मग हाया का मेलाया कुणाला ठावं. " झोपडपट्टीतल्या दादासंगं असायचा. गिरजाक्का शिळंपाक मागून आणायची. पोरं जगवायची. पर हा नुसत्या गटाळ्या घालायचा. मूत प्यायाचा अन ह्यांजं उचल, त्यांजं उचल, आसलं धंदं करायचा. आक्क्या झोपडपट्टीत त्याच्या नावानं बोंब चालू असायची.

बोलता बोलता गिरजा अक्कानं गहिवर घातला व्हता. आठवणींचे कड दाटून आले होते. गिरजा अक्का कडा कडा बोटं मोडत हाताचं तळवं वासत नवऱ्याला शिव्याशाप देत होती. तीजा सारा तळतळात बगत व्हतो. ती सांगते, आमी झोपड-पट्टीत व्हतो तवा परपंच कसा नामी व्हता बग. म्हाद्याचा बा लई माया करायचा. राकीश आला, म्हंजी कुदलायचा. पर तेवडंच. तेवढी येळ गेली का मऊ सुतावाणी व्हायचा. म्या किडूक मिडूक काय करत, पर लई करून कष्टाचे काम करत नव्हते. पहाटे उठायचं. रसायनाचं डबं काढायचे. एका डब्याचं त्वांड फोडायचं. डबा भट्टीला आलाय का ते हेरायचं. भट्टीला आलेला डबा बाजूला घ्यायचा. त्याच्या तोंडावरलं तटकारं काढायचं. त्याज्यात नवसागर घालायची. नवसागर घातली का डबा लवकर निगतोय. आपल्या हिकडं देशावर, हिवराची, खैराची साल मिळतीया. मंबईत न्हाई. सालंचा दुष्काळ. म्या दोनपाराची गेली धारबीला, म्हंजी सांजची मागारी यायची. चांभाराच्या कातडयाला लागती न्हवं, असली ती सालं, चार-आठ आणे दिवून आणायची. ती भिजवायची. न्हायल्यालं चोथा काडायचा. पाणी रसायनाला लावायचं. म्होरचं समदं तुला ठावंच हाय. म्या कणीक मळायची अन म्हाद्याचा बा भट्टी लावायचा. दिस उगवायला पैला डबा निगायचा. दिस उगवला का म्हाद्या, सकी, बबी समदी पोरं गिऱ्हाईक बगायची. म्हाद्याचा बा नुसता भट्टीवर आन म्या गल्ल्यावर असायची. लई झकास चाललं व्हतं बग. कवाबवा पोलीस यायचे. मारझोड व्हायची. पर कुणाच्या डोळ्यावं आलं नव्हतं. वर्स-दोन वर्सं चांगल चाललं. पोलीसांचं हप्तं बैजवार देत व्हतो. झोपडपट्टीच्या दादाला हप्तं देत व्हतो. पाण्याचा पैका पाण्यावाणी जात व्हता. पर खाऊन पिऊन सुखी होती.

" म्हाद्याचा बा आता लईच पेत व्हता. पेला म्हंजी चार-चौघांला घिवून पियाचा. घराचा नुसता तमाशा व्हायचा. त्यात याक इपरीत झालं. सारखा धुमसायचा आपला ह्यो येपार (व्यापार) वाईट. गेला म्हंजी चार-चार दिस यायचा न्हाई. आला की समदं हुडकायचा जरा संशय आला का बदडून काडायचा. म्या बायामाणसानं येवडी परजा (प्रजा) जगवली. त्याचं लक्षाण ठीक नव्हतं. म्या कष्ट करायचे. मारबी खायचे. परपंचाचा गाडा बी वडायचे. काव इवून गेला व्हता. मारामाऱ्या तर पाचबीला पुजल्या व्हत्या. समद्या झोपडपट्टीत खिशात पैसा आसंल त्यो दादा व्हतो. आता म्हाद्याच्या बाच्या खिशात पैका आला. कुणाच्या बी आया भनी म्हणंना. समदं माज्या म्होरं चाललं व्हतं. पर म्या उरावर

धोंडा ठिवला व्हता. गप गुमान बगत व्हते. नायतरी बायामाणूस काय करतं ? अशी मस्तकाची शिर हालायची का टकुरात धोंडा घालावा असं वाटायचं. पर कुंकवाचा धनी. घाण्याच्या बैलावाणी सारं वडत न्हायचं समदं. सोसत व्हते. पर आब्रूवरचा डाग जीव गेल्या सोसायचा न्हाय. त्याजी आकल पाण्यात गेली व्हती. त्यो गु खात व्हता. त्यानं त्याला सारी दुनिया तशीच दिसत व्हती. म्या लई ऐकून घेतलं. पर नगंनगं ते बोलला. त्यानं माजं मस्तक फिरलं. रागाच्या भराट्यात खोपटात वडला म्हाद्यानं न् मी. लई हाणला. ततंनं तर तो लईच बह्याकला. आता धंदा बसला व्हता झोपड-पट्टीतल्या जगनसेठकडं राबता वाढला व्हता. दोन डब्यावरनं पाचपंचवीस डब्यांवर त्यो गेला अन् आमच्या तोंडात माती पडली. आमी पाच डब्यांवरनं एकावर आले. जगनशेठच्या माणसांनी म्हाद्याच्या वाला जीव जाईस्तवर मारला अन् पोलिसांच्या ताब्यात बी दिला. त्याला दोन महिनं सजा झाली.

"म्या गाडा वडत व्हते. दोन महिन्यानं म्हाद्याचा बा सुदीनं बागंल म्हण म्या टकरा देत व्हते. पर कशाचं काय आपल्या कर्माचा भोग. त्यानं झोपडपट्टीतच दुसरी रांड ठेवली व्हती, तिज्याकडंच न्हाया गेला. रोजचा कज्जा. त्यानं जलम नको झाला व्हता. म्हाद्या एक दिशी बोंबलत आला. म्हाद्याच्या बाची रांड म्हणत व्हती, 'तुजा बा आठ दिस झालं गप झालाय. तुज्या आईला सांग.' म्या कर्माला बोल लावला. सवतीसंगे महिनाभर हिंडले. हितं आसन, तितं आसन, जीव तकतकला पर म्हाद्याचा बा ज्ये तोंड काळं करून गेला त्यो परत दिसला नाय. आमच्यासाठी त्याला जगबुडीच झाली. जगला का मेला, त्याजं काय झालं, ते एका परमेशराला ठावं. पर माज्यामागं भुंगा लावून गेला व्हता." मदेच म्हाद्या पूरतवणी जोडत व्हता, "जाऊंदे आय, कोळसा उगळून काय उपेग ? सटवीचा टिका चुकायचा नाय." गिरजा आक्का आठवणींच्या डोहात पार बुडून गेली व्हती.

"तर पावसाळा जवळ आला व्हता. म्हाद्याचा बा फरारी झाला तवा मला दिस गेल्यालं व्हतं. म्हाद्याच्या पाठीवर चार झाली. त्यातली दोन जगली, दोन पावली. सावं पोटात व्हतं. अन् अशा टायमाला आवगडली सवगडली बाय सोडून बाप्या गेला. ज्यो गेला त्यो गेलाच. का करावं ? हे काय केल्या सुचंना. जिवाचा चेवंडा झाला व्हता. आण परपंचाचं खोबरं. पाऊस तोंडावर आला. मी अशी आवगाडल्याली. परमेशराला घोर. हाटभट्टीचं काम बायामाणसांचं न्हाई. झाडाचा आदार आसला म्हंजी येल वर जाई, न्हाई तर नुसती फरफट. भीक मागायची अन् पोरं जगवायची. पर पावूस-काळ आला. आता काय करावं. म्या इचार केला. जीव घट केला. शेजारपाजारची माणसं पोरानला अन् बिराडाला बगत्याला, पर रोज कोण बगंल ? म्हाद्या समद्यात मोटा. मिसरूड फुटत व्हता. चौदा पंधरा वर्सांचा आसंल. त्यानं बाकीच्या पोरानला जगवावं, भीक मागाय शिकवावी. शेजारची रक्मी चांगली व्हती. तिज्या आधारानं

हतंच न्हावं, असं चाललं व्हतं. मुंबईला जीव किकला व्हता. पर पोरं जगवायची, म्हाद्याचा गावा (बा) हुडकायचा म्हण माजा पाय निगत नव्हता-

" दिस असंच चालल्यालं. एखाद दिशी झोपल्या झोपल्या मनात इचार केला. समदी पोरं निजली व्हती. जिवाचा त्योग आला व्हता. उठले अन् भरा भरा भरा निगाले. कुठं निघाले व्हते, ठावं नाय. झोपडपट्टी सोडली, मोठ्या रस्त्याला आले. सारखं जीव घ्यावा म्हण इचार करत व्हते. एकदा तर मोटरम्होरं आडवं पडावं, जीव द्यावा म्हण इचार पक्का केला. आण अशी मोटारम्होरं पडणार तेवढ्यात पोटात कालवलं. मी गप उभी न्हायले. देवापरमेशरा वाचवलं रे वाचवलं, नाईतर माज्या पोरा-बाळांना जगबुडी झाली असती. गेल्या पावलानं मागं फिरले. बया अशी कशी बुध्या झाली. म्या गतकाळी, पोराठोरांचा लेंढूर देशोधडीला लागंल. माणूस आपला जोडा संबळल पर लोकाचं पोर संबळायचं न्हाय. आन म्या तर निगाले व्हते पोरांना सोडून. पोरांची आठवण होताच लई कालवाकालव झाली. पळतच म्या खोपटात आले. तवर पोरांनी सारी झोपडपट्टी डोक्यावर घेतली व्हती. म्हाद्या येड्यावाणी 'आग आयो, आग आयो,' करत हाका मारत पळत व्हता. बारकी पोरं त्याज्या मागं. समदा कालवा झाला व्हता. म्या समद्या पोरानला गोळा केलं. म्हाद्याला समदं बैजवार सांगितलं. आता म्हाद्याला कळत व्हतं. माझ्या जिवाला एकच घोर व्हता. या बाळतपणात जर मी गचाकले तर माझ्या पोरानला कोण ? सारं वाऱ्यावर उधळलं जाईल जिवाची उलघाल चालू होती. किडूक, मिडूक सारं इकुन झालं व्हतं.

" रकमी आपल्यातलीच. आमची चार बिराडं मुंबईला संगंच गेली व्हती. भनंवाणी जीवाला जीव द्याची. तिज्या हवाली पोरानला केलं. तिला म्हणले, ' रकमे, माज्या पोटचं गोळं तुज्या जिवावर सोडते. माजी पोरं महिना दोन महिना सांबाळ! जर जगली तर पावली, नाईतर बुडाली. आता मला कायतरी इलाज केल्या बिगार निरवा नाय. मी दोन-तीन महिण्यानं मागारी ईन पावसाळ्यात. समदीच मरण्याबिगार निदान माजा जीव वाचंल. बारक्या पोराचा जीव वाचंल. अन् परमेशराच्या किरपेनं सारं चांगलं व्हईल. पर मी जर इथं न्हायलें तर दुष्काळात तेरावा महिना. माजा म्हाद्या काम करलं.' मी म्हाद्याला सारं बैजवार सांगितलं. 'भागतं का नाय ते, आठ-चार दीस बगा. नाहीच जर भागंना झालं तर तुमीबी माज्या मागोमाग या.' असं रकमीला अन् म्हाद्याला सांगितलं.

" देवाम्होरं गेले. पोरानला बोलावलं. गुलाल बुक्का व्हायला, पोरांच्या कपाळाला लावला. पोरं देवाच्या हवाली केली. देवा परमेशरा, मी उगडी पडले, आता तूच निवारा. पोरानला सोडलं. कासटां घातला. साऱ्यांचं आळंबाळं घेतलं. एकडाव समद्यास्नी डोळं भरून बगीतलं. पोरं बावरली व्हती. रकमीनं साऱ्यांना जवळ घेतलं, अन म्हणली, " गिरजे, जीव बारीक करू नगं. आमी दोन महिने काढू. तू गुमान जा. तू

नाईच आलीस तर माजी दोन तशी तुजी चार सांभळीन. तू चार सा महिण्यानं ये. आण न्हाईच आली तर माजी पोरगी तुज्या म्हाद्याला दिली.' म्या रकमीच्या गळ्यात पडून रडले. जीव मोठा केला अन् माणसांच्या घोळक्यात दिसेनाशी झाले."

गिरजा अक्काला पोलीसांनी पकडली, तवा तिज्या जीवात जीव आला. तिनं पाल सोडलं तवापासनं ती वाटच बगत व्हती. पोलीसांच्या गाडीच्या म्होरंच एका रुबाबदार माणसाच्या खिश्यात तिनं सरळ हात घातला. बोंबाबोंब झाली. गिरजा अक्काला मुद्देमालासह पोलीसांनी अटक केली. गिरजाक्काचा जीव भांड्यात पडला. तिनं जबानीत गुन्हा कबूल केला. पोलीसांनी तिला कोर्टम्होरं हजर केलं. गिरजाअक्कानं गुन्हा कबूल केला. सरकारी वकीलानं तिला कडक शिक्षा करण्याबद्दल सांगितलं. कोर्टानं तिच्याकडं पाहिलं. त्याला दया आली. ही आवगडलेली बाई. हिला किती शिक्षा करावी, कोर्टाला कळेना. 'एक महिना सक्त मजुरी अन् १०० रु. दंड. आन् दंड न्हाई दिला तर आणकी आठ दिवस सक्त मजुरी.' अशी शिक्षा सांगितली.

जशी शिक्षा ऐकली तशी गिरजाअक्का मोठ्यानं भवत भवतळून रडायला लागली. "सायेब, तुमच्या पाया पडती. सायब माझ्या गरिबावर दया करा. सायब कायबी करा पर आणकी दोन महिन्यांची शिक्षा लावा. सायब माजी हात जोडून इनंती हाय. सायेब वाट्टंल ती करा पर सायेब आणकी दोन महिने सक्तमजुरी लावा सायेब. पावूसकाळ जवळ आलाय सायेब. माज्या पोटातल्या लेकराला अशीरवाद द्या सायेब," म्हणून इनवायला लागली. ह्यो जगावेगळा कैदी बगून सायबांचा जीव कळवळला. आतल्या आत कालवलं. कोर्टाची येळ झाली. पोलीसांनी तिला ठेसनात नेहली. सायबाचा पोलीसानला फोन आला व्हता. गिरजाअक्काची कलमं बदलली. पुन्हा कोर्टम्होरं उभी केली. कोर्टात तिला नव्या कलमात चार महिन्यांची शिक्षा लावली. तवा गिरजाक्कानं कोर्टम्होरं हात जोडले. आन हसत हसत कोर्टातनं बाहेर पडली.

म्होरं चार महिन्यांची सजा संपली. पोटातलं लेकरू काय जगलं न्हाय. पर पावूस काळ निवला. पुन्हा बिराडं. खोपोलीत धावली. रकमीनं पोरानला संभाळलं व्हतं. तिनं म्हाद्याला वळायला, इकायला शिकावला व्हता. म्हाद्याबी लई धीराचा. चार लहान भावंडं आन बिराडं, आईच्या मागंबी चार महिनं त्यानं सांभाळली. रकमी म्हणली, "तुजा जीव वाचला न्हवं, बास झाला. आता कुकू पूस अन मर्दाबाणी पोरं मोठी कर." गिरजाअक्कानं कानाला खडा लावला आन तवापास्नं पोरानला सोडून कुठं जात न्हाय.

रात बरीच झाली व्हती. बिराडावर समदा अंधार व्हता. पोरं लेकरं गोदड्यावर पडली व्हती. पोरांच्या अंगावर रकटं आसतं, तर गिरजाक्का तशीच नुसतं आभाळातल्या चांदण्या मोजत बसल्याली आसती. "आईला जाऊन लई दिस झालं. तवा

आईला आन 'या'ला पूसी पुनवला जेजुरीला धाड. म्हंजी, आनवरीची गाठ पडंल", म्हण निरूप द्यायला सांगितला. मी उठलो. निरोप घेतला. रेल्वेच्या रुळावरल्या लाइनी-पतूर म्हाद्या, त्याची बायकू, गिरजाक्का आन बाकीची दोन-चार माणसं मोठ्या वाटं-पतूर मागंमागं आली. मी समद्यांचा निरोप घेतला. आक्का पुन्हा पुन्हा आईला पाठव म्हणत असते. आणि मी हो हो करीत आंधारात गप गुमान समद्यापास्नं लांब लांब मानसांच्या वस्तीवर झराझरा निघालेला असतो. मागे वळून पहायची हिंमतच होत नाही. सारा अंधार गिळायला उठलेला असतो.

●

बळी आणि बळींचे बॉस

खंडाळ्याचा घाट उतरलं की डोळ्यात वारं भरायला लागतं ते पंचवीस-तीस वर्षांपूर्वीचं. आपण त्यावेळी याच रस्त्यावरचे राजे होतो. सारा रस्ता चढउतारांसह पाठ. पण पूर्वी बसायला गाढव असायचं. मोठं नामी जनावर. अपघाताची भीती नसायची. उतार आला की, मागच्या पायांवर कलावं. चढ आला की, बानं गाढवावरनं उतरावं. कुठेही गेलो तरी वस्ती रस्त्याच्या कडेला. बिऱ्हाड लावलं की, आपला ठिकाणा रस्त्यावरच. रस्त्याच्या खुणांचे दगड म्हणजे आपले सगेसोबती. त्यातल्याच एखाद्याला म्हसोबा, विरोबा, येताळ, काळूबाई करायची, त्यालाच खोटखोटं देऊळ बांधायचं. तिकडं आईचा घसा बसला तरी बेभान होऊन याच रस्त्याच्या कडेला आपली ही बासारखी जत्रा, देवरसपण व्हायचं. सरावानं सहज मागंम्होरं बगत रस्ता सरड्यासारखा ओलांडायचा.

मनात आलं की भराभरा अंगातल्या सदऱ्यानं रस्ता झाडायचा. सारा फुफाटा नाकातोंडात घुसायचा. मातीतले हात पाय आणखीनच धुळीनं माखूनच जायचे. एक अवतारच व्हायचा. रस्ता झाडला की काळाकुट्ट व्हायचा. रस्ता काळा झाला की जीव हलका व्हायचा. काय करू नी काय नको व्हायचं. गबागबा लोळायचं. पुन्हा बसायचं. पुन्हा उठायचं. पुन्हा माती आणून टाकायची. पुन्हा झाडून काढायचं.

घाट उतरू लागलो की २५ वर्षांपूर्वीचे ते खेळ, माणसं, सखेसोबती, कोंबड्या, जनावरांसह डोळ्यापुढं सरकायला लागतात. त्यातनं खाडी पूल ओलांडून पुढे निघालं की, मुंबईची मायावी रूपं दिसायला लागतात. पट्ठे बापूरावांच्या त्या लावणीची सारखी आठवण येते :

मुंबई ग नगरी बडा बाका ॥
जसी रावणाची दुसरी लंका ॥

या लंकेत पोटाच्या मागे लागलेले अनेक भटकेही वस्तीला. राजपारधी, पालपारधी मसणजोगी—साऱ्या अठरा पगड जातीचे लोक फूटपाथवर, झोपडपट्ट्यांत, कुणाच्या वळचणीला, पुलाच्या वळचणीला, जिथं घावंल जागा तिथं रेटारेटीत आपल्याही ६'×३ ची जागा केलेली. आपल्याही डोळ्यात अशीच रेटारेटी चालू असते भटक्या विमुक्तांच्या प्रश्नांची.

भटक्या विमुक्तांची चळवळ तशी आता गती घेते आहे. मुंबैतल्या परिषदेच्या निमित्तानं असाच भटकत होतो. वाड्या, वस्त्या, तांडे, झोपडपट्ट्या, फूटपाथ, रस्त्याच्या साईट पट्ट्या, खाडयांची दलदल—कार्यकर्ते नेत असतात. त्यांच्या मागं मागं फिरायचं, लोकांशी बोलायचं. दादरच्या एका पुलाखाली दुपारी पोहोचलो.खरं म्हणजे ही तशी जेवणाची वेळ नाही. दिवस कललेला. पुलाच्या वरनं वाहनांची प्रचंड गर्दी आणि कोलाहल. सभोवार माणसांचा महापूर. पुलाखालच्या या पारध्यांचे सारे कसे बिनधास्त चाललेले असते. तीन दगडांच्या चुली ढणढणत असतात. रद्दीच्या कागदांनी चुलीवर कायबाय शिजत होतं. बाया चुलीच्या म्होरं कोंडाळ्यात बसलेल्या. बापे कुणी कलांडलेले, कुणी बसलेले, तर कुणी जेवत होते. आम्ही गेलो तसे बाप्ये उठून बसले. पोरांचा कालवा विरला. सारी चिडीचाप. बायकांनी पोरं काखेला मारली आणि त्या तुटाक जाऊन उभ्या राहिल्या. म्हातारी माणसं पाय काढू लागली. बघता बघता सारी माणसांची पांगापांग झाली. सगळे आपण त्या गावचेच नव्हे अशा थाटात चिंध्यांची गाठोडी, एखाद-दुसरं जरमनचं भगोलं, एखाद-दुसरी वाकाळ, एखाद-दुसरा तांब्या, वाटी—बघता बघता सारं बेवारशी झालेलं. आसपासच्या दुकानाच्या फलाटावर माणसं बिस्कटलेली. कुणीही जवळ येत नाही. आम्ही तिथच ठिय्या मांडतो.

जिवल्या रकमा तसा मध्यम वयाचा माणूस. खाली मान घालून बसलेला. आमच्या डोळ्यात क्रांती झालेली. आम्ही मारे तावातावानं बोलत असतो. पण त्याचा चेहरा

मख्ख. बराच वेळ एकतर्फीच बडबड झाल्यावर जिवल्या बोलला, " हमाला वाटलं मालक हे." पुन्हा जिवल्या गप्प. आम्ही बराच वेळ बसलोय हे बघून, गेलेली माणसं जमू लागली. आणि चर्चा सुरू झाली. आठ आण्याला पाण्याची बादली तर चार आणे संडासला द्यावे लागतात. मुंबईतले बहुतेक पारधी तर फूटपाथवर. मुंबईतल्या झोपडपट्ट्याही त्यांना आसरा देऊ शकल्या नाहीत. पोरं कळती झाली की, आई-बापाबरोबर कागद, काचा, बूट, सँडल गोळा करू लागतात.

सावूबाई सांगत असते, " तसा कवा तरी चूल पेटवतं बग. पोरं लेकरं रडाय लागली म्हण कवाबवा लावायचा भात उलीकसा. नायतर चार घरं मागायची, खायाचं. "

पुलाखाली पन्नास-साठ लहान पोरं लेकरं असतात. शाळेत कुणीच जात नाही. " शाळेत घालायचं तर जन्म तारखेचा दाखला कुठनं आणनार ? शाळेत घालायला पैका कुठनं आणनार ? आन् पोरानला पाठवून पोटाला काय बिवा घालणार ? समदी चार घरं मागतू, चिंध्या–कागद गोळा करतो म्हणून खातू." यांची तशी वीस वर्षं तरी मुंबईत लोटली, पण अद्यापि झोपडपट्टीत जागा नाही. आणि या पुलाखाली गेली तीन-चार वर्षं राहतात तर कुणीतरी मवाल्यांची गँग नुसता दम भरून महिन्याला डल्ला नेहत असते. मगाशी सगळी मंडळी उठून गेली ती या दादांच्या भीतीनंच.

दादरच्या पुलाखालची वस्ती काय आन रूपम टॉकीजमागच्या दांगटांची वस्ती काय. तिथं पोहोचलो तर रात्रीचे सात-आठ वाजले असतील. रेणके बाहेरनंच हाक मारतो. " लक्ष्मीबाय हाय का ? " जसं लक्ष्मीबायचं नाव घेतो तसं एकच धावपळ सुरू होते. लक्ष्मीबाई दांगट घाबरत बाहेर येते. हात जोडलेले असत्यात. जवळ येऊन रेणकेला, " पाया पडते पर बाबा काय किटाळ आनू नगं. तू म्हणलास म्हण म्या बोल्ये तर माझंच चुकलं, " असं म्हणून बाईनं रेणक्यांचे पाय धरले.

रेणके तिला उठवून विचारू लागला. बाई रडत असते. मला काहीच समजत नसते. तिला वाटतं मी पोलिसवालाच आलोय. त्याचं असं झालं– परिषदेच्याच निमित्तानं बाळकृष्ण रेणके यांनी "मुंबई सकाळ"मध्ये भटक्यांच्या व्यथा सांगणारा लेख लिहिलेला. त्यात दांगट समाजातल्या या लक्ष्मीबाईची व्यथा असते आणि फोटोही असतो.

तर तो फोटो पाहिल्यापासून बाईला अन्न गोड लागेना का पाणी गोड लागेना. साऱ्या झोपडपट्टीनं बाईला घाबरून सोडल्याली. " लक्ष्मबाय आता बस करमाची

फळं खात. तुला पुलिस जेलात नेहत्यात. तुझं नाव आता म्हाजूर झालय. तुझं झोपडं जानार आन् आमचं बी जानार." लक्ष्मीबायचं धाबं दणाणलेले. "कुठनं देवानं बुध्या दिली आन म्या बोल्ले बया. माझी पोरं लेकरं उगड्यावर येत्याल, का करावं?" म्हणत लक्ष्मीबाय रडत असते. झाला प्रकार पाहून मी आणि रेणके बाईला समजावत असतो.

तेवढ्यात दुसरा पोरगा सांगत असतू, "सायब, आताच्या आता निगा. आमचा बॉस लय पिसाळलाय. आता ईलच बया." बॉस शेजारच्या थेटरात तिकिटाचा काळाबाजार करायला गेला असतो. तो आला की पंचायत. लोक नुसत्या सावलीनं थरकापत असतात. आता पेपरात नाव नको म्हणून कुणी बोलत नाही. एक तरणी बाई म्हणती, "आता फुटू छापायचा तर आमच्या बॉसचाच छापा. अन् मंग आमचा छापा . न्हाय तर कालच इथं तमाशा झालाय, पुना व्हाया नगं!" खुलाशावर विचारल्यावर समजलं ते असं: "हाथं झोपडपट्टीत दुसऱ्यानला येवू दिलनं कसं, मला इचारल्याबिगार कुणाचं काय ऐकायचं न्हाय. आसं झालंच कसं?" म्हणून बाचाबाची सुरू झाली. त्याचा परिणाम म्हणून चाकूनं एकाची मांडी वांगं चिरावी तशी चिरली. एकाला किरकोळ लागलेलं. दोघेही खाजगी दवाखान्यात असतात.

तर हा बॉस म्हणजे झोपडपट्टीचा दादा. जोशी समाजातला. पण त्याचं आसं वेगळं जग असतं. तो तेथल्या विभागातल्या आमदाराला धरून असतो. त्याचा एरिया ठरलेला आहे. त्या एरियात बाई बसू दे, नाही तर बाळंत होऊ दे– सगळं त्याच्या कानावर अन् ह्याच्या परवानगीशिवाय नाही. तर रेणकेनी गुन्हाच केलेला असतो. याला विचारल्याशिवाय सभा घेतो म्हणजे काय? तसा रेणके बाचलाच. नाही तर सभेतच मारामारी झाली आसती.

रेणके सांगत असतो. "आमी बॉसशी बोलतो. तो आपलाच माणूस हाय. तुमी काळजी करू नगा. परिषदेला या."

लोकांचा मूड लक्षात येतो. कुणीबी आपला जीव धोक्यात घालायला तयार होणार नाही. दांगट समाज देशावर देवाच्या नावानं म्हणजे महादेवाच्या नावानं भीक मागून जगत असतो. आता भीक मिळत नाही म्हणून बायामाणसं रानातनं गवत आणून विकू लागली. गवत विकता विकता एकादी दुसरी म्हैस राकुळीला घ्यायची, दोन-तीन वर्षं सांभाळायची, गवत काडी घालून चांगली करायची, आणि गाभन राहिली की इकायची. आता धंदा बदलला. आता देशावरचा दांगट समाज डोक्याला फेटा बांधून हातात महादेवाचा त्रिशूळ घेऊन गुलाल लावीत दानं मागत फिरत नाही, तर म्हैशींचा धंदा करतो. कुणी कुणी दलाली करतात. तर काही लोक म्हैशीची पारख करण्यात येवढे तरबेज असतात की शेतकरी दांगटाला म्हशीच्या व्यवहाराला घिवून जातो.

म्हैस विकत घेतो अन् राकनवालीला दांगटाला देतो. मला कुतूहल वाटून मी दांगट मंडळी का करतात म्हणून दिलीपला विचारलं, तसं त्यो म्हणाला, " आमचं का न्हाय, मिळंल त्यो धंदा. मोलमजुरी करायची. घावंल त्यो उद्योग करतू. मिळालं काम तर झ्यॉक, न्हाय तर फाका. बायामाणसं कचऱ्याच्या ढिगातनं बॅटरीच्या सेल वेचून आनत्यात. " तो एका पोरीला बोलावून दाखवतो. ती पोरगी चुलीम्होरं बसून चुलीत कागदाचं बोळं सारत दुसरीकडं बॅटरीच्या बारीक मोट्या शेल फोडून आतला कोळसा एका बाजूला काढत असते, तर त्यातली नळी दुसरीकडं. तो सांगत असतो, " ह्या काळ्या पावडरीला येगळा भाव अन् ह्या पितळंच्या नळीला येगळा भाव. आमच्यातली बायामाणसं कागद काचा आणत न्हायी, तर ह्या बॅटऱ्या आनत्यात. "

" किती रोज पडतू ? "

" रोज काय ह्या धंद्याला सांगता येत नाय. घावलं तर घबाड घावंल, नाय तर पायांची चाळण झाली तरी माल घावत न्हाय. म्हण बारकी पोरं अन् बाया दिवसभर शेला येचत्यात. बापे भविष्य बगत असतात. तर सांचं आलं की ते काम चालतं. सकाळी उठून पुन्हा फेरीला जायचं. तिकडनं कोरकुटका मिळतू त्यो खायाचा. आठवड्यातनं एकदा माल येपाऱ्याला घालायचा. आठवड्यात चांगलं काम केलं तर तीस चाळीस रुपये सुटत्यात. "

दांगटांच्या दादाला भेटावं म्हणून त्यांच्यातला एक पोरगा घेतला अन् त्याला हुडकत फिरलो. तर त्यो दादा थेटराजवळच्या एका हाटिलात दिसला म्हणून तो पोरगा लांब जाऊन उभा राहिला. त्यानं लांबनंच आमाला दाखवलं अन् धूम पळून गेला. मला वाटलं ह्यो दादा म्हणजे कमालच हाय. ह्याला दादा तरी कसा म्हणावं ? हा तर चांगला पुढारी दिसत असतो. मला बॉस म्हणजे हिंदी शनिमातला बॉस वाटत असतो. आमी त्याच्या टेबलाजवळ जाऊन त्याला नमस्कार करतो. तसं मान वर न करता नुसती डोळ्यांची बुबुळं वर होतात. हातात घड्याळ, सोन्याची पट्टी, बोटांत असली-नकली आंगठ्या. डोक्याला कुंचीदार गांधी टोपी. अंगात नेहरू शर्ट, पायजमा, अगदी परीट घडी नुकतीच मोडलेली. गळ्यात माळ, कपाळाला गंध, तोंडात सिगरेट, अगदी सभ्य वाटावा असा हा माणूस बॉस असतो.

' मी लक्ष्मण माने आणि हे बाळकृष्ण रेणके. ' आम्ही संघटना, परिषद, दौलतराव भोसले वगैरे बोलतो तरी हा गप्पच. आम्ही त्याला निमंत्रण देत असतो. तो वर बघतो. सिगरेट खाली टाकतो. अन् एवढा सीन बदलतो, विचारता सोय नाही. जसं शनिमातला सीनच बदलावा.

' सायब, आपल्यासारख्या देवमाणसाचं नाव ऐकल्यापास्नं मी कवा भेटंल म्हण वाटच बगत व्हतो. ह्या जलमाचं सारथक झालं बगा. तुमी आमच्या भटक्यांसाठीचं देव हाय बगा. मागंबी दादासायब आलं हुतं तवा आमी त्यांच्यामागं उभं

राहिलू. पर त्यास्नी तेवढं मंत्री केलं न्हाय बगा. लय धडपडलो. पर आपून अल्पसंख्येत पडलू. दादांचा चानस गेला. आता आपल्या मागं आमी हायच. किती गाड्या धाडताय सांगा. माणसांला काय सायब, आपली बट्ट बगा तरी. हा, कितीबी गाड्या धाडा. बायापोरांशी हाजीर. आन ह्ये बगा. धंद्याचं दिवस हायती, तवा जरा लोकासनी सांभाळायला लागतंया तवा...'

रेणके मध्येच त्याला समजावतो. आमच्या स्थितीची त्याला कल्पना देतो. तर बॉस सांगत असतू, "सायब आपल्या लोकानला लय बंगाळ सवं हाय बगा. आता त्यास्नी तर का कळतंया म्हणा, त्यास्नी सवंच आशी लागली. तर पैक्याबिगार एक बेनं हालायचं न्हाय. पर सायब, काळजी न्हाय. त्या तमक्या मंत्र्याला पैक्याचं उलीकसं सांगा की झालंच पैक्याचं काम. का तुम्ही सांगितला तर म्याबी इचारतू. आम्ही आंगाला लागू देत नसतो!"

कालच्या सुरामारीला कोन जबाबदार असं विचारलं तसं बॉस उडालाच! "कवा झाली मारामारी? सायब, या येरियात काय झालं तर ते मला समजतं यांचं... त्यात झालं आसंल पिवून बिवून." मी थोडा दम मारून मंत्र्यांच्याकडं नेणार म्हणताच बॉस एकदम सपाट. हाटिलाच्या म्होरं बाहेर आमचा तमाशा चालू. बॉसवर आता माझी मजीं खपा झालेली. तर बॉसचा ठेका एकच. "सायब, आपल्या पोरानं मांडीवर हागलं तर मांडी कापत्यात का? येवढं लोकं बंगाळ करत्यात. आन आमचं तुमी देव. तुम्हीच आसं करू नगा." बॉस भारी बेरका. क्षणात हसायचा, क्षणात रडायचा. क्षणात धमकी द्यायचा, तर क्षणात थरथर कापायचा. तसा अनेक बेकायदेशीर उद्योगांचा संरक्षक. लाचारी अंगात मुरलेली. बेरकी नजर. आपल्याच लोकांच्या मढ्यावरचं लोणी खायची तयारी. मंत्र्याशी डायरेक्ट संबंध. एका मंत्र्याच्या जवळ बसून फोटो काढलेला, तर एका आमदाराच्या गळ्यात हात घालून दुसरा फोटो काढलेला. सचिवालयात सारका वावर असतो. तर शनिमा टॉकोजवर तिकिटांचा सौदा याचाच. बायांनी धंदा केला आणि ह्याची परवानगी नसली की बाई गेलीच भावात. 'बाई'च्या नावानं डगला घालायचा, आणि दुसऱ्या दायीची भाड खायची. धंदेवाल्या बायांचा हप्ता म्हणे वरपर्यंत जातो. पोलिस खात्याचं तर काय सांगावं? पोलिसांनी आमच्या राज्यकर्त्यांशी फार चांगली दोस्ती केलीय. मुंबईतले सारे धंदे पोलीसांनीच संरक्षित केलेले आहेत.

अशीच दुसरी एक भटक्यांची वस्ती. तिथं घरोघर माझे पावने. माझी भावकीच म्हणा की. गेलो तर येवढा ऊर भरून आला, विचारू नका. बायांनी पंचारतीनं

ओवाळलं. पोरांनी टाळ्या पिटल्या. आता सभा माझ्या भाषेतनं चालू. रेणके नुसता प्रेक्षक. त्याला काही कळत नसतं. लोकांच्या टाळ्या पडल्या की रेणके खूष. तेवढंच त्याला समजत असतं. बायापोरांशी मंडळी खुष असतात. मगाच्या चित्राच्या उलट चित्र. ही झोपडपट्टी मान्यताप्राप्त. त्यानं झोपड्यांची खुराडी एका दिसेने लावलेली. मध्ये बोळ. गटारानला खेटून उंबरे, पण चौकटी उंबरे असतात. प्रत्येक घरात भट्टी असते.

पण तरुण मुलांचं मंडळ असतं. मुलं खेळती असतात. बालवाडी चालत असते. मी आमच्या भाषेत विचारतो. 'नांबरातुली येदाना दादा किरा?' (आपल्यात कुणी दादा हाय का?) मगापासून सारी मंडळी आपल्या जातीतला मानूस, तोही अगदी पयलाच माणूस. पेपरात नाव येतं, रेडिओवर बोलतो, टीव्हीवर दिसतो, विमानातनं परदेशी जावून आलाय आणि मुख्य म्हंजे तो आपला जातवाला आहे, याचं कौतुक प्रत्येक डोक्यातून उतू चाललेलं असतं. तर माझा प्रश्न म्हंजे विंचू अंगावर पडावा तसं झालेलं. मगापासून सगळी सभा कशी भारावलेली असते आणि आता स्तंभित. सारेच गप्प असतात. मी न समजून पुन्हा आमच्या भाषेतनं बोलू लागतो. एक म्हातारी उभी राहते. "नांबरातुली येदइल्ला नांबरण मित समराद किर. येदाना निडचं तर नागळक माहिती इल्ला!" (आपल्यात कुणी दादा नाही. आपल्याला काय करायचं? पोरा, तू बाकीचं बोल. आपल्याला असा दादा माहिती नाही.)

सभा संपवून एकाच्या झोपड्यात चहा घेतला. सगळे आनंदात असतात. मगापासून केसांची झुलपं वाढवीत पैलवानासारखा तरणाबांड पोरगा म्होरं म्होरं करत असतो. तो त्यांचा पुढारी असावा. सगळे त्याला मान देत असतात. तो बोलत काहीच नाही. नुसतं पहात असतो. डोळ्यात आनंदाचं पाणी चमकत असतं. तसं वस्तीत कुणीच शिकलेलं नाही. सारे पीत असतात. कारण बहुतेकजण सफाई कामगार म्हणून काम करीत असतात. तर पैलवान म्हणतो, 'चला'. आम्ही गुमान चालू लागतो. त्याला सगळे भीत असावे. पण तो तसे दाखवीत नाही. त्याच्या घरात गेलो का पुन्हा सीन बदल. मगाची शिसारी आणणारी घाण, जीवघेणा संडासाचा वास, नरकातली आपली वस्ती– आन् झोपडीतच उभा महाल. हो, महालच तो! काय नाही या झोपडीत? टीव्ही, फ्रीज, रेकॉर्ड प्लेअर, सेंट सारं काही व्यवस्थित मांडलेलं. भिंतीला सनमायका. बसायला मस्त कोच. कौंटर, अलेशान खुर्ची. आम्ही आत गेल्यावर हा पैलवान गहिवरला, रडला, छातीला लागला. मला नेऊन त्या खुर्चीवर मानानं बसवलं. खांबावरल्या वसंतदादांच्या, इंदिरा गांधींच्या फोटोपुढं ठेवलेला पेढा तोंडात कोंबला आन् पाया पडून खाली जमिनीवर बसला. मला गुदमरल्यासारखं झालं. 'बसा सायब. आपुन कधी येणार नाय. आज देवाचं दर्शन झालं.' अपराधी-

पणानं बाहेर आलो. नंतर समजलं, हाच या वस्तीतला दादा आहे. सरकार दरबारी मोठं वजन. दिसायला गोगलगाय, आपल्याच टाळूवरचं लोणी खानारा! खरं राज्य कुणाचं आहे? गरिबांचं की ह्या लोणी खाणाऱ्या बोक्यांचं?

दुसरा असाच रेल्वेचा प्लॅटफॉर्म. मिनटामिनटाला माणसांची खेचाखेची. येणारं किती, जाणारं किती यांची मोजदाद नाही. 'रेल्वेच्या रुळानं म्होरं गेलं पाहिजे,' बाळकृष्ण रेणके सांगतो. 'गाडी निघून गेली की झटक्यात त्या बाजूला गेलं पाहिजे.' असे चार-पाच प्लॅटफॉर्म डावी–उजवीकडं बघत ओलांडले. पलीकडे ओसाड असलेला एक प्लॅटफॉर्म. बहुधा तिथं मालाच्या गाड्या लागत असाव्यात. पुलाच्या खाली रेणके थांबला. त्याच्या मागं मागंच भेदरलेला मी. इकडं तिकडं बघत रेल्वेचे मालाचे मोकळे डबे, सिमेंटच्या गोणी, कोळशांचे ढीग, दुसऱ्या बाजूला झुडपातनं जाणारी पायवाट, सगळीच दलदल. रेल्वेची हद्द संपल्याची कंपाऊंड. रेणके सांगत असतो, 'हे आलंच.' चिखलातनं वाट काढत रेणकेपाठोपाठ सरपटलो. 'डोक्याला लागंल हां, दमानं ये.' बेचकाटातनं डोस्कं सुरक्षित ठेवून म्होरं सरकलो. तो रेणकेचा पाय गुडघाभर चिखलात. एक काढायला गेला तर दुसरा तेवढाच चिखलात. घाणीला तर तोटाच नाही, नुसती नरकाची बजबजपुरी. किडे वळवळत असतात. नाक मुठीत धरूनही जीव गुदमरायला लागतो. रेणकेला हात देऊन वर काढला तसं नागडी पोरं दुडूदुडू त्या चिखलात खेळायला आली. रेणके विचारतो– "ये बिट्यांनो, शंकऱ्या गोंधळ्याचं घर कुठंरे?" पोरं नुसती बघत राहतात, जसे आपण त्या गावचे नाही. मी म्होरं सरकलो. तर ही डवरी गोसाव्यांची झोपडपट्टी. दिवस मावळतीला गेलेला. बैठक घ्यायला आलोय प्रमुख कार्यकर्त्यांची. येवढ्यात साऱ्यांची एकच धावपळ उडाली. कालवा सुरू झाला. बघता बघता बाया-पोरांची एकच झुंबड उडाली. 'तो हा आईच्या...' पुढं न सांगण्यासारखं. आईच्या आन् बापाच्या लिंगांचा उद्धार सुरू झाला. कोण कोणास मारत होतं? कोण का शिव्या देत होतं? हे कळलं नाही. बैठकीचं वांगं झालंच होतं. आम्हाला कुणी विचारतही नव्हतं. आम्ही बोलत होतोः संघटना, परिषद, चळवळ. पण सगळ्याचं वांगं झालं व्हतं. त्यांना घोर पडला होता बाब्याचा. ही तिसरी येळ–टरकातनं माणसं येतात, बाब्याला हाणत्यात, समदी निघून जात्यात. कितीबी खोदून खोदून इचारलं तरी बाब्याचं तोंड उचकटंना. आम्ही निघालो. सारे कासावीस होते. बाब्याची बायको रडत व्हती.

पुन्हा फलाटावर आलो. रेल्वेवर घालवत आलेला रेणकेचा पावना म्हणाला, "सायब, नरक हाय नुसता नरक. आता आम्ही माणसं नाही, हैवान ह्या

हैवान. तुमी सोन्यावानी माणसं आली तर बाब्यानं आय घातली. ह्याची रांड जाते वाटतं, हा बसतो बोंबलत. ही नवीनच ब्याद आली. ह्यानं कुणाला सुपारी घेऊन मारला, आता भोगतोया करमाची फळं." मला न समजून मी इचारलं, "पावनं, सुपारी घेऊन मारलं म्हंजे काय केलं?" तसा तो रेणकेकडे बघायला लागला. रेणके म्हणाला, 'बाबा, सांग त्यास्नी समजून.' पावण्यानं जी सुरवात केली तो चार वर्षांचा बाब्याचा इतिहास सांगितला. सार एवढंच–'बाब्यानं एका मध्यमवर्गीय माणसाला गटवला. त्याचा येवढा इस्वास बसला की, त्याच्या घरातच पंचांग घेऊन रहायला आला. हिकडं ह्याच्या बायीनं दुसरा बाबा ठेवला तर बाब्याचा पत्ताच नसायचा. जात–पंचायतीनं खोडा घातला, तवा समजलं. बाब्याचं पाणी मुरतंय. त्योवी शाना. खाल्ल्या घरचं वासं मोजलं. हा ज्या घरात व्हात व्हता त्याची बाईलच ह्यानं गटावली म्हणं. त्या बाबानं बाब्यावर मारेकरी घातला. त्यातनं बाब्या वाचला. बाब्या इयांवाज. त्यानंवी आकाल चालवली. चारसा महिने गेलं. त्यो माणूस हापिसाला गेला का बाब्या त्याच्या घरात. त्या बाबाच्या बायकोनं अन् बाब्यानं देवाच्या परसादातनं त्या बाबाला 'इक' घातलं. तासा दोन तासांनं ते मरून पडलं. सायब आमच्या लोकांस्नी आसलं औषाद ठावं हाय. माणूस तर मरतंय. पण तुमच्या डाक्टरला घावत नाय. म्हण आमच्यातली कायबाय माणसं ह्यो निसूक धंदा करत्यात. आता त्यो बाबा गेला मरून. ह्यो नामानिराळे. आता त्या बाबाच्या पावण्यांनी त्याला धारेवर धरला. भविष्य सांगायचं, खोट्याचं खरं, खऱ्याचं खोटं करायचं. सांचं पियाचं. आला वस्तीला आला, नायतर बोंबलत गेला. पोरांची सुद नाय, बायकोची सुद नाय, परपंच्याची सुद नाय. समदा डवरी समाज नरकयातना भोगतुया बगा.'

आम्ही परिषदेवद्दल सांगून काढता पाय घेतला.

फास्ट लोकलमध्ये आमच्या गप्पा चालू असतात. कोलमडून पडलेली, उद्ध्वस्त झालेली ही माणसं. महारोग्यासारखी. संवेदनाहीन, अचेतन. कार्यकर्त्यांचा नुसताच तळतळाट. कसं उभं राहील सारं?

●

सोलापूरचे उजाड सेटलमेंट

सोलापूर शहर तसे भटक्या-विमुक्तांच्यासाठी भारीच मशहूर. गावात भटक्या विमुक्तांची संख्याही मोठी. म. न. पालिकेत आठ ते दहा सभासद जनरलला निवडून जाऊ शकतात. आतापर्यंत अनेकदा शहराचा नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष भटका राहिलेला आहे. त्याला तसे कारणही महत्त्वाचे आहे. या देशात ब्रिटिशांनी पहिल्यांदा कायदा आणि सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी, शासनव्यवस्थेचा वचक बसवण्यासाठी या देशातले काही मानवी समूह, काही जाती-जमाती या गुन्हेगार ठरविल्या. १८७१ मध्ये गुन्हेगारी कायदा पास केला. तेव्हापासून ते स्वातंत्र्य मिळेपर्यंत हा कायदा अस्तित्वात होता. माणसं जन्मतःच गुन्हेगार ठरवली गेली – जसे अस्पृश्यता जन्मानेच ठरते तशी. गुन्हेगारांच्या वेगळ्या वसाहती निर्माण करण्यात आल्या. १९२९ साली ब्रिटिशांनी या गुन्हेगार जमातींसाठी सेटलमेंट ॲक्टनुसार सोला-

पूरची पहिली वसाहत निर्माण केली. देशात अशा जवळपास ५२ ठिकाणी सेटलमेंट्स आहेत—महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, आंध्र, तामिळनाडू या प्रांतांतून. परंतु मुख्यतः महाराष्ट्रात आणि कर्नाटकातच जास्त सेटलमेंट् कॅम्प्स आहेत. महाराष्ट्रात लहानमोठी अनेक सेटलमेंट्स आहेत. ठाणे, अंबरनाथ, मुंढवा, पुणे, बारामती, धुळे, जळगाव, चाळीसगाव, बार्शी; कर्नाटकात होटगी, म्हाळुंग, हुबळी, गदग, धारवाड बागलकोट, विजापूर, बंगलोर, बल्लारी,. इ. अनेक ठिकाणी या वसाहती होत्या. परंतु सोलापूरची वसाहत ही सर्वांत मोठी वसाहत. देशातल्या गुन्हेगार जमातींचे पुनर्वसन करण्यासाठी म्हणून शहरालगतच ब्रिटिशांनी या गुन्हेगार जमातींसाठी जवळपास ४७२ एकर जमीन एकूण ९ सव्हेंनंबरमध्ये राखून ठेवली आहे. या सेटलमेंटमध्ये आजही मोठ्या प्रमाणात या जमातीचे लोक राहतात. चार-पाचशे तरी पदवीधर या वस्तीत रहात असतील. त्या काळात घरे नव्हती. तारेचे कंपौंड होते. त्या कंपौंडला सोडून बाहेर जाता येत नसे. रोज हजेरी द्यावी लागे. एवढेच नव्हे तर एकाच माणसाला या ५२ सेटलमेंटमध्ये फिरवत असत. महाराष्ट्रातला माणूस आंध्रात तर कर्नाटकातला माणूस महाराष्ट्रात, गुजरातेत असे होत असे. या वसाहतीत ब्रिटिशांनी काही चांगल्या गोष्टी केल्या होत्या. आय. सी. एस. ऑफिसर, त्याच्या हाताखाली आणखी काही माणसे याच वसाहतीत राहात असत. या लोकांचे पुनर्वसन करावे या हेतूने ब्रिटिशांनी जागा राखून ठेवली होती. या सर्व सेटलमेंटना जवळून पाहावे, जिथे आपले बापजादे तारकंपौंडच्या आत अडकले असतील, त्यांना काय यातना सोसाव्या लागल्या असतील, वगैरे भावनिकता मनात निर्माण झालेली. म्हणून सोलापूरचे भटक्या–विमुक्त संघटनेचे उपाध्यक्ष ॲड. वाय. एस. गायकवाड नारायण जाधव, औरंगाबादचे आसाराम, संघटनेचे कार्यकर्ते दिवसभर फिरत होते.

सेटलमेंटचा भाग शहरापासून तीन चार किलोमीटर दूर. सारी वस्ती भटक्या-विमुक्त जातीजमातींची. शहरालगत विस्तीर्ण माळावर ओसाड पडलेली एवढी मोठी जागा. कार्यकर्ते तार कंपौंडच्या खुणा दाखवत असतात. तार कंपौंडला लागूनच आताची वस्ती आहे. ब्रिटिशांच्या अधिकाऱ्यांच्या मोकळ्या पडलेल्या जागा आहेत, तर शहरात आणि महाराष्ट्रात नावाजलेले कबड्डीपटू तयार झाले ते विस्तीर्ण खेळाचे मैदानही जवळच होते. ब्रिटिशांनी या समाजाला गुन्हेगारीचा कायदेशीर कलंक लावला, पण त्यांनी ज्या पद्धतीने या जमातींच्या पुनर्वसनाचा विचार केला होता तसा विचार आमच्या स्वकीय राज्यकर्त्यांनी मात्र केलेला दिसत नाही. वस्तीला लागूनच अतिशय टुमदार असा दवाखाना आहे, जेथे या जमातीतील स्त्री-पुरुष आजही औषधोपचार घेतात. स्वातंत्र्यानंतरही सोलापूर जिल्हा परिषदेने हा दवाखाना अद्यापही चालू ठेवलाय याबद्दल जिल्हा परिषदेला धन्यवादच दिले पाहिजेत. तसा दवाखाना जुनाच, पण तो शिल्लक आहे.

दबाखान्यासमोरच ब्रिटिश अधिकाऱ्यांनी त्यांच्या ऑफिसर्ससाठी बांधलेले सुरेख चर्च आहे. मंगलोरी कौलांनी झाकलेले चिरेबंद चर्च ही वास्तू ठणठणीत उभी दिसत असते. सभोवताली शेकडो एकर जागा रिकामी आणि या स्थितीत हे येथे एकटेच उभे. आज याला प्रार्थनेला माणसंच मिळत नसावीत. काही चार-दोन कुटुंबे ख्रिश्चन झाली असतील-नसतील, चार-दोन लोक प्रार्थनेला येत असतील-नसतील. कार्यकर्ते सांगत असतात, हे चर्च एका अधिकाऱ्याने (समाज कल्याण खाते) शहरातल्या ख्रिश्चन मंडळींना विकलेय ! ही सेटलमेंट ॲक्टने अस्तित्वात आलेली मालमत्ता आज समाज ' कल्याण ' नव्हे, समाज ' अकल्याण ' खात्याकडे आहे. ही वास्तू या अधिकाऱ्यांना विकता कशी आली या गोष्टीची चौकशी झाली पाहिजे.

चर्चच्या पाठीमागच्या बाजूस एक छोटीशी उंचवटावजा टेकडी आहे. आम्ही बोलत तिकडे निघालो. समोरच लहान मुलं खेळत होती. तशी ती पाहताच आपल्या लहानपणची आठवण झाली. अंगातली मळकी कापडं आणि हातापायावरचे 'वधूळ' दिसत असतात. बंगलीवजा शाळा तेथे दिमाखात उभी असते. शेजारी चाळीवजा दोन इमारती असतात. त्यात शासकीय प्रमाणित (सर्टिफाईड स्कूल) शाळा असते. रिमांड होम कोर्टाकडून गुन्हेगार ठरवली गेलेली लहान मुलं इथे येतात. सर्व जातीजमातीची असतात. पण जातींचा खरं म्हणजे काय संबंध ? ती शासन आणि समाज यांनी बहिष्कृत केलेली असल्याने या ओसाड माळावर, गावाच्या बाहेर आणि कायद्याने कलंकित झालेल्या जागेत त्यांची ' सोय ' केलेली असते. त्यांना तरी गावात मध्यवस्तीत जागा कोण देईल ? ही शाळा रिमांड होम झाली १९४८ मध्ये. पण तोपर्यंत, म्हणजे १९२९ ते १९४८ या काळात, सेटलमेंटमध्ये असणाऱ्या गुन्हेगार जमातींसाठी ती चालवली जायची. तिथे या जमातीची मुले शिकली आणि आता रिमांडहोमची मुले शिकत असतात. " एक बगीचा था, अब उजाड बन गया. "

जवळपास १५७ मुले आज या शाळेत आहेत. त्यांत अनुसूचित जातीची ५७, भटक्या जमाती ४, विमुक्त गुन्हेगार जाती १, लिंगायत २, मराठा ३६, जैन ३, आदिवासी १, ब्राह्मण ३, बाकीची इतर. म्हणजे ज्या गुन्हेगार जमातींची ही शाळा तिथे आज त्यांचा एक मुलगा शिकतो– तरी या जमाती मात्र गुन्हेगार ! या १५७ मुलांपैकी ११० प्राथमिक शाळेत, ३० माध्यमिक शाळेत, तर ५ मुलं कॉलेजला जातात. रिमांड होमची ही मुलं चौथीपर्यंत याच ठिकाणी शिकतात–उकिरड्यासारख्या उजाड अवस्थेतील शाळेत बाकीची सर्व मुले तीन किलोमिटर गावात जातात. या सेटलमेंटच्या शाळेचे हेड ऑफिस म्हणजे दिसायला देखणी इमारत, पण वयाने उतारलेली. सेटलमेंटच्या मुलांच्या शिक्षणाचे वांगे, दुसरे काय ?

या ऑफिसच्यासमोर पाहिले की, कुणाही सच्च्या भारतीयाच्या डोळ्यांत पाणी नाही आले तर तो भारतीय कसला ? इतक्या सुंदर देखण्या इमारतीला पाला ओरबडावा

तसं इथल्या स्वातंत्र्योत्तर जनतेनं ओरबडलं आहे. खंडूबाच्या यात्रेतल्या लुटीतल्या खोबऱ्यासारख्या अतिशय मजबूत वाटाव्यात अशा ३२ खोल्या अक्षरशः वरवडून, लुटून नेल्या आहेत. कुणाचीही शरमेने मान खाली जावी. एकेकाळी देखणी असलेली पण कष्टाने रापलेली देखणी बाई जशी उजाड दिसते तसं. अक्षरशः १६ खोल्यांवर कौलाचा तुकडा नाही, चौकटीची लाकडं नाहीत. खिडक्यांना दारं होती हे अंदाजाने ओळखावं !

इमारतीचे सुरेख घडलेले कोपरे चुन्यात असे घट्ट बसलेले की, बत्तीशी. पण कोपरे उखडून नेलेले आणि मोकळ्या खोल्यांचा सार्वजनिक संडास झालेला. आत खोल्यांच्या फरशा तर पहार लावून उकरून नेलेल्या असाव्यात. कारण एवढ्या जाड फरशा मी तरी पाहिलेल्या नाहीत. पण लुटीतला माल, सरकारी माल, त्याचं असंच हाल. धनी ना जत्रा आन् कारभारी सतरा. त्यातनं अठरापगड जमातींची इस्टेट. कोण विचारतो कुणाला ! या खोल्यांच्या पुढे व्हरांडा होता असे जोत्यावरल्या खुणावरनं ओळखावं. तर इटली, जर्मनीतून आलेले त्यावेळेचे लाकूड आजही खास ब्रिटिशांचा वारसा सांगत उभं. पण न्यायला अशक्य असेल तेवढंच. या पूर्ण उजाड झालेल्या खोल्यांच्या मागे तसेच जुने सुंदर वृक्ष उभे. पण निष्पर्ण, ओसाड. सटवीच्या बोडक्यावाणी. कधी काळी येथे सुंदर बाग होती, पवनचक्कीने पाणी बागेला मिळत असावे, एकेकाळी समृद्धी असावी असे चित्र आणि बाजूला दोन खोल्या तर पार उचकटून पडलेल्या. एवढ्या टोलेजंग इमारती, पण आत वाकून पाहिले तरच पडद्या असाव्यात असे वाटावे. एरवी विटा, फाडीचे घडीव दगड पण घावशेल पावशेल. बागेच्या दुसऱ्या बाजूला तेरा-चौदा खोल्या व्हरांड्यासह असाव्यात. पण त्यातल्या त्या काळातल्या शाळेचे ऑफिस आणि तीन वर्ग एवढेच शिल्लक. बाकी सारी लुटालूटच. कार्यकर्ते सांगत असतात– ७७ मध्ये वादळ आलं होतं. त्यात कौलं उडाल्याचं निमित्त झालं. आणि जशी कौलं उडाली तसे त्यांना पंख फुटले आणि सारी कौलं त्या चर्चवर जाऊन पडली. होती नव्हती ती शान संपली. सारी शाळा उजाड झाली.

शाळेच्या समोरून हे उदासवाणे दृश्य पाहात उभा होतो आणि कार्यकर्ते कुणी कसे लुटले ते सांगत होते. अर्थातच मला या नावात रस नसतो. मी भारतीय माणसाच्या मनाचा शोध करत असतो. कार्यकर्ते सांगतात–कुऱ्यांच्या कलवंडी लागतात, तशा तलवारींनी दंगली या सार्वजनिक लुटीसाठी होतात. पण पोलिस, शासन, आणि देशी वसाहतवादी नागरिक यांना काही पत्ता नसतो की, या गोरगरिबांसाठी साहेबाने बांधलेल्या या इमारती उद्ध्वस्त केल्या जाताहेत !

शाळेच्या पाठीमागे साहेबाने या गुन्हेगारांच्या पुनर्वसनासाठी जशी शाळा बांधली तसेच नुसते कारकुनी शिकवण्याऐवजी या जमातींना औद्योगिक शिक्षण मिळा

म्हणून औद्योगिक कार्यशाळाही चालत होती. या कार्यशाळेत स्पिनिंग मिलसाठी लागणारे प्रशिक्षण दिले जात होते. या शाळेतून मुलगा बाहेर आला की, सेटलमेंट ऑफिसर या मुलांना सरळ जुन्या सोलापूर मिलकडे कामाला पाठवी. शिलाईपासून सुतारापर्यंत वेगवेगळे धंदे या प्रशाळेत शिकवीत. पण हागनदारीतून वाट काढीत शाळेपर्यंत गेलो तर तीन भिंती उभ्या. पूर्वेच्या बाजूची भिंत पूर्णपणे गेलेली, बाकीच्या बारा उजाड झालेल्या. जमिनीवर पडलेल्या तुटलेल्या कौलांच्या खुणा सोडल्या तर या इमारतीवर कौले होती हे सांगायला दुसरा पुरावा नाही. शेजार-पाजारी आणि तेच का, सारेच शहरातले लोक या लुटीत सहभागी असतील का ? यंत्रे गेली कुठे ? इमारती बेवारशी झाल्या कशा ? १९४८ सालपर्यंत सुस्थितीत असलेल्या गुन्हेगार जमातीतील मुलांनी बहरलेल्या या शाळा बंद झाल्या कशा ? कुणी आणि का बंद केल्या ?

एका बाजूला या भटक्या–विमुक्त जमातीच्या शिक्षणाचा बट्ट्याबोळ चालू आहे. त्यांच्या शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे. एक टक्का शिक्षण अजून पुरे व्हावयाचे आहे. आणि त्यांच्या शिक्षणाचा, आरोग्याचा आणि पुनर्वसनाचा जो रस्ता परकीयांनी दाखविला तोही स्वकीयांनी का बंद केला ? आमचे शासन कुंभकर्णासारखे झोपले आहे की गांधारीसारख्या त्याने डोळ्यांना पट्ट्या मारल्या आहेत ? पण आजही या देशाला स्वातंत्र्य मिळालेले नाही हेच खरे. परदेशी साहेबांच्या हातून देशी साहेबांच्या हाती सत्ता आली, पण जी माया परकीयांना होती तीही स्वकीयांना का बरं आली नाही ? लक्षावधी लोकांना अन्न-वस्त्र-निवारा यासाठी मोताद का व्हावे लागत आहे याचा साधा विचारही आज लोकशाही स्वातंत्र्याचा उद्घोष करणारे राजकीय पक्ष, नागरिक संघटना, आणि समाज का करीत नाही ? या भटक्या, विमुक्त जमातींच्या लाखो नागरिकांचा विचार शासन बजेटमध्ये करत नाही. एक नवा पैसाही यांच्या वाट्याला आलेला नाही. यांच्यासाठी वेगळ्या महामंडळाचा विचार होत नाही. ३५ लाख मतदार या जमातीचे आहेत. पण संघटित नसल्याने आणि राजकीय सामाजिक जागृती नसल्याने ते बोलतही नाहीत. अज्ञानाच्या घोर अंधारात ते पिचत पडले असल्याने हे असे होते. पण ज्यांच्या दिव्य प्रतिभेला सारे चराचर दिसते ते कागदी विद्वान आणि विचारवंत अर्थशास्त्रज्ञ यांनाही का दिसत नाही ? नाही दिसत याचे कारण ' गांधारी, ' दुसरे काय ?

सोलापूरच्या सेटलमेंटच्या निमित्ताने भटक्या विमुक्तांच्या पुनर्वसनासाठी ब्रिटिशांनी त्यांच्याचसाठी कायद्याने राखून ठेवलेली जागा–शेकडो एकर जागा–आज शासनाला उपलब्ध आहे. ती शासनाच्या ताब्यात आहे. आमची अशी मागणी आहे की हजारो कुटुंबांचे पुनर्वसन या जागेत होणे शक्य आहे. एखादी स्वतंत्र योजना आखून शासनाने या जमातींना डोक्यावर छप्पर आणि हाताला काम द्यावे. आम्ही भटक्या

जमातीचे लोक या जमातींच्या शिक्षणाची वेगळी मागणी करतो, तिचाही विचार व्हावा. शासन झोपले असेल, पण समाज झोपू शकत नाही. समाजातील सुबुद्ध नागरिकांनी शासनाला वेठीला धरले पाहिजे, आणि आमच्या मागणीला मानवतेच्या भावनेतून आणि हक्क म्हणूनही पाठिंबा दिला पाहिजे.

याच सेटलमेंटच्या प्रचंड आवारात हजारो–लाखो भटक्या-विमुक्त जमातींचे देश-भरचे बांधव जमले होते १९६० मध्ये, त्याची याद येते. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू आले होते, तर यशवंतराव चव्हाण या कार्यक्रमाचे सूत्रधार होते. (त्यांचे स्नेही वसंतदादा आज मुख्यमंत्री आहेत.) नेहरूंना माया होती. ते म्हणाले होते, "देश स्वतंत्र झाला, पण तुम्ही अद्यापही या तार कंपौंडमध्ये बंद गुलाम होता. आज साऱ्या देशबांधवांना अभिमान वाटावा म्हणून मी असे जाहीर करतो की तुम्ही विमुक्त आहात. आजपासून तुम्ही या तारकंपौंडमधून मुक्त झालात, एका अर्थाने स्वतंत्र झालात. तुम्ही दोन गुलाम्या तोडल्यात. एक परकीयांची आणि दुसरी स्वकीयांची !" पण नेहरू 'स्वातंत्र्य मिळाले' म्हणाले त्याचा अजून प्रत्यय यायचा आहे. हा प्रश्न नुसता विमुक्तांचा नाही, तो आर्थिक, सामाजिक स्वातंत्र्याचा आहे आणि म्हणून तो आम जनतेचा आहे, असे आम्ही मानतो. सेटलमेंटच्या शाळेची अवस्था प्रातिनिधिक आहे. त्यातल्या भ्रष्टाचाराची चौकशी तर झालीच पाहिजे. पण संबंधितांना, मग ते केवढेही मोठे असोत, शासन झाले पाहिजे. कारण देशातल्या गोरगरिबांच्या टाळूवरचे लोणी खाण्याचा हा प्रकार आहे. पण आसाराम गुरुजी सांगत असतात, आपल्या समाजाची अवस्था अशी आहे की, " हम नकटे, तुम नकटे, वो नकटे, ये नकटे, सब नकटोंका मेला, उसमे एकही नाकवाला और वोभी सबका चेला." कोण कुणाची चौकशी करील ? कोण भटक्या–विमुक्तांना न्याय देईल ?

●

जनतेच्या कोर्टात

जिनार प्रधान कंजारभाट समाजातला साधा अंगठाबहादूर मानूस. कागदाची कोपाटाला खवलेली एक एक चिंधी उघडून दाखवीत असतो.त्यात ७–१२ उतारा असतो. पीक फाळणीच्या नोंदीचे कागद, कायबाय फेरफाराचे उतारे असतात. काही पाणीपट्टीच्या पावत्या असत्यात, तर काही कागद नुसतेच गुंडागुंडाळून, मुडपून, घड्या घालून घडयांच्या जागेलाच हात लावता उचकटत असतात. जिनार सांगत असतो, त्याच्या जमिनीची शोकांतिका. त्याच्या भाषेला धार येते. शहरातल्या कार्यकर्त्यांची मुंढ-व्याच्या फलाटाच्या वस्तीवर–म्हणजे सर्वोदय को. ऑप. कलेक्टिव्ह फार्मिंग सोसायटीच्या जमिनीवर– एका झाडाखाली बैठक चाललेली असते. शिवलाल जाधव, ना. वा. माने, मुरचंद भाट, विलास वाडेकर, अशा तरुण मंडळींची टीम सेटलमेंटच्या जमिनीची कागदपत्रं तपासत असतात, माहिती घेत असतात, तर पाच-पन्नास बाया कुजबुजत

असतात. बाबा आढाव कागदपत्रं जुळवायला शिकवत असतात. तर शंकर गायकवाड सांगत असतो—

"सायब आम्ही दोन पिढ्या ह्या जमिनीवर ऱ्हायलोय. ती आम्हाला सरकारनं दिलीया. आमच्या आगुदरच्या माणसांनी सोसायटी केली, पर आपसांत लय तट पडलं. खुनाखुनी झाली. कोण कुणाचं त्वांड बगंना. पारधी, कंजारभाट, कैकाडी टकारी, उचले, समदेच आपसांत मारामाऱ्या करायला लागलो. आमी सारी माणसं आंगठाबहादूर होतो. सेटलमेंट उटावला तवा मी बारीक व्हतो. आमाला दिवसाला तीन येळा अन् रातीला तीन येळा हाजरी व्हती. परवानगीशिवाय बाहीर जाया येत नव्हतं. तीन तारांत आमाला डांबून घातल्यालं व्होतं. मायबाप सरकारनं तार तोडली, आमाला सोडलं अन् घरांच्या फ्री कॉलनीची 'सर्वोदय सहकारी गृहनिर्माण संस्था' केली, तर आमी घर बांधलं. पर जगायचं कसं? मायबाप सरकारानं सांगितलं, 'लोकहो, आजवर तुमी चोऱ्यामाऱ्या केल्या, आता पुन्हा चोऱ्यामाऱ्या करू नका. ही जमीन घ्या अन् कसा.' म्हणले, 'भांडाभांडी करू नका. जमिनीची सोसाटी करा. तेवी 'सर्वोदय सहकारी सामुदायिक शेती सोसाटी' केली. आन् म्हणाले, 'आता भीक नको, उपकार नको, मेहनत करा आन् खा.' पर सायब दैवानं घातलं फाटक्या झोळीत. ते गळून पडतंया. हातात काय साधत न्हाय. गावात पत न्हाय. साथीला आडानीपना आन् गुन्हेगारीचा शिक्का. सोसाटीचा चेअरमन आडाणी आन् सबा-सदबी आडाणी, आडव्या टकुऱ्याचे. झालं, संस्था बोंबालली. कोनच काय करना. पर समद्यांनी आपल्या आपल्याला फलाट वाटून ज्याला जमंल त्यो कसाय लागला. सगळी आमी आजबी जमीन कसतुया."

सेलटमेंटचा कायदा, चोरजातीचा जाच. कागदपत्रांचे पुरावे. १९५१ सालापास्नं कागदांची जुळवाजुळव चालू केलेली. खरं म्हणजे अगोदर भेळीचा आन् उताऱ्याचा कागद ह्यातलाही फरक न समजणाऱ्या माणसांनी सातबाराच्या उताऱ्यावरोबर हेमा-मालिनीच्या शनिमाची जाहिरात आन् भेळीचा कागद एकत्रच ठेवलेला. कार्यकर्त्यां-च्यात मोठा उत्साह असतो. शिवलाल जाधव, शिवदास आन् बाकीची तरुण मंडळी सांगत असतात. त्यांना खूप आनंद झालेला. गेल्या ४० वर्षांत पहिल्यांदाच सगळ्या जातींचे लोक एका जागेवर आलेले असतात. आणि अर्थातच ते या तरुण मित्रांचं 'यश' मोठं असतंच. परंपरेनं वैर जतन करणारे, वेळप्रसंगी एकमेकांच्या जिवावर उठणारे हे सगळे लोक त्यांच्या जमिनीवर आलेल्या संकटानं तसे उशिराच पण या तरुणांच्या समंजस प्रयत्नांनी एकत्र आलेले असतात. लोक बोलते करणं यात बाबांचा हातखंडा. ते असले की, मुक्याला वाचा फुटते. हा अनुभव पुन्हा येतो. लोक बोलू लागतात. लढ्याची तयारी करायची, वाटेल ते झालं तरी मागं जायचं नाही, असा निर्धार करून सभा उठली. सगळे कार्यकर्ते मुंढवा सेटलमेंटच्या सर्वे नं. ९ ते १४

(२२५ एकर ३ गुंठे) जमिनीतून संध्याकाळपर्यंत फिरलो. लोकांनी साधनं हाती नसताना केलेली शेती पाहिली, घरं पाहिली, आणि लढ्याचा निर्धार झाला.

तयारी चालू होते. मुंढवा सेटलमेंटच्या निमित्तानं शहराच्या आसपासच्या भागांत बैठका चालू होतात. भटके विमुक्तांचे तांडे हालू लागतात, बोलू लागतात.

गाव वाढू लागलं. कारखाने वाढू लागले. जमिनीला भाव सोन्याचा येऊ लागला तसं प्रस्थापितांच्या तोंडाला पाणी सुटू लागलं. पन्नास वर्षांपूर्वी जिथं जायला माणूस भीत होता, तिथं गावकुसाबाहेर, निवडुंगाच्या आडोशाला, ओसाड जागी या लोकांनी आपली पालं लावली होती. ती गेली पन्नास वर्षं तिथंच आहेत. मुळामुठेचं पाणी वहात होतं. काळ आपल्या गतीनं बदलत होता. भटके आपलं जगणं काळावर बेतत होते, काळाशी जमवून घेत होते. पण सगळीकडे एकच सूर होता : इंग्रज बरा होता. त्यानं जागा दिली. मुंढव्याच्या सारखंच हडपसरच्या साडेसतरा नळीचं असत. ती– ही जागा शासकीय. गेली पन्नास वर्षं तरी दांगट समाजाचे लोक तिथं राहताहेत. पण मायबाप सरकारचं तिकडं लक्ष नाही. या आडाणी लोकांनी कागद दाखवले. शेकडो अर्ज प्रत्येक खात्याला आणि बदलणाऱ्या प्रत्येक मंत्र्याला गेलेत. पण सत्तेचे मायावी रूप आपल्या वेगवेगळ्या नकारांच्या विकारांचं दर्शन घडवत आहे. होकार म्हणून नाही, आणि धड नकारही नाही. 'नुसतं मागच्या पानावरनं पुढे' चालू आहे. पालं होती तिथंच आहेत. दांगट असोत, वैदूवाडीचे लोक असोत की गोसावी असोत.

पावर्तीबाई भोसले ही गोसावी समाजातली हडपसरची बाई सांगत असते. " दादा आतापातुर शंभर ठिकाणी बिऱ्हाड लावलं. आता एक आशी जागा दाव तिथनं बिराड उचलावं लागायचं न्हाय. " पण हडपसरच्या परिसरातल्या माकडवाल्यांची, कोल्हाट्यांची, सगळ्यांची व्यथा एकच. उठा म्हणले की उठायचं, कुणाचं ध्यान जानार नाही तवर न्हायचं. उठा म्हणले की, जरासं बूड उचलायचं आन् पुन्हा बिराड लावायचं. लयच खळीला आलं कुणी तर मात्र जागा सोडायची. वडगावच्या मंडळींची स्थिती तीच. आणि गेली शंभर-दीडशे वर्षांहून अधिक काळ राहिलेल्या चतुःशृंगीजवळच्या वडार आणि वैदूंच्या जागेची गत तीच होते आहे. सगळीकडे उठावा चालू आहे.

कार्यकर्ते सुनवत राहिले, पालापालांत आपल्या व्यथांची गाथा. लोकांचा प्रतिसाद वाढतो आहे. 'जमीन आमची हक्काची, नाही कुणाच्या बापाची,' साद घुमू लागली. मोर्चाची तयारी सुरू झाली. मुंढव्याच्या सेटलमेंटचा प्रश्न हा आता नुसत्या मुंढव्याच्या मंडळींचा राहिला नाही. तो भटक्या विमुक्त जनतेचा प्रश्न झाला. मोर्चाची तयारी सुरू झाली. जाईल तिथं गळू पिकलेलं. गेलं आन् जरा शब्दांची टाचणी लागली की व्यवस्थेच्या 'पुवाचा' पूर वहायचा. एके ठिकाणी एका

मालदारानं बिल्डिंग बांधायला काढली. सगळी वस्ती एका रात्रीत उद्ध्वस्त झाली. हाक ना बोंब. पोलिसांनी, कोर्टांनी आणि नोकरशाहीनं पाठ फिरवलेली. अन्यायाच्या गाढवांचा नांगर फिरतच असतो. पण लक्षात घेतो कोण? वेळ तरी कुणाला आहे? चोर कुठले!

आता साव पाहू. कार्पोरेशन म्हणजे शहरातल्या तमाम नागरिकांचे व्यासपीठ. व्यासपीठावर पुन्हा शंकराचार्य आम्हीच निवडून पाठवलेले. बेलगाम शासन, बेजुबान जनता. बेजुबान जनतेचे प्रतिनिधी तिच्याचसारखे बेजुबान. एका जनरल बॉडीत अधिकारी म्हणाले, 'गावात वाहतुकीला फारच व्यत्यय येतोय. गावातली 'गुरे' ही गावात घाण, प्रवासाला व्यत्यय, आणि आरोग्याला घातक. रोग आणि घाण. हे सगळं बरोबर नाही. गावातले जनावरांचे गोठे गावाबाहेर हलवले पाहिजेत, असं आपण खरं म्हणजे खूप खूप आधी ठरवलंय, आणि त्यासाठी आपण शासनाकडे जागा मागितलीय. तेव्हा पहिल्यांदा गावाच्या आरोग्यासाठी काहीही करून गोठे बाहेर गेलेच पाहिजेत.' झाले, साहेबांनी ठरावाचे दप्तर दाखवले. मुंढवा सर्वे नं. ९ ते १४ गोठ्यांसाठी घ्यावेत. आता गावातल्या बीटभट्ट्याही बाहेर हालवल्यात. अधिकृतपणे शहरात बीट-भट्टी नाही आणि प्रत्यक्षात सगळ्या नागरिकांना ठाऊक आहे. आळी-मिळी गूपचिळी चालू.

तर गोठा प्रकरण जनरल बॉडीने मान्य करून टाकले. आणि एरवी सुस्तावलेली नोकरशाही जी हालू लागली ती एवढी वेगात की तिला भटक्या-विमुक्तांचा आवाजही ऐकू गेला नाही. नोकरशाही कोणतीही असो, हितसंबंध निर्माण झाले की, तिचा वेग वाढतो. दोन महिन्यांत कसलीही चौकशी न करता आपल्या ह्या कृतीने शेकडो लोकांच्या संसारांवरून नांगर फिरला जाणार आहे, त्यांची कायदेशीर मालमत्ता नष्ट होत आहे याची कसलीही पर्वा न करता वेग चालू राहिला. शासनाचे काय सांगावे? ती तर गांधारी, डोळ्यांवर पट्टी मारून बसलेली. परस्पर अंधारात रातोरात कागद, फोन आणि कामकाज हलू लागले. आणि शासनाने कसलीही पूसतपास न करता आपणच पूर्वी दिलेली जमीन नोटीस न काढता परत घेतोय, बेकायदा परत घेतो आहे, याची फिकीर न करता महानगरपालिकेला आंदण दिली.

झाले. पेपरात सर्वे नं. ९ ते १४ मुंढवा गुरांच्या गोठ्याला घेतली; आता तिथे अमुक होणार, तमुक होणार; रस्ते, ड्रेनेज, प्लॉटवाटप; सगळ्यानला गाळावाटप चालू होणार; या मुदतीत गोठे बाहेर जाणार इ. झाले. नागरिक खूप. वा काम छान झाले. आयजीच्या जिवावर बायजी उदार आन् गुरवाचं चित निवदावर. निवदावरचं चित्त-निवेना, मग कुणाचं का 'बाळबाण' होईना! येवढ्यात नोटीफिकेशनही झाले. टेंडरही निघू लागले. तर इकडं प्रतिकार दुबळा. साऱ्या दुबळ्यांची डबोलेबाल्यांशी लढाई. होणार कसं? सुख येवढंच पुण्यातली सगळी वर्तमानपत्रं या सगळ्या धावाधावीत

मदतीला आली. निदान 'जनतेच्या कोर्टात' जाता येतं. येरवी गरीब बिचारी कुणी हाका! बरं, पुन्हा सगळी साधनं सत्तेच्या, संपत्तीच्या रखवालदारांकडे राखीव. पेपरात बातम्या घडकतात. कौन्सिल हॉलवर बायापोरांच्या टोळ्या, तांडे येऊ लागतात. सायकली येऊ लागतात. गुरांची खोंडे येऊ लागतात. तसं कार्यकर्त्यांचा हुरूप वाढू लागतो. बगता बगता रस्त्याची पट्टी गजबजून जाते. उन्ह मी म्हणत असते. माणसं मिळेल तिथं सावलीला सरकतात. बाया पोरांनी हातावर भाकरी–मिरचा घेतलेला तर गाड्या बैल, बारदान, बाजलं, सावलीला येऊ लागतं. डुकरं आणि गाढवं धिंगाणा घालू लागतात. यांना मोर्च्यात यायचं असतं. पण पोलिसांनी दम भरला, "गाढवं मिरवता म्हणजे काय! डुकरं, गाढवं, जनावरं प्रवासाला अडथळा आणतील. आम्ही परवानगी देणार नाही." झालं. शेवटी नुसती जनावरं आणि गाड्यांना परवानगी मिळाली. गाढवं, डुकरं माघारी गेली. भरल्या उन्हाला डोक्यावर घेऊन घोषणा सुरू झाल्या.

मोर्चा वाढू लागला. वाटेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला हार घालून मोर्चा जिल्हाधिकाऱ्यांच्या बंद दरवाज्यावर आदळला. ऑफिसची फाटकं बंद. पोलिस कडे करून उभे. 'शिष्टमंडळाला पाठवा' निरोप. शिष्टमंडळ निघाले. मध्ये इन्सपेक्टर उभा, 'पाचच पाठवा.' 'साहेब दहा-बारा असू दे.' साहेबांचा नकार. तडजोड. पुन्हा शिष्टमंडळ आत. दरवाजा बंद. पहाऱ्यात आत गेलो. तर 'साहेब नाहीत'. 'अहो साहेबांना अगोदर कळवले होते'. 'नाही साहेब नाहीत. 'निवासी साहेबांच्यावर भागवा.' भागवतो. चर्चा सुरू. ७-१२ चे उतारे सरकारचे रेकॉर्डस ऑफ राईट्ससाठी मोलाचे. त्यावर सन १९५१ ते १९७१ सर्व्हे नं. ९ ते १४ सर्वोदय सह. सामुदायिक शेती सोसायटीच्या नावे दिसत असतात. त्या उताऱ्यावर सर्व्हे. नं. ९ ते १४ व एक व दोन किंवा पोट विभाग काहीही नसते. आणि साहेब रेटून सांगत असतात. मग सातबाराबर कुणाचीही नोंद होते म्हणून काय झाले. ही जमीन तुमची आहे, याला सबळ पुरावा म्हणजे जमीन तुम्हाला दिली त्याचा कागद आणा. "साहेब, साधे उतारे या लोकांना मिळत नाहीत. ही सारी अडाणी जनता. यांचेकडे कागद नाहीत. पण पाणीपट्टी भरल्याच्या पावत्या आहेत. ७।१२ ला यांची नोंद आहे. पीकपाण्याचा उतारा आहे. यांना कसलीही नोटीस नाही. यांनी गेली तीस वर्षे शेती केलीय. ताबा त्यांचा आहे. सरकारी 'जी. आर.' प्रमाणे अतिक्रमण ठरले तरी ते कायम होते."

साहेबांचे एकच : 'ही जमीन पाटबंधारे खात्याकडे होती. मला माहीत नाही.' तर १९७१ मध्ये झुबेरी नावाच्या जिल्हाधिकाऱ्यांनी एक ब्लॅकमेलचा उद्योग केलेला असतो. या सेटलमेंटच्या लोकांना पोलिसांकडून धरून नेलेले असते. दम देऊन कोऱ्या वागदावर आंगठे उठवून घेतलेले असतात. 'सोसायटीबिसायटी गेली.

तुम्हाला प्रत्येकी तीन एकर जमीन देतो, तुम्ही गप्प बसा. नाहीतर पुन्हा तुरुंग.' लोकांनी चोराची लंगोटी का सोडा म्हणून कबूल केले. त्यांच्यातल्या प्रमुख पुढाऱ्यांनी तयारी दाखवली. साहेबांनी फूट पाडली. पुढाऱ्यांना अनधिकृत म्हणून शेरा मिळाला. ७।१२ त घोळ चालू झाला. आणि ७१ सालापासून २२५ एकराला भगदाड पडले. एक एक तुकडा कुरतडला जाऊ लागला. लोकांना कसलीही माहिती नाही. सारी घोडी कागदोपत्री नाचू लागली. लोकांना अंधारात ठेवून कारभार चालू. सोसायटीचे सभासद शंभराहून जास्त. कोणालाच काही माहिती नाही. मी साहेबाला सांगत असतो. साहेब ऐकत असतात, पण बेरकीपणाने म्हणतात, "अहो लोक अडाणी, याला आम्ही काय करावे? ७।१२ कोरा झाला. आम्ही जमीन दिली. कॉर्पोरेशनने ताब्यात घेतली. आता काही करता येणार नाही. मी २० ला बैठक बोलावलीय. आपण येऊन कागदपत्र दाखल करा."

आम्ही सायबांशी युक्तिवाद मांडलेला असतो. "साहेब, जमिनीवर तावा नाही म्हणता तर मोर्चा निघणार समजल्यावर तहसीलदारांनी नोटिसा कशा काढल्या? एक नोटीस अशीः 'तुमच्या घर, गोठे, झाड-झाडोरा-तदंगभूत मालमत्ता आम्ही जप्त करतोय.' आणि लगेच दुसरी नोटीस अशी : 'आपण २० तारखेला या. जागेचे वाटप करायचे आहे.' या नोटिसा कशा आल्या?" 'आपण पुन्हा या,' याच्या पलीकडे आणि 'आता काही करता येत नाही' या पलीकडे चर्चा जाईना. आम्ही सहानुभूतीने विचार करा. अशी विनंती करून निघालो.

मोर्चा गरम. चालू लागला. घोषणांनी वातावरण दणाणू लागले. गुरं-जनावरं, गाड्या, बाया, पोरे, माणसं, तरुण सगळ्यांना चेव आला. मोर्चा शहरात कुतूहलाने पहात असतात. मोर्चा कॉर्पोरेशनच्या फाटकावर येऊन आदळतो. पुन्हा दरवाजा बंद. शिष्टमंडळ आत जाते. डॉ. बाबा आढाव, दत्ता एकबोटे, तायाप्पा भंडारे. आणि भटक्या विमुक्त जाती संघटनेच्या कार्यकर्त्यांनी घोषणा, गाणी सुरू केली.

शिष्टमंडळ आत गेले तर महापौर गैरहजर. आयुक्त गैरहजर. झाले एका मोठ्या अधिकाऱ्यांशी बोलणे सुरू. कॉर्पोरेशनचे बोट शासनाकडे. त्यांनी दिली, आम्ही घेतली. आम्ही काय करणार? आम्हाला काय, आम्ही अनेक जागा मागितल्या, आम्हाला ही दिली. सर्व्हे नं ९ ते १४ शासनाने दिलीय. आता तिची किंमत ठरेल मग आम्ही पैसे भरू. तर कार्पोरेशन आणि जिल्हाधिकारी कार्यालय दोघांनी ९ ते १४ (२) हा डाव कुठून निर्माण केला कळत नाही. '७।१२ ला तशी नोंद नाही. आम्ही तुमची जमीन घेतलीच नाही. शासनाकडे जा.' तर आम्ही बाहेर. बाहेर सभा चालू असते. लोकांच्या घोषणा चालू. आमचा क्रांतिकारक घोळ चालू. सभा संपते. आता घोषणा असते : 'एक इंचही जमीन सोडणार नाही!' 'अन्याय सोसणार नाही.' लढ्याची पुढची तयारी जोरात सुरू झालीय.

कॉर्पोरेशनचे सभासद दत्ता एकबोटे, ना. तु. पवार, सतीश देसाई, शिवाजीराव ढमढरे यांनी सहकार्य देऊ असे सांगितले.

दरवाजा ठोठवायचे काम चालू आहे. आवाज वाढत जाईल. पक्ष, पंथ, जात, धर्म, लिंग, या सगळ्यांच्या पलीकडे जाऊन माणूस आणि माणुसकीचा न्याय यांचा हा संघर्ष आहे. सगळी जनता जाणते आहे. आम्ही जनतेच्या कोर्टात आलो आहोत.

•



बारशादिवशी बार्शिंग

महाराष्ट्राची 'धनलक्ष्मी' या सार्थ नावाने परिचित असलेली 'कोयना विद्युत्-योजना'. महाराष्ट्राची आणि देशाची मान जगात उन्नत करणारी. तंत्रज्ञानाचा अभिमान वाटावी अशी देखणी, वर्धिष्णू योजना साऱ्या महाराष्ट्राला उजेडाने न्हाऊ घालणारी. तिचा आपणा सगळ्यांना केवळ अभिमान! कोयनेच्या निसर्ग परिसरावर ऊर भरून माया करणारा मी ढेकळासारखा विरघळत गेलो. अभिमान जाऊन लाजेने आपोआप मान खाली जाऊ लागली. वैभवसंपन्न निसर्ग शाप वाटू लागला कारण...

कारणही तसेच महत्त्वाचे. बाळासाहेब कोळेकर हा श्रमजीवी जनता सहाय्यक मंडळाचा खंदा लढवय्या कार्यकर्ता सांगत असतो, कोयना परिसरातील भूमिपुत्रांच्या व्यथा – वेदना. दाभोळकरांच्या माडीवरली मंडळी अस्वस्थपणे ऐकत असतात. कोळेकर माहिती देऊन आव्हानात्मक पवित्र्यात विचारतो, "येता का या बैठकीला?

सह्याद्रीचे कडेकपारी तुडवीत ते येणार आहेत. डोंगराएवढाले त्यांचे हातपाय पसरीत जमणार आहेत. ढोनला त्यांची जात पंचायत बसणार आहे. पाटण, सातारा, जावळी यांच्या पश्चिमेकडचा भाग. या कोयना प्रकल्पाने निर्माण केलेल्या बेटावरचे हे सगळे सगेसोयरे एकत्र येत आहेत. उंच कड्यांना तिडा टाकीत, एक एक कडा चढत जावं लागेल." बाळासाहेब तसा तिशीतला तरुण पोरगा. आम्ही सारे तरुणच. लाईन जमली. मी आणि दाभोळकर येण्याचं आश्वासन देतो. बाळासाहेब कोयनानगरला गेला. आम्ही दुसऱ्या दिवशी निघण्याचा निश्चय केला.

दुसऱ्या दिवशी सकाळी दाभोळकर, मी, धुरळा खात, धक्के खात एकदाचे कोयनानगर स्टँडवर उतरलो. नेहमीप्रमाणे एस. टी. 'लेट'. बाळासाहेब कोळेकर अस्वस्थ. स्टँडवर ताटकळलेला. धरणातली लाँच उभी केलेली. पण आम्हाला एस. टी. तून उतरताना बघून त्याचा घामेजलेला चेहरा खुलतो.

धावत पळत धरणाजवळ आलो. स्टँड सोडून जरा पुढे आलो की, समोर माणसाच्या कर्तृत्वाचा महान प्रकल्प उभा असतो. आपल्या चिरेबंदी छातीवर पाण्याचे कठोर आघात सोशीत भक्कमपणे उभा. कोयनामाईचा पुत्र 'बंधारा.' एका बंधाऱ्याच्या पुरुषार्थाने केवढा जलसमुद्र आपल्या कवेत घेतलेला. सुरूची उंचच उंच झाडं डोलत असतात. आम्ही भराभरा डोळ्यात साठवत असतो आसपासच्या उंच टेकड्या नी सह्याद्रीचा दिमाख, त्याची हिरवीगार वनश्री आणि शिवसागरातले अथांग हिरवेगार पाणी.

बाळासाहेब नेहमीच्या सरावातल्या सात-आठजणांना लाँचमध्ये हात देत आत घेत म्हणाला, "चला, मंडळी वाट बघत असतील."

बाळासाहेबाचा 'बाळ' कोळेकर झालेला असतोच. त्याचे अन्य साथी आमच्या बरोबरच लाँचमध्ये चढतात. लाँच श्रमजीवी जनता सहाय्यक मंडळाचीच असते.

बाळ आपल्या सहकाऱ्यांशी आम्हा दोघांची ओळख करून देतो. 'हा जनार्दन ऐरे, हे बाबुराव शिंदे. दोघेही सडावाघापूरहून बैठकीसाठी आलेत.' बाकीच्यांची कामे चाललेली असतात. लाँच पाण्याला मागे रेटीत टेकड्यांच्या कवेत घुसत असते. जनार्दन ऐरे सांगत असतो, "मी 'गोपाळ धनगर' जमातीतला पहिला शिकलेला माणूस. नंतर हे शिंदे. त्यानंतर बाळ कोळेकर. सात-आठ लोकच शिकलेले असू."

"हा 'गोपाळ धनगर' काय प्रकार आहे?" माझा प्रश्न, कारण 'गोपाळ'ही भटकी जमात मला माहीत असते.

तो सांगतो, "आमीबी भटकेच की. धनगरांच्या 'साडेतीन' जाती आहेत. (साडेतीन म्हटलं की सध्या आपल्याला घाम फुटतो!). हारेकर, खुरेकर, शेगर या मुख्य जाती आणि खाटिक धनगर ही अर्धी जात. पण या जमातीचे लोक 'क्षेत्रीय धनगर' म्हणवून घेतात."

या उपजातीबद्दल मी कुतूहलाने विचारतो. मध्येच शिदे सांगू लागतात. "१९६७ मध्ये आम्ही पहिल्यांदा या गोपाळ धनगरांची परिषद सडावाघापूरला घेतली. तेव्हापासून हे गोपाळ धनगरांचं काम सुरू झालं. तेव्हा मी सातवीला असेन. पाटण, जावळी आणि सातारा या तालुक्यांच्या पश्चिमेकडच्या सह्याद्रीच्या रांगांत हा समाज पसरला आहे. लोकसंख्या जवळपास तीस हजारांच्या दरम्यान असेल. मेंढ्या पाळतात हे मेंढपाळ धनगर, तर गुरं सांभाळणारे गुरेपाळ धनगर. गुरे पाळणारे म्हणून आम्ही गोपाळ धनगर. तर काय सांगत होतो, आमच्या साडेतीन जाती, त्यांच्यापैकी आम्ही हाटेकर धनगर. हाटेकरांच्यात मेंढपाळ आणि गुरेपाळ असे दोन भाग. तशी आमची ४९ मूळ घराणी अन् ३५० कुळ्या हायेत. आमी हाटेकर प्रत्यक्ष गुरे पाळणारे. तर खुटेकरांचा धंदा येगळा. खुटेकर आमच्याकडून म्हंजी मेंढपाळांकडून मेंढराची लोकर घेतात. आन् त्यांच्यापास्नं घोंगड्या, जिन तयार करतात. तिसरा प्रकार हाय शेगर धनगरांचा. ते जनावरं पाळीत नाहीत. आन् घोंगड्या इनतबी नाहीत. तर इनलेली घोंगडी खुटेकरांकडून घेत्यात आन् गिराइकाला इकत्यात. तर खाटीक धनगर मेवामिठाई इकत्यात. तर कुणी बकऱ्याची सागुती इकत्यात.

"तशी आमची जात भटकी. आम्ही पूर्वीचे राजाळ्याचे. म्हंजी डोंगराच्या पल्याडले. पण गुरानला चारा मुबलक मिळायला लागला तसं आम्ही डोंगरानला धरून राहिलो. आन् डोंगरच आमचं घर झालं. आज आमच्यात रोटी बेटी व्यवहार होत नाही. पण जानुबाई, बिरुबाची पूजा एकच आसतीया. या तिन्ही तालुक्यांतल्या शिक्षणाचं प्रमाण शून्य टक्के. ३० हजारांत आम्ही दहापाच लोक कसेबसे शिकलोय."

मध्येच दाभोळकरही प्रश्न विचारत असतात. लाँच शिवसागरात मध्यांवर आलेली असते. भोवती हिरवंगार जंगल. त्यात साग, शिसव, बांबू, निलगिरी यांची लागवड फॉरेस्ट खात्यानं केलेली. सह्याद्रीचं सारं अंग वृक्षांनी लपेटलेलं. मध्येच एखादा सुळका वर गेलेला, तर एका बाजूला खोल दरी. त्यात शिवसागराचं वैभव खेळत असतं. वर निळं आभाळ आणि बाजूला निळं पाणी. हातावर आतापर्यंत बाळनं भाकरी चटणी टेवलेली असते. इंजिनाची भकभक चालू तर आमच्या गप्पाही तेवढ्याच रंगात आलेल्या. कधी बाबुराव सांगतात. कधी जनार्दन ऐरे सांगतात. मध्येच बाळ कोळेकर अधिक माहिती पुरवीत असतो.

गप्पांचा ओघ आता लोकांच्या प्रश्नाकडे वळतो. कोयना धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचा विषय निघतो. बाळ कोळेकर सांगतो. "या लोकांना पुनर्वसनाचा पैसा मिळाला, पण बापजन्मात पैसा पाहिलेला नव्हता. त्यात धरणाचं काम दहा वर्षं पुरलं. त्यानं घर बांध, कुठं पोरांची लग्नं कर यात सारा पैसा गेला. तर बऱ्याच लोकांना व्यसनं लागली. त्यात पुन्हा भूकंपाचा तडाखा बसला. घरंदारं पडली. सरकारी, लोकांची

मदत आली. पुन्हा पुरवणी कामं निघाली. ती आठ-दहा वर्षं पुरली. गरिबीचा शाप कायमच राहिला. पुनर्वसन झालेल्या गावी दहा टक्के लोक गेले असतील. बाकी ९० टक्के लोक येथेच आहेत, मजुरी करत. जी गावे नदीच्या पात्रालगत होती ती उठून गेली. बाकीची जी गावं डोंगरावर होती ती उठून गेलीच नाहीत. उलट उठून गेलेले लोक आज इतके कंगाल झालेत की, तेच पुन्हा डोंगरावर जाऊ लागलेत. फॉरेस्ट-अतिक्रमण करून, तर कुणी आपापल्या रानात राहिलेत. कोयनानगर ते महाबळेश्वर-पर्यंत या गावांचा पसारा आहे. पावसाळ्यात यांचा चार महिने इतर जगाशी संपर्कच तुटतो. एरवी मोळ्या विकणं, जंगलसंपत्ती– उदा. हिरडा, मध–गोळा करणं, गुरं सांभाळणं ही कामं करतात. पावसाळ्यात मीठ आणायलाही पाच-पन्नास मैलांची मजल मारावी लागते. शाळांचा गेल्या दोन वर्षांपर्यंत पत्ता नव्हता. दोन वर्षे चळवळी केल्या, तेव्हा कुठं चौथीपर्यंतच्या शाळा झाल्या. तर मास्तर शाळेच्या गावी राहत नाही म्हणून पुन्हा चळवळ केली. आता मास्तर राहतात. शिक्षणाचा अभाव, त्यामुळं आदिवासीसारखं राहतात. पण यांना सवलत मात्र नाही. ”

कोळेकर सांगत असतो. आसपासचं समृद्ध जंगल दाखवीत असतो. डोंगरात मध्येच चार घरांची एखादी वाडी दिसत असते. लोक लाँच बघून धावत येतात. मोठ्यानं साद-प्रतिसाद होतात आणि लाँच पुढे जाते.

शिंदे धनगरांबद्दल बोलू लागतात. ते म्हणतात, “ आमच्यात या अडाणीपणानं मोठा उच्छाद मांडलाय. सगळ्यांत वाईट चाल बालविवाहाची. लहान म्हंजी किती लहान मुलांची लग्नं व्हाबीत ? ” मी नुसता हसतो. भटक्यांचा तिडा मला माहीत असतो. वैदू त्याला म्हणतात, ‘ पोटातली भाजी विकत घेणे. ’ तर शिंदे सांगतो, “ आमच्यात अंगाला वस्त्र नाही, पोटात अन्न नाही, याची काळजी करण्यापेक्षा पोटातल्या गर्भाचीच काळजी पडते. पोटालाच कुंकू लावतात. तेंव्हापास्नंच लग्न ठरतं. तर बाई बाळंतीण झाली की, मागणी घालणारा त्या बाईचा उंबरा शेणानं सारवतो. त्याला ‘उंबरा पूजन’ असं म्हणतात. उंबरा पुजला की, नारळ पोरीच्या बापास द्यायचा. त्यो त्या बाळंतिणीनं देव्हाऱ्यात ठेवायचा. मग दिलेला शब्द कुणी मोडत नाही. लग्न पक्कं होतं. पैपावने जमा करतात. शे-दोनशे माणूस जमतं. पाडव्याला बाशिंग बांधून लगीन लावत्यात. कवा कवा तर बाळंतीण हातावर पोरगी आडवी धरते. दुसऱ्या हातात बाशिंग धरते. आन् पोरगा त्याच्या बापाच्या काखेत असतो. बामन बोलावत नाहीत. आमचाच उपाद्या असतो. बोडके आन् येडगे हे परंपरागत उपाधे आहेत. लोक जमले की, उपाधा लग्न लावायची परवानगी इचारतो. होकार आला की, तो म्हणतो, ‘ आक्षीदा टाका. ’ आक्षीदा टाकल्या जातात, टाळ्या वाजविताव. टाळ्या वाजल्या की, लगीन झालं. इन-इवाय आनंदात बकरी मारतात आन् आत बरबाटांचा रस्सा, दारूपानी होतं आन् लग्न संपतं. त्यानंतर पोरगी आईबापा-

कडेच राहते. पदर येस्तोवर बाप पोरीला सांभाळतो. सोळाव्या वर्षी मुळसाडा होतो. त्याला लग्नाएवढाच खर्च येतो. दागिने, भांडी कुंडी देतात. मुलीला आदीच .द्याज देतात. ते ५ हजारापास्नं ते ३० हजारांपर्यंत असतं. एवढं करून आता पुढचे प्रश्न आहेतच. पोरगी ऐन १५-१६ वर्षांची तर नवरा ३०-४० वर्षांचा. मग पोरी नांदत नाहीत. तर जो पोरगा २५-३० वर्षांचा असतो, त्याची बायको ७ वर्षांची असते. त्याने तो दुसऱ्याची बायको पळवतो. लग्नाला मुली मिळत नाहीत. मग पोरींचा बाजार वाढतो. आणि गोरगरिबांना बाई मिळत नाही. श्रीमंताची मातर मजा असते. तो कुणाचीही बाई विकत घेऊ शकतो. एक एकाला चार चार बायका असू शकतात. तर बायांचा, पोरींचा व्यापार करणारे काही दलाल जातीत तयार झालेत. ते लाच खाऊन लोकाच्या नांदत्या बाया पळवितात. आमच्यातले 'गावडे' (पाटील मुंडे या अर्थाने) याला फूस लावतात. या बालविवाहाची पद्धत जोरात चालू आहे. म्हणून बालविवाह–विरोधी मोहीम चालू केलीय." त्याचीच मीटिंग असते. बालविवाह-विरोधी कृतिसमिती तयार झालेली आहे. भागातील कार्यकर्ते कामाला लागलेले आहेत.

बालमृत्यूंचं प्रमाणही मोठं आहे. त्यानंही प्रश्न निर्माण होतात. या कृतिसमितीनं यंदा असे २३० ठरलेले विवाह रोखलेत, नोटिसा दिल्यात. लोकांनी आपण होऊन ते थांबविलेत.

चर्चा सामाजिक प्रश्नांवर रंगलेली असते. पूर्वेच्या बाजूला उभा कडा विस्तीर्ण होत गेलेला असतो. डोंगरावर दाट जंगल उभं असतं. लाँच किनाऱ्याला येते. कोळेकर सांगतात, 'चला मंडळी, दोन तास लागतील. अगोदरच उशीर झालाय, ऊन ऐन दुपारचं. घड्याळात अडीच वाजलेले. लाँच किनाऱ्यावर लागली. आम्ही मंडळी डोंगराला चढणीला लागलो. खड्या चढावानं जायचं. मुंगी सरकावी तसं सरकायला लागलो पायवाटेनं. कोळेकर सगळ्यांत म्होरं. त्याचे मागे शिंदे, ऐरे, दाभोळकर, मी. अंगातली कापडं घामानं निथळू लागतात. साऱ्यांच्या डोक्यापासून बोटापर्यंत घामच-घाम. पण कुणी थकलेला नसतो. उत्साह ओसंडत असतो. त्यात भर म्हणून खालून ड्रायव्हर शिळा मारत असतो. वरून कोळेकर, त्याचा पट्टा चालूच असतो. " हे औषधी झाड आहे. या झाडाच्या सालीचा चांगला कागद होतो. या झाडाचा पाला तिखट लागतो. तर या झाडाची मुळी गोड लागते. या झाडाच्या पाल्याला फार चांगला वास आहे. हे पान डोळ्यात गेलं तर डोळे जातात. या झाडाला मोहर फार फार चांगला येतो. हे मधाला असतं. या झाडाचा पाला फोडणीला वापरतात. " तेवढ्यापुरतं आमचा तांडा थांबायचा. पुन्हा वर चढू लागायचा. निम्म्यात जाऊन मागं पाहिलं तर खाली दऱ्या पाण्यानं भरलेल्या. आभाळातल्या चांदण्या चमकाव्या तसं उन्हानं पाणी चमकतंय, खुणवतंय, आणि तोंडाला पाण्यासाठी कोरड पडलेली. थांबत थांबत वर चढू लागलो. 'किती अजून चढायचं?' म्हटलं की, कोळेकरचं

उत्तर तयार, 'हे झालंच.' आसं झालंच, झालंच करीत एकदाचं झालं. माथ्यावर आलो. पश्चिमेला उंच निमुळता कडा खाली वाकू देत नव्हता. म्होरं थोडं पठार दिसत होतं. डोक्यावरचा रुमाल पिळला. चार शिव्या स्वतःला दिल्या. खरं म्हणजे डोंगरदऱ्या काही नवीन नाहीत, आणि अजून काही वय झालेलं नाही. तेवढ्यात येवढा भला घाम. पण काय करणार ? घाम आला हे खरं आन् धाप लागली तेबी खरं. तर असे धापलत धापलत चाललो. अजून लांब असेल असा विचार करत होतो. दोन्ही बाजूनं जंगल आणि मध्येच गाव जवळ आल्याचा 'वास' येऊ लागला. नाकानं सांगितलं. जरा म्होरं गेलो तर शेणाचे उकिरडे दिसू लागले. शेण लावलेलं दिसू लागलं. कोळेकरांनी उसासा टाकला. आणि आम्ही एक बारकं वळण वळलो. तो म्होरं वाडग्यावाणी येस लागली. काय बाया उभ्या, काय बापे उभे. असे म्हणजी टकुऱ्याला भलंमोठं पागुटं, आंगात दंडकी, खांद्यावं घोंगडं, आन कंबरेला लंगुटी, हातात काठी. तर तरुण पोरांनी आंगात बंडी, डोस्क्याला टोपी, आन् कंबरंला पट्ट्यापट्ट्याची आखुड इजार. येवढाच पिढीत बदल. तर बाया गुडघ्यापातुर लुगडं नेसलेल्या. खोच आसं खवलेलं की आर्ध्याहून जास्त पाय उघडंच. तर पदर मातर येवढा लांब की, डोस्क्यावरनं घेऊन कंबरंला दोन तिडं लावल्यालं. नाकात भली मोठी नथ, गळ्यात भलं मोठं डोरलं. तर दोन–चार पोरी ४–७ वर्षांच्या, त्याबी अशाच नेसू नेसलेल्या. गळ्यात डोरलं. कोळेकरानं त्यातल्या बारक्या पोरीला उचलून घेतलं आन् नाव इचारलं. ती चाचरत 'यसूदा' असं म्हणाली. तीन-चार वर्षांची आसंल. तिचं लगीन झालेलं आसतं. या पाड्यावर अशा २० तरी पोरी असत्याल. आमी आल्यालं बगताच कोकरे म्हणून एक कार्यकर्ता आम्हाला घोंगडं टाकतो. येवढे दमलेलो असतो की, आम्ही टेकतो. टेकून उसासा टाकतोय तवर म्होरं तांब्या आला, त्यो ताकाचा. आंबट खारट ताक तसल्या तडाख्यानं खलास झालं. सगळे ताक पीत होतो. जवळच मोठा तात्पुरता बांधलेला मांडव दिसला. मांडवात तीन-चारशे लोक जमलेले. आमी ताक-पान उरकून मांडवात आलो, तर मंडळींचं कामकाज चाललेलं असतं. ढोनकरांनी येवस्था झाक केलेली असते. समदे गोल बसलेले असतात. पोषाक तोच, फक्त रंग तेवढे येगयेगळे असतात.

वाळ कोळेकर बालविवाहाच्या दुष्ट रूढीबद्दल सांगतो. पोटतिडकीनं बोलतो. त्याच्या प्रत्येक शब्दाला लोक दाद देत असतात. टाळ्या मात्र नाहीत. मध्येच लोक बोलायला बगायचे. बाकी कार्यकर्ते गप्प बसवायचे. कोळेकर बसला. मग एक एक जण बोलू लागला. सगळ्यांच्या बोलण्याचा सूर तोच. आमक्यानं तमक्याची बाई पळवली, तमक्यानं तमक्याच्या पोरीची दलाली घेतली. लोक बोलू लागले. रामचंद्र कोकरे म्हणाले, " परवाच डोनीच्या वाडग्याला (ता. पाटण) ६१ दिवसांच्या पोरीचं लगीन ठरलं. त्याला मोडता घालावा म्हणून मी भांडलो तर मलाच लोकांनी

प्राय अंधःकारमय जीवन. काळजात कालवाकालव होत होती. एका बाजूला सामान्य माणसाचा पुरुषार्थ, दुसऱ्या बाजूला समृद्ध निसर्ग आणि समोरच ओसाड मानवी जनसमूहाचा चोळामोळा झालेला. आत्मविश्वासहीन पशुतुल्य जीवन.

खाली उतरलो असं वाटे आणि खाली वाकून पाहिलं की, तेवढंच अंतर उरलेलं असे. कोळेकर आणि त्याचा गट खूपच चांगला आहे. रचनात्मक विधायक काम करताहेत. दलाल, गुंड, शासकीय अधिकारी आणि ठेकेदार—सगळ्यांना टक्कर देत रचनात्मक विधायक काम करताहोत. लॉंच आहे, दूधडेअरी आहे, मधमाश्यांचं प्रोजेक्ट आहे. पण फाटलेल्या आभाळाला किती टाके घालणार ? अखेर धावत येऊन सगळेचजण लॉंचमध्ये बसलो. रात्रीचे जवळपास आठ वाजले होते. अंधार पसरला होता. लॉंचमध्ये पुन्हा चर्चा सुरू झाल्या. मी मात्र सुन्न होऊन बसलो होतो.

कोयना माईचं पाणी संथ, शांत होतं. शिवसागर निपचित पडला होता. तर हळूहळू लॉंचमध्येही चर्चा कमी होत गेली. अखेर उरली ती इंजिनाची घरघर. बाकी सारे शांत बसून होते. आता किनारा येईल म्हणून.

●

पालं गोपाळांची

आई म्हणायची, "चित नाही थिरी, आण बहुतीर्थं करी. पायाला पाय म्हण लागायचाच न्हाय. उटवळ रांडंवाणी उब्या जल्मात एका जागी वसायचा नाईस." आत्ताची माजी गत आईनं सांगितल्या सारखीच असते. मागं मी गल्ली बोळात फिरायचो, गाडवामागं वळती करत. आत्ताही हिंडतो. विन भिकाराची पालं दिसली, की पाय आपापच तिकडं वळायला लागतात. वळकी–पाळकीची गरजच आसत न्हाई. जाऊनशान उबं न्हायलं का सूत जमून जातं. त्याजं आसं हाय, त्यांच्या पोटातलं आपल्या व्हटावर यायला लागलं का नाड जमती. मंडळी मोकळी होऊ लागतात.

परवा आसंच वाठार स्टेशनच्या (कोरेगाव) एस. टी. स्टँण्डवरून निघालो होतो. रेल्वे रुळाचं फाटक बंद होतं. एस. टी. सिग्नलची वाट बघत उभी होती. रुळाच्या

पलिकडं पाचपन्नास पालं पडलेली. साजं एस. टी. चं तिकीट म्हणजे फलटणपर्यंतचं. पर्ण ही बिराडं बगावीत आनू, मंगच फलटणला जावं, म्हण इचार करत व्हतो. तवर एस. टी. सुरू झाली. सिग्नल मिळाला होता. रेल्वे रुळाचं फाटक उगाडलं व्हतं. रेल्वेचा रूळ ओलांडून धुळीचा लोट उडवीत एस. टी. स्टँण्डवर पोचली. शबनम गळ्यात आडकावली आन् एस. टी. तनं खाली उतारलो. गेल्या पावलानं मागं वळलो. पाचन्धा मिनटं चालल्यावर पालांच्या जवळ जाऊन पोचलो.

रेल्वेरूळ आन् गाव ह्यांच्या वेचक्यात लिंबाच्या झाडाखाली पाचपन्नास पालं पडलेली. दोन–तीन तर नुकतीच येऊन उतरल्याली. पालकरी पाल ठोकीत व्हते. पाणकणसांच्या बाव-बाव काड्या सुतळीनं बांदून त्यांचा कुड केलेला. ह्या कुडांना तीन काट्यांचा आदार दिला का तासाभरात पाल उभं व्हातं. पाणकणसांच तराट आसं भारी आसतं का वाराच काय पर वावटूळ आन् पावूस दिकील त्याज्याम्होर झक मारतो. बाकी बिराडात बापे माणूस कुणीच दिसत नव्हतं. पाच-पंचवीस बाया घोळक्यानं बसलेल्या. चार-पाच फाकड्या पोरी फतकल मारून बसलेल्या. काही बायका तेंच्या पाटीला गुडग्याचं टेकान लावून त्यांच्या डोसक्यातलं टेणं मारत बसलेल्या, तर काही जणी तीन दगडांच्या चुलीम्होरं रानातनं इचून आणलेल्या काट्या दाबून दाबून दडपून बसवत होत्या.

दुसऱ्या बाजूला पाच-सात पोरं कैपरगलीचा डाव मांडून बसलेली तर दुसरा एक घोळका जरासं आडुसा करून डोस्क्यांला डोस्की चिकटवून म्होरं वाकून काईतरी करत व्हता. त्यो घोळका जरा मोठ्या बायांचा व्हता. त्या बाजूला जावं म्हण इचार केला आन् तिकडं पाय वळवलं. मी सडक सोडून बिराडांकडं सराकलो आन् झाडावरलं कावळं उडावं तसं माणसं उट्टून उबी व्हायली. मी जवळ गेलो तर सागुतीचं वाटं पडल्यालं व्हतं. सागुती कशाची व्हती, कुणास ठावं. खुरा आन् फऱ्यावरनं म्या हेरलं, ते शेरडाचंच आसलं पायजे.

मी जवळ इस्तंवर कुणी काय बोललं न्हाई, पर समद्यांचं डोळं माज्यावर भिडलेलं व्हतं. जसा जवळ गेलो तसा पोरांचा कालवा सुरू झाला. पोरं काय बोलत व्हती, मला बी समजत नव्हतं. एक बाय म्हणली. 'बंकाई होपली निजरा.' दुसरी पोरान्ला खेकसून म्हणली, 'खामीन गावला तिकडं चिकु नको.' तिसरी म्हणली, 'ए पन्ही निजरु नको. फारस्टीक आला निजर. रेवाटी तुडवू नका खपळ.' चौती म्हणाली, 'रापकी वैतली का?' मलाबी समजत नव्हतं. पर आंदूक आंदूक समजत व्हतं ते एवडंच का कुणीतरी परकं माणूस आलंय म्हणजे काय तरी बिलामत आलीया, पोरांनू पळा. मी एका बाईला बिचारलं, "आक्का, रापकी वैतली का?" (भाकरी खाल्ली का?) बाईनं माजं बाक्य ऐकलं आन् कालवा एकदम थांबला. मी पूना म्हराटीतनं सुरू केलं, 'कंच्या गावावरनं आले?' बाई नुसतीच बगत

व्हायली. तवर एक म्हातारा सागुतीचं वाटं घालता घालता उटला आण म्होरं आला. "आमी 'गोपाळ' मालक." तो मला पाटील समजून बोलाय लागला. मी बाकीचं इचारणार तर तोच मोट्यानं बोलत सुटला. मी उब्या उब्या सगळं बगत हुतो. माजी मी जुजबी वळक करून दिली. म्हातारा म्हणाला, "आमची काय बिराडं हतंच पंदरा-इस सालं झाली हायती. कायबाय बिराडं चार पाच दिस झालं इऊनशान. तर कायबाय ही आत्ताच आल्याती." "कुटनं कुटनं आल्याती?" मी चौकशी केली. तसं म्हातारा चपापला. त्याला माजा संशय याला लागला. "मालक, आपल्याला याक का गाव हाय? बारा गावं, बारा वाटा तुडवत आलो. कंच्या गावाचं नाव सांगू?" मी म्हाताऱ्याची आडचण ध्यानात घेतली. आन् जरा इसवास द्यावा म्हणून माजी वळक करून दिली. नाव, गाव, धंदा, आता काय करतो. सारं सांगितलं. आपनबी गाडवगोती हाय आन् आता ह्या आपल्या भटक्या जमातीच्या संघटनेचं काम करतोय, आसं बी सांगितलं. तसा म्हातारा नुसता बगीतच बसला. बाकीची माणसं मगा टवकारून बगत व्हती, ती आता म्हातारा निस्तरंल म्हणून आपापल्या उद्योगात डोकं घालून बसली. पायंदूळीसारका मगाचा कालवा विरून गेला.

मी लाख सांगत व्हतो पण म्हाताऱ्याला काय खरं वाटंना. आता म्हाताऱ्याला कसा इसवास द्यावा याचं कोडं माज्या म्होरं पडलेलं. आन् याला कसा कटवावा याचा इचार म्हातारा करत असावा. "आपुन जरा बसून बोलू." मी म्हणालो. तसा म्हातारा बावरला, "हातं नगं. केंडावर जावून बोलू." तवर एका पालात बेंडातली कलाट वाजल्याचा आवाज आला, तसा मी म्हाताऱ्याला म्हणालो, "आपुन बेंडाची चार गाणी वाजवू आण मग जाऊ केंडावर."

दिवस मावळतीला गेलेला. पोटामागं गेलेलं सारं गोपाळ सांचं घरी येणारच. आन् मलाबी पालात घुसायचं होतंच. अनायसे बेंडातली कलाट वाजली. बस, आता म्हाताऱ्यालाबी इसवास वाटाय लागला. एका पालाम्होरं इऊन उभा व्हायलो तर दहाबारा वर्षांचं एक पोरगं व्हटावर कलाटीचं रीड ठिवून झोकात वाजवीत व्हतं. एक बाई तान्ह्या पोराला झोकं देत व्हती. पोराचं दोनी पाय दोनी हातानी धरून धुनं वाळवावं तसं झटकत व्हती. खाली मुंड वर पाय. बाईच्या हाताचा झोका तालात पुढं जायचा आन् मागं यायचा. पोरगं नुसतं टुकुटुकू बगत व्हतं. हूं नाय का चूं नाय. क्षणात दोनी पाय सोडून गरकन त्याला फिरवून झेलायची. एका हातावर उभं करायची. इतक्या कवळ्या जिवाला आयुष्यभर कराव्या लागणाऱ्या कसरतीचे, ही बाई धडे देत व्हती. मी जरा इकडं तिकडं बगितलं. तवर पोरांनी गराडा घातल्याला. पोरांची रेटारेटी सुरू असते. काईबाई माणसांला बेंडाच्या सुपारीचं गिराईक आसंल आसं वाटलं. आन् आतापातूर लांबनंच बगणारी जाणती माणसं येऊन चिकाटली, काय पायजे काय पायजे म्हणून. एकाच येळंला चार-चार, पाच-पाच माणसं बोलू

लागली. आतापातुर बारकी पोरं, म्हातारी मानसं, बायाच दिसत व्हती. पण सुपारी आसंल आसं दिसल्यावराबर आपापल्या कोपटातनं सारी जमा झाली. मी त्यांना गप बसवत व्हतो. आन त्यांचा कालवा वाढत होता. नुसता डोंव उसळलेला. मी काय बोलतोय, त्यांना समजंना आन् ते काय बोलत्यात, मला समजंना. हातानं शांत रहाण्याबद्दल सांगत व्हतो. तवर त्यो मागचा म्हातारा मोठ्यानं वरडून त्यांच्या भाषेतनं बोलाय लागला. तसं सारी मंडळी शांत झाली. त्यातला एक जरा चुणचुणीत तरुण हात जोडून म्हणाला, "सायब, आमचं चुकलंच. आमाला वाटलं गिरायकच हाय. गिरायक आलं की ही आमची वहिदावाणी चिमट आसती बगा. ह्योच कालवा नुसता घावशील पावशील करत्यात. सुगी सराई झाली, आता कामधंदा काय नाय. ज्याचं मिळंल त्याचं वाजवतो. पोटावारी वाजवायचं, एकांदा खळीला आला का त्याचं तसंबी वाजवायचं. आमचा खेळ तर बंद पडला. कुणी गिनत नाय बगा. भाकरतुकडा मिळतो. पोराबाळांचं भागतं. नाईतर उपाशी मरावं लागंल. असू आपलं नशीब," म्हणत त्यानं पोराला तराट हातरायला लावलं. त्याच्यावर बसलो. भाषाण ठोकण्याच्या इचारात व्हतो तवर म्हातारा त्याच्या भाषेत कायबाय बोलला. तवर मगाचा तरणा पोरगा म्हणतो, 'सायब, आपन कुणीकडं आले?' मी सांगितलं. "आपन काय वाजवता?" "मी बाजात ढोल वाजवतो. आमचा बाजा घरचाच हाय. आमी घरातली चार माणसं वाजवतो. तीन मानसं चुलत भावाची हायत. आसा आमचा तापा हाय." माजं बोलणं चालू व्हतं तवर त्यानं आपलं कारनिट आणाय लावलं. आपल्या बाजातल्या दोगातिगाना सनग आणाय लावली. मी ढोल घेतला. खांद्याला लावला. ढोलाचं टिपरू ढोलावर पडल्याबरोबर आपलं जुळलं. चार-पाच गाणी वाजवली. कशीबशी, पण आता मागच्या सारकं हात हालत नव्हतं. मंडळी खुश झाली व्हती. चार गाणी त्यांना वाजवाय लावली. दोन चिजा झाल्या. तालासुरानं ताला-कालाचं बोलणं जुळलं, आण आता खरीखुरी बोलणी सुरू झाली.

वाजवण्याचा सीझन, म्हागाई, आसल्या बाता मारता मारता मंडळी मोकळी व्हायला लागली. आता मी श्रोता झालो आन् मंडळी सांगू लागली. आता ती अगदी आगळपगळ. शबनममध्ये टेप होता तो सुरू करावा असं वाटलं, पण तो सुरू केला तर मंडळी बोलणार नाहीत. पुन्हा पंचायती. पण जरा विश्वासात घेऊन बोललो. तसं पुन्हा कालवा आन रेटारेटी सुरू झाली. टेपरेकॉर्डर कुणी कशाला बगीतलाय. तरुण पोरांनी तो या हातातनं त्या हातात नाचवायला सुरुवात केली. माझं काळीज खालीवर होत व्हतं. माझं सारं लक्ष टेपरेकॉर्डरवर तर पोरांचं बी लक्ष त्याच्यावरच. अखेर टेप बगून झाला आन चर्चा पुन्हा सुरू झाली.

एकजण सांगत व्हता. "आमी गोपाळ. कवाकंच्या पिढीत आमाला गोपाळ म्हणलं कुणाला ठावं. पण आमी श्रीकृष्णाच्या वंशाचे लोक. मागं कवातरी गाया गुरं

चारत चारत आमचं वाडवडील या मुलकात आलं. किती डुया झाल्या कुणाला ठावं. आमी बोलतोया, ती आमची बोली. उली-उली कशी गुजर मारवाड्याच्या भाषेगत हाय. म्हराटी आन गुजरातीच्या मह्ली भाषा आम्ही बोलतो. म्हण आम्ही गुजराती मुलखातलं हाय. पर काय की, कुटनं आलो हेचा आमी– कवा इचारच केला न्हाय. आमची आन् डोंबाऱ्याची काम एकच हायती. तेवी आमावाणी फिरस्तेच हायत, पर ते येगळं आण आमी येगळं. रोटी–बेटी येव्हार आमच्यात व्हत न्हाय. त्यांच्यात लई भिसळ हाय. त्यांच्यावाणी आमीबी दोऱ्यावरल्या उड्या मारतो, कोलांट्या उड्या मारतो, कसबी कसरतीची कामंबी करतो. आमच्या बायापोरबी कसरती करत्यात. एक एक पोरगी येताच्या कांबीवाणी वाकती. कापडाच्या घडीवाणी पोराची घडी घालत्यात. डुईच्या केसांनी मोटाली दगडं बांदून उचालत्यात. ढोलावर टिपरू पडलं का सारं चित तारंवर ठिवत्यात. डोळ्याचं पातं लवस्तवर खुटवाणाच्या ह्या कडंन त्या कडंला जात्यात. त्या आर्जुनाच्या गोष्टीगत हाय. आरजुनाला कंच्या पुराणात माशाचा नुस्ता डोळाच दिसायचा. तर कसरत करणारी बाय कसरतीला लागली का ? कानात ढोलाचा ताल आन् डोळ्याम्होरं नुसती तार दिसती. उलीकसं जरी आवसान सुटलं तर समदा सत्यानाश होतो. कैक येळा पडल्यालं माणूस, बाय पोर जायबंदी होत्यात. एकांदा तर जलमातनं उटतो.

" आता डोंबाऱ्यांचं येगळं असतं. ते ढोलकं आन् ताशावर नाचत्यात. तर आमी आमच्या बेंडातल्या तालावर आन् बाजावर नाचतोया. आमच्या बायामाणसांचा कासोटा लई घट तर डोंबाऱ्याचं जरा यंगाळ व्हातया. त्यांच्या बायांचा कासोटा लई ढिला. गोपाळांची बाय जीव दिल पर आब्रू द्याची नाय. लई आब्रूनं व्हात्यात. कसरतीचा खेळ झाला का पूना नाचायचं नाय, का गाणं म्हणायचं नाय आसा आमच्या पंचायतीचा ठराव हाय. डोंबाऱ्याच्या बाया नुसत्या नाचत नाय तर तमाशाबी करत्यात. म्हण त्यानला कोलाटी म्हणत्यात. आता त्यांच्या बाया येसवा होत्यात अन् तरास आपल्याला. आमी नीतीनं व्हातो. गैर आब्रूचा धंदा न्हाय. आमची पंच परमेशर हायत. ते घालत्यालं ती रीत मोडायची न्हाई. आमी गोपाळ कृष्णाचे वंशज. मागंदी गायांची खांड आण बायांची खांड आमी सांबळायचो. म्हण आमच्या बाया आब्रूनं व्हात्यात.

" लगीनसराई आली म्हंजी आमी कसरतीचे खेळ करत न्हाय. लग्नात बेंड वाजवतो. आता काम नसलं तर पोटापुरतं खेळ करतो. बायापोरं गावात चार घरं मागून आणत्यात. पर आमचं वैदावाणी नाय. त्यांचं काय व्हातं, वैदं लई भाकर जमा करत्यात. कोल्ह्या कुत्र्याला घालत्याल. वाळवून वाळवून खात्याल. आमचं तसं न्हाय. आमीबी भाकर आणतो. पण आमाला बाळकृष्णाचा शाप हाय. भाकरी मागून आणली तर खायाची. सांडा-लवंडायची न्हाय. पोटाला लागंल तेवढी समद्यांनी

खायाची. पर ठिवायची न्हाय. सकाळची भाकरी. सांजच्याला नाय. उरलेली भाकरी खड्डा काढून पुरायची पर ठिवायची नाय."

"का बरं पुरून का टाकायची?" मी कुतूहलानं विचारलं. तसं पहिल्या माणसाला गप करून दुसरा म्हणला, "सायब, उगवतोया तो चारा दिल्या बिगर मावळंत न्हाय. आमचा मागता धर्म. आमी जर आजची भाकर उद्या खाया लागलो तर माज ईल. जात बाटली म्हणं, रीत बाटली का? आमच्या धर्मात असं काय दिकून ठिवायचं नाय. आमच्या देवानं सांगितलं, 'रोज चार घरचा शिदा खा, खाऊन माजा, पर टाकून माजू नका. पायानं तुडवू नका. कोल्ह्या-कुत्र्याच्या मुखात घालू नका. धरित्रीला दान द्या.' म्हणं आमी आजचं आजच खातो. आमचं वाडवडील तर सांगायचे, 'मागितल्यालंच खावं. ते बरं न्हातं नाई तर माज इल.' म्हणं आमी एका जागी न्हात नाई. आमच्या देवाचा असाच आमाला शाप हाय."

या भिकेच्या वाळल्या तुकड्यावरनं मी गाडी पुन्हा रुळावर आणत असतो. "आता तुमच्या देवाचं तुमाला एवढं भ्या वाटतं तर तुमच्या जातीच्या पंचायतीचं किती भ्या वाटंत आसलं?"

"सायब, आमचं पाच पंच म्हणजे आमचं परमेशर. एकांद्यानं आगळीक केली, काय ढोणा केला, रीतीभातीचं चुकला तर पंचाम्होरं झाडाझडती द्यावी लागतीया. एकांदी जरी बाय वंगाळ चालीची निगली तरी आमच्यात चालत न्हाय. लगीच आमच्या पाटलाला समजतय. पाटील कोतवालाला धाडून समदे पंच जमावतोय. लगोलग पंचाम्होरं कज्जा चालतोय. त्या बाईचा गुन्हा शाबीत झाला म्हंजी आमी तिला जातीतनं वाळीत टाकतो. एकदा का जातीतनं बाहेर टाकली म्हंजी ती मेली. तिला संगत न्हाय पंगत न्हाय, तिला किडं पडलं आन् ती सडून जरी गेली तरी कुणी जातवाला तिला जवळ करत न्हाय. जातीतनं बाहेर टाकायचं म्हंजी सादं काम न्हाय. लय करून मिटवत्यात. आमच्यात म्हण हाय, 'वरनं दिसाय गोरी आण आत दुखभरी' अशी आतनं जात किडवणारी बाय आमी ठिवतच नाय. त्या बाईला पंचात बसवत्यात. तिज्या डोसक्याचं क्यास काडत्यात, डोसक्याचा भुंडा नारळ करत्यात, तेला चुना फासत्यात, कपाळाचं कुंकू पुसत्यात आण त्याला शान लावत्यात. तिज्या आईला अन् 'बा' ला बोलावत्यात. समदे लोक म्हंजे समदे पंच तिज्या आय 'बा' कडनं दंड घेत्यात. दारू पित्यात. तिला पालथी निजवत्यात. आई हात धरती. भाऊ पाय धरतो. आण बाप मानंवर, कमरंवर, लवणीवर, आण घोट्यावर कुराड मारल्यावाणी करतो. ती बाई रडत आसती. जल्मातनचं उटली की बो. मंग समदी पंच, भाव भावकी, पै-पावनं तिला आकीरचं बगत्यात. मडद्याला खांदा दिल्यावाणी, तिला समदे उचलत्यात. बाप तिला गाडवावर उलटा बसवतो. आण लांब शिवंच्या पडद्याळ निऊन सोडतो. अशी सजा झाली म्हंजी मंग ती जल्मात आमच्या संगतीला का पंगतीला

नसती. असा रिवाज हाय. आमची बाय म्हंजी अशी धुतल्या तांदळावाणी, दिल्या घरी का मेल्या घरी सुकानं नांदतीया. काय टाप हाय तिची जातीम्होरं जायची. नेमाधर्मात नेमलं ते कडंला न्हेलं पायजे."

मी जात पंचायतीबद्दल विचारत व्हतो. तसं म्हातारा म्हणला, "सायब, तुमी मोटी मानसं. आपून ही अशी गावंदरीला पडल्याली, नरकातल्या किड्यावाणी. तुमी लईच विचारून ऱ्हायले, म्हण सांगतो. तुमी ऊद्या शेणोलीला जावा म्हंजे तुमाला समदं समजल. उद्याच शेणोलीला आमची जात जमणार हाय. महिना झाला कोतवालानं आवातनं दिल्या. चार-पाच लग्नंबी हायत, आण धा इस खटलंबी पंचाम्होरं चालत्याल. ह्यो बसलाय त्यो आमचा कोतवालच हाय. त्यो हतं समद्या माणसास्नी घेऊन जाया आलाय. ततं समदी जात जमल बगा. ततं जातगंगा बगा, आमच्या पाटलाला समदं इचारा, त्यो बैजवार सांगंल. लग्नात जेवाबी, खावाबी, आण पायजे ती म्हायती इचारा. आमच्यात लई पंडित माणसं हायती. ती तुमाला खडानखडा म्हायती देत्याल. आमी कायबाय सांगावं. चुकलंबिकलं तर काय करावं ? आमच्या गळ्याला फास. शेणोलीच्या हतंच तुमाला म्हायती मिळंल."

कडुसं पडलं होतं. बायांनी चुली पेटवल्या होत्या. भाकरीचा खरपूस वास सुटला होता. तर काय बाय चुलीवर मगाची सागुती शिजत व्हती. सागुतीच्या वासानं तोंडाला पाणी सुटत व्हतं. चुलीतला ढणढणता जाळ एकदम मोठा व्हायचा. काशा, गवताच्या मुळ्या, तेलावाणी भडकून पेटायच्या. क्षणात मोठा जाळ तर दुसऱ्या क्षणाला एकदम राक. बाया फुकून फुकून दमलेल्या. काटक्या कुटक्याचं पुरतवान जोडायच्या. बापे चुलीला शेकत शेकत जाळ लावायचे. आण भाकरी मात्र भाजत नव्हत्या.

एका चुलीम्होरं जाऊन उभा ऱ्हायलो. माजी आई अशीच बाऱ्या बायदुळीत पडत्या पावसात बारक्या मोठ्या कावदानात अशीच भाकऱ्या भाजायची. नवऱ्याला, पोरांना, जाळाला, अन् नशिबाला समद्यांना शिव्या हासडायची. अशीच घाम पुसायची. पदर खवायची अन् रपाट्याच्या रपाट्या दोन हाताच्या तळहातावर भाकरी करायची. ही बयाबी तशीच शिव्या घालत व्हती. माझं लहानपन ताजंतवानं झालं होतं. चुलीच्या एका दगडाला शेरडीचं तिळवाणं चिकटवलं होतं. त्याच्याकडं पोरं बगत बसल्याली. तर दुसऱ्या चुलीच्या दगडावर खूर, आन् शेरडीचं कान खरपूस भाजत व्हतं. नाकाला परिचयाचा वास दाटला व्हता. दुसऱ्या एका चुलीम्होरं एक तरणा बाप्या व्हता. दोन दगडांच्या मंदी तांबडया मिरच्या चेचीत व्हता. मिरच्याच्या बिया उडत व्हत्या तर सालपटांचा भुगा व्हत होता. बिया उडू नाय म्हण डाव्या हातानं त्यो मिरच्यावर पाण्याचं चार थेंब टाकत होता. मिरच्या रगडायच्या. एकजीव करायच्या. चटणीचा भेला करायचा का त्यो सुटला. बाई भगुल्याच्या तोंडावरलं झाकण बाजूला करून त्याच्यातल्या सागुतीचा तुकडा शिजला का न्हाय बगत व्हती.

मी सागुतीची चौकशी केली. मगापासनं उत्तर मिळालंच नव्हतं. तर आता ती बाई म्हणाली. "दादा, गावातल्या न्हाव्याची शेरडी कायतर खाऊन मेली. ती त्यानं आमाला दिली. त्यो म्हणला, 'आतडं पोतडं तुमाला आण कातडं तेवडं मला.' त्यानं कातडं मागारी न्हेलं. सागुती आमी घेतली."

बाई सांगत व्हती खरं पर तिची नजर स्थिर नव्हती. मी बळखलं. असाच लहानपणचा एक प्रसंग आठवतो. विकत घिऊन खायला मटन परवडंल कसं ! त्यात आईला दिवस गेले होते. म्हणून तिनं शेरडाच्या मटनाचा घोशा लावला व्हता. बा म्होरं मोटं कोडं पडलं व्हतं. पहाटचं उटला. कडू इंद्राइन आणलं. इळयानं कापलं, त्याला हाळद कुकू लावलं. आरध्या भाकरीत कापल्यालं कडू इंद्राइन घातलं. आण गावात गेला. जितराब हारी हेरलंच व्हतं. कोन न्हाई आसं बगून शेरडाच्या तोंडात भाकरीचा तुकडा सारला. तसं शेरडानं गबागबा भाकरी आण कडू इंद्राइन खाऊन टाकलं. बा गेल्या पावलांनी मागारी आला. आण वाटंच बगत बसला. कासराभर दिस वर आला आसंल तवर शेरडानं प्राण सोडला. शिव्या घालत शेरडाच्या मालकानं शेरडू दरादरा वडत चालवलं होतं. संभावितपणे 'बा' नं कुळवाड्याला गंडवला. त्या दिवशी आमची मटणाची चंगळ झाली व्हती.

मी मंडळींचा निरोप घेऊन निघालो. पण म्हाताऱ्याच्या आग्रहाखातर त्याज्या चुलीम्होरं टेकलो. त्यो म्हणाला, "सायब, पोटात भूक नसली तरी मायेनं माणूस खातंच. चार घास खावा आन् मंग जावा." नाय व्हय करत चार तुकडं खाल्लं. पण आता सरावलेलं माजं मन आण चव्हाटळ झालेली माजी जीभ ते घशाखाली उतरू देत नव्हती. पाण्याच्या घोटासंगं घास घेतला. आवंढा गिळत कसंबसं चतकोर भाकर खाल्ली. माजीच मला कीव आली. उद्या गोपाळांची जात पंचायत बगायची म्हणून फलटणला निगालेला मी, फलटणचा रस्ता सोडून गपचूप सातारच्या एस. टी त बसलो. एस. टी. सातारा स्टँडवर आली. पण मी मनानं अजूनही गोपाळांच्याच पालात होतो.

•

गोपाळांची जातपंचायत

तर लोकानला गाव असतोय. गावकूस असतोय. गावंदर असतेय. गावपांढरी असतेय. गाव असतोय गावगाडा असतोय. गावकी असतेय. तराळकी असतेय. येस्करकी असतेय. पाटीलकी असतेय. चौगुला असतो. अन् कुलकर्ण्याबी असतो. तर असा गाव असतो. गाव असतो, गावाला शीव असते. शिवंला म्हसोबाचा पहारा असतो. येताळाची राखण असते. अन् म्हसणवाटाबी असतो. तर असा गाव असतो.

गावाच्या बाहेर एकांदा माळ असतो. हागनदारी असते. गावंदरी असते. म्हसणवाटा असतो. नाहीतर वसाड पडलेली जागा असते. जितं मानूस जात न्हाय, मानूसच काय कुत्रंबी फिरकत न्हाय. ध्या दुपारी भ्या वाटतंय तिथं आसतो. असा एक गाव. आमीच बसवलेला तात्पुरता. जातगाव, जातपंचायत, जातगंगा इथंही आसतो. पंच, पाटील, कोतवाल, येस्कर, न्हावी, आन् सोनार सुदा. हितंबी लाकडं

फोडायला येस्करच लागतो. न्याय द्यायला कोर्ट लागतं. शिक्षा करायला कोतवाल लागतो. हा तसा गाव नसलेला गाव. बिन् चेहऱ्याचा गाव. हा तसा गाव नसतोच. जनावरांच्या पाठीवर, पोत्यांच्या खोळीत, खुगीरात, लगायात अडकलेला. अंगात वारं भरल्यागतं रोजच्या जागा बदलणारा. आपल्या रीतीभाती, परंपरा, चालीरीती, भेष, भाषा, भूषा, साऱ्यांनी कवटाळून– साऱ्यांच्या पेक्षा आगळा-वेगळा, चिरेबंद, असा जातगाव असतो. तो काई एक गाव न्हाई. आठरापगड जातीचा आठरापगड गाव. आठरापगड गुत्यांचा आठरापगड गाव. आठरापगड जातींचा फिरस्ता गाव. त्याला सीमा नाय. नाव नाय. गावकूस नाय. असा गाव.

तर शेणोलीच्या माळावर असा जमलेला असतो एक गाव. जातगंगेचा, जातपंचाचा, जातदेवांचा, जातभूतांचा, जात गुन्हेगारांचा, जात न्यायाचा, जात अन्यायाचा, पिढ्यान्पिढ्या भरणारा, रहाणारा, न्यायनिवाडा करणारा. पेनारा, पाजणारा, मारामारी करणारा, अब्रूची लयलूट करणारा गोपाळांचा तांडा, गोपाळांचा जातगाव. पोरीबाळींची लग्नं, देवादिकांच्या जत्रा, आन् पंचाचा न्याय-निवाडा यांच्यासाठी जमलेला गोपाळांचा जातगाव. आपल्याच परंपरागत भोवऱ्यात आडकलेला.

वाठारच्या गोपाळांनी अगोदरच या जात पंचायतीची माहिती दिलेली. फलटणचा नियोजित कार्यक्रम सोडून मी सातारला परतलो व्हतो. तसा बेचैन तर खूप व्हतो. बिनचेहऱ्याच्या गावाचा तलाश दुसऱ्या दिवशी सुरू झाला. बाळासाहेब थोरात आन् मी. त्यांच्या मोटारसायकलवरनं शेणोलीला निगालो. बाळासाहेब, आमचे मित्र कार्यकर्ते त्यांना प्रत्यक्ष जातपंचायत पाह्यची असते. त्यांनी तशी ती 'उपरा' त बाचली होती. पण पाह्यची व्हती.

शेणोली तसं बागायती गाव. गावाच्या एका बाजूला उसाचे तरारलेले मळे, घसमुसळ्या वाऱ्याला टक्कर देत उभे. आल्याची, हळदीची डेरेदार, कोंबदार रोपं तरारून उभी तर दुसऱ्या बाजूला रेल्वे स्टेशन. स्टेशनला लागूनच थोडासा टेकडीवजा डोंगर. गाव, रेल्वेस्टेशन अन् डोंगराच्या बेचकीत वसाड माळ. वसाड माळावर तेवढाच वसाड गोपाळांचा जातगाव. ही तशी गोपाळांची वसाहत. तसं थोडं थोडं कलमांचं वारं पोचलेलं. ती पालासारखी पालं नव्हतीच. रेल्वेच्या रुळांनी गावकूस केला व्हता, स्थायिक अन् भटक्या गोपाळांच्यात. भटक्या गोपाळांची पालं रेल्वेच्या अलिकडं अन् मातीला धरून न्हायलेल्यांची स्थायिक वसाहत. नुकतीच इस कलमांनी टुमदार मंगलोरी कवलांची एका-एका खोलीची घर बांदून दिलेली. आता गोपाळासंग काई इतर मागासवर्गीयांचीबी घरं हायत. पर बहुसंख्य घरं गोपाळांची. तर आगोदर फिरस्त्या गोपाळांच्या पालाजवळ गेलो. एका पालाम्होरं एक बाई बसली व्हती. चार-पाच पोरांची आई असंल. मध्यम वयाची, मध्यम बांध्याची, अंगानच घराची कळा सांगत व्हतं. तसं तितं आंगन अन् घर नव्हतंच. पण तिची अंगाची

कळा तिची दैना सांगत व्हती. तिनं खाली घ्वान घातली व्हती. चितागती वाणी.

" कोण जातवालं हाय. हामी गोपाळ, खेळकरी, बेंडवाले, " ती गपच. " आनकी विराडं कुटं हायत. " " विराडं ? नाय बा. येवडीच इस पंचइस असत्याल. अन् ते पड्याल दिसतोय तेवी गोपाळच हायत–घरवाले, गाववाले. " गाडी ठेवली. रेल्वे रुळ ओलांडून गावाच्या खाली वस्तीत गेलो. तर बॅन्ड वाजत होता. माणसं, बाया-पोरांनिशी घोळक्यानं उभी व्हती. बाजूला तरणी पोरं अंगणातच बाजा वाजवत उभी होती. दुसऱ्या बाजूला बायामानसं नवरानवरीला आंगोळ घालत व्हत्या. तरण्या पोरी, तरणी पोरं, गरती बाया अन् बापे नवरा नवरीची चेष्टा करत व्हते. समदेच बायापोरांशी एकमेकांवर पाणी फेकत होते. चुळा भरभरून बाया बिनधास्त एकमेकींवर पाणी फेकत होत्या. नवरा-नवरीबी पाणी फेकत होते. सगळे कसे नुसते आनंदानं भरभरून नहात होते. पाण्यात हाळद मिसळलेली. त्यानं समदे लोक पिवळे जर्द दिसत व्हते. आदल्या दिवशीच लग्नाचं उराकलेलं. आता लग्नाची काकणं, बाशिंग सुटत व्हती. सुपारीचा खेळ रंगात आलेला. सुपारी नवऱ्यानं दोन बोटांत घट्ट धरायची. सारी ताकद एकवटून नवरीनं जीव खाऊन सुपारी सोडायची. नवरीनं दोनी हातांच्या खबरमिठीच्या मदल्या बेचक्यात सुपारी आडकित्यासारखी घट्ट धरायची. नवरदेवानं ताकद वापरायची नाय. अकलेनं सुपारी सोडायची. मी जरा म्होरं सरकलो. नवरदेवानं त्येच्या शेजारच्या पाटावर बसलेल्या नवरीच्या हातातली सुपारी सोडायची. तसा पेच होता. प्रश्न अब्रूचा होता. ती बायकोच्या हातात होती. अनू बाकीच्यांना चेव आला होता. ते नवरा-नवरीला नीट बसूही देत नव्हते. एक करवली, सारकीं दोघांच्या अंगावर पाणी मारत होती. नवरीनं सुपारी घट्ट धरली होती. नवरा पेचात आडकला होता. पण डोकेबाज. त्यानं आपला कोपर नवरीच्या मांडीवर ठेवलं आणि दोन बोटं हाताच्या खोबणीत घातली. कोपरानं मांडीवर दाब दिला तसं एक कळ उठून गेली. नवरीनं गुपचूप गुमान सुपारी सोडून दिली. साऱ्यांचा एकच हशाचा कल्लोळ झाला. इकडं बँडाच्या तालावर वाजत होता डिस्को. सारी मंडळी रंगून गेली होती.जसं देहभान हरपून काकणं–बाशिंग सुटण्याचा उरूस चालला व्हता.

अन् जरा चार-सहा घर सोडून खाली माणसांची कुस्त्यांच्या फडाला गर्दी व्हती. तशी गोल गर्दी जमल्याली. एका मानसाला इचारलं. त्यो म्हणाला, " खाली आमची पंचायत चाललीया. " खाम्ही लगेच खाली गेलो तर माणसांनी कोंडाळं केल्यालं. मदी एक सायकल आडवी पडल्याली. त्या सायकलभवती फेर धरून माणसं बसल्याली. एका माणसाच्या हातात काठी व्हती. त्यो काठी फिरवून माणसांचा गोंधळ झाला की त्यानला गप बसवायचा. अर्ध्याभागात डोस्क्याला तमासगिराबाणी रंगी-बेरंगी पटके बांधलेले, जरा अंगानं भरल्याले, तोंडात तंबाखू-पानाचं इडे ठेवल्याले,

हातात वाटल्या, पिशव्या, घेतलेले पाच-सात बापे बसल्याले. त्यांच्या बाजूला सुतकी चेहरा करून तरणी पोरं बसलेली. त्यांच्या मागं बायामाणसं बसलेली. एका-एका बायांनी चार-चार लुगड्यांचं धडपं दंड घालून नेसलयालं. त्या चार-पाच रंगी लुगडयांनी नटल्याला अन् खाली माना करून बसल्यात्या. त्यांच्या मागं काय बायमाणसं उभी व्हायल्याली. हे समदे सोलापूरकडचे गोपाळ. ह्या पंचायतीतले प्रतिवादी.

दुसऱ्या अर्ध्याभागात साताऱ्यातले म्हणजे या देशातले वतनदार, पाटील, सरपंच. डोक्यावर काँग्रेसी छापाच्या टोप्या, पांढरे फेक कपडे, तोंडात पानं अन् हातात सिगरेटी. जराशे तालेवार वाटावेत असे, वजनदार गोपाळ. या बाजूलाबी बाया बसल्या व्हत्या पर तेवढ्या नव्हत्या आन् सोलापूरच्या बायांहून जरा नेटक्या.

ह्या समद्याच बायांनी केसाचं चांगलं फुगं पाडल्यालं. डोस्क्यात इतर कुठं न दिसणारे गजरे घातलेले. इतक्या वेगवेगळ्या रंगातले की ते फुलांचे नक्कीच नव्हते. मी जवळच उभ्या असलेल्या बाईच्या केसातले गजरे पाहिले. पण ते फुलांचे नाहीत. पण इचारणार कसं. म्हण गप झाल्यालो.

तर दोन्ही बाजूला म्होळं उठावं तसं एक. एक लाट उठायची. ती किनाऱ्याला येऊन आपटती तवर दुसरी उठायची. उठली की समदीच माणसं असं हातघाईवर येऊन उठत की एकमेकांचा जीव वेतील असं वाटायचं. एकमेकांच्या गचांड्या व्हायच्या. आता हाणामारी हुनार असा कालवा उसळायचा. बरं, काय चाललंय ते मला अन् मित्राला समजत् नव्हतं. विचारावं तर घोटाळा. विचारलं तर आपल्याकडं सगळ्यांचं लक्ष जाईल. अन् आसं लक्ष गेलं का सारा रंगाचा बेरंग होईल. हे मला म्हाइत म्हणून गप गुमान गर्दीत उभं व्हाऊन बगत बसावं म्हणून खुणेनंच मित्राला गप बसाय सांगितलं. म्होरं खटलं रंगात आल्यालं. चार पाच लोक तर इतके लास होते की त्यांना धड बोलताबी येत नव्हतं. सातारवाली मंडळी लई जोशात व्हती. त्यांची ताकद जरा ज्यादा व्हती. तर सोलापूरवाले नरमले होते. सातारवाला, पांढऱ्या टोपीवाला त्याच्या भाषेतनं सांगत व्हता. कळवंडीला आल्यागत घसा फाडफाडून, अन् समदी त्याचं ऐकत व्हती. त्यो पाटील व्हता. तो म्हणत व्हता " नांदलापूरमा बेतापा, जकानवाडीचा तनतापा. " हे त्याचे शब्द सोबतच्या कालव्यातच विरत होते. लोक आपसात एवढे बोलत की कुणाचचं कुणाला कळत नव्हतं. मगाचा तो काठीवाला पुन्हा रिंगणात येऊन काठी फिरवू लागला. तसं पुन्हा शांतता झाली. पुन्हा तो पाटील बोलू लागला. " लारीवाले हुं का हुं. आपनेवाले हुं का हुं, पावनी तमनतापो, आवाच्छोजी." पुन्हा कालवाच कालवा. "हामना दो दो तापा छे. लोणेदया छे तापा. तमी सोलापूरवाला तापा छा तक्रार ना छा. " पुन्हा गोंधळच गोंधळच. आपसात बाचाबाची एवढी का मारामारीचा प्रसंग. " घरबीर बांदीनो सोलापूर

भायेर ये हामना हाय. घरबीर बांदीनो हम यहासे. रमीन, आनंदती छा. तमना तमारा जिलाना जावा छा आमी व्हावं सातारा जिल्यात. हायना तन-तन तापा व्हत्या. नांदलापूरमा तनतापा. तमी सोलापूरवालान् तनतापा, बेतापा हामना तमारो-तमारो जिलाम तापा आया छा." असा सगळा कालवा चाललेला.

तेवढ्यात पाटलाशेजारी बसलेल्या गोऱ्यापान तरुणाचे लक्ष आमच्याकडे गेले. त्याच्या हातात आंगठी, घडयाळ, डोक्याला छान भांग, दिसायला छान, अंगात परीटघडीचा पायजमा–शर्ट, त्या सगळ्यांत उठून दिसणारा. तसा त्यांच्यात न शोभणारा जरासा शिकल्या-सवरल्यासारखा. तो ताडकन उभा व्हायला आन् त्याच्या भाषेतनं काही तरी बोलला. तसं समदा कालवा क्षणात थांबला अन् आमच्याकडं समद्यांच्या नजरा वळल्या.

आमाला चारी बाजूंनी नजरांनी कैद केलं व्हतं. त्यांच्या म्होरं आमी गुन्हेगार व्हतो. सगळे लोक अवाक् होऊन बगत व्हते. हे अवचित काय झालं म्हणून कोतवालाला सारे घेरून उभे होते. परकी माणसं आपल्यात आली आन् आपल्याला सुगावाच लागला न्हाई म्हणून साऱ्यांच्या चेहऱ्यावर चिंता दिसत व्हती. सारे अविश्वासानं बगत व्हते. बाया भराभरा उठून पंचायतीतनं बाहेर गेल्या तर बापे सावरून बसले. मगाचा रसरसीत कालवा, गोंधळ, मारामारी, आणि सारी पंचायतच गार पडली. पाटलाचा नूर बदललेला. सारी दगडावाणी गपगार. मगाशी हमरीतुमरीवर आलेले, आपसात कळवंडीला आलेले, आमच्या अवचित येण्यामुळे मैतीला गेल्यावाणी गप बसले होते. अशी आमची बेचक्यात बेडूक आडकावा तशी गत झालेली.

मगाचा तो तरुण उभा व्हायला. शांतपणे आमच्याजवळ आला. त्यांचा काठीवाला काठी सावरीत खाऊ का गिळू अशा अवस्थेत तिरिमिरीनं येऊन जवळ उभा राहिलेला. आमच्या अंगावर काटा सरसरला पण मोठ्या नम्रतेचा आव आणून त्यो म्हणला, "पाटील आपण कोण लोक कुणीकडं आले, बेंडाच्या सुपारीचं काम हाय, बाजा पायजे, कोण पायजे आपल्याला?"

"आमी आपल्यातलेच हाय." मी माझी सारी ओळख सांगितली. "सायब, जरा आमचं पंचाचं काम चाललंय. आपन तवर तिकडं झाडाखाली बसू."

आमी मुकाट्यानं त्याच्या मागून चालाय लागलो. त्यो एका शेजारच्याच घराम्होरं गेला. ते गोपाळांच्या शेणोलीच्या पाटलांचं घर. त्या घराम्होरं एक वाकाळ हातारली. तिच्यावर आमी बसलो. जसं आमी लेपट्यावर बसलो तसं तिकडं कोर्टाचं काम चालू झालं. पण त्यात मगाची रग नव्हती. रंग नव्हता. साऱ्या रंगाचा बेरंग झाला व्हता. आता नुसती उरकनी चालू होती. दिवस मावळतीला गेला होता अन् पाटील सर्वा येचत होता.

त्या तरुण माणसानं आमची माहिती विचारली. मी त्याला बैजवार समजावलं.

त्यानं पेपरात नाव वाचल्यालं. तसा तो पदवीधर शोभेल असा. पण अजिवात शिकला नव्हता बॅन्डमास्तर अन् हिशोबाठिशोबासाठी घरीच लिहाय वाचाय शिकलेला. त्यात भटक्यांच्या संघटनेची जात दिसली. त्यो मोठ्यानं घरात बगून काय तरी म्हणला. तसं थोड्या येळातच आमच्या गप्पा चालू असताना नुसत्या साखरंचा 'चा' आला. आमी 'चा' प्यालो. पण गुन्हेगारासारकं त्यो अजून मोकळा होत नव्हता. पण कार्ब्याच्या संभाजीबाबा थोराताचं नाव सांगितलं. बरोबरच्या मित्रांनी त्याचं नाव सांगितलं आन् त्याच्या घरातली सगळी माहिती सांगितली. मी जातीचे रिवाज सांगितले. तवा त्यो मोकळा झाला. त्यो मोकळा झाला तसं मधेच उठून पंचात गेला. आता सारा कालवा कानावर येत होता. मगाशीही काही समजत नव्हतंच आताही काही समजत नव्हतं. पण काखेतला टेप शवनममधेच त्याच काम करीत होता. तसं चोरूनच टेप करत व्हतो.

तेवढ्यात त्यो तरुण पुन्हा आला. त्यानं आपलं नाव सांगितलं, आनंदराव तात्याबा पवार. कार्ब्याला रहातो. त्यो गोपाळांचा पाटील. त्याचा भाऊच पंचात पाटीलकी करत होता. आम्हाला म्हणाला, " सायेब, गरीब माणसं आमी. तसं माजं बेंडाचं उत्पन्न चांगलं हाय. आमी सोसायटी केलीय. काहीबाहींनी जमिनी घेतल्यायत पण त्यो जातीचा तिढा असतोया. आता काम संपतच आलयं. तवा आपन पुना पंचाम्होरं जाऊया. आमी गपचूप उठून उभे व्हायलो. आमाला पंचात जायचं होतंच. त्यानं लेपटं उचलून घेतलं, झाडलं. वळणीवर टाकलं. आमी समदे पंचात आलो. पण आता प्रतिष्ठितपणे. अगदी भर पंचात पाटलाजवळ. कामकाज संपत आलं व्हतं. पाटील नोटा मोजत व्हता. त्याला शंभराच्या नोटंची मोड पायजे होती. तो काठीधारी हाबालदाराला मोड आणायला सांगत होता आन् त्यो मोड आणाय सोलापूरवाल्याकडं गेला. तसं त्यातल्या एकानं आपल्याकडं शंभराची नोट असल्याचं सांगितलं. अन् काहीतरी बोलला एवढ्यात ज्यो कालवा झाला त्यो विचारता सोय नाय. सारं मिटल्यालं भांडण पुना सुरू झालं. पाटील पुना चिडून चवड्यावर येऊन बोलू लागला. दोन्ही पार्ट्यांचा कालवा झाला. आता शेजारचा तरुण दुभाष्याचं काम करत होता. त्यो सांगत व्हता, " गोपाळ कुठून आले. सांगता येत न्हाय पर आमचे वाडवडिल म्हणायचे, 'दरख्खन्नमा आया सो दरख्खनमा रह गया ' आमचे वाडवडील गुजराती असावेत. आमची भाषा गुजराती आन् मराठी दोन्हीच्या मधली आसते. पण आमाला गुजराती भाषा उमजती म्हणं आमी गुजराती म्हणते."

कळकाच्या काठीच्या टोकावर पोट दुमडून, पाट दुमडून, कसरती करणारा गोपाळ. खेड्यातल्या लोकांच्या दयेवर जगणारा हा भिक्षेकरी समाज या गावाहून दुसऱ्या गावी रोज मुक्काम बदलीत बारा गावे, बारा वाटा धुंडाळीत पोटामागं फिरतो आहे. स्वतःच विणलेल्या रीतिरिवाज, चालीरीती, अंधश्रद्धा, रूढी व जातगावाच्या कोशात

फिरतो आहे. व्यापक समाजापासून आपले वेगळेपण जोपासतो आहे. वर्षातून एकदा जातपंचायतीत पुढच्या वर्षासाठी जगण्याच्या रीतीभीती आणि कायदे ठरवतो आहे. परंपरा मोडणाराला शिक्षा करतो आहे. नवीन उभारीनं जगायला लागतो आहे.

"सोलापूरकरानला ९० रु दंड झालाय. पण हे पैशे वाटायचे हायत म्हणून मोड मागितली तर मोड आणायला गेलेल्या कोतवालाला शंभर रुपयाची नोट दाखवून यांनी निवाड्याला आव्हानच दिलंय. जातीचा त्यो अपमान झाला. पाटील म्हणतो आमालाच शंभर रुपयाच्या नोटा दाखवून जातीचा अपमान केलाय. म्हणून आता पुन्हा दुसरा दावा लागंल."

पण पंचायतीचं काम लांबवायचं नाय. परक्या माणसांपुढं तमाशा नको म्हणून पाटीलं सरतं घेतो. आनंदराव सांगतो. त्याच्या भाषेतनं. आनंदराव बोलत असतो. मी मधेच विचारलं. "पण दावा कंचा आलाय?" त्यो म्हणाला, "ही बॅन्डकंपनी सोलापूरची. ती आमच्या हद्दीत आली. बॅन्ड वाजवायला आण आपल्या मुलकातल्या गोपाळासंग तक्रारी केल्या म्हणून आपल्या लोकांनी त्यांना पंचात ओढलं. त्यो दावा आता शावीत झालाय. पंचानी सोलापूरकरांना ९० रु दंड व पाटलाची खर्ची अन् जातगावाचं जेवान असा एकदम दंड भरायचाय. ही पाटील मंडळी लांबलांबनं आली. त्यानला वाटखर्ची, चा-पाणी यासाठी जेवढा खर्च आला तेवढा 'चा' सोलापूरच्या पार्टीनं करायचाय. जातगावाला तिकटाचं जेवान द्यायचयं."

पैशावरनं चालल्यालं भांडण मिटलं. मोड मिळाली. पैशाचं वाटप झालं. तर दोनरुपये उरले. ते कुणाला द्यावेत असा प्रश्न पडला. पाटील मागं वळून म्हणाले, "आपल्या पंचात अशी रीत हाय ज्यो लांबनं आला त्याला खर्ची दिली. पर हे आपल्याकडं पावनं आल्यात. आपल्या जातीचे न्हाय पर तीन दगडाच्या चुलीचे भाव हायत. तशी आपन एका गोतावळ्यातळी माणसं. त्यानला आयेर करावा का नको?" साऱ्या पंचांनी माना हालावल्या. तेवढ्यात आनंदा उभा न्हायला. त्याच्या भाषेतनं काय म्हणाला. झालं, एका बाईनं ताटातनं कुंकू आणलं. सारं त्यांच्या भाषेतनं चाललयालं. त्यामुळे काय कळत नव्हतं. पण एवढं लक्षात आलं. की ते आमच्यासाठीच चाललंय. आनंदानं त्या बाईच्या हातातलं ताट घेतलं. माज्या कपाळाला कुंकू लावलं. पंचाच्या वाटणीतलं न्हायलेलं दोन रुपये माज्या हातात दिलं. मी मुकाट उभा न्हायलो होतो. तक्रार करायची नसते, हे मला माहीत हाय आन् नाही तर म्हणायचं नाहीच नाही. नाहीतर जमातीचा कोप होतो. आनंदा म्हणाला, "सायब पाचामुखी परमेशर. तुमी मोठं हाय. आमी आडाणी. पर या जातगंगंहून मोठं न्हाय. जात वाटली म्हण रीत वाटली न्हाय." मी मुकाट्यानं पैसे खिशात घातले. पाटलांच्या पाया पडलो. साऱ्या जातगंगेला रामराम केला. मी पाळलेल्या परंपरांचा लगेच अनुभव आला. सारी मंडळी जिवाभावाच्या माणसासारखं बगाय–बोलाय लागली.

सोलापूरची मंडळी उठून उभं ऱ्हायली. त्यांनी पाटलांना वाकून नमस्कार केला. त्यांचे चेहरे पडले होते. त्यांच्या पाटलाला मी बोलावलं. त्यांचं नाव शंकर भिकाजी जाधव. ते रहातात माळीनगरला. ते ही आपुलकीनं जवळ येऊन बसले. त्यांचा चेहरा उतरलेला होता, पडेल पैलवानावाणी. पण ते हसून बोलत होते. जातगंगेनं दिलेला निर्णय मान्य करून पुन्हा जातीशिवाय सत् ना गत् म्हणून जातीचंचं मोठेपण सांगत होते, " जातगंगा ही आमची आई हाय. चुकलेल्या पोराला आईनं कानफाडलं, 'बा'नं मारलं तर काय व्हंत! जातगंगा आई अन् बापावाणी. ती न्यायाचंच करील. ज्याचा हात मोडंल त्याच्याच गळ्यात बांदल. ती अन्याय करायची न्हाय. आपल्या माणसांच चुकलं तर सजा होणारच की. ज्याला दंड झाला त्यो भरणारच. त्यानं दंड भरला न्हाई आसं हुणारच न्हाई. पण भरला न्हाई तर जात त्याला वाळीत टाकलं. त्याचं हुक्का-पाणी बंद, संगत पंगत बंद, रोटी-बेटी व्हेवार बंद, त्याला जी मुलगी दिली हाय त्या पोरगीला पुना म्हायेर नाय. त्याज्या पोरी-वाळींना पुन्हा म्हायेर नाय. त्याच्या परपंचात तो एकटा ऱ्हाणार. त्याच्या मैतीला कोण जाणार न्हाय. त्याच्याशी सोयरीक करणार न्हाय. त्याला बिराडात घेणार न्हाय. बिराड-बाजलं बंद, बेंडाच्या ताफ्यात घेणार न्हाय. माणूस घाण्यावाणी त्याची कोंडी व्हईल. माणसातनंच उठणारवं. म्हण जातीनं माती खाया सांगितली तर माती खाईल. पर जातगंगच्या म्होरं कोण जाईल! दंड जर लई मोठा आसंल, दंड भरायची त्याची ऐपत नसंल तर त्याच्या गुन्ह्यापरमानं त्याच्या नातूचा नातू दंड भरंल. आन दंड भरायचं व्हईना तर पंचाम्होरं पाच फटकं खाईल. खुब्याला दोरी बांदून त्याला पंचात ढोराबाणी वडणार आन् पंचासमक्षा त्याला पाच-पंचइस लोकांचा मार खावा लागणार. असली सजा लई करून व्हत नाय. पर शेवटाला काय करायचं! जातगंगचा गाडा चालायचा तर कान धरायलाच पायजे. हाताबाहेर गेला तरच वाळीत. मंग खून करू दे, बाईल नेऊ दे. नायतर कायबी करू दे, समदं आमचं आमीच बगतो.

" बाईचं एक लगीन होतं. इस्कटलं तर दुसरं होतं. आमीच काडीमोड देतो. दोन लग्नं होत्यात अन् चारबी होत्यात. पायजे तेवडी व्हत्यात, पर पंचानी सांगितलं तर. नाहीतर बोहल्यावर रंडकी होऊ दे–जातीनं मोडता घातला तर कोलदांडा. मंग बारा बैलाचं येतान तुटलं पर जातीचं येतान तुटायचं न्हाय. तिला तसंच कुजवत्याल, नासवत्याल पर डोकून वघायचे न्हायत. "

जात पंचायत संपली. मंडळी लगेच पांगली. आमालाही परतायचंच होतं. कार्यकर्त्यांनी नुकतीच डॉ. बाबा आढाव व प्रा. अरुण कांबळे यांच्या हस्ते बालवाडी सुरू केलीय. काही मुलं बालवाडीत जातात, पण बहुत करून जातच नाहीत. वस्ती माळाला. त्यानं पाण्याची लई परवड. पाण्याला लई लांब जावं लागतं. पाण्याला रेल्वेचा रुळ वलांडल्याशिवाय गत नाय. रुळ वलंडण्यापायी रेल्वेखाली अपघात व्हवून दोन-

चार बाया दगावल्यात. हाक ना बोंब. वस्तीला पाणी मिळंल ? कुणास ठाऊक. पण एक बरं वाटलं. आनंदासारखी माणसं आज नेट धरत्यात. आपल्या माणसान्ला स्थायिक व्हायला लावतायत. मदत करतायत. सापानं कात टाकावी तशी नव्या दमाची आनंदरावासारखी तरुण मंडळी गोपाळांना स्थिर करू मागतायत. आशेचे किरण दिसत हायत. त्यांच्याच वस्तीत एक बारीक 'चा 'चं दुकान झालंय. ते बी गोपाळच चालवतो. तेथे जाऊन चहा घेतला. दिवसभरात इतक्या बाया आसपास होत्या पण एकीशी काई बोलता येत नव्हतं. बरोबर आनंदराव व पाटील होते. उभ्या उभ्या चहा पीत मी शेजारीच कुतूहलाने पहाणाऱ्या बाईकडं बगत होतो. डोक्यातला गजरा कुतूहलाने बगत होतो. बाया काही बोलत नव्हत्या. जरा धाडस करून बाईच्या केसातली वेणी मागितली. हातात घेऊन पाहिली तर जवळपास बीस-पंचवीस रंगाच्या रेबिनी दोऱ्यात अशा बांदल्या होत्या की जणू विविध रंगाच्या फुलांचा छान गजराच. या कसबी कलावंत बायका फावल्या वेळात तो वर्षभर विणत असत्यात. फुलांचा घस-घशीत घस. न सुकणारा, न कोमेजणारा. मळला की धुवायचा. पुन्हा ताजातवाना. तो जर बाजारात आला तर सगळ्यांनाच आवडेल. पुन्हा रस्तोरस्ती डोक्यात तेच दिसेल. पण तो येणार कसा ? त्यालाही दरवाजा बंदच आहे. " शिंक्यावर दही नि दैवात नाही. "

निरोप घेऊन निगालो. आनंदा रुळापर्यंत आला. भटक्यांच्या वेदना बोलक्या झाल्या होत्या. मी लक्ष देऊन ऐकत होतो. संघटनेचा मंत्र देत होतो. निरोप घेऊन परत रेल्वेरूळ ओलांडले आन् घसारतीने माघारी परत मोटारसायकलीजवळ आलो.

मोटारसायकल पालाम्होरं लावली, तेव्हा पालात एक बाई व्हती. तिच्या पालाम्होरं मोटारसायकल ठेवली होती. ती मागे वळवून घेतली. आणि तिचा निरोप घ्यावा म्हणून मी पालाकडं गेलो. रात्रीच्या जेवणाची वेळ झाली व्हती. लांबच्या लाईटच्या खांबाचा अंधुक उजेड पालात डोकावत होता. मी खाकरलो. आतून आवाज आला न्हाई म्हणून पालाजवळ गेलो. आन् आत डोकावून पाहिलं. आतलं चित्र पाहिलं आणि अंगावर सरसरून काटा आला. आपलं रक्तच गोठतं आहे असं क्षणभर वाटलं. आपल्याला मरण येईल तर बरं असं झालं. पालात बाई तटकारावर झोपून पोराला पाजत व्हती. उशाला सतरा ठिगळाचं धडुतं (लुगडं) व्हतं. अंगावर बोटभर चिंधी नव्हती. ती बाई बिन लुगड्याची निजली व्हती. धाकटं पोरगं अंगाला चिकटलं व्हतं. अन् दुसरं चौदा-पंधरा वर्षांचं पोरगं शेजारी फाटक्या कापडानं मातीत तसंच पडलं व्हतं. त्याच्या अंगावरची कळा सारं सांगत व्हती. मी मागं फिरलो. शेजारच्या पालातबी अंधारच होता. पण पालाम्होरं चूल पेटली होती. तेवढ्यात बाळासाहेबांनी गाडी सुरू केली. मी परत गाडीकडं आलो.

गाडीच्या आवाजानं ती बाई पालातनंच म्हणाली, " दादा ! उलीसं थांबावूसं. "

आमी गप उभं व्हायलो. मगाची बाई अंगाला धडपं गुंडाळून तशीच उभी होती. ती सांगत व्हती, " दादा, राकील मिळत न्हाई. इचूकाट्याचं लई भ्या. हतं डोळ्यांत बोटं घातलं तर बी दिसत न्हाई. म्हणत्यात आमाला कार्ड नाई म्हण गावात कोण राकेल देत न्हाय. एका लुगड्यावर अंगाला धडुतं न्हाई." पोरगं बी उभं व्हतं. मला काही केल्या तिच्याकडं बगवत नव्हतं. मी तसा सुन्न झालो होतो. भारतमातेच्या अंगावरची कापडं उतारल्यासारखी तिची आवस्था होती.

ती म्हणाली, " सोलापूरकडनं आलू. हिकडं सुपाऱ्या चांगल्या मिळत्यात. तर पंचांनी पुना देशाला जाया सांगितलं. दादा तूच सांग आमी कसं जगावं ? का करावं ? खेळ करत व्हतो. जगत व्हतो. आता कुणी खेळबी बगत न्हाय. आन् मागल्यावाणी कुणी भीकबी वाढत न्हाय. जीव जगीवतुया. तू कायीतरी कर. आमी येडी माणसं हतं हागनदारीत उतरलो. आता पंचांनी सांगितलं तवा मागारी जावाच लागंल. दंडाची वर्गणी भरायची तर कशी भरावी ? "

मी गपचीप मगाचे दोन रुपये तिच्या हातावर ठेवले. ते ती घेईना. आणखी खिशात होते ते देऊ लागलो. तिच्या डोळ्यात पाणी उभं व्हतं. " दादा ! गाडवाच्या कपाळाला कपाळ घासून नशीब मिळत न्हाय. आमच्या कर्माला आलंय.आमी भोगतुया. तू एकदा दिवून काय हुनार ? तुज्या लेकरानला सुकाचं दिस दिसू दे. पण जराकशी कार्डाचं बग. आम्हाला राकील पायजी. उलीकसा कामधंदा जरा आमच्या पाटलाला सांग." आभाळच फाटलेलं. ठिगाळ कशाचं लावावं ? आपल्याला तर मरणाचं दुःख. मोटारसायकल सुरू झाली. मूकपणे निगालो.

•

पूजा

भर दुपारचं ऊन तापल्यालं. आंगातनं घामाच्या धारा निथळत असतात. पाठीला शर्ट चिकटत असतो. एका हातानं तोंडावरचा घाम पुशीत मुरचंद भाटच्या स्कूटरवर बसलेलो. भर वहातुकीतनं उंदीर सुळकांडावा तसं सुळकांड्या मारीत गर्दीत वाट काढीत मी व मुरचंद एकदाचे वस्तीत पोहोचलो.

वस्ती–होय, आता वस्तीच. पूर्वीची पालं तशीच पण आता आक्कं शहर भोवताली लपेटून उभं राहिलेलं हे वस्तीचं ठिकाण–नदीच्या कडेला पत्र्यांच्या कुशीत निपचित पडलेली. वरखाली चारी बाजूला पत्रा. तोही डांबरी पिंपाचा पत्रा. गल्लीबोळात बापे-माणसं गटागटांनी पत्त्याची पानं खेळत, कुणी नळीतल्या पैशाची जुगार खेळत, तर कुणी गप्पांचे अड्डे रंगवीत गटागटाने बसलेले. शेजारी पोरांचेही पत्र्यांचे डाव रंगलेले. आयाबाया उकिडव्या बसलेल्या. कुणी डोक्यातलं टेनं मारीत तर कुणी खराखरा

खाजवीत उभ्या. कुणी नळावरच्या गर्दीत आपल्या वाट्याला आलेल्या दगडावर धुणं धूत तर कुणी भांडी घासत व्हत्या. कपाळावर आलेल्या केसांच्या वटा बाजूला सारीत घामाच्या धारा वारीत आपआपल्या कामात रंगून गेलेल्या. मध्येच एकांदा बाप्या डाव रंगात आल्यानं वरडून " हात त्याज्या आयला, सकाळपास्नं नुसतं राजानं पिडलंया. लैय दौलत खावूगांड्" असं काही म्हणायचा. तर कुणी मध्येच उठून शेजारीच भिंतीकडं तोंड करून उभा रहायचा. अशा निवांत वेळात आमची स्कूटर गल्लीत आपला गुरगुरता आवाज करीत विसावली. तसं समदी मंडळी आमच्या आगमनाची आपआपल्या परीनं दखल घेत असतात. बापे मंडळी उठून उभी राहतात. हासत स्वागत करतात. मुरचंद भाट हा कांजारभाट या जमातीतला. गोरापान, उंचापुरा, देखणा तरुण. कांजारभाट जमातीचा तरुण नेता. आपला माणूस आलाय म्हणून बायापोरांशी समद्यांचा गराडा पडतो. मंडळी त्यांच्या भाषेतून मुरचंदशी बोलत असतात. मला तसं फार समजत नाही, पण मी कोण असावा याबद्दलच बोलणं चाललेलं असावं.

मुरचंद माझी ओळख सांगतो. मंडळींनी मला भटक्यांच्या अधिवेशनात पाहिलेलं असावं. साऱ्यांना तसा आनंद वाटतो. ओळखीचे चार-दोन चेहरे दिसतात. आम्ही येण्याचं कारण मुरचंदनं सांगितलेलं असतं. त्यामुळं सरपंचाचा शोध चालू असतो. बाकीचे सारे बाऱ्याची झुळूक आल्यासारखे पुन्हा आपआपल्यात दंग होतात. आणि एक बाई सांगते. " सरपंच आपल्याच हितं हायेत. आज आमचा देवदेव हाय." मुरचंद तिच्यामागे चालू लागतो. आणि मी कविचंद भाटबरोबर मागे लागून राहतो. एका पत्र्याच्या नळकांड्यातून म्होरं म्होरं चालत निघतो तर चारी बाजूला खुराड्याबाणी घराम्होरं बाया बसलेल्या. पोरी, पोरं मजेत खेळत असतात. आम्ही सगळ्यांच्या हसऱ्या नजरा स्वीकारत म्होरं जातो.

एका पत्र्याच्या शेडम्होरं एक चादर बांधलेली असतीया. आज लांबनंच धुराचा लोट उसळतांना दिसतो. धुराचा लोट साऱ्या गल्लीबोळात दाटलेला. त्यानं नाकातोंडात धुराचा भपका बसतो. नाकाला एका विचित्र वासाची व चवीची जाणीव होत असते. कुतूहलानं मला सारकं पछाडलेलं असतं. आम्ही चादरीखालच्या मांडवात जातो. तसं त्या घरातली तरणी पोरं हसून स्वागत करतात. तावडतोब एक चादर हांथरतात. त्यावर मी, मुरचंद, सारे घाम पुशीत बसतो. तर शेजारच्या जाळानं आन् धुरानं जीव मेटाकुटीला आलेला असतो. नाईलाजानं बसणं भागच असतं. आणि समोरच्या देवदेवानं असं काही भारावून टाकलेलं असतं की, त्यापुढं उकडणं आणि उन्हाचे चटके विझून गेलेले असतात.

समोरचं आंगण शेणानं सारवलेलं असतं. त्याच्यावर एक देवीची मूर्ती चादरीवर विसावलेली. तिच्या म्होरं निवद मांडलेला. त्यात चपात्यांच्या चवडीच्या चवडी

असतात. चपातीच्या चवडीवर बकऱ्याच्या काळजाचा शिजावलेला धड असतो. एका दोऱ्याला बकऱ्याचं काळीज, फुप्फीस, उराडं–आत कायबाय असतं, ते निवदावर ठेवलेलं असतं. एका चवडीवर फुटाणं, लाह्या, बत्तासे, जिलेबी, लाडू, साखरेचं फुटानं, खारी शेंगदाणं तर दुसऱ्या अंगाला नारळाचा ढीग असतो. नारळ फोडण्याचं काम चालूच असतं. नारळाच्या पाण्याचा लोट वहात असतो. नारळाची आकबंद कवचं एका बाजूला ढिगानं मांडले जातात. समोरच्या चपात्यांच्या ढिगावर सारं बैजवार मांडलेलं असतं. समईत तुपाची वात मंद तेवत असते, तर उदबत्त्यांचं भेंडाळंच्या भेंडाळं पेटलेलं असतं. तर देवीम्होरं निवदाला लागूनच कोळशाचे निखारे रसरसत असतात. त्या निखाऱ्यावर चपात्या, मटन, जिलेबी, लाडू, लाह्या, फुटाणे, बत्तासे, साऱ्यांचा काला करून टाकलेला. समोर मालक आणि मालकीन मोठ्या भक्तिभावानं बसलेले असतात. शेजारी एक तरुण पोरगा बसलेला असतो. शेजारी सरपंच उघडा बसलेला. घामानं सारेच नितळलेले असतात. अग्नी पेटविण्यासाठी तो देवीची मनधरणी करत असतो. तोंडानं बडबडत असतो. आन् हातानं तुपाचा मारा निखाऱ्यावर करत असतो. तर काला दुसऱ्या हातानं कोळशावर टाकत असतो. कोळशाचा पेट होत नाही. तर नुसता धुराचे लोटच्या लोट उठत असतात.

देवरशी म्हणत असतो, " दाते पडदाते सगळे लोक तेरा गु खाईल, जगदंबे, भल्लाड कोटेकी मालकन. तेरा गु खायेल, तेरी गांड चाटेल. हजार बंडोदे गळा पालोद, मुक्काम तिलगुळा दाते पडदाते. वो तेरे पाव निवास कर जटा जाडं से. हजार पापे तेरे दफना कर दे. तारी चौकी काम राखे. तेरा गु खाईल, तेरी गांड चाटेल. भल्लाड कोटेकी माळकन, म्हाळकामाय, दुर्गामाय, काळकामाय, शाबनी ऊबशी माय, मरयम्मा माय, तेरा गु खाईल, तेरी गांड चाटेल. भगतू नाहीये. और वो एक गंत्री मंत्री मानवी फिरवी तेरी कांगडी कुल्ली, वाती और तेरा गु खाईल, तेरी गांड चाटेल. तेरा जो. तेरी निवत. जो एक बकरा, लड्डू, तपासे. दो बाटलीयाँ दारू. जो जो तेरा लगता है, त्यो केली हाय का नाय देख, माय. तेरा गु खाईल, तेरी गांड चाटेल. हजार बंडोदे सकीना माय तेरे पाव विनाशकारी. तुतो माळकन हाय. बच्चे हाय तेरे. तेरा गोपाळ कोई न्हारा नाई. हाय तमारे तो पिछा तमको. धाई रे, तेरा गु खाईल, तेरी गांड चांटेल. हजार बंडोदे, गळा पालोर, राजी खुषी होना. अंबा उभटी वो लोकन कोट झळ तेरी लागीरी नाही. तेरा गु खाईल, तेरी गांड चाटेल. तेरा भंडारा हम भरी रहती हाय. जो करी हाय मान्यता नाही की हाय. जगदंबे तेरा गु खाईल, तेरी गांड चाटेल. तेरा किल्लवटा, वक्कल्लीया तेरा गोपाळ, तेरी गांड चाटेल. हजार बंदेडों, गळां पालोर, मुक्काम तिलगुळा, तेरी गांड चाटेल. तेरा पाव विनाशकाली जगदंबे.ऽऽ"

पुजारी एका बाजूला अशी टकळी लावत असतो. तर दुसऱ्या बाजूला येजमान-

बाई आन् आत तिचा नवरा सारखं तूप आणि काला यांचा निखाऱ्यावर मारा करत असतात. शेजारी बायापोरांचा नुस्ता कालवा उसाळलेला असतो. कोण काय बोलतंय ते समजतच नाही. पण उंच स्वरात सारा कालवा उसाळलेला असतो.

साऱ्यांचं लक्ष अग्नी केव्हा पेटतो याकडं लागलेलं असतं. आणि अग्नी काही पेट घेत नाही. वरं, वारा घालून किंवा फुंक घालून काही अग्नी पेटवायचा नसतो. आपोआपच अग्नी पेटला तर देवी प्रसन्न झाली असं मानायचं. जोपर्यंत देवी पावत नाही तोवर तुपाचा मारा चालू ठेवायचा. एक तरुण सारखा चुलवानात निखारे आनून ओतत असतो. आता पेटत नाही याचा अर्थ करणीत काही तरी अपूर्ण राहिलं आहे. काही तरी चूक राहिलेली आहे. त्यामुळे माता येत नाही. सारे लोक काळजीत असतात. पोरांची रेटारेटी सुरू असते. पुजारी बडबडत असतो. पूजाविधीशेजारीच सकाळपासून केलेला सिदा, अन्न शिजवलेलं असतं. एका भल्या मोठ्या पातिल्यात नुसती उकड असते. तर भल्या थोरल्या पातेल्यात नुसता लालभडक तवंग असतो. दुसऱ्या पातिल्यात पांढरा भात असतो. तर शेजारी चपात्यांच्या चवडी हारीत चादरीवर हांथरलेल्या असतात. शेजारीच शेंबुडनाळी गटार वहात असतं. गटाराला लागून सारं अन्न लावलेलं असतं. सकाळपास्नं कुणी पाण्याचा थेंब सुद्धा घेतलेला नसतो. बाया पोरांशी सारे उपाशी असतात. कविचंद सांगत असतो, "आमच्यात पूजा घालणारा माणूस, त्याची भावकी, त्याचे नातेवाईक आज बायापोरांशी उपाशी असतात. त्या पूजेच्या घरीदारी कुणीही जेवत न्हायी. तोवर कुणी पानी सुद्धा पीत नाही. कावळा, कोंबडं, कुत्रा, चिमणी, पाखरं ह्यांनी सुद्धा काही खायचं नाही. एकानं जरी ही चूक केली तरी सारं अन्न उष्टं होतं. आता असं अन्न उष्टावलं तर सारी पूजाच वाया जाती. सारं अन्न टाकून देतात. आन् पुन्हा पूजा घालाया लागती." मी पाहत असतो. तर सारे लोक कासावीस असतात. एक लेहंगा घातलेली म्हातारी अन्नाची राखण करीत असते. कावळ्याला का कुत्र्याला फिरकू देत नाही.

इकडे अग्नी पेटत नाही. देवी पावत नाही. म्हणून मालकीन गुडघ्यावर ओणवी होऊन देवीम्होरं वाकून जमिनीला नाक घाशीत असते. तर तिचा नवरा पालथा पडून देवीला विनवीत असतो. बायापोरं अग्नीला काला आन् तूप देत असतात. पण अग्नी काही पेटत न्हाई.

सारे कासावीस असतात. उन्हं कलून गेलेली आहेत. मगाचा उकाडा जावून मंद वाऱ्याची झुळूक अंगाला चाटून जाते आहे. तर इकडे देवी पावत न्हायी म्हणून घालमील चालू असते. तरुण पोरं काश्याच्या पितळ्या घेऊन येतात आणि वाजवू लागतात. तेवढ्यात एक मध्यमवयीन देखणी नाकेली बाई आणि एक माणूस एक ढोलकं घेऊन येतात. आणि वाजवत गाणं म्हणू लागतात.

काली तोहे मंडवेमे, मंडवेमें तो रोते है,
काली तोहे मंडवेमे.
कालके के भवनेमे, लड्डू देता पाणी.
लड्डू तमासे है, काली तेरे भवनेमे.
कालके के भवनेमे बकरे मारे है
बकरे मारे है, काली तेरे भवने मे.
कालकेके भवनेमे आसूड मारे है
असूड मारे है, काली तेरे भवनेमें.

मंडळी ठेक्यावर गाऊ लागतात. बारकी पोरं ताल धरतात, तर बापे लोक, बाया सारे टाळ्यांच्या ठेक्यांने प्रतिसाद देतात. मीही सामील होऊन टाळ्या पिटू लागतो. पण देवीला काई घाम फुटत नाही. देवी पावत नाही. खरं म्हणजे आपण नास्तिक इथं आलो, यामुळं तर देवी पावत नसेल ? मी कविचंदला म्हणत असतो. तर मुरचंद देवीपुढे घामाघूम बसलेला. तो कालव्यातनंच सांगतो. " तसं काय:न्हाय मानेसाहेब, तुमी बसा. "

तो माझ्याशी बोलत असतो. आन् तेवढ्यात एक मुलगा देवीला तूप देत असतो. पुजारी कासावीस तर कालिका मातेची मालकन रडत असते. मान डोलवून आठवंल तो नवस सांगते. आन् तिकडं सांगील तसं नारळ फुटत असतात. मोठ्यांनी नारळ फोडावे लागतात. तो मुलगा तूप देऊन देवीला आळवू लागतो. " देवी अंत पाहू नको. "

आन् त्याची प्रार्थना फळाला येते. तुपाचा मारा चालू असतो. एकदम जाळ होतो. माझं नास्तिक मन किंचित साशंकपणे त्याकडं पाहतं. ज्वाळा उफाळून वर येतात. तसं साऱ्यांचे चेहरे तांबूस जाळांच्या उजेडात चमकायला लागतात. मगाशी रडणाऱ्या यजमानबाईचा चेहरा असा काही खुललेला असतो की, सांगता सोय नाही. पुजाऱ्याची धांदल उडालेली असते, तो घाई करतो. दारूच्या दोन बाटल्या घेतो. त्यातल्या एकीचं बूच काढतो. आणि देवीम्होरं निवद दावतो. त्यातला पहिला ग्लास तो यजमानाला देतो. दुसरा बाईला देतो. ते जमिनीवर थोडी दारू सांडतात. आणि उरलेली घटाघटा नरडयाखाली घालतात. पुजारी एक बाटी घेतो. त्या बाटीत बकऱ्याचं कच्चं रक्त असतं. ते घोटलेलं असतं. ते बोटानं कालवतो, पातळ करतो, त्याचा निवद दावतो, आन् यजमानाला प्यायला सांगतो. यजमान ते डोळे मिटून तोंड बाकडं करून घटाघटा पितो. एका दमात सारं रक्त प्यावं लागतं. नाही तर पूजा बाया जाते.

राहिलेले सगळे लोक देवीची पूजा पावली म्हणून मांडवाच्या दुसऱ्या टोकाला जातात. तेथे एक गोरीपान देखणी बाई बादलीत दारू घेऊन विकत असते. रुपायाला

एक ग्लास. सारेजण निवदाची दारू पिऊ लागतात. पोराटोरांशी दारू पिणं सुरू होतं. मोठ्या माणसांची लोक जेवायला घालायची घाई असते. पोराबाळांशी सारे काळीआईचा आशीर्वाद घेतात. आणि पंगती बसू लागतात.

पुजारी गुंगलेला असतो. तोच म्होरक्या आन् सरपंच असतो. त्याची मुलाखत मला हवी असते. साऱ्या वातावरणात हातभट्टी आपला वास पसरीत असते. आणि आम्ही पंगतीच्या एका बाजूला बसून पुजाऱ्याची वाट पाहात असतो. तो रिकामा झाला की माझं काम सुरू होणार असतं. शेजारी बाया पोरं खेटून खाणं उरकीत असतात. वाढपे उत्साहानं वाढत असतात. सारेच एका नशेत असे झिंगत असतात. दुसऱ्या एका बऱ्यापैकी पऱ्याम्होरं गिराईक दारू पीत आड्डे रंगवीत; तर कुणीशी चुणचुणीत पोरगी आपलं सैलसर पोलकं पुन्हा पुन्हा सावरीत गिऱ्हाईकाच्या पेल्यात दारू ओतीत, चणे फुटाणे हातावर ठेवीत, दुसऱ्या हातानी नोट बरुबर पोलक्यात कोंबीत असते. एका बाजूला देवाच्या भेटीनं मालक फुलून तर दुसरीकडे ते रामायण चालू असतं. आम्ही पुढाऱ्याला पुन्हा येतो असं सांगून निघणार, पण मुरचंद, कविचंद, जातवाले. त्यांना तसं जाऊ देता येत नाही. खरं म्हणजे सकाळपासून आतडी वाळलेली असतात. काही खायला हवंच असतं. लोकांचा आग्रह मोडवत नाही. तिथंच गटाराच्या कडेला जराशी जागा होते. आणि सारी मंडळी गटाराच्या आणि दारूच्या नशेत जेवू लागतात. आम्ही त्यांच्यात मिसळून जातो. त्यांचे होऊन.

●

हत्तीची गोष्ट

प्रा. मोतीराज राठोडची तार धडकली. 'कार्यक्रम नक्की. लवकर नीघ.' ठरल्याप्रमाणे दोघेही मोहिमेवर निघालो. आधी ठरल्याप्रमाणे बारक्या, वामन्या बरोबर होतेच. गाडी सुरू झाली. मी, मोतीराज बोलत होतो. बारक्या, वामन्या तसे गप्पच. आमचं बोलणं येवढ्या मोठ्यानं चाललं होतं आणि रंगात आलं होतं, पण या दोघांना त्यात काहीच रस नव्हता. जसे ते या भानगडीत कुणीच नव्हते.

मध्येच मोतीराज एखाद्या प्रश्नाच्या तिडक्यात वामन्याला नाही तर बारक्याला बोलते करायचा प्रयत्न करत असे. पण वामन्याच्या भेदक बोलक्या डोळ्यांची बुबुळं अशी काही हालत की, त्याचा होकार किंवा नकार त्याच्या डोळ्यात दिसत असे. फार तर मान हालवून हो-ना करीत असे. वामन्याचा ओढलेला चेहरा आणि दाढीची खुरटं अशी भीतिदायक दिसत की जणू याला फाशीच्या तख्तावर चालवलाय. त्यात

मी बोलल्यावर तर दोघे असे चमत्कारिक वघत की विचारू नये. त्यानं मी गप्पच असे. पण मोतीराज मोठ्या हिकमतीनं त्यांना बोलतं करण्याचा प्रयत्न करीत असतो.

" बारक्या, तुला बायका किती ? " बारक्याचे मोठं डोळं बारीक झालं. आणि म्हणतू कसा, ' आवंदा पाच हायत्या, म्होरल्या येळंला एक येल. ' मी थोडा खोलात ओढावा म्हणून विचारलं, " म्हंजी काय रं ? " बारक्या हळूहळू रंगात येऊ लागला. " म्या झबझब्याला दोन सालं पैका दिलाया. त्यो औंदा मागारटीला हाय. त्यो न्हाय दिला तर त्याची बायकूबी माझी बायकू व्हईल. आन कर्ज फेडला तर पाचच न्हात्याल. मुद्दल दिलं तरी येजात त्याची बाईल मी घरात घालीन. त्याच्या बिगार दोन लेकरं हाईत. ती बी त्येला जमलं तर ठिवीन. मिलाबती असत्याल तर माझीच. आन् त्यो म्हणला तर पोरगा ठिवीन, पोरगी आनीन. " तर बारक्याला पाच बायका असत्यात आन् बारा पोरं जिती आन् पाच पोरी आन् एक पोरगा मेलेला असतो. हळूच बायकापोराबरनं आमी हळूहळू बोलत म्होरची वाट चालू लागतो. गाड्या येत्यात-जात्यात. आवाज येतच असतात, कंडक्टर, प्रवासी आणि मागेपुढे जाणारी वाहने, त्यांचे आवाज, लोकांची रेटारेटी, बाचाबाची सगळं चाललेलं असतंच. आणि आमचं बोलणंही तेवढ्याच रंगात आलेलं असतं. बारक्या, बामन्या विश्वासानं सांगत असतात, " सायबा, आमच्यात लग्नाला बामन नसतू. बेंड लावीत न्हाय. नवरा-नवरीच्या आई-बापानं भावकीला लग्नाला सांगितलेलं असतं. समदे जमत्यात. लांब गावाबाहेर माळावर बिऱ्हाडं उतरत्यात. दोनींकडचे पावने-रावळे येत्यात. पोरीला व्याज येत्यात. पोरा पोरीला, वरमाय–वरबापाला कापडं असत्यात; कवा कवा नसत्यातबी. पोरीचा बाप जावून रुईची पानं आनतू. पोराचा बाप जावून कापसाची बोंडं आनतू. सांचं दिस मावळला की, रुईच्या पानांची पूजा करायची. बायामाणसं कापसांच्या बोंडातला कापूस बाहिर काढत्यात. आन् उरल्याला बोंडाचा हार बनावत्यात. लई नामी हार इनत्यात. त्याजीबी व्हडाचड आसतीया. तवर वरमाय एका भगुल्यात पाणी तापावती. पाणी तापल की, नवरा-नवरी उभी करत्यात. आन् पाणी घालाय लागत्यात. पैल्यांदा बारकी पोरं पाणी घालतात. मग मोटी मानसं पाणी तांब्या तांब्या घालत्यात. लई थट्टामस्करी करत्यात. हे पाणी घातलं की, समजायचं लगीन लागायला लागलं. पाणी घालून झालं का नवरा-नवरी देवाम्होरं न्यायाचे. त्यान्ला रुईच्या न्हाईतर पिंपळाच्या पानाची बासिंगं बांधायची. बासिंगं बांदून झाली का नवरा-नवरीला पुन्हा पाणी घालायला लागायचं. आता मातर नवरा पैला नवरीच्या अंगावर पानी घालतू. तिच्या समद्या आंगाला पाण्यानं धुतू. बाकी-च्यांनी नुसतं मस्करी करायची. मग नवरी नवऱ्याला पानी घालून चोळती आन् मग नवऱ्यानं तोंडात पाणी घिवून नवरीच्या अंगावर चूळ भरायची. चूळ भरताना दुसऱ्या कंच्या बाईनं अंगावर पाणी उडू द्यायाचं न्हाय. नवरानवरीच्या अंगावर

चूळ भरून टाकतू आन् नवरीवी नवऱ्याच्या अंगावर तोंडात पाणी घिवून चुळा भरून टाकती. अशा चुळा भरल्या भल्या म्हंजी ती दोगं बाटली. समद्यांच्या म्होरं त्यांनी एकामेकाला बाटिवलं का झालं. समद्या पंचांच्या पाया पडलं, का झालं आमचं लगीन. मग एकादा हालाल (रेडा) मारायचा आन् देवाला निवद दावायचा. देवाम्होरं हालाल उभा करायचा. त्याचं रगात बरूबर देवावर पडलं पायजील. एकदा रगात देवावर पडलं की समदी माणसं बाया-पोरांशी परसाद घेत्यात. तरणी पोरं हालालाच्या आनकी धमन्या कापत्यात आन् लेकरू थानाला चिटावं तसं समदीजनं रगात पेत्यात. आमच्यात तशी चालच हाया. रगात लई नामी आसतंय. मंग सागुती शिजती आन् समदे पेत्यात. कोण मारामाऱ्या करत्यात. तर कोण भावकीच्या भांडनात तर कोण खबऱ्या झाला म्हणून एकदम कज्जा उकरून काढत्यात. आसं आसतंया लगीन!"

आणखी खूप काही बोलायचं असतं. पण तोवर गाडी जालना स्टँडवर येऊन उभी राहते. आमी घाईत खाली उतरतो. खरं म्हणजे गाडी अजून चालती तर बरंच असं वाटत असतं. तोंडाचं कुलूप उघडणं सोपं नसतं. पोलिस आन् त्याचा बाप आला तरी जे त्वांड उगडत नाही ते उगाडलं व्होतं. जालन्यात रस्त्यावर आलो तरी बोलणं चालूच असतं. वामन्या, बारक्या आता म्होरच्या पावलानं चालत असत्यात. दिस मावळतीला कलल्याला आसतू. कडुसं पडायच्या आत बिराडावर पोचलं पायजी. न्हाईतर लई बंगाळ, बला जिवावर उठायची. म्हणून पायांना भिंगरी लावल्यावाणी आमी बारक्या आन् वामन्यामागं पळत असतो. ते दोगं अशा ढेंगा टाकायचे सहज, आन् आमी पळायचो. बारक्या पोराच्या बोटाला धरून कसं आपुन चालतो आन् पोरगं पळतं तसं झालेलं. वामन्या, बारक्या सहज चालत असतात. तर मी नि मोतीराज पळत असतो.

टेकाडानं आमी वर चढाय लागलो, तसं म्होरं लांब पाच-पन्नास मानसांचा तांडा दिसत आसतू. तांड्यावरली मानसं लांब दिसत असत्यात, पर आंधुक आसतं. आमी जसंजसं बिराडांच्या मागावं जवळजवळ जाया लागलो तसंतसं बिराडावरली मानसं गडप व्हायला लागली. आदी पाचपन्नास मानसं लांबनं दिसत व्हती. वामन्या आन् बारक्या मनोमन हासत व्हते. आमी पालाच्या अगदी जवळ गेलो तर काय नवल? दिसत तर कुणीच नव्हतं. नुसतंच एकदोन जरमली टोप, एक पतऱ्याची कळशी, एक तवा, उलतान, आन् दोन-तीन रकटी येवढ्याच वस्तू आन् बारक्या पोरांचा चिगूर. येवढ्याच ठळक गोष्टी. पालं पारध्यांची दिसत असतात. एकही गडीमाणूस पालांवर नसतो. चादरच्या पालात काही हालचाल होत आसती तर तसल्याच चादरच्या पालाम्होरं एक म्हातारी डोस्क्याला हाताच्या तळव्याची उशी देऊन आडवी पडलेली आसती.

वामन्या लई नामी. त्यानं तोऱ्हा म्हारा करत मोठ्यांदा पारधी भाषेतनं बोलाय

सुरवात केली. आमी पालांच्या जवळ जाया लागलो. खरं म्हणजे पालावर आन् पारध्यांच्यात तसा मी पहिल्यांदाच निघालो होतो. तसे हे लोक अतिशय गुन्हेगारी प्रवृत्तीचे आणि आपल्यासारख्यांवर विश्वास नसलेले, हे मला माहीत होतं. मोतीराजही तसा थोडा काळजीतच पडलेला असतो. आमी वामन्या-बारक्याच्या आधीन असतो. वामन्या, बारक्या मोतीराजच्या खूप परिचयाचे कार्यकर्ते. त्यानं आमाला तसा आधार असतो. तर म्हातारी तोंडावर हात पालथा करून निजलेली आन पोरं खेळात दंग. निदान नाटक तरी तसंच चाललेलं. आमी जवळ एका पालाम्होरं उभं राहिलो. वामन्या, बारक्या पोरास्नी हाका माराया लागले. तवा म्हातारी झोपली असल्याचं सोंग सोडून वामन्या, बारक्यासंग तिज्या भाषेतनं बोलाया लागली. आमी नुसतेच उभे.

आमी असे चितागतीवर. वामन्या त्या म्हातारीजवळ जावून बसला. त्ये तिगंजण बोलत असतात. म्हातारी तावातावानं बोलत असती. तेवढ्यात पालाची हालचाल व्होती. चादर वर उचलून एक तरणीताठी बाई पालातनं म्होरं येते. तिला पाहिलं तर तिच्यावर विश्वासच बसणार नाही. ती अगदी वली बाळांतीण आसती. आंगावरली कापडं रक्ताच्या डागांनी भरलेली असत्यात. पायावर रक्ताचं डाग असत्यात. आंगावर म्हणायला लुगडं आसतं. पर सारं आंग तसं उगडचं आसतं. ती बारक्याला कायबाय बोलती. आमी म्हातारीजवळ टेकतो. समोर पाहावत नसतं. आपली आपल्यालाच लाज वाटत आसती. पर ती पोरगी अजिबात लाजत न्हाय. ती तिच्या कामात आसती. बारक्या म्हणतो, "दोन तासांपूर्वीच तिचा बाळंतपण झालंया. पोरगी झालीया." येवढ्यात ती म्हातारी उभी न्हाती. वामन्या, बारक्या म्हातारीला पटवण्यात यशस्वी झालेले असतात. तर इकडे ती बाई एका चरवीत पाणी घिवून पोराला आंघूळ घालत आसती. पोर मोठ्यानं किंचाळत आसतंया. येवढ्याशा लहान जिवाला गार पाण्यात ती आंगुळ घालत असती. थोड्या येळानं पोराचा बरडण्याचा आवाज कमी होतो. ती बाई बाहेर येते. पुन्हा चरवी उचालती आन् पाण्याला निगून जाती.

म्हातारी मोठमोठ्यानं काय ओरडत असते ते काही आम्हाला कळत नाही. पण बारक्या सांगत असतो ती धोका नसल्याचा इशारा करतीया. 'आता काय धोका न्हाय. मानसं आपलीच हायेत.' म्हातारी खाली बसती आन् थोड्या येळानं एक एक जण जमायला लागला. कुणी झाडावरनं खाली उड्या मारल्या, तर कुणी वगाळतनं वर आला, तर कुणी लांब उसातनं बाहीर आला. उंदराच्या बिळातनं जसं मांजार गेल्यावर उंदीर बाहेर येत्यात तसं एक एक जण जमाय लागला. तर ती मगाची बाई पाणी घिवून आली. आन् पालाम्होरंच तिनं अंगावर पाणी घ्यायला सुरुवात केली. खरं म्हणजे आपली आपल्याला येवढी सिसारी आल्याली, पण 'बोडकीचा तळतळाट,' दुसरं काय ?

मंडळी जमाय लागली. पण सावधपणे. पांगून, फटकून बसलेली. कुणी कुणी तर

दगडाचं गोटं जवळ वगूनच सराकलेली. मी मोतीराज, वामन्या, बारक्या एका बाजूला. आमच्या बाजूला म्हातारी. म्होरं म्हातारे, तरणे मिळून १०-१२ जण तर तरण्याताठ्या पोरी आन् मध्यम वयाच्या पाचसात बाया बसलेल्या. बायांनी एकजात गुडघ्यापर्यंत लुगडं नेसलेलं. हातात कथलाच्या बांगड्या, आंगात दंडापातुर चोळी, सगळ्यांनी कपाळाला गोंदल्याली बारीक टिकली. आन् दुसरं समद्यांचं दातवणानी दात काळेभोर झाल्यालं. केसांच्या बटा झालेल्या. उपारट्या कोंबडीवाणी पकाडं बाऱ्यावर उडत असत्यात. तर समद्याजणींनी डोस्क्याला बुचडं बांधल्यालं. सगळी मानसं कावळा फांदीवर बसावा, तशी तयारीनं बसल्याली. कावळ्याला जसं टुणुकन् उडी मारता येती तसं तयारीनं बसल्याली. बापे सगळे रापत असत्यात. डोस्क्याच्या पागुटयातनं बाप्यांचे केस बाढलेले दिसत असतात. हाजामत करायची नसती बाटतं. सगळे गप्पगार बसलेले असतात.

मोतीराज बोलाय लागतो. आमच्या येण्याचं कारण सांगतो. सगळे लोक गप्पचीप ऐकत असतात. आमी बोलत असतो. प्रतिसाद नसतो म्हणण्यापेक्षा आमी घाबरून गेलेले असतो. येरवी वाघावाणी डरकाळी फोडणारे साक्षात मृत्यू समोर दिसावा तसं आम्ही, आपुन येऊन चूक तर केली नाही असं बाटू लागलं. पण एकदा बारक्याला प्रतिसाद मिळतो आहे असं पाहून बरंही बाटत असतं. पण आसाराम जाधव गुरुजींनी सांगितलेलं असतं, 'संशय येईल असं बागायचं नाही तर भलतीच पीडा व्हायची. जित्ते मागारी यालच आसं नाही.' आमी मनातून धास्तावलेलो.

आम्ही घाबरलो त्याला दुसरंही कारण होतं. ते म्हणजे रात्र बाढत होती. अंधार बाढत होता. रात्र होत चाललेली. त्यात जागा अनोळखी. त्यानं जरा घाबरलेलो. पण बारक्या, वामन्याला यश येतं. ते जीव तोडून आपलं म्हणणं पटवून देत असतात.

आकीर सगळेच उठतात. हासतात, बोलतात. मग मोतीराज आणि मी त्यांच्याशी गप्पा सुरू करतो. त्यातला एक जण सांगत असतो, त्याची पयली बायकू लयी मर्द व्हती. "नवऱ्याला पोलिसांनी धरून नेहला तर ही वली बाळंतीण. तिनं बकिलाकडं जावून जामीन दिवून नवऱ्याला सोडवून आनला. तर बकिलानं फी घेतली न्हाय. आदल्या दिवशी बाईचं मूल पोटात व्हतं. दुसऱ्या दिशी बाई कोर्टात जामीन भरायला गेली तर मूल बस्त्यात होतं. आन् बाई नवऱ्याला सोडवायला सकाळपास्नं कोर्टात बसली व्हती. बारा तासांची बाळंतीण हातात जीव घेऊन नवऱ्याला सोडवायला बसली व्हती."

आम्ही हळूहळू त्यांना आमचा उद्देश सांगितला. तसं एक बाई म्हणाली, "आमी चोरी करतच न्हाय. आमाला आसलं काय ठावं न्हाय, तुमी जावा. आमाला संघटना काय नगं..." आम्ही दोघांनी जिवाचा आटापिटा करून त्यांना शपथ घ्यायला

तयार केलं. पण या माणसांचा विश्वास आमच्यावर नाही हे त्यांच्या डोळ्यात दिसत असतं. ही माणसं माणसं आहेत, ती आपली माणसं आहेत, निदान आपल्या हितासाठी यांच्या संगं बोलावं असं त्यांना वाटत नसतं. वारक्या, वामन्या, पारधी समाजाची कथा नि व्यथा सांगतो. आमी दोघे अनुभव सांगतो. दोघे-चौघे म्हणतात 'बगू, जमलंच तर येतू' पण त्यांच्या बोलण्यात जोर नव्हता. पोरं तर येगळाच इचार करत व्हती. आकिर मानसं उठून जाया लागली. पोरं आयांना चिटाकली. आमी उठलो तर एक पारधी मोठ्यानं खाकारला. तसं दोन तरणी पोरं उभी राहिली. त्यांनी आपसात बोलणं केलं. आणि गावात कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचवलं.

माणसांच्या बेटांतली ही असंख्य बेटं. संपर्क तर कठीण, पण असे वामन्या, वारक्या असले तरच फायदा. नाही तर... नाही तर गुन्हे, पुन्हा तुरुंग, गुन्हा हेच कायम चालू राहणार.

पिढ्यान् पिढ्या हेच होत आलं. म्होरच्या हात्तीच्या चिपा होणार. त्यांची हाडं साठसाठून त्यांचं डोंगराएवढं ढिगारं होणार आन् मागचे हत्ती तिथंच जावून आपली हाडकं टाकीत राहणार. हाडांच्या ढिगाआड दडलेली माणुसकी पुन्हा पुन्हा उकरत बसाय लागणार. सापानं कात टाकताच साप सळसळून म्होरं जातो. तसं झालं तर इयाक, नाहीतर हात्तीची गोष्ट पुढे चालू आहेच.

●

औरंगाबाद परिषद

औरंगाबादची संशयित–गुन्हेगार–निर्मूलन परिषद ही तशी भटक्या–विमुक्तांच्या चळवळीला वेगळी कलाटणी देणारी ठरली. हजारो लोकांच्य। समक्ष गुन्हेगारीचं आणि भिक्षेचं बदनामी जीवन नाकारलं गेलं. आणि अनेकांचं आंधारी मरण उजेडात आलं. मुक्या वेदना बोलू लागल्या.

अशीच एक पारधी बाई गंगुबाई बजरंग काळे. पन्नासीतली, काळ्या सावळ्या रंगाची, बसक्या नाकाची, नाकात चमकी, इरकली लुगडं, कपाळाला भला मोठा कुंकवाचा टिळा, दाताला दातवान लावल्यानं, काळेभोर झालेले दात, डोक्यावरून हातभर पदर काढलेला. येरवी पारधी समाजातल्या बाया दुईटांगी गुडघ्यावर लुगडं नेसतात. पदराचा तसा पत्ताच नसतो. घावंल तिथं खवलेला असतो. तर गंगूबाईनं आज चोपून चापून पदर नीटनेटका डोक्यावरून घेऊन माईकपुढे आयुष्यात

पहिल्यांदाच बोलायला उभी राहते. समोर प्रचंड माणसं पाहून बाई खाली मान घालून बराच वेळ उभी असते. बाबा आढाव आग्रह करू लागतात. बाई खाली मान घालूनच कोणताही औपचारिक भाग न आनता सरळ बोलू लागते. येरवीचं अध्यक्ष महाशय आणि... काहीही तिला माहीत नसते. ती बोलते ते सरळ, थेट महत्त्वाचं.

" त्याजं आसं झालं, म्हंजी पैल्या दिशी घट व्हतं. घटादिशीच समदी बायंदूळ आली बगा. आमी घरी व्हतो. मी आंगुळ करून बसल्याली व्हती. च्या कराया भगुलं ठिवल्यालं व्हतं. म्या जराकशी क्यास उनात वाळवीत व्हते. तेवढ्यात माझी पाटची भन आरडत-वरडत बोंब मारीत पळत आली. माजा जीव चराकला. काय तरी वला आली म्हणं म्या पदुर खवून उभी झाल्ये.

" भन म्हणत व्हती. ' दोन गावची माणसं आल्यात. ती आता आपल्या माणसासनी मारून टाकत्यात. बायापोरानला माराय लागल्यात. बायांची लुगडी फेडल्यात आन् झिंज्यानला कांदं बांधाया लागल्यात, म्या चार-पाच काट्या खाल्या. आन् मेल्यावानी पडली. तवा मला सोडली. म्या डोळा चुकावला आन् पळाली.'

" मी उभ्या उभ्याच चुलीत पानी वतलं. पोराला धडप्यात बांधलं आन् दोगी घाबऱ्या घाबऱ्या पळत ठेसनात गेलू. तसं सायब व्हते. आमी गेलू तसं सायब उभा राहिला. मी सायबाचं पाय धरलं. सायबानं हासाडलं. म्हणले, ' काय झालं ? ' म्या सांगितलं. सायब म्हणला, ' खरं सांग. मला खरं पायजे.' ' साऱ्या गावानं पारद्यांचा नायनाट केला. समदे मरले असत्याल. ' म्हण रडाया लागले. सायबाचा का इस्वास बसंना, तेवढ्यात माजा पुतण्याबी बोंब मारीत आला. त्यानं बी त्येच सांगितलं. सायब म्हणले, ' तुमी लायरी करा. माझ्याकडं गाडी न्हाय. '

" ' सायब लायरी कुठं बगू. तवर आमच्या माणसानला खलास केलं आसलं. सायब पाया पडती निगा. तुमीच आसं मन घालत न्हाय तर आता आमी काय करावं ? ' मंग ते म्हणले, ' बरं काय हरकत न्हाय. ' सायबानं लायरी भरून घेतली. लायरी निगाली. तसं सायबानं गाडीतच लिव्हायला सुरुवात केली. म्या सांगत व्हते. ' म्या गंगुबाई बजरंग काळे. राहणार भूम. तालुका परांडा. जि. उस्मानाबाद. ' ते म्हणले, ' कुठं घडलं ? '

' आरसुलीला. '

' तीथं तुमची भन आहे ? ' ' व्हय. त्या भनीनं येऊन सांगितलं. ' ' आनकी किती माणसं हायेत आरसुलीत ? ' ' पन्नास-साठ झोपड्या. म्हंजी पाचसहाशे मानसं.'

' आल्याली माणसं कंच्या गावची ? ' ' आरसुली आन् देवळालीची. कायबाय नांदेड वाडीची आसत्याल पण लय करून देवळाली आन् आरसुलीचीच. '

" म्या सांगत व्हते. सायब लिव्हत व्हता. ' चारपाचशे माणूस. कुणापाशी काठी तर कुणाजवळ कुऱ्हाडी. तर कुणापाशी क्वयता. तर कुणापशी इळा. आसं सम

गाव जय करत आलं. पारध्यांच्या वाड्यावर तसं लय माणूस नव्हतं. आसंल शंभरेक. बाकीची पोटामागं गेल्याली. येळ सकाळी दहा-अकराची. आलं ते खोपटातली कापडं काडली. आन् अंगावरची हिसकून घेतली. कापडान्ला पेटवून दिलं. समदा कालवा झाला व्हता. घाबंल ती माणूस बुकलत व्हते. आन् जगलं वाचलं ते जीव घिवून पळत व्हतं. म्हाताऱ्याकोताऱ्यांनी आंगं टाकली व्हती. तर तरण्याताट्या माणसांच्या रक्तांची कारंजी उडत व्हती. माझी भन त्यातनंच पळाली. आन् भूमला पळतीच आली.'

"म्या सांगत व्हते, सायब लिव्हत व्हता. तवर आमची लायरी आरसुलीत शिरली. आमी आमच्या वस्तीत गेलू. तर समदं इस्काटल्यालं. एक म्हातारी कुंतत म्हणली, 'आता हेच नेल्यात संमदी देवलालीला. सात-आठ जणांच्या गळ्याला दोराचं फास लावून नेल्यात. लवकर जावा.' आता सायबाचा इस्वास बसला. त्यानं लायरी जोरात हाकायला लावली.

"आमी देवलालीला गेलू. तर पाटील वाड्याम्होरंच उभा व्होता. त्याच्या आंगावर समदं रक्त. आमच्या नंदाव्याला मारलं व्हतं. त्यानीच मारल्यालं व्हतं. असं हाताला (खूण करून दाखवत) तर सगळं रक्त आंगावर पडल्यालं. पुना म्या म्हनली पाटलाला, 'वकरं कापलंय का कोंबडं कापलंय?' पाटील गप्प. त्याला वाड्यात घेतला, झेपाललो, तवा त्वांड उगाडलं. पुना गप्प. समद्या गावात दाराला कड्या घालून माणसं घरात गपगुमान बसल्याली. भर दुपारचं रस्त्यात चिटपाखरू दिसत नव्हतं. कोण बाहीर ईना. सायब वाड्यात नुसता बगतच उभा राहिला. आमची मानसं गुराच्या दावणीला बांधल्याली. संमद्यांच्या गळ्याला गुराच्या चराटानं फास लावल्यालं. पल्याड गवानीत सात-आठ मण सरपानाचा ढीग. तीनचार डबे घासल्याट. माझ्या नंदाव्याची तर आसी इतभर जीव बाहीर पडली व्हती. घडीभर गाडी गेली नसती तर खल्लास झालं आसतं समदं. सायबानं समद्यासनी सोडलं. लायरीत आनून घातलं. आन् आमी लायरीत बसल्यावं सायब मागूनशान वाड्यात गेला. बोलणं मोठ्यानं चाललं व्हतं. आमाला लायरीत आयकायला येत नव्हतं. लायरी चालू झाली आमाला ठेसनात आनलं. म्होरं कायबी झालं न्हाय.

"आमच्याच मानसान्ला रिमांड काढला. रोज दणकायचे. 'सांगा कुठं ठिवलं?' आता म्हाईत न्हाय तर सांगायचं काय? मंग घीयाचे रोज एकाचं नाव. पंधरा-दीस मारमारून खोबरं ठेसल्यावानी ठेचलं. आमी रोज सायबाच्या पाया पडायचो. वरडायचो. पर आमचा कुणी वाली न्हाय, कुणी वाली न्हाय सायेब. कुठं कुणाची कणसं गेली. कुठं कुणाचं किड्डूकमिड्डूक गेलं, कुणाची मोटर गेली, कुणाचं कापाडचोपाड गेलं, का आमच्यावर आलं. मायबाप जगावं तरी कसं? आपला गू खावून जावा, आसं झालंय. कुणी म्हण इश्वास ठिवत न्हाय का कुणाला म्हण कणव येत न्हाय."

तिच्या निवेदनानं सगळे आसवं पुसत असतात. तर बाकीचे सारे हादरून गेलेले असतात.

बाई व्यासपीठावरून खाली उतरते. आणि सेलूचा रामभाऊ पारधी व्यासपीठावर चढतो. रामभाऊ पारधी आंगापिंडानं धिप्पाड, काळासावळा रंग. डोक्याला टोपी-जी पारधी कधी वापरीत नाहीत. शिकल्या सवरलेल्या समाजात वावरतो. त्याचं कपडे स्वच्छ. सेलूला यानंच मराठवाड्यातली आणि या देशातलीही कदाचित पाहिली पारध्यांची परिषद संघटित केलेली असते. तो महाराष्ट्राच्या भटक्या विमुक्त संघटनेचा उपाध्यक्ष आहे. रामभाऊ बोलू लागतात.

"तर मानूस म्हण जगावं म्हणतू. पर ढोकीचं हत्याकांड झाल्यापास्नं आमी पाखरांची शिकार करणारी माणसंच आज गावगुंडांच्या जुलमाची शिकार झालुया. आमाला जग जगू देत न्हायी. आमी आमच्या कष्टानं जगावं म्हणतुया तर आमाला मारपीट रोजचीच पाचवीला पुजलीया, मी चोर म्हणत्यात पर मी सांगतू, आक्क्या जलमात चोरी म्हण म्या केली नाय. कुणाच्या बाळल्या पाचोळ्यावर पाय ठिवला न्हाय. तर पोलिसांच्या हापिसात माझा फोटू लावलाय. संशयित गुन्हेगार म्हण. मी म्हणतू एका तरी ठेसनात माझ्यावरचा दावा सिद्ध झालाय का? तो दावा, नाहीतर आमास्नी गोळ्या घालून मारून तरी टाका. माझी बायकू, पोरं डुकरं सांबाळत्यात. तर म्या जमीन घेतलीया. पर माणूस म्हण जगूच देत न्हायीत.

"आमच्या मराठवाड्यातच लय काच हाय. उस्मानाबाद, परभणी, बीड, नांदेड ह्या भागात आमची वस्ती मोठी हाय. उस्मानाबादला तर लयच हाय. त्यानं गावोगाव आमच्यावं जुलूम चालू हाय. पोलिसांचं तर काय सांगू! माझ्या रानातनं म्या बैरणीचा भेला घिवून येत व्हतो. तर गाववाल्यांनी चोरीचा आळ घातला. दोन दिस ठेसनात ठिवलं. पर 'कर न्हाय त्याला डर कश्याला' म्हण म्या मार खाल्ला. कोर्टानं म्होरं निर्दोस सोडलं. आमी पारधी म्हण जलमाला आलू आन् पाप झालं बगा. आमच्या बायापोरास्नी पोलिस सोडत न्हायीत. नवरा-बायकूला हद्दपार करत्यात. बायकूला उस्मानाबाद जिल्हा बंद आन् नवऱ्याला नांदेड बंद. नवरा बायकूला भेटायचं आसन् तर जालन्याला न्हायतर औरंगाबादला जावा लागतया. बाया सुदीक हद्दपार असत्यात. मायबाय हो आमची दोनदोन वर्षाची लेकरं दिकून आमच्या संगं चोर, गुन्हेगार असत्यात. त्यानूला बी मार बसतुया. पारधी म्हणलं का त्यो आसलाच, आसं समजत्यात. आमच्यात बी वाईट माणसं हायेत. मी न्हाय म्हणत न्हाय. पोटाला मिळंना की उचलपाचल करत्यात. कुणी दारू काढत्यात. कुणी कायबाय करत्यात. पर का करावं? मी म्हणतू आमाला ठिवता का तुमच्या घरात कामाला? आमी शिकावू न्हाय. लावता का शेतात कामाला? मायबाप तेबी करूनशान बसलू. भूमचा बजरंग हाथं हाय. आमी रोजगार हामीच्या कामावर लोकं घ्या म्हण गेलू.

आमचं आसाराम गुरुजी, राठोडसायबानला इचारा. कामाला घेतलं. दोन दिस काम केलं. आन् तिसऱ्या दिशी लोकं म्हणली, 'तुमच्या मायचं तुमच्या, तुमी हाथं काम करता आन् आमच्या भाकऱ्याची गठुडी चोरीला जात्यात.' झालं. निमताला ठेकलेल्या सायबानं समद्या पारध्यान्ला हाकालल. म्हणं कामावली माणसं संप करू म्हणत्यात. तर आमच्यातबी लय वंगाळ लोक हायेत. चार-चार, पाच-पाच बायका करत्यात. दहादहा, ईसईस पोरं आन् मंग उंडगायचं. म्या परिषद घितली. तांड्या-तांड्यावर जाया लागलू. डोस्क्याला टोपी घालाय लागलू. समद्यासनी एकवट कराया लागलू, तर जात माझ्यावरच उलाटली. त्यात सेलूची परिषद झाली आन् पोलिसानं ज्यो जुलूम केला, इचारू नका. आमी हाजार, दोन हाजार, पारधी एकदम जमाया लागलू, तसं पोलिस खातं आन् गाव हादारलं. आमी कामं मागतुया. तर गावानं आमाला जुलूम दिला. झालं, म्या लय शाना झालू म्हण आता जातीनं मलाच वाळीत टाकलंया. का तर म्या पुढारी झालुया, पोलिसांचा खबऱ्या झालुया! बाया इकत घियाच्या आन् इकायच्या, भाड खायाची, वाईटवकट कामं करायची, आन् त्यांची घरं भरायची. आपुन आपलं उकीरडयावर हाय ते हाय. मायबाप, गल्लोगल्ली कुत्र्याला तरी पत आसतीया. कुणीतरी घासभर टुकडा टाकतंया. पर पारध्यांचा जलम कुत्र्याहून निसूके. कुत्र्याच्या जलमाला रया आसतीया. पर आमच्या जगण्याला रया न्हाय. नुसत्या हाडया हाडया. हाडाची काडं करून नुसतं तगून राह्याचं. हाथं लय मोठान्ली आमची माणसं हायेत म्हण सांगतू. मायबाय हो, आमीबी माणसं हाय. तुमी सांगा. समदं राकरांगुळी करून टाकू. जिवाला कोण भेतं. रांडा भ्येत्यात. आमी मर्द हाय. तुमी सांगा. पायजी ते करू, जीव दिवू. पर ह्या खातीऱ्यातनं आमाला बाहीर काढा. लय जलमाचं उपकार व्हत्याल बगा."

असे अमानुषतेचे अनेक पदर उलगडत होते. अन्याय अन्याय कशाला म्हणतात, त्याचं मूर्तिमंत चित्र समोर उभं केलं होतं. वसंतभुवनच्या आवारात घातलेला मांडव. बाया, पोरं, म्हातारे, रापलेले, करपलेले, तसे ताजेतवाने चेहरे मंत्रमुग्ध होऊन ऐकत असतात. जेवनाचं भान नसतं. सकाळी नऊ वाजता सुरू झालेला कार्यक्रम संध्याकाळी सात वाजेपर्यंत एका मिनिटाची उसंत न घेता चालू असतो. वेदनेनं ढसलेलं, कराटं फुटून पुवाचा लोंढा लागावा तसं. सारी कुजलेली व्यवस्थेची घाण वाहात असते.

ढोकीच्या पारध्यांची गाडी अकरा तारखेला रात्रीच दाखल झालेली असते. तेरा-चौदा बायका, त्यांची रुपुटुपू रूपं असल्याली पोरं, दोन-तीन बापे अशी जवळपास पंचवीस-तीस माणसं भटक्या विमुक्त संघटनेच्या कार्यकर्त्यांनी आणलेली असतात. त्यांची सोय वसंतभुवनात केलेली असते. त्यान्ला परिषदेच्या सुरवातीलाच मानानं मंडपात आणून बसवलेलं असतं. नियोजित अध्यक्ष न्या. तारकुंडे येऊ शकलेले नसतात. पण आमचे ज्येष्ठ सहकारी आणि समता चळवळीचे अग्रणी डॉ. बाबा

आढाव यांच्या अध्यक्षतेखाली परिषदेला सुरुवात होते. स्वागत भटक्या विमुक्त संघटनेचे उपाध्यक्ष आसाराम गुरुजी तर प्रास्ताविक चिटणीस मोतीराज राठोड करतात. शरद पवारांनी उद्घाटनपर भाषणात "आपण आरोपीच्या पिंजऱ्यात उभे आहोत, जन्मजात गुन्हेगार हा शिक्का मारणाऱ्या व्यवस्थेचा मी घटक आहे, त्यामुळे आपल्या समोर अपराधित्वाची जाणीव होते. तुमचा संताप मी समर्थनीय मानतो. प्रश्न सुटायचा तर ऐक्य आणि ताकद वाढवली पाहिजे." असे सांगितले. तर त्यांच्याच हस्ते पिढ्यान् पिढ्या गुलामीनं करकचून बांधलेला हा समाज जागा होऊ लागला, त्या गुलामीचं प्रतीक म्हणून तुरुंग आणि बेड्या जाळण्यात आल्या. तर बाबा आढावांनी हजारो वर्षांची भिक्षेची झोळी, चिमटा यांची होळी केली. हजारो लोकांनी प्रचंड प्रतिसादानं टाळ्यांचा गजर केला. घोषणा केल्या. घोषणा विरल्या, आणि बाबांनी गंभीरपणे पुढील शपथ सांगितली. हजारो लोकांनी ती घेतली.

" आम्ही जन्मतः गुन्हेगार किंवा भिकारी नाही. गुन्हेगार किंवा भिकारी होण्याची आमची इच्छा नाही. स्वराज्यात पोट भरण्यासाठी भीक मागावी लागते किंवा चोरी करावी लागते, हे व्यक्ती व देशाला लांच्छनास्पद आहे. स्वकष्टावर आधारीत स्वावलंबी व स्वाभिमानाचे जीवन आम्ही जगू इच्छितो. "

प्रतिज्ञा संपली आणि अध्यक्षांनी पुढील कार्यक्रम सुरू करण्याआधी ढोकीच्या हत्याकांडात बळी पडलेल्या हुतात्म्यांच्या विधवा व निराधार बहिणींना प्रेमाची साडी-चोळी देऊन त्यांचा गौरव करण्यात आला आणि त्यांच्या दुःखात परिषद सहभागी असल्याचे आवर्जून सांगून हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहिली. लांबलांबून लोक आले होते. सातारा, सांगली, कोल्हापूरपासून नाशिक, मुंबई, नागपूर आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेली ही माणसं भान विसरून गेली. एक कार्यकर्ता आणि एक वक्ता अशी भाषणं सुरू झाली. भटक्या विमुक्तांचं जग हळूहळू एकएक पदर उलगडत गेलं. एक एक अनुभव म्हणजे हजारो लाखो वेदनांचा महापूर. कार्यक्रम चालू असतानाच एक वैदूंचा तांडा आला. तांड्यातला कार्यकर्ता धावत पळत व्यासपीठावर आला. तो सांगत असतो. ' परिषदेला आलेल्या पंधरावीस वैदूंना पोलिसांनी हटकून अटक करून ठेवलंय. आपुन विगीनं चला.' मी कारण विचारले तसं तो म्हणाला, 'माने सायब, चिम्याच्या हातात रेडिव व्हता. त्यो त्याच्या मेव्हण्याचा हाय. पोलिस म्हणतुया त्यो चोरीचा हाय, न्हायतर पावती दाखव. पावती आगुदर धावत नव्हती. पर हुडकल्यावर ती लवरी पिसवीतच व्हती. ती दावली तर म्हणतू ह्यो माणूस तूच कशावनं ती दाव. आता का करावं ? रेडिवचा मालक हाय नांदिडात.' मुकाट्यानं कार्यकर्त्यांना घेऊन गेलो. गुन्हेगारी जीवनाचा मगाशीच धिक्कार केलेला आणि आता प्रत्यक्ष येरे माझ्या मागल्या पुन्हा चालू. पोलिस इन्सपेक्टरला भेटलो. सायबाचं म्हणणं आसं, ' वैदू मानूस दिसला. आता अंगावर कापडं बगा ह्याच्या,

आयला चार कुत्री जोगावत्याल येवढा मळ निगंल. आंगावं धड कापाड न्हाय. आन् रेडिओ लावुनश्यान निगालाय. आता तुमीच सांगा. ह्यो रेडिव कशावनं पळवल्याला नसंल ! आन् खायाची बोंब तर रेडिव इकत घिलच कसा ? म्हण अडकवून ठिवले होते. आता तुमी म्हणताय, तर देतू सोडून. पर तुम्हाला सांगतू त्याचा विश्वास धरवत न्हाय.' आसाराम गुरुजींनी इन्स्पेक्टरला झापला. तो त्याला गावात परिषद चालू आहे याचा पत्ताही नसतो. अखेर फार कटकट न करता आणि पाच-पन्नास कार्यकर्ते बघून पोलिस वैदूंना सोडतात. पोलिस स्टेशनातनं बाहेर आल्यावर आसाराम गुरुजी मला सांगत असतात. 'अहो तुम्ही आला म्हण बरं झालं न्हायतर अगदी इथल्या कार्यकर्त्यांना पसाभर रक्त येवढ्यासाठी आटवावं लागलं असतं. आणि तवा कुठं हे सरळ झाले असते. पोलिस खातं लय बदमाश बगा.'

तर अशी दोन दिस चाललेली परिषद. अनेक ठराव पास झाले. पुनर्वसनाची जोरदार मागणी करण्यात आली. डॉ. बाबा आढाव यांच्याकडून सगळ्यांनी शपथ घेतली.

आणि या हजार लोकांची एक यादी शासनाला सादर करण्याचे ठरले. या हजार जणांचे पुनर्वसन एक वर्षात करावे, अन्यथा महाराष्ट्रातल्या शासकीय विश्रामगृहावर आम्ही सत्याग्रह करून शासकीय मालमत्ता ताब्यात घेण्याचे आंदोलन सुरू करू अशी प्रतिज्ञा केली गेली. समारोपाच्या भाषणात रंगा वैद्य यांनी स्वाभिमान, स्वत्त्व, आणि समता या मूल्यांसाठी सुरू असलेल्या समतेच्या सागरात स्त्री-पुरुष, श्रमिक, दलित आदिवासी यांनी सामील व्हावे असे सांगितले. तर प्रा. अरुण कांबळे, विरोधी पक्षनेते दि. बा. पाटील, यांचीही भाषणे झाली.

समारोपाच्या अगोदर माझंही भाषण झालं. ते नेहमीसारखंच झालं. उस्मानाबाद, परभणी, नांदेड, लातूर येथून सुमारे दोन हजार पारधी परिषदेला यायला निघाले होते. त्यांना पोहोचू दिले गेले नाही. तर जे पारधी पोहोचले त्यांची एक आणखी वेगळीच कथा. जवळपास पाचशे पारधी बंजार वसतिगृहात मुक्कामाला ठेवलेले असतात. प्रा. मोतीराज राठोड, आसाराम जाधव गुरुजी, प्रा. जवाहर राठोड, मी या पारध्यांची राहण्याची व जेवणाची सोय करून गेलो. आणि सकाळी पाहतो तर एकही पारधी वसतीगृहात नाही. आंम्हाला कळेचना. पारधी गेले कुठे ? मुलांनी सांगितले, त्यांनाही कळले नाही. पारधी गेले कसे ? रात्री जेवताना कुणीतरी त्यांच्याशी बोलत होते. पण मुलांनी लक्ष दिले नाही. आणि एक एक पारधी गायब झाला. अगोदर यांपैकी असंख्य पारध्यांनी शहरच पाहिलेले नव्हते. त्यामुळे ते जाम घाबरलेले होते. त्यात पोलिसांची एवढी भीती असते की, ते पळाले असतील. आणि निवाऱ्याला, हांथरुणावर झोप लागत नाही. पारध्यांच्यात अशी परंपरा आहे की, रात्री एका जागेला. झोपू नये असं एका जागेला झोपणं हे कमीपणाचं मानलं जातं.

रात्री एका जागेला झोपलेला पारधी अगदी हातभर आंतरावर पण रात्रीत किमान आठ-दहा वेळा तरी जागा बदलून झोपतो. एक ना अनेक गोष्टी, पण पारध्यांशी, टकाऱ्यांशी, लमानांशी, विशेषतः पारध्यांशी संबंध आणि संपर्क ठेवणं, हे ही जिवावर उदार होऊनच करावं लागतं. कोणत्याही क्षणाला कार्यकर्त्याचा जीव धोक्यात येऊ शकतो. त्यांचा विश्वास संपादन करणे, ही आजची सर्वांत मोठी गरज आहे. गंगूबाईच्या फाटलेल्या धडप्याला ठिगळ मारण्याचं काम आम्ही करतो आहोत. पण माणुसकीला पोरकी झालेली ही माणसं भयभीत स्थितीत जगताहेत. त्यांना गरज आहे, समाज व्यवस्थेची चौकट मोडून सामावून घेण्याची. पण ही चौकट खरोखरच कधी काळी मोडेल ? मी आशावादी आहे.

●

माणसं आता बोलायला लागलीत

बाबा आढावांचा फोन आला. "मी निगतोय. तुझं काय? तू कसा येणार?" परस्पर येण्याचं कबूल करून मी फोन खाली ठेवला. "तरण्याचं झालंय कोळसं आन् म्हाताऱ्याला आलंय वाळसं." खरंच बाबांचं कौतुकच वाटतं. केवढी प्रचंड धावपळ, यातायात करत असतात. वयाची पन्नाशी उलटली तरी पंचविशीतल्या पोरासारखं टुणटुण उड्या मारत असतात. खरं म्हणजे बाबांचाच का बाबांच्या आख्ख्या पिढीचा हेवा वाटतो आन् आपल्या पिढीचा नेभळटपणाही जाणवू लागतो.

पंढरपूर सोलापूर करत करत औशाला पोहोचलो. कबूल केलेल्या वेळेपेक्षा तब्बल दोन तास उशीर होतो. गाडीनं फाट्यावरच सोडलं तेव्हा ऊन तापायला लागलं होतं. चालत गावात गेलो. गावाचं जुनं वळण लगेच दिसत होतं. जुन्या किल्ल्याची भग्न तटबंदी संस्थानकाळचा रुबाब सांगत होती. तटबंदी ओलांडत गावात शिरलो.

उत्तम माने हा औशातला भटक्या–विमुक्त जाती संघटनेतला तरुण कार्यकर्ता. त्याची चौकशी करावी म्हणून एका मध्यम वयाच्या माणसाला विचारलं. 'बाबा! उत्तम माने कुठं रहातात?' त्याला म्हाइत नव्हतं. चार–दोघांना विचारल्यावर माझी ट्यूब पेटते. खेडेगावात माणसांची वळक त्यांच्या जातीनं होते. पटकन एका म्हाताऱ्या बाईला विचारलं. 'आई, कैकाडवाडा कंच्या बाजूला?' बाईनं कपाळाला हात लावला. न्याहळून बगितलं आन् म्हणाली, 'ते तकडं हाय. आसंच म्होरं जावा नीट, नी उजवीला वळा का त्योच कैकाडवाडा.' कैकाडवाडा जवळ करावा म्हणून भराभरा निगालो. जसा कैकाडवाडा जवळ यायला लागला तसं डुकरांच्या लिदीची वर्दळ वाढली. वाभळीच्या काटीचं फ्यास ओलांडत काट्यानंच काटा चुकवत माणसांची अन् डुकरांची लीद टाळत निघालो. नाकाला कैकाडवाडा जवळ आल्याचं कळत होतं. अन् कानावर भाषणांचा आवाजही येऊ लागला. 'म्हंजे कार्यक्रम चालू झालाय तर!' मनाशीच म्हणालो. सभेच्या जवळ गेलो. तर सभा म्हंजे काय माळावर इस्काडलेल्या खडयांगत इस्काड्रून बसलेली. बायापोरं आपल्या आपल्या दारात पाट्या वळत बसलेली. बाकी बापे माणसं, वट्यावर अन् आपल्या आपल्या अंगनात बारक्या बारक्या गटात इस्कटून बसलेली शे-दोनशे माणसं असावीत. महारुडयातल्या तक्क्यागत कैकाडयांचाही तक्क्या आसतो. तक्क्या म्हंजे सगळ्यांच्या साठी बांधलेलं देऊळ. लगीन येऊ दे, पोरांची शाळा, पावसा पाण्यात सगळ्यांच्या झोपण्याची जागा, जत्रंखेत्रंला आलेल्या माणसांची जागा, कुणाच्याबी घरी पावना रावळा आला तर त्याच्या मुक्कामाची जागा अन् कवाबवा जातपंचायत भरायचीबी जागा. तर असा ह्यो तक्क्या तक्क्याच्या म्होरं माणसं बसलेली अन् तक्क्यात वळीनं खुर्च्या मांडलेल्या. पत्र्याच्या. त्याच्यात सारे पुढारी बसलेले.

मी तरातरा चालत, माणसं ओलांडत तक्क्यात जायचा विचार करत होतो. तेवढ्यात कुणीतरी पाह्यलं. 'आले... आले... आले... आले.' एकच कालवा झाला. सारी सभा इस्कटून गेली. मंडळी सकाळपासनंच माझी वाट पाहत होती. मला उशीर झालेला. माझी वाट पाहून बाबांच्या हस्ते बालवाडीचं उद्घाटन झालेलं असतं. बाबांनी भाषण करून पुढच्या वेळी लक्ष्मणला नक्की आणतो असा शब्द देऊन बाबा पुढच्या कॉलेजच्या कार्यक्रमाला निघून गेले होते. आसाराम जाधवगुरुजी पुन्हा आपलं जोरदार भाषण चालू करतात. हे गुरुजींचं मी कधीही न ऐकलेलं असं आगळं–वेगळं भाषण असतं. गुरुजींच्या खूप सभा मी ऐकल्यात. त्यांच्या कर्तृत्वाचा अन् फडर्या वक्तृत्वाचा मला चांगला अनुभव. पण ही सभा मी अवाक होऊनच ऐकत असतो. गुरुजी बोलत असतात आमच्या मायबोलीतनं. गुरुजींचं कैकाडी अतिशय सोपं आणि लालित्यपूर्ण होतं. म्हणी, उखाणे, दृष्टान्त यांनी त्यांनी सभा जिंकली होती. समोर बसलेल्या लोकांचा मूड काही

औरच होता. गाडगे महाराजांसारखी सभा साद–प्रतिसाद देत चालली होती. माझ्या गळ्यातला प्रचंड हार मला गळ्यातनं न काढण्याचा दम संयोजकानं दिलेला. त्यानं माझी पंचाईत झाली होती. मोतीराज राठोड, बाळकृष्ण रेणके, शंकर भारती, उत्तम माने, लक्ष्मण गायकवाड म्हणजे मराठवाड्यातल्या संघटनेची मानाची पानं. सारे कसे वळीनं बसले होते. समोरच्या मंडळींच्या फेट्यांकडे मी सारखं कुतूहलाने पहात होतो. गुलाबी रंगाचा कोशा, फेटा जसा काही युनिफॉर्म. साऱ्यांच्या डोक्याला एकाच रंगाचा फेटा. मोठी गंमत वाटत होती. तर दुसऱ्या बाजूला दातबान लावलेली काळ्या दातांची, इटलेल्या लुगड्यांची आणि जमलं तर भाषण ऐकत, जमलंच तर केसातल्या उवा मारत आपसांत सारखं कुचकुचत असलेल्या बाया. तर गुरुजी सांगत असतात "नान नांवराद जातील्यू. जलमी सरी निंगळक नंवराद. गुरुजी कीर नलावाटीसाक नलावाटीस पर नंमरा लक्ष्मण उत्तम नान निंगला गाऊगा नंगलक हारमिशेक नांक हार भ्याराद अन् बाबा आढावांनक इद टिचभर इद ह्याना?" (मी, लक्ष्मण, उत्तम आमी सगळी आपलीच माणसं. आमाला हार मोठं आणि बाबा आढावासारखा मोठा माणूस त्याला इतभर हार दिला हे काय बरोबर नाय.) मंडळी माना हालवतात. कार्यकर्त्यांचे चेहरे पडलेले असतात. साली जात, जराशी खरवडली का भळभळायला लागते. तर गुरुजींचं सुंदर कैकाडी ऐकून कैकाडी असलेल्या सगळ्यांनाच आनंद होतो. तर कैकाडी नसलेल्याची पंचायत. असून नसल्यासारखेच. गुरुजींचं भाषण संपलं. आन् एक म्हातारी उठून आली. गुरुजींच्या जवळ गेली. गुरुजींच्या चेहऱ्यावरनं हात फिरवला आन् आपल्या कानशिलावर कडाकडा बोटं मोडून घेतली. दृष्ट लागली असती ना! आली तशी जागंला जाऊन बसली. आता माझं भाषण ऐकायला सारे उत्सुक होते. मोतीराज, रेणके चिमटे काढून मलाही भाषेतनंच बोलायला सांगत असतो. कारण त्यांनी माझं कैकाडी कधीच ऐकलेलं नसतं. आणि श्रोत्यांचाही प्रचंड आग्रह मी कैकाडी बोलण्याबद्दल. आता माझी पंचाईत झालेली. माझा तर भाषेचा संबंध खूपच कमी झालाय. जास्त वावर अन् वापर मराठीचाच. येरवी कैकाडीतनं बोलणं वेगळं अन् भाषण कैकाडीतनं करणं वेगळं. मला अमेरिकेतल्या माझ्या इंग्रजी भाषणाची आठवण झाली. आणि इटारसीच्या अखिल भारतीय भाषा संमेलनातल्या हिंदी भाषणाचीही आठवण झाली. तिथं तर मी प्रमुख पाहुणा होतो. समोर विद्वान मंडळी होती आणि मी हिंदी रेटून बोलत होतो. हा अनुभव गाठीला असल्यानं माझं मतं झालं, की दडपून बोलण्यानं भाषा गळून पडते. लोक समजून घेतात. तर अशा मराठी कैकाडी भाषेतनं चिमटे काढत, चुटके सांगत, लहानपणच्या आठवणी काढत बोललो. मी खाली बसलो तेव्हा लोकांनी खूप टाळ्या वाजवल्या. मिस्कीलपणानं रेणके म्हणाला, "च्याआयला, वड्यातल्या दगडावाणी आमी ठणठणीत कोरडेच की रे! तुज्या भाषणाचा सारा पूर डोक्यावरनं गेला आणि आमी ठणठणीत कोरडे. खरंच मला

आता कैकाडी शिकलंच पायजे."

औशाला शे-दोनशे उंबरा कैकाडयांचा. म्हणजे तशी मोठी वस्ती. मंडळी फोका वळण्याचीं कामं करतात. आमच्याकडे निरगुडी ,निरुंबी, तरवड, करंज, घाणेरी मिळंल त्या फोका. फोका नसल्या तर कळकाचा वेळू. तर औशाला पळाटी, तरवड, लई करून पळाटींच. काही मंडळी डुकरं पाळतात. डुकराच्या केसांनला अन् मटणाला बराच भाव येतो. त्यानं डुकरकऱ्यांची परिस्थिती जरा बरी असते. तर बाकीचे काही मातीकाम करत असतात. काहीबाही मोलमजुरी करत असतात. आताशा कैकाडी मालाला भाव नाही. झाप-कुडुका गेला, डालगा गेला. पाटी गेली, प्लॅस्टिकच्या टोपल्या आल्या. लोखंडाची घमेली आली. कणगी गेल्या, लोखंडी बॅरल आले. पोत्याची गोणपाटं आली. बदललेल्या उत्पादनांच्या संदर्भात सारा कैकाडयांचा परंपरागत व्यवसाय मोडीत निघाला. मायबाप सरकारचं बसलेल्या गावगाडयाकडं अन् बारा बलुत्यांच्या बुडलेल्या धंद्याकडं ध्यान कुठाय! आजकाल बलुतेदाराला दारात कुणी उभं करत न्हाय. साऱ्यांचा धंदा बसलेला. मंग न्हावी असो, शिंपी असो, साळी असो, की कैकाडी असो. हातावर पोट भरणारे सारेच खुरडत खुरडत सडून चाललेत पण लक्षात कोन घेतो?

सभा संपली. उन्हं भर दुपारी अंगाला घामाच्या धारा काढत होती. पोटात भुकेचा डोंब उसळलेला. तसाच 'चा-पाणी' उरकला. लोकांचा जेवणासाठी आग्रह चाललेला. पण उमरग्याची भटक्या-विमुक्तांची सभा वेळेत सापडावी म्हणून स्टँड गाठला.

उमरग्याला पोचलो तर स्टँडवरच लोक स्वागताला. लोकांचा उत्साह शिगेला पोहोचलेला असतो. मिरवणूक गावात आलेली असते. हजारो लोक मिरवणुकीनं गावात घोषणांचा दणका उडवत असतात. "स्वातंत्र्याचं झालं काय? आमच्या हाती आलं काय?" "भारतमाता आमची आई, मग तिचे आमी कुणीच न्हाई?" "भीक नको उपकार नको, मानुसकीचा हक्क हवा." घोषणा टिपेला गेलेल्या असतात. मिरवणुकीलाही आगळा वेगळा थाट असतो. कुणीतरी अतिउत्साही तरुण मुलं गुलाल उधळत असतात. साऱ्यांच्या कपाळाला गुलाल लागत असतो. आघाडीवर धोत्रे बाबा आढावांच्या बरोबर थाटात चाललेला. बाबांच्या घोषणा रंगात आलेल्या. तर मसण-जोग्यांचा नाच चाललेला. मरगम्माची कडकलक्ष्मी थयथयाट करत असते. गडबडीनं मिरवणुकीत सामील झालो. मिरवणुकीनं वळण घेतलं. म्होरं बँडचा बाजा आपल्याच लोकांचा. बँडाच्या तालावर नाचणाऱ्या मरगम्माच्या नाचानं लक्ष वेधलेलं. येरवी बेंडाच्या तालावर लई लोक नाचताना पाहिलेत. पण अंगात आल्यासारखं दात-ओठ खात, मनगटांचा चाबा घेत, केसाच्या जटा उपटत, आसुडांचे फटके मारून घेत असल्याचे हावभाव करत, एका पायात

घुंगरू बांधून पाच वर्षांच्या पोरापासून सत्तरीच्या म्हाताऱ्यापर्यन्त ८-१० जणांचा गट नाचत असतो. बाकीच्या मंडळींचा या मंडळींबरोबर नाचण्याचा प्रयत्न सपशेल फसतो. बारकी बारकी मरगम्माची पोरं मोठ्या माणसांच्या पायाला पाय मिळवीत नाचत असतात. मिरवणुकीत रेटारेटी चालू असतेच. प्रत्येकाला म्होरं घुसायचं असतं. मिरवणूक स्टँडवर आली. तसं शे-पाचशे लोकांचे वेगवेगळे मोर्चे पुन्हा मिरवणुकीत सामील झाले. परंपरागत वेषांत आलेले भोपे, बैरागी, कैकाडी, घिसाडी, लमान, बंजारा– आठरापगड जातीचे लोक शहराच्या कुतूहलाचा विषय. कुणी गोसावी शंख फुंकी तर कुणी बैरागी इबीत लावत फिरत होता. मधेच एखादा मोरपिसाची टोपी घातलेला वासुदेव 'दान पावलं' म्हणून एका पायावर नाचायचा. असं करमणूक करत, घोषणा देत, मिरवणूक एकदाची मेळाव्याच्या जागेला येऊन धडकली. आता भटक्या विमुक्तांचा मेळावा. सारे गोरगरीब भिकारी. पैसा कुठला, त्यांना व्यासपीठ नाही, थाटमाट नाही. नुसत्या माणसांची प्रचंड गर्दी. भानुदास धोत्रे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जमेल तेवढी व्यवस्था केली व्हती. माध्यमिक शाळेचा प्रचंड मोठा व्हरांडा. त्याच्यासमोर पटांगण. व्हरांड्यात टेबलखुर्च्या मांडलेल्या. तोवा गर्दी झाली. वक्त्यांची भाषणं चालू झाली. उमरगा, निलंगा, उस्मानाबाद, लातूर आणि विशेषत: महाराष्ट्र कर्नाटक सीमेचा पट्टा, आंध्र-महाराष्ट्र सीमेचा पट्टा. या पट्ट्यावर भटक्या विमुक्तांची प्रचंड संख्या. कार्यकर्ते भाषणात सांगतात: ५०-६० टक्के लोकसंख्या या भटक्या विमुक्तांची आहे. भानुदास धोत्रे वडार समाजातला धडाडीचा कार्यकर्ता. तो सांगतो, "आमाला राखीव जागा का नाई ? या भागात आमची लोकसंख्या रुपायातले आठ आणे, धा-आणे हाय. पण आतापर्यंत आमाला काहीच मिळालं नाई." बाळकृष्ण रेणके यांचं हे गाव. त्यानं रेणके खूप खुलला. ब्रह्म, पंचेंद्रिय, पूर्वजन्म, पूनर्जन्म, पाप, पुण्य यांचा पाढा वाचत वाचत साऱ्या धर्मव्यवस्थेच्या गुलामीचं स्वरूप खास त्याच्या ढंगात त्यानं सांगितलं. माझं अन् बाबांचंही भाषण झालं. रेणकेचं भाषण अन् आसाराम गुरुजींची गोष्ट लोकांना खूप भिडली.

भाषणं झाली. सभा संपली. तेवढ्यात पाच पंचवीस पारध्यांच्या बायांनी मला घेराव केला, " आमाला व्हायला घर दी. तू भाषण कशाला केलाव ? आमी तुला सोडणार नाई. तू पुढारी कशाला झाला ? समदे फसवत्यात. आमी का करावं ? घर नाय, दार नाय. हाताला काम नाय. पोलिसाचा लई सासुरवास हाय. बापे तुरुंगात. बायांनी कसं जगावं ?" पारध्यांच्या बाया धिटाईनं मला अडवून बसलेल्या. काय करावं ते मला कळत नाही. तेवढ्यात इगवे गुरुजी, भानुदास धोत्रे, आणि गावातले कार्यकर्ते येऊन माझी सुटका करतात. त्या बायकांना आमी समजावत असतो. पण त्या मला सरकारी माणूस समजून पिच्छा पुरवत असतात. पारध्यांच्या बायकांचा प्रेमाचा घेराव कार्यकर्ते सोडवतात. तेवढ्यात मोतीराजला पंधरा-वीस लमान-बंजारांनी

घेरलेला. त्यांना घेऊन मोतीराज माझ्याकडे येतो. लोक नेहमीसारखे चर्चा वगैरे करत नसावेत. लोकांची पांगापांग चालू झालेली असते. लक्ष्मण गायकवाड बाबांना मोटार सायकलवर घेऊन लातूरला निघालेला. आणि लमान-बंजारा भोवताली कोंडाळं करतात. मोतीराज सुन्न होऊन बघत असतो. एक तिशीतला लमान बंजारा सांगत असतो, " साहेब तांड्यावरली तीन लहानगी पोरं आन् एकं म्हातारा पोलिसांनी धरून लकापात घातलाय. आमी इचारायला गेलो तर आमाला धक्कं मारून हाकलून लावलं." " काय केलं पोरांनी ? " मोतीराज विचारतो. " सायब चोरी केली म्हणत्यात." " कशाची चोरी केली ? " मी म्हणालो. " अंड्याची. " साहेब म्हणाले. मधेच गुरुजी म्हणाले, " अंड्याची ? " " व्हय आंड्यांची, अन् अंडी ठिवायच्या ट्रेची. " आम्हा साऱ्यांनाच आश्चर्य वाटत असतं. त्यावर खुलासा करून तो तरुण सांगतो. " त्याजं काय झालं सायब, पाच सा दिस झालं. रस्त्यावर एक ॲक्सीडेंट झाला आंड्यांच्या ट्रकला. त्या दुपारा एक बाई मेली म्हणत्यात. पण आमा ठाव नाय. समद्या वाटंनं आंड्याच्या डिलाचा नुसता पूर आला व्हता. त्यातनं उमरग्याच्या बाजाराचा दिवस. बारा गावची माणसं बाजाराला येणार सायब. समद्या लोकांनी आंड्यांची धुळवड घातली. आक्क्या उमरग्यानं आंडी खाल्ली. समद्यास्नी ठावं हाय, पोलिसांनी दिकील अंडी घरी नेली. आपल्या तांड्यावरच्या पोरांनीबी आणली. साळंतली पोरं हायत. एक आठवीत हाय. एक नववीत हाय. एक बावीत हाय. आन् म्हातारं हाय, ते हाय ८० वर्सांचं. आता समद्या गावानं अंडी खाल्ली पर तांड्यावं घासलेट नव्हतं. म्हण पोरांनी अंडी बाजारात इकायला आणली. आंड्यांचा ट्रेबी आणला. पोलिस पाळतीवर होतंच. आता समद्या दुनियानं अंडी खाल्ली तर ते साव. अन् ह्या पोरांनी अंडी आणली हे चोर झालं. पोलिसांनी समद्यांनला मुद्देमालासह पकडलं. म्हणले, ट्रे घावला, अंडी घावली, म्हणताना अटक केली. लकापात टेवलंय समद्यास्नी. आमी गेलो तर कोण दाद दिना. आता तुमी चला. तर निभाव लागंल. नायतर म्हातारं लकापात मरून पडंल. "

बरोबरचे कार्यकर्ते घेऊन पोलिस स्टेशनला गेलो. ठाणे अंमलदार बसला होता. इन्स्पेक्टर नुकताच बाहेर गेला होता. कुठे गेलाय माहीत नव्हतं. समोरच लॉकप मध्ये १५–२० वर्षांची तीन पोरं एकमेकाला खेटून झोपली होती. म्हातारा लॉकपच्या बाहेर खुडा घालून, धोतर पोटाशी घेऊन निजला व्हता. आमची आख्खी टीमच तेथे गेली होती. मोतीराम राठोड, आसाराम जाधव गुरुजी, मी, भानुदास धोत्रे, लक्ष्मण गायकवाड, असे सगळेच कार्यकर्ते कितीतरी चिडलेले असतात. सगळ्यांनीच प्रश्नांचा भडिमार केला. अचानक आलेल्या या बावटळीने पोलिसांचा गोंधळ उडाला होता. त्यातलाच एक जण इन्स्पेक्टरला हुडकायला गेला होता. साधा एफ. आय. आर. ही तयार केला नव्हता. आसाराम गुरुजी चिडले होते. तर ठाणे अंमलदाराचं म्हणणं असं

की. "अपघात झाला. त्याचा रीतसर पंचनामा झाला. ड्रायव्हर आधीच पळून गेला होता. गाडी आडरानात होती. पोलिस राखणीला ठेवले होते. परंतु पाऊस आला म्हणून राखण ठेवलेला पोलिस कुठतरी आडोशाला गेला. तेवढ्यात अंडी, ताडपत्री, स्टिपनी, ट्रकची हत्यारं चोरीला गेली. म्हणून तलाश सुरू झाला तर बाजारात ही माणसं मुद्देमालासह सापडली." "काय मुद्देमाल सापडला?" मी विचारले. "अंडी अन् ट्रे. अजून ताडपत्रीचा तलाश लागत न्हाई म्हणून यांच्याकडं तलाश लावतोय." कुणीतरी पोलिसाची टपली उडवावी म्हणून "अंड्याची फोलपटं नाय का घावली?" असं विचारलं. ठाणे अंमलदार अधिकाऱ्याच्या गुर्मीत चिरकला. तेवढ्यात बाहेरून दोन पोलिसांच्या कपडयातले पोलिस अन् एक साध्या कपडयातला माणूस झोकांडया खात तेथे आले. तेवढ्यात पी. एस. आय. ला हुडकायला गेलेलाही तेथे येऊन धडकला. "सायब कुठायत म्हाईत न्हाय." रात्रीचे आठ वाजलेले असावेत. भानुदास धोत्रे म्हणाला, "सायब पी. एस. आय. सर्किटमध्ये आडवा झाला असेल, बाई अन् बाटली घेऊन. मी खात्रीनं सांगतो. आता तो शुद्धीवर नसंल म्हणून हे त्याला बोलवत नाहीत." सारं पोलिस स्टेशन म्हणजे तमाशा असतो. पाच-धा पोलिस तरी प्यालेल्या अवस्थेत झिंगत असतात. कार्यकर्ते संतापलेले. वाचाबाची सुरू होते. पी. एस. आय. पोरांना सरळ करून नुकताच गेलेला असतो. या अचानक संकटानं पोलिसांची धावाधाव चालू असते. तेवढ्यात एक धुवाट कपडयातला माणूस स्टेशनात येतो. तो ठाणे अंमलदाराच्या कानात कायतरी सांगतो. अन् जादूची कांडी फिरल्यागत ठाणे अंमलदार सुतासारखा सरळ वागायला लागतो. तो म्हणतो, "सायब, केवळ संशयावरनं यांना ताब्यात घेतलंय. उद्या सकाळ सोडेन. यांचं रेकॉर्ड हुनार न्हाय. सकाळी सोडतो." तर एक लास असलेला पोलिस मध्येच सांगतो, "सायब, हे लमानी चोराच्या पोटची औलाद. ह्यांनीच सारी अंडी खाल्ल्यात. हे लोक चोऱ्या करत्यात रोज. या भडव्यानला हाकलून लावा. कसे कबूल होत नाय बगतो." बाकीचे पोलिस त्याला गप करतात. नि पोलिस स्टेशनमधे आतल्या बाजूला घेऊन जातात. संबंधित पोलिसाची मेडिकल करावी अशी आम्ही मागणी करतो. मग मात्र ठाणे अंमलदार गयावया करतो, "सायब, हवं तर तुमची माणसं आता घेऊन जावा पर असं काय करू नका. त्याची पोरं उघड्यावर पडत्याल." तर लॉकपमधली पोरं सांगत्यात, 'सायब, सारी माणसं अंडी नेत व्हती. आन् आमी बी आणली. आन् ह्यो पोलिसच अंडी वाटत व्हता. तवा म्हणला नासून चाललीत, नासून जाण्यापक्षी तुमी घेऊन जावा. आख्ख्या गावानं अंडी आणली. ह्याच्या घरात राकेल नव्हतं. म्हाताऱ्याच्या घरात बी नव्हतं. म्हणताना आमी इकायला आलो.' तो मगाचा पोलिस आतनं म्हणत व्हता, "ए भाड्याओ, तुमचा मुद्देमालचं काढतो." "गावाला का अटक केली नाय रं? त्याचा संशय आला नाय?" "सायब, ही लमानी.

तुमासनी ठावं नाय. ह्यांच्या विगार ताडपत्री गेलीच नाय. या भडवीच्यांनी इकूनबी टाकली आसंल. तुमी जावा. तुमाला ह्यांचं कळायचं नाय. ही जातच चोरटी हाय. आमी बराबर करतो." ठाणे अंमलदार गया वया करत असतो. कार्यकर्त्यांचा संताप लक्षात घेऊन आमी पी. एस. आय. ला गाठायचा असं ठरवून सर्किट हाऊस गाठतो.

सर्किट हाऊसवर पोलिसांचा पहारा असतो. पाच पन्नास माणसांचा जमाव येतोय म्हणून ते सज्ज. आमी पोलिस इन्स्पेक्टरची चौकशी करतो. 'सायब इथं आले नायत.' यापुढे पोलिस सरंना. तोपर्यंत भानुदास धोत्रे सांगतो, "सायब, कुन्हाडीचा दांडा गोतास काळ म्हणत्यात तो असा. ह्यो पी. एस. आय. बंजारी हाय, बंजारी. एक नंबराचा पेदाड. आन् पोरं हाणतोय लमाणी. ही पोलिसांची जातच अशी उलटी असते. मंत्र्यांचा आशीर्वाद अन् पै-पावण्यांचं राजकारण म्हणून हे ब्याद इथं आणून बसवलंय. भ्रष्ट तर आसं हाय, का सारं गाव बैतागलंय. चला, त्यो आता घावणार नाय. उद्या सकाळी त्याला आपन गाठू." आता वाढवायला नको, म्हण आमी परतलो. दुसऱ्या दिवशी सकाळी पी. एस. आय. कडे गेलो. तर पहाटेच सारी सूत्रं हाललेली. एफ. आय. आर. न होताच, गुन्ह्याची कसलीही नोंद न करता म्हातारा व पोरं यांना जेलमधून हाकलून लावलेलं असतं. पी. एस. आय. ला भेटलो तेव्हा त्याच्या डोळ्याची तार तुटत नव्हती. पोलिस स्टेशनमध्ये बसलेला हा पी. एस. आय. रातची उतरली नसल्यानं अजूनही झिंगत व्हता. मी आवाज चढवून बोललो, तर आसाराम गुरुजी धावून अंगावर गेले. तवा पी. एस. आय. त्यांच्या पाया पडला. सारं मिटवून घ्या म्हणून गयावया करायला लागला. आमी उमरग्याच्या पोलिस स्टेशनची चौकशी करा म्हणून संबंधिताना अर्ज धाडून निलंग्याला पळालो.

निलंगा हे शिवाजीराव पाटील निलंगेकरांचं गाव. निलंगेकर तिथले सम्राट. पोहोचल्यापासूनच त्याची लक्षणं दिसत होती. लोक टरकून बोलत होते. श्रमिक प्रतिष्ठानच्या तिथल्या मित्रांनी भटक्या विमुक्तांचा मेळावा घेतलेला. सविता सुडे, हरिश्चंद्र सुडे आणि इतर मित्र यांच्या मनात धुगधुगीः 'लोक येतील का नाही, लोक येतील की नाही! आणि आले तर बोलतील की नाही!' पण मुंग्या वारुळातून बाहेर याव्या तसं झालं. शाळेपुढचं पटांगण हळूहळू गच्च भरलं. एक एक तांडा विसावत होता. बाया पोरांची गर्दी वाढत होती. बाबा आढाव म्हणजे मराठी माणसांच्या मनातला सल, नेमकं कुठ दुखतंय त्याच्यावर बोट ठेवणारा डॉक्टर. माणसं बोलती करावीत ती बाबांनीच. बाबा बोलू लागले. आणि माणसंही बोलू लागली. बाबू दरवेशी अस्वलाकडं बोट दाखवून म्हणाला, "सायब, त्याला दया हाय. ते आमचं पोट भरतंय. दुकायला लागलं, खुपायला लागलं का रडतंय. काठी उचलली का नाचतंय. गप बस म्हणलं, गप बसतंय. सायब! माणसापरास हे जानवर बरं. ते

इमानदार रहातंय. त्याला दया-मया आसती. पर तुज्या सरकारला दया–मया नाय. आमी कोण, कुठले, कुणाचे, तुज्या सरकारला माहीत नाय. तुज्या सरकारला सांग, माझ्या अस्वलावरनं तुजं सरकार निसूक हाय. त्येला दया नाय, माया नाय. ते उलट्या पायाचं हाय." बाबू बोलत होता, सभा डोलत होती. सभेच्या पोटातलं बाबूच्या ओठावर होतं. व्यासपीठावरचे काँग्रेसचे पुढारीबी टाळ्या पिटत होते. बाबूचं म्हणणं पटत होतं. एक मध्यम वयातली बाई, पदर सावरीत व्यासपीठावर आली. सरुबाई तिचं नाव. सरुबाई बाबाला एवढंच म्हणाली, "बाबा, तुमी आले, लक्ष्मण-भाऊ आले, जीव मोठा झाला. पर बायामाणसांचं काम न्हातं! समदं मोकळं करून उलगडून मांडावं. पर तुमच्यावाणी सुचत न्हाय. आमी येडी बागडी माणसं. तुमच्या सरकारला सांगा, उलीकसं हाताला काम दे. झालं तर डोस्क्यावर निवारा दे! खाली धरती, आन् वर आकाश. कसं जगावं? धरतीचं हांतरून आन् आभाळाचं पांघरून. सरकारला सांग उलीसा मायेचा पदूर या गोरगरीब बिनभिकाऱ्यांवर घालायला." समोरच्या जमावात लमान बंजारा समाजाचा भरणा होता. मोतीराज राठोड बोलायला उभा राहिला आणि व्यासपीठावरली मंडळी ऐकण्याच्या तयारीनं पुढं सरली. मोतीराज मराठीतनं बोलाय लागला अन् समोरची आजी उभी न्हायली. आन् लमाणी भाषेतून मोतीराजशी भांड्ड लागली. मोतीराज बोलू लागला त्याच्या भाषेतून. सभा रंगत गेली. लोक-भाषेतून लोकांपर्यंत किती प्रभावीपणे भिडता येतं, हे मी अनुभवत होतो. समोरची बायामाणसं हुंकारत होती. जसं आमची जात-पंचायतच चालू होती. मोतीराजचं लमाणी, आसाराम गुरुजींचं कैकाडी, भानुदास धोत्रेचं वडारी बाखाणण्यासारखं होतं. आपापल्या भाषेतून बोलायला लागलं की लोक खुलतात हे मला माहीत हाय.

भाषणं संपली. फुले, आंबेडकरांच्या जयघोषात समारंभ संपला. सुडे सांगत होता, "आपन पक्षीय राजकारण करत नसलो तरी स्थानिक मंडळींचा खूप त्रास झाला. चार दिवसांनीच इथल्या सत्ताधाऱ्यांनी भटक्यांचा मेळावा घेतलाय. तुमाला ते विरोधी समजतात." मी हसतो आणि सुडयांना एवढंच म्हणतो, "आम्ही कुठल्याही पक्षाचे सभासद नाही. कुठल्याही राजकीय पक्षावर आमचा विश्वास नाही. म्हणून भटक्या-विमुक्तांच्या चळवळीचं काम पक्षाच्या पलीकडं जावून रेटलं पाहिजे. त्यामुळं दुसऱ्या कोणत्या पक्षांनी भटक्या-विमुक्तांना संघटित करण्याचे प्रयत्न केले तरी चालतील. चांगली गोष्ट एवढीच आहे की माणसं आता बोलायला लागलीत."

•

जो देगा तन, वही देगा कफन ?

मुरचंदचं घर सोडलं तेव्हा दुपारचे बारा वाजून गेले असतील. सूर्य मध्यान्हीला आला होता. उन्हानं आंगावर घामाच्या धारा वाहत असतात. कपाळावरचा घाम पुशीत मुरचंद, रेणके आणि मी बसच्या रांगेत बसची वाट पाहत उभे असतो. तशी थोडी चिडचिड वाढलेली असते. एक बस तशीच गेली. लांबकळून जाणे नको. बसायला जागा नाही तरी निदान, उभे तरी राहता यावे, गर्दी कमी होऊ द्यावी म्हणून थांबलो होतो.

एका बाजूनं थोडीशी सावली आली होती. सावलीत उभा होतो. तो समोरच्या फूटपाथवर पोत्याच्या रकट्यात एक बिराड थाटल्यालं दिसतं. रस्त्याच्या कडेचा लाइटचा खांब आणि त्याला जोडून एक खांब रचलेला. त्या दोन्ही खांबांवर समद्या पोत्याच्या रकट्याचा भार. त्या दोनी खांबालाच दोन पदरी दोर बांधून त्याला

चादरीची खोळ घालून त्यात पॉर निजावलेलं आसतं. कोपऱ्यात कळकाच्या बारीक-सारीक काड्या पडलेल्या असतात. त्या काड्यांजवळ कुंभाराच्या पणत्यावाणी मातीची ठावरं एकावर एक रचून ठेवल्याली दिसत्यात. भर उन्हात पोटावर सावली धरून पोतं हालत आसतं. एका हातानं झोका हानत बाई मागंम्होरं हालत होती. म्हण कुतूहल वाढलं. शेजारची बाई, रांग म्होरं सरली तरी मी म्होरं सरंना म्हण वैतागून बगत व्हती. निळ्या-तांबड्या व्हटावर पाणी चमकत व्हतं. मी गपचीप रांगेतनं बाजूला झालो. तसं बाई फनकऱ्यानं म्होरं शिरली. मी मुरचंदला बोटानंच खुनावलं आन् म्होरच्या फूटपाथवर दाखल झालो. बिनभिकार दिसलं की, जावून वळक-पाळक काढत बसायचं, म्हन बिराडाम्होरं गेलो. मगाचा शीन आता जरा जवळनं दिसायला लागला.

भर उन्हात बाईनं तीन दगडांची चूल पेटवल्याली. चुलीत चाराचुरा घातल्याला. धुरकाटल्यालं लाकूड धुपत व्हतं. बाई उभी न्हाल्यावाणी वलीचिक झाल्याली आसती. एका हातानं पोराची झोळी हालवत आसती. झोळीत पोरगं निजल्यालं आसतं. हाता-पायाच्या नुसत्या कळकाच्या कांब्या झाल्याल्या व्हत्या तर पोटाचा नगारा आन् डोस्क्याचा मोठाच मोठा ढोल. पोर झ्यॉक झोपल्यालं आन् बाई जरमलच्या थाटलीत भाकरीचं पीठ मळत आसती. जवळच पाच-सहा वर्षांची पोरगी कळकाच्या कांब्या एकासवत तोडत आसती. बाईच्या आंगावर तिच्या परपंच्याची कळा उतारल्याली दिसतीच. दंडात भरल्यालं इरल्यालं लुगडं कसंबसं आंग झाकीत आसतं. डोस्क्याला किती वर्षांत पाणी नसंल ते तिलाच ठावं. डोळ्याच्या ईत ईत खाचा रूबॉल गेल्याल्या अन् गालफाडं ईत ईत वर आल्याली. नाकातनं पाण्याची धार लागल्याली. मधीच नाक शिकरायची आन् भाकरी उलतायची. जाळ म्होरं सारायची. एका हातानं पोराला हालवायची.

तिच्या नादात ती येवढी गुंगल्याली आसती की आमी जवळ येऊन उभं राहिलोय हे ध्येनात यायला बराच वेळ जावा लागला. तिच्या ध्येनात येस्तवर आमी नुसतं न्ह्याळात व्हतो. तिच्या ध्यानात आल्याबरूबर तिनं 'काय बला आली' म्हण त्वांड आंबाटचिंच करत आंगावरलं लुगडं सावारलं आन् आमच्याकडं बगाय लागली.

'बाई, नाव काय तुझं ?' सुरुवात केली. आमी कोण हाय ते सांगितलं. पण बाईचं त्वांड बंदच. बाईला कोणापैकी म्हण इचारलं तवा 'आमी मुसलमान है' येवढंच उत्तर. भटक्या जमातीत, गुन्हेगार जमातीत अशा अनेक जमाती मुस्लिम आहेत. म्हणून 'तुमी कोणचे मुसलमान ?' म्हण इचारलं तर तिचं पुना तुसडं उत्तर, "आमी मुसलमान हाय, मंजी मुसलमान" बाई उन्हानं वैतागलेली असावी. आमी नाईलाजानं म्होरं सटकणार येवढ्यात लुंगी नेसलेला, दाढीवाला, काळेल्या रंगाचा, राकट आंगाचा कळाकलेला एक बाप्या आमच्याम्होरं आसा आक्रमक होऊन उभा राहिला की जसं

एका ठोश्यात आमी गारं व्होवू. आमी त्याला नमस्कार केला. त्यानं 'काय पायजी' म्हण इचारलं. त्याला समदं सांगितलं.

तसं त्यो जरा चमाकला. "आव भाव, आव. हमी सोलापूरवालेच हाय" म्हणत लांब फुटपाथवर आसलेल्या झाडाखाली बसू म्हणत त्यानं आमाला तिकडं नेहलं. खांद्यावरची गोदडी हाथारली. आन् आमच्या गप्पा सुरू झाल्या. महंमद शेख त्याचं नाव. त्याचा आजा सोलापूरच्या सेटलमेंटमध्ये आसतो. महंमद छप्परबंद समाजातला. सेठलमेंट उठलं तवापास्नं सोलापूर सोडलं. आता गावोगाव फिरतो. डोस्क्यावर बिराड आसतं. परपंच्याचं येवढं भरायचं की, सांचं भागल्यावर सकाळची काळजी नाय, का उद्या काय याचा घोर न्हाय. बायका अन् पोरगी, बारक्या पोरांच्या भिंगऱ्या करत आसत्यात. कुंभाराकडनं ठावरं आनायची, त्याला कळकाची कांबी आन् जाड कागद चिकटवायचा. काम बायकू करती. ह्यो रंगरंगुटी करतो आन् हे भिरभिरं इकतो. कवा कवा धंदा झाला नाही तर भीक मागतो.

भिकेवरनं विषय खोलात न्हेत मी इचारलं, "महंमदभाय, आप तो इतने गरीब है फिर झोपडपट्टीमें क्यो नही रहते?" "आरे भाई क्या करना मकानवकान! जिसने दिया है तन, वही देगा कफन! कल किसने देखा है क्या?"

"महंमदभाई परमेश्वरावर तुमचा फारच भरोसा दिसतो. पण एका मानसानं बंगल्यात रहावं आन् दुसऱ्याला पाय टेकायला जागा नसावी हा कसला खुदाचा न्याय?"

महंमदभाई सांगतो,

"क्या लाया सिकंदर, क्या ले जायेंगा? थे दोनो हाथ खाली. बाहर कफनसे निकले. निकले तो या महंमद, बाहर कफनसे निकले." महंमदभाई बोलत असतो. त्याच्या बापाला सेटलमेंटमध्ये ठेवलेलं आसतं. आजा सोलापूरच्या सेटलमेंटमध्ये आसतो. गुन्हेगारीच्या कलंकाबद्दल त्याला खूप संताप येतो.

"आता आम्ही चोऱ्या करीत न्हाय. आन् म्हणून नुसतं मुसलमान सांगतो. 'छपरबंद' सांगत नाही. कष्ट करतो, पोटं भरत नाही. सातआठ पोरं सांभाळायची." मला थोडा धक्का बसतो. मगाशी दोनच पोरं दिसत होती. मी पोरांची चौकशी करतो तर, महंमदभाई सांगतो—

"अरे भाई बडे तीनो लडके तो अब कमाते हैं. कोई सुतारके हाथ के नीचे, तो कोई गवंडी के हाथ के नीचे, तो कोई कागज गोला करते हैं. तो दो लडकिया कागज गोला करती है, कभीकभी प्लॉस्टीक की चीजें या डबाबाटली या कुछबी कामधंदा करती हैं. मैं खैरियत माँगते फिरता हूँ."

"आप लेकीन फकिर तो है नहीं. फिर भीक क्यों माँगते हो?"

महंमदभाई उसळला, "अरे हम थोडेही भिकारी है? हम अपने लिये भीक

माँगते नही ! वो तो अल्लाहके लिये माँगते है, अल्लाह उसे दुआँ दे इसलिये जिसके पास है वो खुदाके लिये खैरात करता है ! हम भी अल्लाह के नामपर माँगते हैं ! "

आपलं लहानपण आठवलं. दाताच्या कण्या करत, " सोनाबाय, रकमाबाय, सोन्याची आय, वाढ. राधेची आय, वाढ. वाढ गो माय वाढ " म्हणत उभं रहावं. शिळं-पाकं मिळालं की, म्होरच्या घरी जावं. न्हायतर ढसाढसा पाणी ढोसावं. मिळंल ते घ्यावं. केवढी लाचारी ! शिवी दिली, आंगावर धावून आला, एकादी कानफाटीत बसली तरी तसेच " वाढ गो माय. " न्हायतर " पाटील, तुझं कल्याण व्हईल" म्हणत रहायचं. तर महंमदभाई भिकारीच, पण त्यो हिंदूंच्या देवळाम्होरं भीक मागणार नाही. कुणालाही भीक मागील पण लाचारीनं नाही. " दे दे अल्लाहके नामपे दे दे, " नाही तर " खुदाके लिये खैरात करो भाई, खैरात करो. " म्हणेल.

महंमदभाई सांगतो, हातीमभाई नामाचा एक इसम दान देणारा होऊन गेला. भीक मागताना तो म्हणतो—

" हातीमको पुछीये,
ओ सखवान कहाँ गयी,
रुस्तुमसे पूछिये,
वो सजावत कहाँ गयी,
वो ताज कहाँ गयी,
वो हुकुमत किधर गयी,
वलहा गीरते गीरते,
खुदा उसको थाम ले,
देगा उसका भी भला,
न देगा उसका भी भला,
जिसने दिया है तन,
वही देगा कफन. "

विश्वगरीब असलेला महंमदभाई फाटलेल्या कोटाला आस सावरत असतो, की जसं राजा-महाराजाचा कोट असावा. दाढी अशी कुरवाळत असतो, जसं तो ताज तख्तावर बसलेला असावा. बोलण्याची ऐट अशी असते, की जसा राजा-महाराजा बसला आहे. मनातून मी अस्वस्थ झालेला असतो. मगापासून फूटपाथवरच्या पोऱ्यानं तीन वेळा चहा दिलेला असतो. महंमदभाईला अजून एक चहा हवा असतो. वरनं उन्हाचा जाळ चालू असतो. घामाच्या धारांनी आंग आंबून गेलेलं असतं. आन् वर चहा. पण साराच विरोधाभास असतो. चहा नको म्हणावं, तरी अवघड असतं. महंमदभाईचं चऱ्हाट चालूच असतं. असं वाटतं, शहरात येऊन ही माणसं उजाड झालीत, संवेदनाहीन झालीत. सत्याचा दावा करणारी माणसं भ्रमात जगतायेत.

महंमदभाईचा निरोप घेतला तेव्हा पाच रुपये चहाचे मोजावे लागतात. " फिर आ जाना भाई, खुदा आपका भला करे ! "

डोक्यात झिंग तशीच असते. सात-आठ पोरांचा बाप असलेला महंमदभाई छातीच्या फासळ्या दम्याच्या रोगाबरोबर मोजत असतो. मशिदीत जातो आणि नमाजीला सगळे एकत्र बसतात. तेथे कुणी गरीब नसतो. श्रीमंत नसतो. सारे प्रार्थनेला एकत्र येतात. तेव्हा सारे एकमेकांचे असतात. रोटी-व्यवहार मोकळा आहे. पण बेटीबंदी चालू आहे. शिकलगार, नालबंद, छपरबंद सारे भटके, पण बेटीव्यवहार नाही. महंमदभाई सांगतो.

" एक सफहमे खडे हो गये,
महंमद और अयाम
न कोई बंदा रहा,
न कोई बंदे नवाज ! "

आपल्या वाळवंटातल्या समतेसारखी समता. वाळवंटात एक आन् कंठाळीला मेक. वाळवंट सोडलं की बेकी, वाळवंटात तेवढी एकी. मग राजा असो की रंक, तसंच यांचं-ही. मशिदीत एकी, बाहेर गेले की बेकी.

महंमदभाईचा निरोप घेऊन लोकलच्या गर्दीत मिसळून गेलो. डोक्यात असेच विचार घोळत असतात. धक्के बसत असतात. मानसं खाली उतरतात, वर चढतात. मध्येच मुरचंद काही बोलत असतो. मी उत्तरे देतो. पण डोक्यातला महंमदभाई काही बाजूला जात नाही.

शिवाजीनगर स्टेशनवर दोघे खाली उतरतो. आणि स्टेशनातून बाहेर पडणार येवढ्यात स्टेशनाच्या बाहेर काही बाचकी घेऊन बिराडं उतरलेली असतात. खरं म्हणजे दोघेही दमलेलो असतो. शांतपणे हॉटेलात जाबून चहापाणी काही घ्यावं असा विचार चालू असतो. तोच हे दृश्य. पाय आपोआपच तिकडे वळतात.

पंचवीस-तीस बाचकी इस्कटून पडल्याली असत्यात. बापेमानूस कुणीच दिसत न्हाय. आमी थोडं घुटमळतो. बाचक्यांच्या म्होरं किडूकमिडूक सामान आसतं, तर जवळच बाज्यात बाजवायचे ढोलकं हारीनं रचून ठेवलेले असतात. लय ढंगाचे, येगयेगळ्या आकाराचे, बारीक-मोठं, लांब-आकूड, साई लाबल्यालं-साई नसल्यालं. तमाशातल्या ढोलक्या येगळ्या, कवालीचा ढोलक येगळा तर बारक्या-बारक्या ढोलक्या येगयेगळ्या ठेवलेल्या. एका बाईला बाटलं येवढं न्याहाळून बगत्यात तवा ढोलकीचं गिराइकच आसंल म्हण ती जवळ आली. अंगावरली ओढणी सरळ करीत लेहंगा सावरीत म्होरं येत तिनं विचारलं "क्या माँगता है ? " मी ढोलक्याचा सौदा करण्याच्या थाटात तिला ढोलकीची किंमत इचारतो. तसं चार पाच आकारांतली ढोलकी दाखवीत ती सांगाय लागली. " इसका पचास, इसका सौ, इसका देड सौ. " मी मान

हालवीत असतो. नको म्हणत असतो. पण .माल खालीवर करून बघत असतो. खरं-तर एक ढोलकं मला हवंच असतं. मी ढोलकीच्या भावाची घासाघीस चालू ठेवून बाकीचं विचारतो. "कोण लोक तुम्ही ?" "आमी मुसलमान है" "कहाँसे आये ?" "मालूम नहीं." तिनं मान खाली घातल्याली. मी मध्येच दुसरं ढोलकं पहातो. तेवढ्यात बाकीच्या दोघी आल्या. आन् बोलू लागल्या. स्टेशनात गाडी येऊन गेल्यानं गर्दी वाढली. आमी उभ्यानंच बोलत असतो. मुरचंद ढोलकं वाजवून पहातो. त्यालाही ते आवडतं. आमी सौद्याला उभे होतो. मी पुन्हा मूळ पदावर येतो. "तुम्ही आले कुठून आता ?" एकीला दोघी होत्या. थोड्या जोरात "तुमकू क्या करने का है ?" मी विश्वास देत परिचय करून देतो. त्या थोड्या सावरतात आन् सांगतात, "उत्तर परदेशसे आये. वैसे आमी नाही आले. आमचे दादा परदादा कुणी तरी आले. आता आमी असेच फिरतो."

"ढोलक्यात बरकत किती असती ?"

"क्या साब सांगू ? कवा कवा तीस चाळीस मिलते. कवा शंभर मिलते तर कवा आनाबी मिलत न्हाय. मग याजानं पैसा काढून खायाचा. याज फेडायचा. कर्ज काढायचा आन पोट भरायचं. चना खाल्ला. हाथ कोरडाच रहता है"

"बालबच्चेकी पढाईका क्या करती हो ?"

"क्या करे भाई, हमारे लिये कौनसी पढाई होगी ? कुछ सिकतेबी है. लेकिन हमारे गावमें सिकते हैं ! हम अरबी पढाते हैं, उर्दू पढाते हैं."

"पण गावाकडं केव्हा जाता ?"

"अरे साब क्या बताऊ, हम तो कभी जाते नही."

"तुम्ही कौनसे मुसलमान ?"

"हमी ढोलकीया मुसलमान."

"कितनी पिढीसे इधर आये ?"

"मालूम नही. अब तो यहीं मरेंगे !"

"लेकिन एक जगह झोपडीमें रहते क्यों नही ?"

बाई उसळली. का कुणास ठावं पण तिला या प्रश्नाचा येवढा राग आला की, ती फणकारली. "हमी थोडेही गरीब हैं ! हम झोपडीपट्टीमें क्यो रहेंगे ? हमारे बापदादा तो रईस थे रईस ! खेतीवाडी थी, जमीनजुमला था, बाग-बगीचे थे, अजी थुंकते थे तो ऐसा थुंकते थे सारा जहाँ मुलकीन हो ! बडे लोग थे हम ! महलोंमें रहथे थे ! सलतनत थी उनकी ! हम थोडेही गरीब हैं ? हम तो बडे खानदानके लोग हैं !"

मी ऐकत असतो. ती बोलत असते. तिच्या बोलण्यातून तिचा गतकालीन इतिहास वहात असतो. खानदानाचा नशा वाहत असतो. आंगावरची कळा खरंच आवकळा झालेली असते. साराच विरोधाभास, सारंच विपरीत !

"मग रस्त्याच्या कडेला का राहता?"

"हमारी छोडो! खुदाने सारा जहाँ अपनेही लिये बनाया है! क्या सडक क्या महेल? महेलमें रहे तो खुदाकी और सडकपर रहे तो भी खुदाकी देन है। वो चाहे आज सडकपे उतारे, कल महेलभी मिलेगा! सारी उपरवालेकी मर्जी है। वही साँस देता है तो आँस भी वोही देता है।"

बाईची ढोलकी मोठी चांगली होती. मुरचंदने एकीचा सौदा जमवला होता. तेवढ्यात दहा-बारा बाप्ये येऊन टपकले आणि सौदा उरकला. तसं समद्यांनी बाचकी डोक्यावर घेतली. मगाशी बोलणारी बाई नवऱ्याकडं पैसे देत त्याला कायबाय म्हणाली. आमी बाजूला उभे होतो.

तिच्या नवऱ्यानं डोक्यावर बाचकं घेतलं. एक पोरगं खांद्यावर, दुसरं पोरगं दुसऱ्या खांद्यावर, तिसरं पोरगं हाताला, एका काखेत दोन ढोलक्या, दुसऱ्या खांद्याला दोन ढोलक्या, दुसऱ्या हातात बादली, आन् चालू लागला. बाईनं डोस्क्यावर बारीक बाचकं घेतलं. एका हाताला एक पोरगं, दुसऱ्या हातात बादली. त्यात सटारफटार कोंबल्यालं. आंगावर मळकी, इटल्याली कापडं. पोरांची कळाबी तशीच. तांडा चालू लागला. आमी बगलंनं चालत होतो. तिच्या नवऱ्याशी बोलत होतो. तलाक, नमाज, स्त्रियांचे प्रश्न...सारं जगाचं दुःख गाठोड्यात बांधून आणि डोक्यावर घेऊन ते निघाले होते.

●

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
३०६६
दा. क्र. २७७०२
दिनांक २८/११/९५
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

उद्याच्या सूर्यासाठी–आजचे व्याकूळ सूर

बापुरे हॅ हिय्याँऽऽऽ
मारो राजवाडी बापुरे हिय्याँऽऽऽ
आंग देखू छु तो टालो टालो लाग छु
लार देख छूऽऽऽ
तो भरो भरो लागछु मारो बापूरे हिय्याऽऽऽ
लाडली बेटीती टाळमत
खावजो.
बापूरे. हिय्याँऽऽऽ

हे अर्थ न समजलेलं परंतु मनाचा ठाव, नुसत्या स्वरांनी घेणारं लमाण तांड्यावरचं गीत कानामध्ये वस्तीला उतरलंय. प्रा. मोतीराज राठोड हे लमाण बंजारा जमातीतले

मोठे मनमिळावू कार्यकर्ते. त्यांनी सांगितलेल्या पण मला थोड्या न पटणाऱ्या या स्वरांनी मी तात्पुरता तरी बेचैन झालो होतो हे खरं. मोतीराज सांगत असतो, या गाण्यानं न रडणारा माणूसच नसेल. गाणं ऐकायच्या अगोदर मला ते पटत नसतं. पण तांड्याच्या संस्कृतीचा मी पाहिलेला, अनुभवलेला क्षण अन् क्षण आजही ताजातवाना होऊन पुढे येतोय. मोतीराजने अनेकदा आग्रह करूनही मी तांड्यावर जाऊ शकलो नव्हतो. पण औरंगाबादला चळवळीतल्या धडपडीनिमित्त गेलो तर मोतीराज, प्रा. अविनाश डोळस या आमच्या मित्राच्या घरी माझी वाट पहात बसलेला.

मोतीराज तांड्याच्या गोष्टी सांगत असतो. लमाण बंजारा समाज, त्यांची संस्कृती, त्यांचे रीतिरिवाज, त्यांची गोरबोली भाषा–त्यांच्या भाषेला गोरबोली म्हणतात–त्यांची लग्नपद्धती. इ. अनेक प्रसंग सांगत असतो.

औरंगाबादपासून १०–१२ मैलांवर सातारा तांडा आहे. मोतीराज आणि मी तांड्यावर पोहोचलो तेव्हा सायंकाळचे पाच वाजलेले असावेत. डोंगरउतरणीला गुरं चरत असतात. दोन्ही बाजूनं डोंगर आणि डोंगराच्या पायथ्याला तांडा वसलेला असतो. जनावरं जोगावलीली असतात. वासरं आयानला डुश्या मारत असतात. तर गुराखी पोरं खेळत असतात. एखादी म्हातारी तांड्यावर असते. मुलंलेकरं हुंदडत असतात. बाकी तांडयावर कोणी नसतं. मी तांडा पहिल्यांदाच पाहात असतो. मला मोठं कुतूहल असतं. नाहीतरी शनिमा-संस्कृतीनं आदिवासी आणि बंजारा लोकांच्या स्वैर संस्कृतीचं जे विकृत चित्रण केलेलं असतं त्यानं मी ही एखादी नटी दिसते का, ते पहात असतो.

" बस्ती–बस्ती परबत परबत
गाता जाये बंजारा
लेकर दिलका इक तारा "

किंवा—

" एक बंजारा गाये.
जीवन का गीत सुनाये
हम सब जीने वालो कों
जीने की राह दिखाये
एक बंजारा गाये. "

असा जीवनाला मार्ग दाखवणारा मनोजकुमार दिसतो का ? शर्मिला टागोर दिसते का ? एखादा हजारो घागरींच्यातला नाच दिसतो का ? किंवा मध्ये एखादा दिलीप कुमार, जीतेन्द्र भांगडा करताना दिसतो का ? असं मी पहात असतो. आणि वास्तवाचं जे भयंकर स्वरूप असतं त्यानं तो शनिमातला भंपक बंजारा कुठल्या कुठं पळून गेलेला असतो.

तर मोतीराज सांगत असतो, " हा सातारा तांडा. हे नाईकाचं घर. नाईकाचं घर तांड्याच्या मधोमध मध्ये, पुढच्या बाजूला. बाकी साऱ्यांची घरं पाठीमागं. तेथेही मानाप्रमाणंच वांटणी असते. नाईक हा तांड्याचा छोटा राजाच. ' नाईक बोले तांडा चाले, ' अशी म्हणच पडलेली. नाईकानं केलेले सारे नियम तांड्यावर बंधनकारक असतात. नाईक–परंपरा वंशपरंपरागत चालत असते. नाईकाचा पोरगा पुढे नाइकी घेत असतो. नाईक सामाजिकरीत्या तांड्याला संरक्षण देत असतो, तर तांडा त्याला मानमरातब, मर्यादा, इज्जत देत असतो. "

दुसरं त्याच्या शेजारचं घर असतं कारभाऱ्याचं. नाईकानंतर याचा मान मोठा. तो तसा नाईकाचा प्रधान. त्यालाही सर्व मानमर्यादा मिळत असते. तो नाईकास योग्य तो सल्ला देत असतो. तांड्याची प्रत्येक अडी-अडचण कारभारी सोडवीत असतो. म्हणून नाईकाचा अदब राखून तांडा बदनाम होणार नाही, हे नाईक कारभारी पहात असतात. त्याच्यासाठी मोतीराज सारखं एक शब्द वापरत असतो, जो मला समजत नाही– ' डायसाळे. ' तर मी मध्येच मोतीराजला ' डायसाळे 'बद्दल विचारतो. ' डायसाळे ' म्हणजे तांड्यातला सगळ्यात वृद्ध माणूस, जो तांड्याला, नाईक–कारभाऱ्याला काय करावं, काय करू नये, याचा सल्ला देतो. आणि हा प्रेमाचा सल्ला तांडा मानतो.

आत्तापर्यंत तांडा पोरांनी भरून जातो. दिवस मावळून कडुसं पडलेलं असतं. आम्ही नाईकांच्या घरात बसून बोलत असतो. तर बाहेर पावसानं जोरात चपराक हानलेली असते.

एका तांड्यात पाच-पन्नास बिऱ्हाडं असतात. तांडा मोठा झाला की फुटत असे. लमाण बंजारा ही व्यापार करणारी जमात. ब्रिटिशपूर्व काळात जेव्हा दळण-वळणाची साधनं उपलब्ध नव्हती तेव्हा बैलांच्या पाठीवर गोणी लादून या गावाचा माल त्या गावच्या व्यापाऱ्याला पोहोचवणारी ही ट्रान्स्पोर्ट एजन्सीसारखी राबणारी जमात.

त्या काळात रहदारीची साधनं नव्हती. त्यामुळे डोंगरातील पाऊल वाटांनी हे लोक व्यापार करत भटकत असत. पावसाळा आला की चार महिने कुठंतरी डोंगराच्या आसऱ्यानं थांबत. दिवसभर चालायचं अन् रात्र झाली की तिथंच थांबायचं. पावसाळ्यात ते एक ठिकाणी बसून खात. आठ.महिने काम नि चार महिने बसून खाणं. यामुळं अर्थिक स्थिती अतिशय वाईट असते. त्यामुळं लग्न आदि कार्यं पावसाळ्यात उरकतात. ज्याच्याकडं जास्त बैल तो श्रीमंत समजला जातो. बैलांच्या व्यवस्थेकरता डोंगर पाहूनच चार महिने ते थांबत. अशा पद्धतीनं हजारो वर्षे हा समाज जगतो आहे.

तसे हे मूळचे राजस्थानी. राजस्थानमध्ये ' लूणी ' नावाची नदी आहे. त्या नदीतून ' लून ' म्हणजे मीठ भरत, आणि आवश्यक त्या ठिकाणी नेत असत. प्रथम

मिठाचा व्यापार करत असल्यानं लोक त्यांना लमाणी म्हणत. 'लवण' या संस्कृत शब्दाचा अर्थ मीठ असा आहे. पुढे त्याचं 'लमाणी,' 'लबाणी,' 'लंभाडी' असं नामकरण झालं.

लमाण लोकांचा व्यापार त्याकाळी बैलांच्या पाठीवर सामान लादून चीन, तिबेट, ब्रह्मदेश, अरबस्थान या प्रदेशांत होत असे. म्हणून त्यांना तिकडे 'जिप्सी' म्हणत.

राजस्थानात बंजारा चार नावांनी ओळखले जातात. सिल्पी बंजारा हा जंगलातून लाकडं आणून त्यावर शिल्पकाम करतो. पशुपाल बंजारा हा राजस्थानमध्ये आजही जनावरं पाळण्याचा धंदा करतो. व्यापारी बंजारा हा छोटा व्यापार–विशेषतः बैलांचा व गुराढोरांचा करतो. बंजारा जंगलातील फळ-फळावळं शहरात आणून विकतो म्हणून 'बंजारा.' बंजारा शब्दाचा अर्थ 'बन्' म्हणजे जंगल किंवा वन असा होतो म्हणून बंजारा म्हणजे 'जंगलाचा मालक.'

उत्तर भारतात १३९६ ते १४०८ या काळात फार मोठा दुष्काळ पडला होता. त्या वेळी हजारो माणसं अन्नावाचून मरत होती. यावेळी बंजारा जमातींनी इकडून तिकडून धान्य आणून लोकांचा जीव वाचवल्याचा दाखला 'आइने अकबरी' या ग्रंथात आहे.

बंजारा जमातीची आवश्यकता लक्षात घेऊन १६ व्या शतकात 'जंगीभंगी' नावाच्या माणसाला मोगलांनी ताम्रपट दिला होता. जंगीभंगीजवळ १ लाख ८० हजार बैलांची संख्या होती. १६३० मध्ये असफखान नावाच्या वजिरानं ताम्रपट दिला होता,

"रंजन का पानी, छप्परका घास,
दिनके तीन खून माफ,
और जहाँ असफखान के घोडे
वहाँ जंगी-भंगी के बैल खडे."

'जंगी-भंगीच्या बैलांना जर खाण्याकरता गवत मिळाले नाही, तर त्यांनी कोणाच्याही घराचे गवत काढून आपल्या बैलांना खावूं घालावे. याला जर कोणी विरोध केला तर ते तीन खून सुद्धा दिवसातून करू शकतात.' एवढं महत्त्व त्या काळात या जमातीचे होते.

प्रा. मोतीराज राठोड यांचा लमाण बंजारा समाजाचा सारा इतिहासच पाठ आहे. ते बोलतातही मोठ्या लकबीनं. "तांडा संस्कृती" हे त्यांचं पुस्तकही मुळातूनच वाचण्यासारखं आहे.

आतापर्यंत गप्प बसून नुसते खालीवर बघत बसलेले नाईक बोलायला लागले. जसं त्यांनी तोंड उघडलं तसं माझं नी मोतीराजचं तोंडच बंद झालं. हा म्हातारा नाईक असा बोलत राहिला की, निमीत्याला एखादा प्रश्न विचारला की त्याचे विस्ता-

रानं उत्तर येई.

नाईक बोलू लागला की फर्डा वस्क्ताच बोलू लागलासे वाटे. नाईक सांगू लागले त्यांच्या भाषेत. त्यांची 'गोरबोली' म्हणजे मराठी आणि हिंदी मिश्रित बोली. ते सांगत असतात; "मी शामा बिमला पवार. या तांड्याचा नाईक. आता शेतात कामं करतो, डोंगरात गवत कापायचा. बापदादे लाकडं आणत व्हते. त्यांच्या आगुदर जुनी लोकं बैलाच्या पाठीवर येपार करायचे. त्या टायमाला रेलगाडी, हवाई जहाज इमान, मोटारगाडी नव्हती. त्या टायमाला आमची लोकं का करीत व्हते, तर हे बैल, बैलांच्या पाठीवर गोणी व्हात व्हते पैले. त्यातनं माल बंबयवरनं फलाण्या गावाला न्यायचा. तिथंनं तो बिस्ताण्या गावाला धाडायचा. ही समदी कामं आमचे बापदादे करीत व्हते. आमी लखाबंजारा रोज एका गावाला जायाचे. रोज तांडा हालायचा. जनवारान्ला चरायला जागा बगायची. डोंगरात, जंगलामंदी व्हायचे. गावाजवळ राहायचा नाय. हे गाव, ते गाव करत करत राहायचं. तांड्यात नायक असतुया, तसा कारभारी, तसा ढालीया, ढाडी, सतार, जांगडबी असतुया.'

नाईकाला मध्येच अडवीत मी विचारतो, "बाबा, ढालीया म्हणजे काय ते जरा नीट सांगता का?"

नाईक सांगत असतो : "ढालीया म्हणजे तांड्याचा सेवक. ढालीया तांड्यातला हरकाम्या. कोणाला काय नाही म्हणायचं न्हाय. समद्यांच्या हातातली कामं करायची. सगळी त्याला महाराज म्हणत्यात. त्याच्या पोटापाण्याला तांडा देतुया. तांडा त्याला कपडालत्ता देतो, जेवायला देतो. तसा त्यो मागून खातो. पर तो भिकारी न्हाय. त्याचा हक्क हाय. त्यो सोंगढोंग करून तांड्याची मौजमजा करतुया. नकला करून लोकानला हासिवतुया. त्याला तसा कुणी कमी मानत न्हाय पर त्याला पोरगी देत नाहीत.

"आता ढाडी म्हंजी आपला भाट-राजाला भाट असतू तसा आमाला ढाडी. त्यो वाजवतो, नाचतो, गातो. कुळाची गाणी म्हणतो. हे परतेक तांड्यात नसतात. ही तांड्यांवर फिरत्यात, त्यानं वळकी पाळकी लय. ह्यांच्यामागं स्वयरिकी जमवायचा बी लकडा लागतू. लय चतुर जात.

"सतार असतुया. तांड्यात त्यो डागिनं करतू. आमच्यात बाया मानसान्ला आन् बाप्यान्लाबी डागिनं लय प्यार लागतात. लय जीव. बंजाराबाई समद्या अंगावर डागिनंच घालती बगा. सतार तसा आमच्यातला बामन. त्याला वरचा समजतात. त्याचा रोटीबेटी येव्हार तांड्यात दुसऱ्यासंगं होत न्हाय. लग्न कार्यात त्याला कोरडा सिदा देतात.

"जांगड एक असतुया. जांगड ही काय जात न्हाय. पूर्वीच्या काळी आमचे लोक घरातली कामं करायला गावातल्या पोरान्ला पळवून आणायचे. त्याला जांगड

म्हणत्यात. जांगड तांड्यावरच मोठा झाला की त्याला जातीत घेत असत. त्याचा रोटीबेटी येव्हार व्हायचा."

तांड्याचा नाईक बोलतुया तवर दुसऱ्यानं परवानगीशिवाय मध्येच त्वांड खुपसायचं नाय. मोतीराज मध्येच बोलतो. तर नाईक त्याला रागावतो. मोतीराज बंजारा जमातीबद्दल जरा तपशील देतो. लमान बंजारांना जवळपास सत्तावीस नावांनी ओळखतात. तर सतरा उपजाती : गोर बंजारा, चारण बंजारा, मथुरा बंजारा, सतार बंजारा, नावी बंजारा, ढालीया बंजारा, सिंगडिया बंजारा, मारु बंजारा, बामणीया बंजारा, बांगोरा बंजारा, गिगोरा बंजारा, रोहिदास बंजारा, धनकट्टा बंजारा, भाट बंजारा, जोगी किंवा भटावा बंजारा, ब्रिजवाशी बंजारा, धाडी बंजारा.

तर आतापर्यंत चाललेली चर्चा. ही तशी नाईकांनी अगदी नाईकमय केलेली. बोलण्याची पद्धती मोठी आक्रमक असते. मधेच मी विचारतो, "नाईक जरा आपल्या स्त्रियांच्याबद्दल माहिती सांगा की!"

"त्याचं काय स मद्यांचं हाय तसं आमचं. जात फिरस्ती, आब्रूचं राखन आमी करणार. पर कुणाचं म्हण मन जाऊ नाय पायजी. म्हण आसं न्हायाचं. पर दागदागिनं घालत्यात सगळी अंगभर. लगीनबी लवकर करत्यात. त्यात काय अब्रूचा खराबी न्हाय. पोरी बिनलग्नाची आसन तर येगळी दिसती, लगीन झाल्याली येगळी दिसती, तर इधवा येगळी दिसतीया. आमच्या बाया, घागरा, चोळी, वढणी घालत्यात."

ते मी बगत असतोच. तोवर नाईकाच्या दारापुढनं बरंच पाणी वाहून गेलेलं असतं. बाहेर पाऊस कोसळत असतो. चिखलात तांड्यातली पोरं–लेकरं खेळत असतात. तर बायामाणसं गावातून तांड्यावर येत असतात. तांबडा भडक रंग आणि तसलेच रंगी-बेरंगी चटया-पटयांचे घागरे. डोक्यावर केसांचा उंचवटा, कानाच्या दोन्ही बाजूनं कानशिलावरनं केसांच्या बटा म्होरं ओंढलेल्या, त्याला चांदीसारख्या धातूचे दागिने लावलेले. हातात हात भरून हस्तीदंती बांगड्या, निरनिराळ्या रंगाच्या आंगठ्या बोटांतून तर डोक्याचा भांग शक्यतोवर मध्ये पाडलेला. त्या केसातल्या दागिन्याला म्हणतात 'टोपली' व 'घुंघरी'. कानात गुंफलेला आसतो, त्याला 'केनिया' म्हणतात. केसाच्या मागच्या बाजूला छोटे-छोटे लोकरींचे गोंडे विशिष्ट पद्धतीनं लावलेले असतात, त्याला "आरी" म्हणतात. पायात 'वाकडी' नावाचे तांब्याचे किंवा पितळेचे तोडे वापरतात. बंजारा मुलगी काचळी वापरत नाही. काचळी सौभाग्याचं लक्षण. विवाहित स्त्रीच वापरते. लग्न झालेली स्त्रीच केसावर घुंघरी वापरते. कुमारी तो वापरीत नाही. वाकडीही विवाहिताच वापरते. तर विधवा स्त्री आपले दागिने काढून टाकते. कुमारी मुलगी आपली ओढणी उलट दिशेने अंगावर घेते. त्यामुळं स्त्री कपड्यावरून ओळखता येते. मोतीराज माझ्या ज्ञानात भर

घालीत असतो. तांड्यातल्या स्त्रियांना दाखवतो. एखादी आजी कौतुकानं आपले गोंडे दाखवते. तर एकूण तांबड्या रंगावर मंडळींचा फार भर असतो.

नीतीच्या कल्पनांची माहिती घ्यावी म्हणून मी नाईकांना विचारतो. "बाबा, एखाद्या बाईचा पाय वाकडा पडला तर तुम्ही पंचायतीत काय शिक्षा देता?"

झालं. आतापर्यन्त अतिशय खेळीमेळीत चाललेली चर्चा एकदम तापते. म्हातारा नाईक माझ्याकडं मोठ्या रागानं पहातो. मोतीराजकडं पहातो. आणि म्हणतो कसा, "मी हिथं का करतो? का करतो मी हिथं? हाँ? आमच्या तांड्यावर मी असताना असा वाकडा पाय पडंलच कसा? मी का शेरडं राखतो? पाय कसा वाकडा पडंल? पाय वाकडा पडला तर पाय व्हाईल का? हाँ! आता आमच्या तांड्यातल्या तांड्यात आसत तरं समजावून सांगतो. चुकलं तर आमच्यातल्या आमच्यात आमी न्याय करू. पर आमच्यातल्या बाईनं दुसऱ्याकडं वाकडा नजर करून बगितलं तरं डोळं काढत्याल पंच." मी उत्तर समजलेलो असतो. आता याबद्दल मी गप्प बसतो. मोतीराज गोरबोलीतून त्याला समजावतो. म्हातारा शांत होतो.

आता त्यांच्या सणाबद्दल बोलणं चालू होतं. म्हातारा मोठा बेरकी. आता त्याला चर्चेत रस नसतो. आम्ही त्याच्या परवानगीशिवाय तांड्यात दुसऱ्या कुणाशी बोलू शकत नाही. म्हणुन चिमट लावून बोलत असतो. तर बंजारा जमातीत मुलांचा जन्म केव्हाही होवो, त्याचा वाढदिवस म्हणजे बारसं मात्र होळीलाच घालतात. होळी आणि दिवाळी हे दोन सण म्हणजे तांड्याचा उरूस अगदी. जिवाचं सोनं करून घेतात. आक्का तांडा खाणं, पिणं, नाच, गाणं, आणि दंगामस्तीत घालवतात. वर्षभराची आणीबाणी या सणाला जशी उठते. रात्रभर पिणं, पाजणं, आणि नाचणं या दंगामस्तीत, घालवतात. सामुदायिक नाच. स्त्रिया-पुरुष, लहान मुलं, मोठी माणसं सारी धुंद. मोहाची दारू, बकऱ्याचं मटण आणि सोबतीला रंगिली रसिली गाणी. मोतीराज सांगत असतो, "आता दिवाळी नाहीतर शिमग्याला, होळीला, ये. सारा तांडा कसा साती रंगांत रंगतो ते पहायला नक्की ये." त्या आगोदर निदान थोडी झलक दाखवायला मी सांगतो तसं मोतीराज जरा डोकं खाजवतो. मघाशी मी नको तो प्रश्न विचारल्यानं नाईक वैतागलेला असतो. मोतीराज आपल्या गोरबोलीतून नाईकाला सांगतो. नाईक बिडी पेटवत गप्प होतो. मोतीराज दोन लहान पोरींना बोलावतो. त्या थोडं लाजतात. पण नाईक उठून बाहेर जातो आणि त्या दोन छोट्या पोरी खुलतात. साथीला चार पोरी बोलावून आणतात. आणि गाणी चालू होतात.

उरे–ऊँ गाई गोधन पूज
केवड्या–मेवड्या डीर म लाव
घोडेरी कटारे लांबी हार घोळी हार

लांब लांब कानेर टोकळीस माथेर,
छादलास काणेर पुडाथर
घी, तलावडीभर छाच, गळम कसाव
पगला पैंजण आन धन
देस दवाली मावली.

गाण्याचा अर्थ समजत नाही पण उडत्या चालीवरचं हे गाणं नक्कीच दाद मिळवून जातं. पोरींचा आवाजही छान असतो. या गाण्याचा अर्थ असाः 'दिवाळी माता चांगली गाय दे. ती घोडयासारखी दिसली पायजे. तिच्या गळ्यात मी हार घालीन. तिचे लांब लांब कान असतील. ती पिपभर तूप देईल. आणि छोट्या तलावाइतकं ताक देईल. तिच्या गळ्यात सुंदर कंसावरी बांधीन. पायात पैजण बांधीन. असं धन आम्हाला दे. दिवाळी माते कुमारी मुलगी गाई सारखी गरीब असते.'

मोतीराज रंगलेला. एकीकडं पोरींचं कौतुक करीत असतो, एकीकडं मला अर्थ समजावून सांगत असतो. तर एकीकडं नाईकाकडं लक्ष ठेवतो. बरीच गाणी झाल्यावर मोतीराज सांगतो, "आमच्या जमातीत प्रत्येक प्रसंग रडण्याच्या कार्यक्रमानं सुरू होतो. मग मुलगा होवो, की मुलगी होवो. लग्न असो, की आणखी काही, प्रत्येक कार्यक्रमाला रडून सुरुवात करतात. पूर्वी तांडे लांब लांब फिरत. एकदा भेटलेला माणूस दहा-वीस वर्षे भेटत नसे. लग्नात बारीक असलेली पोरगी पुन्हा भावाला, आईला, बापाला, भेटेलच याची खात्री नव्हती. त्यानं रडून दुःख कमी करत असत. त्याचीच परंपरा, चाल, रूढी, निर्माण झाली. लहान मुलींना असं रडायला शिकवतात. या मुली गाऊ लागल्या की पोटात ढवळून येतं. आणि पाषाण असला तरी रडतो. आता पाहशोलच. फार करुण असतं हे गाणं. स्वरही फार आर्त असतात. मुलींना रडायला शिकवतात. आता या पोरी म्हणतील ते ऐक."

मुली गाणं म्हणू लागल्या. वातावरण क्षणात बदलून गेलं. सारी माणसं शांत झाली. पोरी आर्त गाऊ लागल्या, रडू लागल्या. आणि मला काही समजत नव्हतं, पण पीळ पडत होता.

याडी ये हं ऽ ऽ ऽ हिच्याँ ऽ ऽ
चांदा सुरयारी जोडी ज्यू आपली हं हिय्या ऽ
किडी मुंगी सपाती ज्यू तमारी
बेटी.
कोणी सपाती हं हिय्या ऽ ऽ,
लिंबू नारळ वक ज्यू तमारी बेटी.
वक चाली याडी ये है हिय्या ऽ ऽ.

या गाण्याचा अर्थ असा– 'आई तुझी माझी जोडी चंद्र सूर्यासारखी होती. मुंगी सुद्धा तुझ्या या घरात रहाते, तिला तू सांभाळून घेतेस. मग मला का सांभाळत नाहीस? माझं तुला काय ओझं आहे? माझा तू आई सौदा केलास. बाजारात भाजीपाला विकावा तसं तू मला विकलंस.'

तसा या गाण्यानं मी अस्वस्थ झालो. तर सुरुवातीला दिलेलं गाणे वडिलांना संबोधून रडत असताना मुलगी म्हणते. त्याचा अर्थ असा : 'मी जेव्हा पुढच्या जीवनाचा विचार करते, तेव्हा मला सर्व सुने सुनं वाटतं. मागं वळून घराकडं पहाते तेव्हा तर सर्व काही भरलेलं असतं. मी आता तुम्हाला सोडून जात आहे. पण आपल्या लाडक्या लेकीपासून आपलं मन चोरू नका."

गाणी बरीच झाली. माणसं कोरस करून रडतात. गाण्यात एवढी ताकद असते! मी अनुभवली. याला कला म्हणत असतील का? मला ठाऊक नाही. पण जिवंत मनाचा माणूस नक्कीच रडेल, असे हे स्वर.

मोतीराज सांगतो "मुलीचं लग्न होतं. आणि तिला देज म्हणून बैल देतात. मुलगी बैलावर बसते. तिला तोंडावरचा बुरखा येवढाच वेळ स्वतः काढता येतो. ती बैलावर बसते. आणि सारा तांडा ती मागं तोंड करून पहाते. ती निरोप घेत असते. तो तांडा तिला कायमचाच मुकणार असतो. मागे तांडा रडत असतो. पुढे मुलगी, तिचा नवरा, आणि इतर लोक रडत असतात. आणि अशी गाणी चालू असतात. मुलगी दिसेनाशी होईपर्यंत सारा तांडा शोक करीत असतो."

गप्पा बऱ्याच चालू असतात, मोतीराज सांगत असतो, तांड्याच्या चोरीचे कलंकाबद्दल, गरिबी, भीषण दारिद्र्य याबद्दल. दोघेही बेचैन असतो. आजचा आंधार.या धरतीच्या लेकरांच्या वाट्याला आलाय. तो संपून जाईल, उद्याचा सूर्य तरी यांच्या दारात चार किरणं टाकील या आशेवर दोघेही तांड्याचा निरोप घेतो.

●

कात टाकून उभे राहिलेले वैदू

यलप्पा वैदू भटक्या-विमुक्तांच्या चळवळीतला ज्येष्ठ कार्यकर्ता. दौलतराव भोसले, बाळकृष्ण रेणके, आसाराम जाधव गुरुजी ही तशी चळवळीतली वयानं, अनुभवानं मोठी माणसं. प्रत्येकजण आपापल्या क्षेत्रात काही तपश्चर्या केलेले. तर यल्लप्पा वैदू हा सातारचा. आम्ही दोघे 'रयत' वाले. यल्लप्पा भेटला की त्याच्या वैदू समाजातल्या हालचाली सांगायचा. वैदूंच्या संघटनेचं काम गेल्या १०-१५ वर्षांपासून त्यानं चिकाटीनं सुरू ठेवलेलं. अभावग्रस्त समाजात काम करणं किती कठीण आहे ते मी सध्या अनुभवतोय. पण यल्लप्पासारखी झिजणारी माणसं पाहिली की, कामाला दुप्पट जोम येतो. यल्लप्पा, रमेश गुरुजी, सिंधू शिंदे, शामलिंग शिंदे, शिवाजी जाधव आणि कितीतरी तरुण मुलांचा संच आज वैदू समाजात तयार झालाय. तो आपल्या समाजात सुधारणा करू इच्छितोय. यल्लप्पाचं मला याचसाठी मोठं कौतुक वाटतं.

सामाजिक रूढींनी ग्रस्त असलेल्या वैदू समाजात यल्लप्पानं एक मोठी सुधारणेची लाटच आणलीय म्हटलं तर वावगं होणार नाही. पण परवा आश्चर्याचा धक्का दिला तो एका नव्याच मित्रानं–दुर्गप्पा घोरपडेनं.

दुर्गप्पा तसा चाळिशीतला. गुढगाभर धोतर, अंगात सतरा ठिकाणी फाटलेला शर्ट, बहुधा मागून आणलेला. डोक्याला आगळपगळ डगडगीत टोपी. कानात सुरक्या, हातात काठी, दुसऱ्या खांद्यावर बारक्या काठीला आडकवलेला पत्र्याचा डबा. पायात किलो दोन किलो वजनाच्या सातारी वहाना. तर दुर्गप्पा आलाच मुळी, "हाय कारंऽऽआण्णा" करीत हाळी देत. दुर्गप्पा आला की हाळी मारून मी हाय का नाय ते नेहमी बगतो. डबे दुरुस्ती, डबे रिपेअर, चाळणी रिपेर, बादल्यांची बुडं बसवायची, जुन्या पत्र्याचं नवं डबं करायचं. दाराला कडच्या, पेटीच्या कडच्या, सुटकेसची दांडी, बिजागिऱ्या, कुलपं आसं सटारफटार कामं करीत दुर्गप्पा फिरत असतो. माझ्या आळीत आला की हक्काचं घर समजून येतो. मी असलो तर धाडकन बसतो. चार घरचं मागून आणल्यालं शिळं–पाकं तुकडं आमटीत कुस्करून खातो. आणि 'आण्णा, बग' म्हणत बोलू लागतो. कधी वैतागलेला, कधी पिडलेला, कधी आनंदात उडच्या मारणारा. दुर्गा जेवायला लागला की सारी गल्ली जमा. पोरांचं कोंडाळं तयार. पण दुर्गा हाटकतो ते फक्त कुत्र्याला. बाकी पोरा–सोरांनी कितीही वैताग दिला तरी दुर्गा गप्प असतो. पोरं त्याला तसं छळत असतात, पण दुर्गप्पाचं लक्ष जेवणात किंवा कामात.

दुर्गप्पा आज आलेला असतो तो धंद्याला नाही. तो आलेला असतो गुरुजींचा निरोप घेऊन. गुरुजी म्हणजे यल्लप्पा गुरुजी. "जत्रा हाय. तुला जेवाय बोलावला बग. गुरुजी आलंय मंबयवरनं. पोरान्ला घिवून, बायकुला घिवून सांचं ये."

मी आग्रह करून दुर्गाला बोलवतो. निवांत आहे असं बगून त्याच्याशी गप्पा मारू लागतो. तसा दुर्गा सांगू लागतो, "गुरुजी गेला की आपन जाऊ बग. तुला दाखवितो. लय तेलाचं हाय जनवार. मागंबी गेलूतू बग. तवा लय बोंबाबोंब केली, पण बाहिरच आला न्हाय. दोन तीन दिस राहिलू, पर तवा बीळच सोडलं न्हाय. न्हाय तर तुला सांगू लय भारी जनवार."

दुर्गा आला की शिकारीचं वर्णन करू लागतो. बोलायला खडा. जातीबद्दल बोलू लागला की सारा इतिहास पाठ.

"तुम्ही शिकारी कवापासनं करता?

"का म्हणू आण्णा, आता मला तरी का ठावं? वाडवडलापास्नं आमी शिकार करतू. पयले वाडवडील डुयानं डुया जंगलात शिकारी करायचं. कोल्हा म्हणू नगं, चितार म्हणू नगं, लांडगा, रान डुक्कर, तरस, वाघ, ससा, खोकाड, चितूर, चिमण्या, भोरड्या, सायाळ, मुंगूस, घोरपड, काय पायजी ते धरायचे. शिकारीपाई,

जंगलातचं राह्यचे. चार-चार, आठ-आठ दीस, शिकारीला जायचे. रान डुकरांची लांडग्यांची, कोल्ह्याची शिकार करायची. शिकार झाली की गाववाल्यानूला दावायची. तवा गाववाली माणसं आमच्या लहानपनी भाकरी द्यायचे. कुणी कणसं द्यायचे. कुणी कापडं द्यायचे.

" अशी शिकार करत करतच झाडपाल्याचं औषध माहिती झालं. जनावरांच्या चरबीनं, हाडकांनी, रक्तानी, कातड्यांनी मानसाचा रोग पळतू असं दिसलं. झाडपाल्यानं रोग पळतू असं दिसलं. म्हण गावातल्या वैदूला पाला द्यायचा. त्यो पाला–देत देतच शिकार सुट्टन वाडवडील वैदूचं वाताचं, तुंबडीचं औषध द्याया लागले. गुण याचा, नाय याचा. पर हाताला गुण व्होता. गावगन्ना डागदरबी नव्हता. पोटाबारी राबायचं. आज हिथं तर उद्या तिथं. गाडबावर बिराड बांधायचं. आन् रोज येका गावाला जायाचं. आसं कैक पिढ्या चाललंया. आता मी माझ्या म्हाताऱ्याला इचारतू, तू कुठनं आला, तर त्यो सांगतू, ' काय की बाबा कुठनं आलू.' त्याचा बा बी सांगून गेला न्हाय. तर आता तूच सांग आमी कुठनं आलू आसंल.

" गाडबांची अन् कुत्र्यांची संगत मात्र कायम. ज्या वैदूकडं कुत्री जास्त तो समद्यात तालीवार. त्याला जातीत मान मोठा. आमच्यात कुत्री तरी किती असावीत? एका एका बिराडात इस-इस, पंचीस-पंचीस कुत्री. लय कुत्र्याबाला लय तालीवर. मग गाढव. पर गाढबावर काय तालीवर ठरत न्हाय. पर ज्या ज्या दावणीला जनवार लय, त्या घरी आपली पोरगी आमच्यात डोळं झाकून देत्याल. ज्या ज्या दावणीला येवढी जनवारं हायेत, ज्यो येवढी जनवारं पोसतुया त्याला आपली लेक पोसायला याची न्हाय का ? असा इचार करून माणूस आपली पोरगी देतया. तर लय पैकाबाला आसन, पर दारात जनवारं नसंल तर माणूस पोरगी देताना इचार करंल. आयला, ह्याच्या पैक्याला का जाळायचं का ? ह्याज्या दारात जर दोन जनवारानूला खाबू घालत न्हाय, दोन जनवारे ह्याला जगविता येत न्हाय तर ह्यो माज्या लेकराला संबळील कशाबनं ? म्हण माणूस तिथं आपलं पोरगी देणार न्हाय. तर आमच्यात बी असं हाय. "

" पर दुर्गा येवढ्या कुत्र्यानूला खायला कुठनं घालता रं ? "

" त्याजं काय हाय आण्णा बग, बायामाणसं काय काम करत्यात. दिवसभर त्येबी जनवार गप्प बसतूया का ? सुया, बिबं, पोत, मणी, बाळे, बांगड्या, डुलं, असं काय, बाय किडूकमिडूक घिऊन गावात जातंया. ' सोन्याची आय, लंकीची आय, गौंडयाची आय, बाढ गो माय, ' करीत मागीत गाब मागतंया, कुणी सांचं बाढतया, कुणी दोन दिसाचं, कुणी चार दिसाचं बाढतंया. सांचं असल तर आपल्याला अन् लय शिळं आसलं ते कुत्र्यानूला खायला आणत्यात. दिवसभर किडूकमिडूक दिवून चार पैसं मिळवत्यात. भाकरी आणत्यात. पोरंबाळं शिळपाकं खाबून उरतया. आता जेवढी

माणसं लय, तसं टुकडं लय. म्हण कुत्री लय, तर कुत्र्यान्ला खाया घालाय लागतय म्हण भीक मागायची. शिकार करायची. आता कुत्री तरी का काखानी असत्यात. पेद्या कुंका, छिन्ना कुंका. पेद्या कुंका म्हणजे मोठा कुत्रा. छिन्ना कुंका म्हणजे बारीक कुत्रा. तर दुसरा एक सडपातळ कुत्रा असतो."

कुत्र्यांची जात खरी माणसापरीस इमानदार. लई इमानी जनवारं बग. कुत्र्याची पारक, शिकाऱ्यांच्या गमती जमती, कोल्ह्याला घालायची साद, लांडग्याला घालायची साद, सायळीला घालायची साद, कोल्ह्याची कोल्हेकुई असे कितीतरी आवाज दुर्गानं काढून दाखवले. चिमणी, पोपट, कावळा, सगळ्याचे आवाज हुबेहूब काडणारा दुर्गा शेवटी बिळीली घालून दाखवतो. भाई, समता टाळ्या पिटत असतात. शशी कौतुकानं सारं पहात, ऐकत असते. आता दुर्गा केलेल्या शिकारींची वर्णनं करतो. गमती सांगतो. 'सायळीची शिकार लय जीव घेती. सायळीचा काटा इषारी असतो. लागला की जाग्यावर माणूस असूं दे, कुत्रा असुं दे गपगार.' पर कसं हिकमतीनं सायळीचं डोकं हाणाया लागतंया ते दुर्गा काठीनं दाखवत असतो. तर शिकारीचं अतिशय रस घेऊन दुर्गा सांगत असतो.

"दुर्गा वैदूंच्यात जाती असतात का रे?"

"हॉ, आमच्यात जात कसली. समदी? वैदूच. आता काय ऱ्हायला नाय. यल्लप्पा गुरुजींनं मढीला समदं मिटीवलं. आता रोटी-बेटी येव्हार होतो, पर पयलं दोन वर्षां आधी नव्हते. गुरुजी हाय ना आपलं, ते हाय संचीवाला आन् शिवलींग हायना त्यो श्रीरामपूरचा, त्यो हाय झोळीवाला. तर आमच्यात दोन जाती. एक झोळीवाला अन् दुसरा संचीवाला.

"तसं पयलं आमचं बाप-दादा एकच व्हते. एकच भाषा हाय, रीतभात एकच; पर कवातर मागं असं म्हणतात आमच्यात लग्नाला बॅन्ड लागत न्हाय. वाजवणं नाय. कुणीबीनी हौसंनं बेंड लावला आन् बेंड लावला तवापासनं संचीवाले बायले झाले. वरगंटे(पाटील) म्हणाले, 'तुमी बेंड आणले, तुम्ही चांभार झाले. हामी चांभाराचं हातचं खात न्हाय.' झालं, तवामास्नं ते संचीवाले बायले झाले. आमी झोळीवाले झालो. संचीवाला-झोळीवाला रोटी-बेटी येव्हार बंद. आता संचीवाला हाय ते झोळी वापरत न्हाय. ते गोसाव्यावाणी बंदाची झोळी काकंला लावून भीक मागत्यात. तर झोळीवाला काकंत झोळी लावायचा न्हाय, तर चार-पाच बंदांची झोळी असती बग, वाकळंच्या कापडावाणी आमच्या बाया घरी सुई दोऱ्यानं लुगड्यांची खोळ शिवत्यात. त्याला चार कोपरं टोपल्यावाणी इनत्यात. आन् चार कोपरं वर एका जाग्याला केसाच्या दोऱ्यांनी बांदत्यात." केसाच्या दोऱ्यावरून मला आठवण झाली. लहानपणी वैदू बाईला आम्ही 'उंदराची मुस्की मिळत्याल का?' म्हणून चिडवायचो. आणि वैदू बाया दगड घिऊन आमच्या मागं लागायच्या. त्यांतनं सुई, दोरा, बिबं, दाभनं

आसत्यात. "तर अशा दोन जाती. या दोन जातींत पुन्हा १०-१२ पोटजाती हायेत– वंट्टेतोड, आसनलोड, यारोड, इंगलोड, आसनसोड अशा पोटजाती हायत. आता मराठीत कुणी शिंदे, घोरपडे, चव्हाण, वैदू लावतात. पण या पोटजातीच हायेत. एकाचं कूळ दुसऱ्याला पदर लावल्याबिगर सोयरीक व्होणार न्हाय. पर यल्लप्पा गुरुजीनं लय नामी केलं बग.

" आता तुला सांगू, आमच्यात लय भानगडी व्होत्या. आमच्यात पोरगी इकत घ्याया लागायची. ८-९ हजार, १० हजार म्हणू नको, २० म्हणू नको. लय पैका व्होता, त्यानं पोरगी पाळण्यात आसली की लगीन. पोटुशी बाय राहिली का सुपारी फुटायची. पोटालाच कुंकू लागायचं. त्याला आमच्या भाषेत म्हणत्यात. 'पोटातली भाजी इकत घ्यायची.' तर तवाच लगीन ठरायला लागायचं. पर आता मढीला आमी जमतू. यल्लप्पा गुरुजीनं लय चांगलं केलं. आता देज आलाय ५०० रुपयांवर. त्यात जर पोरीच्या डोस्क्यात भवरा निगाला का ठार मेली. तिला कुणी करून घ्याचा न्हाय. तिला करून घेतली का मेलाच बग. डोस्क्यात भवरा असल्याली नवरी केली का नवरा मरतू, म्हणत व्होतं. पर गुरुजीनंच बायकू केली ती केसात भवरा असल्याली. आन् आता गुरुजीला पाचसात पोरं हायेत. त्याला काय बी झालं न्हाय. तर काय सांगत व्हतो, लय आडाणी जात बग. मागंदी मांजरं-बोकं खायाचे, डुकरं खायाचे, आता गुरुजींनी समदं बंद करून टाकलय. तवापस्नं मांजर कुणी खात न्हाय. पर जातीचं पुढारी लय वंगाळ. आमच्यातलं देव लय कडक. तायाम्मा पोचाम्मा, विघाडली का मेलूच म्हण समज. जात हागनदारीला म्हणू नको, मसणवाट्यात म्हणू नकू, नदीला म्हणू नकू, माळाला म्हणू नकू, कुठं जागा दिसंल तिथं उतरायची. त्यानं भुतखेतावर लय विश्वास. पर देव लय भारी. त्यानं कुणाचा केस वाकडा व्होनार न्हाय का कुणाला काटा टोचणार न्हाय. पर देवाचं कमी झालं का बिलामत सांगून येणार. म्हणून देवाला भजायचं. देव सांभाळतूया पोरं–लेकरं."

दुर्गाप्पा असो की आणखी कुणी, एकदा चावी बसली की नुसतं ऐकत रहायचं. मधीच आपण बोललो का त्याची तार तुटणार म्हणून आपण गप्प बसून ऐकत रहावं. तर दुर्गा आता सांगत असतो–वैदूंच्या देवाचं महत्त्व. अशी जत्रा दरवर्षी सातारला भरत असतेच. मुलुकावर गेलेले सारे वैदू सातारला परत आलेले असतात. तर दुर्गा सांगत असतो,

" आमच्यात देवावर अन् भुतावर लय इसवास. पोरगा आजारी पडला, बोला नवस. बाई आजारी झाली, नवस. कुत्रा चुकला, नवस. गाढाव लंगडाय लागलं, नवस. आसं एका एकाचं किती नवस व्होत्याल, सांगता याचं न्हाय. पाच-पन्नास नवस तर हमखास. आता वरीसभर भीक मागायची, पैका जोडायचा, डबा-चाळणीचं, कड्याकुलपाचं काम कराचं. भाकरी कराचा, भाजी कराचा, भात

आणायचा, शिळपाकं आणाचा, गाठीला गाठ माराया पैका साठवायचा आन् आखाड आला की, नवस फेडायचा. घरी याचा तर तायम्मा पोचम्माला बकरी पडणार. किती पडावीत तर रक्ताचा चिखल व्हाचा. मायंदाळी मुंडकी देवाम्होरं लावायचा. अगदी जत्रेला बकरं कापता कापता आठवण झाली की आमक्या तमक्या येळंला आपुन मुलाचा नवस बोललुया, का झालं. लगीच बकरं आणायचंच का कापायचंच. मंग जवळ पैका नसला तर कर्ज काढायचं. त्याला याजबट्टा देयाचा. पर वाट्टेल ते झालं तरी देवाचं करायला पायजे. अशी लय बकरी पडायला लागली. जातीत श्रीमंत माणसं गरीबानला पिडायला लागली. गुरुजी म्हणला, जेजुरीच्या जत्रंत फड भरला. गुरुजींचं भाषण झालं. जुनं पंच लय कावले. देवाच्या इरुद्ध जातू म्हण गुरुजीलाच जातीबाहेर काढू लागलं. तर पोरं उभी राहिली. म्हण पंचाचा नांगा जिरला. न्हाय तर इपरीत झालं असतं. आता लोकांस्नी पटलंया की नवस लय बोलायचं न्हाय. आन् समद्यांनी मिळून एकच बकरं कापलं तरी भागतया. आजून आमाला भ्या वाटतं परं गुरुजी म्हणतूया, तवा ऐकतू."

तर यल्लप्पा वैदू, वैदू समाजातला. भीक मागून शिकलेला पहिला पदवीधर. कुठंही गेलं तरी यल्लप्पाचं नाव वैदू सांगतोच. यल्लप्पानं जिगरीनं लोळागोळा पडलेला समाज उभा करायचा प्रयत्न केलाय. जातपंचायतीची कडक बंधनं पत्करून हा उभा राहिलाय. जातीनं, त्यातल्या सावकारांनी पठाणी दरानं व्याज आकारलं तर हा त्यांच्या विरोधी उभा. सोलापूरच्या वैदूंनी बँकेचं कर्ज घेतलं. आता लोखंडी पत्रा व्यापाऱ्यान्कडून घेवून त्याला पैका द्यावा लागतो. टीन-मेकींगचा धंदा करणारी ही जमात आता जागी होत आहे. सोलापूरला महाराष्ट्र बँकेनं कर्जे दिली. अनिल अवचटांनी ती समारंभपूर्वक वाटली. परवा यल्लप्पा सांगत होता, "पहिला हप्ता आला, सगळ्यांनी भरला. दुसऱ्यांदा बँकेनं कर्जे दिली. बोलावून दिली. पहिला अनुभव अतिशय चांगला होता. सगळ्यांनी कर्जे फेडली, पण दुसऱ्यांदा पैसे थकले. बँकेनं तगादा लावला. यल्लप्पानं बैठक बोलावली. वाट्टेल ते करून पैसे भरा, पैसे भरले नाही तर जातीतून बाहेर टाकलं जाईल. जादूची कांडी फिरावी तसं झालं. सगळ्यांनी कर्जे फेडली आहेत. चुकार काही राहिलेत, पण तेही पैका फेडतील. दुर्गासारखी माणसं आडाणी आहेत, पण त्यांची नियत खराब झालेली नाही. त्यांना बँक पत विचारते. त्यांच्या जवळ पत नाही, पण त्यांची नियत चांगली आहे. त्यांना मत दिलंय, पत नाही. पण कष्ट करून उभं रहायची संधी मिळाली तर दुर्गासारखी माणसं उभी रहातील.

वैदू ही तर अशी जमात आहे, की जिनं आपले धंदे सतत बदललेत. आज तरुण वैदू मुलगा नोकरी नाही, धंदा मागतोय, हाताला काम मागतोय. आर्थिक स्थैर्य मागतोय. यल्लप्पा, सिधू, शिवाजी ही भटक्या-विमुक्तांच्या चळवळीची गोड फळं

आहेत. अंधार तर जीवघेणा आहे. अज्ञानाच्या चिखलात रुतलेला भटक्या विमुक्तांचा गाडा, बाहेर काढणं तसं सोपं नाही. पण दुर्गा असो, यल्लप्पा असो, मोतीराज राठोड, बाळकृष्ण रेणके, ना. वा. माने, शिवलाल जाधव, विलास वाडेकर, व्यंकप्पा भोसले आणि कितीतरी सांगता येतील. समाज जागा होतोय. हाजारो वर्षांच्या गुलामीला तडे जातायेत. सापानं कात टाकावी तसं कात टाकून, सळसळून उभं रहायचं. यल्लप्पा आता एकटा नाही. साथीला उठलीय एक वावटळं. नंगा-भुखा माणूस खडबडून जागा झालाय. वैदूंचा दवा लागू होवा म्हणजे झालं.

●

लातूरचा कत्ती-हातोडा मोर्चा

तर कधी कधी फार उद्वेग येऊन जातो. जीव वैतागून जातो. देश स्वतंत्र झाला. तळागाळातल्या माणसांच्या विकासाची भाषा लहानपणापासून ऐकतोय, पण तळागाळातला गाळ तर वाढतोच आहे. कधी-कधी वाटतं या देशाचा विकासच होऊ नये. चार-चौघांचा विकास आणि तळातल्या माणसांचं जीवन भकास होत चाललंय. विकासाच्या ठोकळेबाज कल्पनांनी उच्छाद मांडलाय. ग्रामीण भागात उसाच्या पिकाबरोबर मस्तीचं पीक येतंय. जनतेचे कोट्यावधी रुपये खर्च करून, जागतिक बँकांची कर्जे घेऊन प्रचंड मोठी धरणं होतायत. धरणाच्या पाटाचं पाणी बांधाबांधावर खेळतंय. पैक्याचं पाणीही बांधाबांधावर खेळतंय. उसाच्या कोंबासारखं मस्तीचं कोंब उभं करतंय, ग्रामीण भागातल्या शोषकांची शक्ती वाढतेय व गोरगरीब रयत देशोधडीला लागतीय. पैशापाण्याला मस्ती–एवढी धुंदी हाय की महाराष्ट्रातल्या ग्रामीण

भागात गोरगरीब माणसाच्या जगण्याचं वाळवण झालंय. माणसं खेडी सोडून शहराकडं पळाय लागलीत. बाया-बापड्यांची अब्रू सुरक्षीत नाही. गोर-गरिबांच्या जल्माला रया नाही. शोषणाची हत्यारं व शोषणाचे चेहरे बदलतायत. मूठभरांचा विकास अत्याचारी राक्षसाचं रूप घेतोय. त्यानं मला वाटतं, खरंच हा देश स्वतंत्र झालाय ? माझ्या विचारांची तंद्री तुटली ती एस. टी. च्या दणक्यानं. एस. टी. ला काय आडवं आलं म्हण ड्रायव्हरनं अचानक ब्रेक दाबला. एक धक्का बसला आन् एस.टी. पुना चालू झाली.

लातूरच्या लक्ष्मण गायकवाड धोंगावकर आणि शंकर भारती या तरुण तडफदार कार्यकर्त्यांची तार येऊन धडकलेली, 'भटक्या-विमुक्तांचा मोर्चा नक्की केला. लगेच निघा.' औरंगाबादहून प्रा. मोतीराज राठोड, आसाराम जाधव गुरुजी, उत्तम माने येणार असतात. मी सोलापूर, लातूर करत निघालेलो असतो. उस्मानाबाद स्टँडवर गाडी थांबते. एक गोसाव्यांचा तांडा एस.टीत घुसतो, तशी एस.टी.त जागा नसतेच. सारे उभे. ते आपसात बोलत असतात. "धुनी लावली.?", दुसरा म्हणतो, "लावली." तिसरा म्हणतो, "काय दिसलं ?" दुसरा म्हणतो "इबीत, झोळी कफनी चिमटा लोकानूला मस्ती आलीय, झोळ्या जाळत्यात." तिसरा म्हणतो, "घर फिरलं, घरासंग बासं फिरलं. न्ह्यात बदालली." चौथा म्हणतो, "कलीयुगाचा फेरा, पर कायतरी केलंच पायजे." पहिला म्हणतो, "झोळी जाळली तर, किती दिस भीक मागायची ? आपल्या माणसांचबी खरं हाय. नुसती झोळीच नाय जाळत, बेड्याबी जाळत्यात आन् मी तर म्हणतो, आपली माणसंबी आता शानी व्हाया लागली. गप गुमान मोर्चाला चला, काय म्हणत्यात ते तर बगू."

मी शांतपणे सारं ऐकत असतो. गोसाव्यांचा वैताग, त्यांचा संघटनेवरचा राग, ते घालत असलेल्या शिव्या, साऱ्यांची कणव येत असती. त्याच्या शिव्याशापात लातूर केव्हा आलं ते कळलंच न्हाय. स्टँडवर उतरलो. दिवस कासराभर वर आला व्हता. प्राचार्य डॉ. जनार्दन वाघमारे, प्रा. मुंडे, टी. एस. कांबळे सारी मित्र-मंडळी. शबनम आडकवली, पाय नेहमीसारखे वाघमारेसरांच्या घराकडे वळले. गावात 'कत्ती हातोडा मोर्चा' अशी छोटी-छोटी पत्रकं एकमेकांना लागून अनेक ठिकाणी चिकटवलेली. जवळ जाऊन पत्रक वाचलं. नेहमीसारखं. कैकाड्यांना शिंद्याच्या फाड्या मिळाल्या पाहिजे. मसन जोग्याला गावात घर मिळालं पायजे. वर लिहीलं होतं, 'स्वातंत्र्याचं झालं काय ?' खाली लिहिलं होतं, 'आमच्या हाती आलं काय ? घर नाय, दार नाय, जमीन नाय, जुमला नाय. आमचा देशाशी संबंध काय ?' पोस्टर वाचून सरांच्या घरी गेलो. सरांच्याकडं सारं उरकलं. वाघमारे सरांचा 'निग्रो' साहित्याचा, चळवळीचा मोठा व्यासंग. त्यांच्याशी निग्रो चळवळीच्या गप्पा केल्या. सरांचा निरोप घेतला अन् शाहू महाराजांच्या पुतळ्याजवळ दाखल झालो. तिथूनच निघणार होता मोर्चा.

उन्हं तापू लागली. लोक जथ्याने जमू लागले. परंपरागत वेशातले मसणजोगी, बाबा, बुवा, बैरागी, भोपे, भुते, आराधी तसेच गोंधळी, कैकाडी, माकडवाले सारे आपआपल्या परंपरागत वेशात. मसणजोग्यांनी मसणवाट्यातच न्हायचं. त्यानं गावात यायचं नाय. त्यांचा वेशही तसाच. कंबरंला गुंडाळलेला, सोडला तर उघडे बंब. केसांच्या जटांचा बुचडा, भगवान शंकरासारखा डोक्याच्या मधी. कानात बाळ्या, गळ्यात हातभर रुद्राक्षाच्या माळा. कपाळाला मसणवाट्यातल्या राखेचं टिळं ? खांद्यावर पाठोवर पोटावर सगळीकडं मसणवाट्यातल्या हाडांची राख. गाव यांच्या हट-योगाला घाबरतो तर हे गावाला घाबरत असतात. मसणवाट्यातच न्हायचं. प्रेताच्या अंगावरलं कापड वापरायचं, नवं कापड विकत घ्याचं न्हाय. मिळालं तर मसण-वाट्यातच खायचं, भीक मागायची न्हाय, शिळंपाकं घ्याचं न्हाय. 'अलख निरंजन' म्हणून पाच घरं पीठ मागायचं, सहाव्या घरी जायचं नाय. पाचच घरातल्या शिध्यावर प्रपंच रेटायचा, असंच धर्मानं सांगितलंय, असाच मसण जोग्यांचा तांडा उभा. बायकांच्या अंगावर लुगडी, गुडघ्यापर्यंत नेसंलेली. हातात कथलाच्या पाटल्या, कपाळाला कुंकवाचा मळवट. टकुऱ्याला केसाचा झाप. बाया घोषणा देत व्होत्या, 'आमाला घर मिळालंच पाहिजे,' 'हाताला काम मिळालंच पायजे,' 'आमी भीक मागणार नाय,' 'आमी चोरी करणार नाय.'

मसणजोग्यासारखाच दुसरा जथ्था. साऱ्यांचं लक्ष वेधत असतो. आराध्यांच्या डोक्याला पगडी; अंगावर घोट्यापर्यन्त मेनचाटलेला पायघोळ अंगरखा, हातात हातभर चिंध्या. काकडा पेटलेला. उजव्या बगलंतल्या बुदलीतलं गोडं तेल काकड्यावर सुटत असतं. काकडा नुसता धुरकटतो. जाळ होवू द्यायचाच नसतो. गळ्यात कव-ड्यांच्या माळा. सारा गळा कवड्यांनी भरलेला. हा आई तुळजाभवानीचा भक्त. साऱ्या गोंधळ्यांच्यातला क्षुद्र. जेवढ्या कवड्या जास्त तेवढा गोंधळी क्षुद्र-आकरमाशे. आई भवानीच्या नावानं हा जथ्था 'उदो उदो' करत असतो.

दुसऱ्या बाजूला चार माकडांच्या माकडचेष्टा लोक बघत असतात. घोषणांचा जोर वाढत होता. तरण्या पोरांचा उत्साह शिगेला पोचला व्हता. तांड्यातांड्याने बिनभिकार शाहू महाराजांच्या पुतळ्याजवळ जमत होता. बघता बघता ८–१० हजार लोकांचा जमाव जमला. मी शाहू महाराजांच्या पुतळ्याला हार घातला. थोडा नत-मस्तक झालो. क्षणभर मनात विचारयेवून गेला, 'हाच... एवढ्या मायेचा, रयतेचा राजा– ज्यानं आपला वाडा संरक्षणासाठी पारध्यांच्या हावाली केला होता.' शाहू महाराजांचा जयजयकार झाला. मोर्चा राजमार्गावरनं पुढं जाऊ लागला.

भटक्या विमुक्त जमातींचा एवढा मोठा या शहरातला पहिलाच मोर्चा. १०-२० कोसांतला बिनभिकार समाज लातूरच्या रस्त्यानं घोषणा देत शिस्तीनं पुढे सरकत होता. बायकापोरं, म्हातारेकोतारे सारे फाटक्या अंगाचे, फाटक्या कपड्याचे, खऱ्या

खुऱ्या भारताचं प्रतिनिधित्व करत होते. गोंधळी, मसणजोगी, कामठी, पाथरवट आठरापगड जाती. डुकरं, गाढवं, घोडे, पोपट, पारवे, शिंग, सांबरासह आलेले. हे इपरित काय हाय ते पाहायला लोक दुतर्फा जमलेले. बघ्यांची मोठी गर्दी झालेली. हा विलक्षण मोर्चा असतोही तसाच, मोर्चात सगळ्यात पुढं विराड घातलेला एक गाढव, त्याच्यावर बसलेलं एक माकड. गाडवाच्या मागं बैराग्यांचा तांडा. हातात शंख घेऊन एकजण म्हणायचा, "गरीबीच्या नावानं" की सारे बैरागी एका आवाजात शंख ध्वनी करत. दुसरा म्हणे, "सरकारच्या नावांनं." पुन्हा शंख ध्वनी व्हायचा. त्यांच्या मागं तरुण जोग्यांचा तांडा. त्यांच्या मागं बिनचोळीच्या वडारणी, वडार. त्याच्या मागं माकडवाले, कैकाडी, डवरी जोशी, जोश्यांच्या हातातले पोपटांचे पिंजरे. त्याच्यामागं संबुळ घेतलेले गोंधळी. प्रत्येकजण आपआपल्या पद्धतीनं घोषणा देत होते. काहीना तर घोषणाही देता येत नव्हत्या. ते नुसते 'की जय' एवढेच म्हणायचे. तर सारी मंडळी स्वातंत्र्याच्या नावानी शंख वाजवत, गरीबीच्या नावानं शिमगा करत आपल्या बायाबापडयांची आब्रू सुरक्षीत नाही म्हणून टाहो फोडत, कलेक्टर कचेरी समोर जमा झालेली. लक्ष्मण गायकवाडनं जिल्हाधिकाऱ्यांची माईक व मोर्चासाठी परवानगी घेतलेली. जिल्हाधिकाऱ्यांची भेट व्हावी म्हणून पूर्वनियोजित वेळ घेतलेली. मोर्चा कार्यालयाजवळ आला. लातूर नुकताच जिल्हा झालेला. गावाच्या बाहेर तुटक असलेलं हे कार्यालय. कार्यालयापुढून रहदारीचा मोठा रस्ता. चारी बाजूनं चार कंपौंड. कार्यालयापुढं मोठं आवार. आवारात मोठी रिकामी जागा. पोलीसांनी मोर्चा आडवला. मी मोर्चा थांबवून, पोलिसांना मोर्चा रस्ता सोडून आवारात घेऊ देण्याची विनंती केली. "आम्ही शांतपणे आलो आहोत. आम्हाला थोडं सावलीला टेकू द्या. लोक उन्हातनं आलेत" ही मागणी अमान्य करण्यात आली. लोक पोलीसांवर संतापले होते. संयमाने मोर्चा, रस्ता व जिल्हाधिकारी कचेरी यांच्या साईड पट्टीत असलेल्या हागनदारीत स्थिरावला. लोक दाटीवाटीनं बूड टेकून बसले.

तशी हागनदारी हीच आपली वतनदारी. कार्यकर्त्यांची भाषणं सुरू झाली. तेवढ्यात आतून साहेबांचा निरोप आला, 'भाषणं बंद करा, माईक बंद करा.' मी माईकची परवानगी असल्याचं लक्षात आणून दिलं व भाषण चालूच ठेवलं. पोलिसी अत्याचाराच्या क्रूर कथा जाहीर मांडल्या जात होत्या. पोलिस, जिल्हाधिकारी सारे ऐकत होते. पुन्हा निरोप आला. मी शिष्टमंडळाला भेट देण्याबद्दल पोलिसांना सांगितलं. त्यांनी मला कार्यालयात बोलावलं. बरोबर निवडक कार्यकर्ते घेतले आन् काही पत्रकारही होतेच. जिल्हाधिकाऱ्यांना भेटून सारं निवेदन द्यावं, लोकांचं म्हणणं त्यांना सांगावं, यासाठीच तर लोक उन्हातानातनं पायी चालत आलेत असं सांगावं, म्हणून गेलो. तर इन्स्पेक्टर पाटील आतून बाहेर आले. साहेबांची मिटींग चालू आहे,

साहेब भेटू शकत नाहीत, असं सांगितलं. आता मी थोडा संतापलो होतो. "साहेबांनी भेटायला बोलावलं, शिष्टमंडळाला भेटायचं कबूल केलंय, असं तुम्हीच म्हणाला होतात. आम्हाला इथं घेऊन आला अन् आता आत मिटींग चालू आहे म्हणता, याचा अर्थ काय?" असं मी म्हणालो. तसेच पत्रकारही म्हणाले, तेव्हा इन्स्पेक्टर म्हणाले, "ते मघाशी म्हणालो होतो, आता नाही. आता साहेब भेटू शकत नाहीत." आम्ही कार्यालयात भेटण्याचा प्रयत्न केला, पण पत्रकारांनी लोक बाहेर दंगा करण्याच्या मूडमध्ये आहेत, तुमी थांबा असे सांगितल्यानं आम्ही परत आलो. तोपर्यन्त काहींनी दगडफेक सुरूही केली. होती. आम्ही येताच एकच कालवा झाला. कार्यकर्त्यांनी लोकांना शांत केलं. घडलेली हकीकत लोकांना सांगितली. लोक संतप्त झाले होते. कोणत्याही क्षणाला दंगल होईल हे मला दिसत होतं, म्हणून त्याही स्थितीत लोकांना आवर घातला. जाहीरपणे जिल्हाधिकाऱ्यांचा निषेध केला. तेवढ्यात बोलविल्या धन्याबरोबर जिल्हाधिकारी गाडीचा धुराळा उडवत निघून गेले. लोक गाडीमागं पळू लागले. काहींनी दगडफेक केली. पोलिसांनी किरकोळ लाठीमार केला. पण पोलिस व कार्यकर्त्यांच्या जागरूकतेने पुढील प्रसंग टळला.

साधं निवेदन घेण्याची बुद्धी ज्या शासन-यंत्रणेला नसते, त्याबद्दल काय बोलावं? मी ब्रिटिश अधिकारी पाहिले नाहीत, पण याहून ते वेगळे असतील काय? गोरगरीब मानसं, 'मुकी बिचारी कुणीही हाका,' काय करणार? बरं, जरा आगाऊपणा करावा तर ही गुन्हेगार जमात. गुन्हेगारी कायदा नावाला रद्द झाला असला तरी त्याचा प्रभावी अंमल चालू आहे. अद्यापी पोलीसांकडे गुन्हेगार जमातीच्या याद्या आहेत. भाषणांच्या सुरवातीलाच झोळ्या, वेडद्या व गुन्हेगार जमातीच्या याद्या याची प्रतिकात्मक होळी झालेली असते. पण उलट्या काळजाच्या पोलीसांना त्याचं काय? पोलिसी अत्याचाराच्या कथा एवढ्या भयानक आहेत की, त्या लिहवत नाहीत की बोलवत नाहीत.

लक्ष्मण गायकवाड सांगत होता आणि मोर्चातली ती बाई उठून उभी व्हाऊन मान खाली घालून रडत होती. तिला भिंत्या करूनही ती पुढे येईना. लक्ष्मण गायकवाड तिच्या जवळ गेला. समजूत घातली. अखेर बाई मोर्चापुढं येऊन उभी व्हायली. पार्वती मुय्यलवार, चाळीशीतली बाई. काळ्या रंगाची, नाका-डोळ्यानं तरतरीत, अंगावर दंडाचं लुगडं. हातभर पदर काढलेला. अंगठ्यानं माती टोकरीत टोकरीत म्हणली, "ऐतवारी मसणवाटच्यात माणसं येत व्हती. मी, माझ्या पाच-सहा पोरं, नवरा, माझ्या दिराची पोरं, अशी समदी मैतीमागं पळत व्हतो. मयत तालीबाराची व्हती. खारका, खोबरं, गुलाल, अबीर, पानं, फुलं अन् पैसे, सारकं उधळत व्हते. आमी समदीजणं येचत व्हतो. दोन इसा आन चार रुपयाचा खुर्दा जमला. साऱ्या आदिल्या-पावल्या, धा पैसं, पाच पैसं व्हतं. मी आन् माझ्या दाल्ला हारकुन

गेलो व्हतो. दाल्ला पेदाड म्हण म्या ग्वाड बोलले. दाल्ला अन मी पेठंत गेले. माह्या दाल्ल्यानं तीन धा अन् साडेतीन रुपये दिले. माह्या कोरं लुगडं घेतलं. विराडातं मागारी आले. पोरं खेळत व्हती. माह्या जीवाला लई हारूक झाला व्हता. कवा घडी मोडंन असं झालं व्हतं. पोरान्ला लांब पिटाळलं अन् भरभरा नवं लुगडं नेसलं. माह्या दाल्ला घोटायला गेला व्हता. म्या दुकानाला गेले. 'चा 'ची पुडी, साकार, मीठ, मिरच्या, कोरड्याशाला समदं वटयात घेतलं. उरल्यालं पैसं हातातच व्हतं. माह्या नादात मी तरातरा येत होते तर मागून आवाज आला. म्हण मागं बगितलं तर हावलदार झोकांडया खात खात मला हाका मारत व्हता. म्या घावरून गेले. का करावं? डोकं भणाणलं. चित्रागत जाग्यावर उभी व्हते. हावालदार जवळ आला आन् म्हणाला, 'रांडं, नवं कोरं लुगडं चोरतीस व्हय! चोर अवलादीची. म्या कालपासनं पाळतच ठिऊन हाय.' काय व्हतंय ते धेनात आलं, तवा लुगडं निऱ्यांत आडकलं व्हतं. मी मटदिशीनी खाली बसले. पर हावालदारानं तवर हिसडयानं लुगडं फेड्डून घेतलं व्हतं."

बाई बोलायची थांवली आन् ढसढसून रडाय लागली. तिला बोलता येईना. मी आवंढा गिळला. तिला खाली बसायं सांगितल. लक्ष्मण गायकवाड सभेला माहिती देत व्हता. भर रस्त्यात पोलिसांनी या बाईच्या अंगावरचं लुगडं फेड्डून घेतलं. वटयातल्या किराण्याच्या पुडया, मीठ मिरच्या सारं विस्कटून गेलं व्हतं. बाई पळत शेजारच्या झोपडयात घुसली. तिथल्या बायकांनी तिजी आब्रू राखली. साऱ्या बायका चवताळून पोलिसाच्या मागे पळाल्या. तवर पोलिस गडप झाला व्हता. पोलिस रस्त्यानं बडबडत निगाला व्हता, 'ह्या रांडंच्या गांडोवर एवढं चांगलं लुगडं आलं कुठनं. मसनवाटयात न्हानार, भिकार औलादीची. आपली नोकरी घालवत्याल, च्या आयला!' तर पोलिस ते नवं लुगडं घेऊन जातो. गावातल्या कुणाची तरी तक्रार आलेली आसते, 'वाळत घातलेलं नवं कोरं लुगडं चोरीला गेलं,' अन् मसणवाटच्या बाईच्या अंगावर कोरं लुगडं असतं, आणखी काय पायजे. लक्ष्मण गायकवाडनं चौकशी केली. पुढं तर आणखीनचं तमाशा झाला व्हता. ज्यांची तक्रार होती त्यांच्याकडं गेलं तर संबंधीत माणूस ते लुगडं आपलं नाही असं सांगतो. पोलिसाला बरचं झालं. ऐतं घबाड घावलं. 'हापापाचा माल गपापा.' नाहीतरी नवं लुगडं मिळालं. या गरीब बाईच्या आब्रूचं खोबरं झालं. त्याला तो तरी काय करणार! या बाईचा जन्म जवाहरलाल नेहरूंच्या पोटी थोडाच झाला व्हता? आसली बाई म्हण काय झालं, गुन्हेगारच ना!

एक ना दोन अनेक कथा सांगितल्या गेल्या. प्रश्न असंख्य आहेत. उत्तरं मिळण्याची अंधूकही शक्यता दिसत नाही. सत्तेवरल्या गांधारीच्या डोळ्याला लावलेल्या पट्टया उचकटण्याचं सामर्थ्य या दुबळया हातांत नाही. सत्तेच्या खुर्चीला सुरुंग

लावण्याचं संघटनेचं ऐक्य जोवर येत नाही, तोपर्यंत जनतेचा विवेक जागं करणं, जागल्या होऊन साद घालणं, मोठ्या प्रमाणात चळवळी करणं, अन्याय अत्याचारांच्या विरोधी जनमत संघटीत करणं, यासाठी डोक्याला अन् पायाला चक्र बांधणं याशिवाय पर्याय नाही. मोर्चाची सांगता झाली.

मराठवाड्यात निर्माण होणारा नवा वर्ग, नव्या पाटाच्या पाण्याची रग मस्ती यांनी मातलाय, नुकत्याच वयात आलेल्या पोरासारखा. 'आधीच मर्कट, त्यात भांग प्याला' अशी इथल्या शोषक वर्गाची स्थिती झालीय. परंपरागत सरंजामी व्यवस्था ज्यांच्या हाती होती, त्यांच्याच शेताला पाटाचं पाणी गेलं. निराश्रित गोरगरीब रयत यांच्या टाचेखाली रगडली जाऊ लागली. कुणा गोरगरीब बहिणीची अब्रू यांना कवडीमोल वाटली, तर नवल काय! पाटाच्या पाण्याची अन् सत्तेच्या खुर्चीची मस्ती. बिचाऱ्या गोरगरीब जनतेला, मग ती कोणत्याही जाती पंथातली असो... कोणत्याही धर्मपंथातली असो...तिला आणीबाणीच आहे, हे नक्की. एक नवा शोषकांचा वर्ग निर्माण होतोय, हे नक्की. बेगुमान लोकांच्या प्रपंचावर नांगर फिरतोय, हे नक्की. मग बथ्थड नोकरशाहीनं हात धुवून घेतला नाही, तर नवल काय!

मोर्चातले लोक सांगत होते : जिल्हाधिकारी कचेरीत त्यावेळी लातूरच्याच एका मंत्र्याचा भाऊ कलेक्टरसमवेत बसला होता. आणि गाडी धुराळा उडवीत गेली, तेव्हाही हे साहेब बरोबरच होते. तर मंत्र्याच्या घरचा वरद-हस्त असताना साहेबांना बिनभिकारांची भीती तरी का वाटावी? माणुसकीला हापापलेल्या, आणि माणुसकी आटलेल्या, सामान्य माणसाबद्दलही अविश्वास बाळगणाऱ्या, गाव व गावगाडा यापासून दोन हात दूर रहाणाऱ्या, एका अर्थानं गावच्या वाऱ्यालाही न उभारणाऱ्या या जमातींना व्यापक समाजाचा विश्वास कसा मिळवून द्यायचा हा प्रश्नच आहे. पण लातूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना त्याचं सोयरसुतक असण्याचं कारणच काय! लातूरच्याच परिसरात कलेक्टरसाहेब डोळे उघडून पहातील तर असंख्य अन्यायाच्या कथा त्यांना दिसतील. त्यांना दिसेल गावागावच्या अंधारात चाललेली जीवघेणी लढाई–जिथं मग्रुरांचीच सत्ता आहे, कलेक्टर साहेबांची नाही!

असाच दुसरा एक प्रसंग गरीब भटक्यांनी मोर्चापुढं सांगितला. तो म्हणाला, "सायब मी टकारी भामटा. संता मुचलर. सडकेच्या कडंला व्हाणार. आज हे गाव उद्या ते गाव फिरतोया. जल्मानं गांगलोय. काम नाय, धंदा नाय. भीक मागत जगतो. आता आमच्या बिराडावर नवी कोरी चादर पोलिसाला दिसली. त्यो आला बिराडावर. मला इचारलं. तर म्या सांगितलं इकात आणली. काय केल्या पोलिस ऐकंना. लागला शिव्या द्यायला. मी पावती दावत व्हतो. तर त्यानं मानला नाय. चल म्हणला ठेशनाला. हातापाया पडलो तर लागला दणकायला." त्यांनं अंगातलं आंगरट काढून अंग दाखवलं. अंगावर काळंनिळं माराचं वळ उठलेलं दिसत व्हतं.

या पोलिसांनी, या माणसांच्या बायकोमुलांनाही मारलेलं असतं. एवढ्यावरच निभावलं नाही तर त्याच्याकडचं किडूकमिडूक विकून पोलीसांना लाच द्यावी लागली, तब्बल ५० रुपये. तेव्हा त्याची सुटका झाली.

एक गोसावी सांगत असतो : त्याला एका चोरीच्या संशयावरून अटक करण्यात आलेली असते. तो लातूरला एके ठिकाणी कामाला असतो. पण पोलिसांना विश्वास नाही. त्याला अटक करून वेठीला धरलेला असतो. बायकोला शेत विकणं भाग पडतं. शेतही पोलिसांच्याच मध्यस्थीनं विकलं जातं. सारा पैसा हडप होतो. तेव्हाच त्या गोसावड्याला सोडलं जातं. तर अशा अनेक कथा पोलिसांसमक्ष नावनिशीवार हजारो माणसांच्या साक्षीनं सांगितल्या जात व्हत्या. पोलिस अधिकारी समोर असताना त्यांच्या तोंडावर सामान्य, फाटक्या अंगाची ही माणसं आरोप करत होती व पोलिस माना खाली घालून ऐकत होते. पण 'अंधेर नगरी अंधेरा राजा, टक्केसे भाजी टक्केसे खाजा' आंधळं दळतयू. कुत्रं पीठ खातयू त्याला करायचं काय !

मोर्चा संपल्यावर कार्यकर्त्यांशी बोलत होतो. मधाच्या पोळ्यावर दगड मारावा नि अत्याचारांची सारी मोहळं आपल्यावरच तुटून पडावीत तसं अत्याचारांच्या माशांचा घोंघावता थवा माझ्या चारी बाजूनं घोंघावत होता. एकेकाच्या जल्माची चित्तर कथा. मी हादरून गेलो होतो. पारध्याची एक बाई आन् चार बापे जवळच बसले होते. बाई खास तिच्या पद्धतीनं सांगत होती, "तुह्या सरकारला सांग, पारध्याला गोळ्या घालून मारून टाक म्हणावं. आमची वंशबुडी झाल्यावर चोरी व्हणार नाय. कुटं खुट व्हणार नाय." 'तुह्या सरकारला सांग' हे तिचं वाक्य खरं म्हंजे इतकं लागत असतं. पण मी तिला आडवत नाही. ती पुढं सांगत असते, मला सरकारचा प्रतिनिधी समजून, "तुह्या सरकारला मी माह्या सरकार तवा म्हणंन, जवा तुह्या सरकार माह्या ह्या पोरांच्या डोक्यावर छप्पर उभं करल. तुह्या सरकारला मी माह्या सरकार तवा म्हणंल जवा तुह्या सरकार माह्या माणूस म्हणंल. तुह्या सरकारला सांग, पारध्यानं कंच्या जलमाचं पाप केलं म्हण त्यानं रानोमाळ हिंडावं, आन् गावातल्या माणसानं कंचं पुण्य केलं म्हणं त्यानं एका जागेला व्हावं, पोरंबाळं शिकवावं, हौसमौज करावा? तुह्या सरकारला सांग आमी भुतं हाय भुतं. मसनवाट्यातली. माह्या भनीला लातूर जिला बंद, तिह्या नवऱ्याला औरंगाबाद जिला बंद. माह्या भन अन् म्हेवना चालत नांदेडाला येत्याला तवा भेट. तुला का सांगू. आमची दोन दोन वर्साची पोरं गुन्हेगार असत्यात. आमची पोरंबाळं जेलात जलमत्यात. तुह्या सरकारला सांग. आमी माणसं हाय का भुतं? म्हण म्हंते, आमा समद्यास्नी एकदमच मारून टाक. म्हंजी सुटलं सरकारबी आन् आमीबी."

खरं म्हणजे ही तोंडानं मुकी असलेली माणसं बोलायला लागली, आग ओकू लागली तर खरोखरचं वणवा पेटेल. यांच्या अक्काळविक्काळ दाढा वाजू लागल्या तर

प्रस्थापिताचा आवाज घशातच आडकेल. त्याला घर-घर लागेल. पण आज अशा असंख्य दडपलेल्यांचा आवाज घशातून बाहेर फुटतच नाही. साधी अन्यायाची नोंदही होत नाही. यांचं अंधारी मरण कोणाच्याच डोळ्याला दिसत नाही. पण ही माणसं जागी होऊ लागलीत. असंख्य वर्षांचे कढ दाटून येऊ लागलेत. ती रस्त्यावर येऊ लागतील. मग निरोसारखा लातूरचा जिल्हाधिकारी किती काळ चैनीत फिडेल वाजवत बसेल ? त्याला जाग ही आणावीच लागेल !

•

जोगवा दे अंबे, आनंद दे !

उघडा बोडका माळ सरत आला तवा दिस पार कलला होता. बाळकृष्ण रेणके, आबा अन् मी झपाट्यानं चाललो व्हतो. माळावरची पायवाट हळूच वगळटात शिरली. दोन डगरींच्या मदनं वगळटातनं बराच येळ चाललो. दिस कवा बुडला उमागलंच न्हाई. कडुसं पडलं व्हतं. अंदार दाटून आला व्हता. वगळटाची वाट आता पांदीला लागली व्हती. पायवाटंची पांदीत गाडीवाट झालेली व्हती. पांदीच्या दोन्ही अंगाला गच्च बसल्याली शेवरी, लिंबोणी आन् आंब्याची झाडं. त्यांनी काळोख आणखीनच गडद झाला व्हता. म्होरं जाया लागलो तसं नाकाला गावंदर जवळ आल्याचं समजाय लागलं. आबा खाकरून म्हणला, 'मानेसायब, उलीकसं म्होरं बगून पाय टाका. गावंदर आली न्हवं. च्याआयला, समदी वाटंतच बसल्याली असत्यात. उगं पाय भराय नगं.'

आबाच्या घरच्या कंदुरीला जायचं हे बऱ्याच दिसांपसनं ठरलेलं असतं. बाळकृष्ण रेणके आमच्या संघटनेचा सरचिटणीस. भटक्या-विमुक्तांच्या चळवळीतला अनुभवी कार्यकर्ता. आबानं लईच वहिदाची चिमट लावली म्हणून त्यो मंबईवरनं आल्याला. आबानं सारकं ढुमणं लावलं व्हतं. 'सांजच्याला ताऱ्याला सुपारी दिलीया. पावनं-रावळंबी जमत्याल. समद्यास्नी वळक व्हईल. बारीकशी सभा करू. आमचे लोक लई आडाणी. त्यान्ला संगटना म्हाईत व्हईल.' वाटेत भटक्या-विमुक्तांच्या प्रश्नांच्या गप्पा, चुटके सांगत आम्ही आलेले असतो. काही वेळा मोठी चमत्कारिक अवस्था असते. लोक तावातावानं बोलत असतात. आपण नुसतं रापत बसायचं. एक अक्षर कळत न्हाय. बरोबरच्या कार्यकर्त्यानं दुभाष्याचं काम करावं तवा कुठं उजेड पडला तर पडला. नायतर नुसता कालवाच आपल्या कानासाठी पुरतो. कितीदा तर भाषा मराठीच असतीया पर आपल्याला उमगत न्हाय. आता हीबी मराठीच असती पर ती भटक्यांची मराठी हाय. भटक्यांच्या मराठीवर बराच वेळ बोलणं चालल्यालं असतं. गुडसा, बोटी, चानी, वार, रेवाटी कितीतरी शब्द.

गावंदरीचा वास नाकानं घेत घेत आमी गावात शिरलो. 'हे आलंच बगा,' आबाचा परवलीचा शब्द असतो. अखेर आमी गोंधळ्यांच्या वाड्यात शिरतो. आबाच्या घराम्होरं माणसं कोंडाळं करून बसलेली असत्यात. बाया-पोरांची उलघाल चालू असती. आमी आल्याचं बगताच आबाच्या आईनं वलणीवरल्या वाकळला झडा-झडा झाडून घराम्होरं सारवलेल्या जागंत हातरलं. पायातली पायतानं बाजूला सारली तवर आबानं टावेल म्होरं केला. टावेलानं झटाझटा अंगावरला फुफाटा झटकला. आन् दोगबी वाकळंवर टेकलो. घरातनं तांब्याभर पाणी आलं. पाणी झाल्यावर 'चा' आला. माणसं जमतच असत्यात. समदे पावणं-रावळं, भाव-भावकी. चूल-बंद आवतन असतं. आक्की भावकी आबाच्या दारात असते. बारक्या पोरी नाचत असत्यात, खेळत असत्यात, उड्या मारत असत्यात. फुफाट्यानं पोरांचा अन् पोरांनी फुफाट्याचा नुसता हैदोस घातल्याला असतो. त्यानं सारका फुफाटा उडत असतो. पोरं, कुणी तुणतुण्याच्या तारा जोडत असत्यात तर कुणी अतिउत्साही संबुळावर आडव्या उभ्या काटकांनी, टिपऱ्यांनी वाजवत असतो. तर घराच्या मागच्या बाजूला तुटाक चर खणल्याला असतो. चरावर पासं अन् पासंवरं आधान रटरटत असतं. आबा हाक मारतो म्हण आमी दोगं घरामागं गेलो. तर चुलीवर एक 'चापली' आदनात तिकट-मीट घालत असते. (चापली म्हणजे बाई, हा खास गोंधळ्यांच्यातला शब्द.) दुसरी चुलबानात निरगुडीच्या लाकडाचं जळाण घालत व्हती. आबाचा 'बा' रकट्यावर बसून नुसत्या आरडरी सोडत होता. एका हातानं तोंडाला चिलीम लावायचा, दुसऱ्या हातानं चिलिमीच्या तोंडावर दाबायचा. तोंडानं चिलीम वडायचा आन् भकाभका धूर सोडीतच बोलायचा. म्हातारा मॅनेजरकी करायचा. पड्याल्ल्या

बाजूला पंधरा-इस बाया हारीनं चुली मांडून भाकऱ्या बडबत होत्या. त्यानं धुराचा नुसता कोंब झाला व्हता. आमी म्हाताऱ्याची चौकशी करायची म्हण तितं टेकलो. तेवढ्यात पोरं वरडत आली, 'तापा आला, तापा आला.' आबा ताडकन उभा व्हायला. 'तापा आला. मानेसायब, रेणकेसायब, तुमी बसा हतंच. मी ह्यो आलोच.' म्हणून आबा निगून गेला. तापा आला म्हणजे मला वाटलं असलं जागरणाच्या ताप्याबाणी नायतर तमाशाच्या ताप्याबाणी. आता तापा म्हणलं म्हंजी बेंडाचा तापा. लय तर १०–१५ माणसं. तमाशाचा तापा म्हणलं का १५–२० जणांचा तापा. तर जागरणाचा तापा म्हणलं की वाघ्यामुरळी अन् सुरत्या–लई तर चार माणसांचा तापा. आता तमाशाला बाई लागती, जागरणाला तर बाई लागतीच. वाघ्यासंगं मुरळी नसंल तर जागरणच व्हायचं नाय. तसं गोंधळांचं नाय. गोंधळाला बायामाणूस लागतंच असं न्हाय. आन् हतं तर गोंधळ्याच्यांतच गोंधळ आसला तर ताप्याला काय तोटा?

ताप्यासाठी झालेला 'चा' बगून आबा हाक मारतो. म्हण आमी पुना अंगणात जातो. ताप्यातला म्हातारा गोंधळी मोठ्यानं, तावातावानं काईतरी सांगतो. मला समजत नाय, पण थोड्या येळात आबाची माणसं (बायको) सुपात खारका, खोबरं सुपाऱ्या, पानं, हळदीची खांडं, आन् घवू आणून ठिवत्यात. म्हातारा गोंधळी खालीवर बगतो, आन् खेकासतो, 'आगं, हळदीची खांडं हायत, पर लेकुरवाळी कुटायत?' बाई चपापती अन् हळदीची खांडं बगू लागती. मला ही 'लेकुरवाळी' काय भानगड हाय, हे कळत नसतं. बाई गपचूप उठून घरात जाते आन् फाट्याफाट्याची चार-पाच हाळकुंडं घेऊन येते. फूट असलेल्या हाळकुंडाला लेकुरवाळी म्हणत्यात. लेकुरवाळी हाळकुंडं असल्याशिवाय चौक भरता येत न्हाय. म्हातारा हाळकुंडं खालीवर बगतो आन् चौक भरायला सुरू करतो. तर आबाची आई लुगड्याच्या निऱ्याचा सोगा हातात धरून तरातरा गावात निगून जाते. तर आबा मंडळींच्या जेवणाची तयारी करत असतो!

गावात गेलेली आबाची आई हातात बैरणाच्या चिपाडाची सात-आठ धाटं घिवून येते. आबाची माणसं (बायको) पाण्याची कळशी आणून ठिवत्यात. त्या कळशीत गोडं त्याल असतं.

त्यो म्हातारा गोंधळी आता रंग-भरणीला लागतो. एक चांगलसं चौरंगासारखं पांढरंधबाट धोतर हांतरतो. देवीचा रंग भराया लागतो. देवीचा रंग भरायचा म्हंजे एक चौकोन काढायचा. त्याच्या प्रत्येक कोपऱ्यावर सुपारी, हाळकुंडं, खारीक, खोबरं आन् पानाचा इड ठेवायचा. मध्ये घवाचा ढीग करायचा. तेजावर तांब्याचा कळस ठिवायचा. कळसात पाणी ठिवायचं. कळसाच्या तोंडावर पाच पानं ठेवायची. तेजावर नारळ. म्हंजी सत्यानारायणाच्या पूजेसारखं. फरक एवढाच की, हतं बामन

नसतो, गोंधळी असतो. आन् दूसरं म्हंजे दिवटीची थापना करायची असते. रेणके हाळूच मला चिमट काडून सांगतो, आमी रेणूराई गोंधळी. गोंधळ्यांच्या तशा दोन जाती. एक रेणूराई गोंधळी, दुसरा कदमराई गोंधळी. समदे गोंधळीच, पण लई फरक हाय. रेणूराई गोंधळी स्वतःला बंदा रुपाया, उच्च गोंधळी समजत्यात. ते कदमराई गोंधळ्यांशी, रोटीबेटी येव्हार करत नाय. आता कदमराई गोंधळी काय कमी हायत ? तेबी स्वतः रेणूराई गोंधळ्यावनं वरचे समजत्यात.

रेणके मला समजावून सांगत व्हता गोंधळ्यांच्यातला फरक. म्हाताऱ्या गोंधळ्यांच्या तितं पोरांनी रेटारेटी सुरू केल्याली. पोरांचा कालवा झाला की, म्हातारा खेकसायचा तवर आबाचा म्हाताराबी पूरतवणीला येऊन बसल्याला. त्यानं पोरांच्यापेक्षा ह्या दोन म्हाताऱ्यांचाच कालवा वाढला होता. म्हाताऱ्याच्या हातातल्या दिवटीकडं बोट दाखवून रेणके म्हणाला, 'रेणूराई गोंधळी दिवटी वापरत्यात. तीन-साडेतीन फूट लांब असते.' तो हासत म्हणाला, 'जर रेणुराई गोंधळ्यानं चुकून जरी बारीक दिवटी वापरली तर त्याला जातीतनं बाहेर काढत्यात. तसं आमी चौसष्ट कवड्यांचं गोंधळी. लई उच्च. एखाद्या गोंधळ्यांनं चौसटपेक्षा कमी कवड्यांची माळ घातली का त्यो कमीतला. म्हणून चौसट कवड्यांपेक्षा कमी माळ कुणी घालत नाय. म्हण चौसटपेक्षा कमी नाय, जास्त नाय, तो उच्चवर्णीय गोंधळी.'

मी कुतूहलाने म्हाताऱ्याकडं पाहतो. त्यानं लांब घोळाची, गुढग्याच्या खाली आन् घोट्याच्या वर व्हाईल अशी शेरवानी घातलेली असते. डुईवरचा लालभडक कोशा डाव्या हातानं म्होरं सारल्याला असतो आन् मागचा सोगा डोक्यातच खवलेला असतो. गळ्यात चौसट कवड्यांची माळ, देवीचा कंठा, साज. हातात चांदीची कडी, तर कानात भिकबाळ्या असत्यात. दुसऱ्या हातात तुणतुणं आसतं. ताप्यातले बाकीचे साथीदार मात्र साद्या धोतर सदऱ्यातच आसत्यात. म्हातारा रंग भरून दिवटी रवतो. दिवटी लांब असते. लोकंडी 'ठावरा' असलेली आन् टोकाकडं निमुळती होत गेलेली दिवटी जमिनीत रुतवतो. ती आबाचा भाव म्हंजे नवरदेव आणि त्याची बायको पेटवत्यात. म्हणजे आबाच्या भावाचं लगीन झाल्यावर ह्यो गोंधळ, म्हण ते दोगं नवरा-बायको दिवटी पेटवतात म्हणजे प्रतिष्ठापना करत्यात.

तवर वाद्यं बाजू लागतात म्हणून आमी जवळ जाऊन बसतो. देवीचा नैवेद्य येतो. नैवेद्य चौकासमोर ठेवून आबाची आई बाजूला व्हते अन् म्हातारा गोंधळी सुरू करतो 'उदो ग अंबे उदो, उदो ग अंबे उदो.' देवीच्या स्तवनाला सुरुवात झाली. एका लईत, एका मस्त ठेक्यात संबुळ वाजाय लागतं. तुणतुणं सूर लावतं. एका पोराच्या हातातल्या घुंगऱ्या अन् दुसऱ्याच्या आवाजातलं किणकिणतं टाळ साऱ्यांची लय जमवून आणतं. आन् म्हातारा एका गोड सुरात देवीचं स्तवन म्हणायला लागतो.

जोगवा दे अंबे, जोगवा दे.
भवानीच्या नावे, अंबे जोगवा दे.
जोगवा दे, सदा आनंद दे.
भवानीच्या नावे, अंबे जोगवा दे ॥ धृ ॥
आईच्या जोगव्याचा काला
त्यानं शेंदूर झाला ओला
आईच्या जोगव्याची रोटी
त्यानं काया झाली मोटी
जोगवा दे, सदा आनंद दे. ॥ १ ॥
सेवा मांडली रेणक्यांनी
देऊळ बांधलं पांडवांनी
शहर वसवलं कासारांनी
वस्ती घातली सोनारांनी
आईच्या चाफ्याला आला भार
कळ्या तोडून गुंफिला हार
जोगवा दे अंबे, आनंद दे.
भवानीच्या नावे, अंबे जोगवा दे. ॥ २ ॥

तर म्हाताऱ्याचा सूर एका टिपेला लागलेला. प्रत्येक ओळ साथीदार मागं झेलत असतात. वाद्यं मागं वाजत असतात. कडव्यामागनं कडवी चढत असत्यात. संबुळाच्या ठेक्यानं सारा गोंधळीवाडा नाचत असतो. आबाचा भाऊ, त्याची नववधू आता रातभर दिवटीत तेल घालत बसणार. उठायचं नाय, तर देवीचं भजन, पूजन स्तवन सारं बैजवार झालं. आता नैवेद्य दाखवला जाणार.

गोडाचा निवद दाखवला आन् सवाशणी जेवाय बसल्या. आता सवाशणी बसल्या जेवायला सातजणी. तर रेणके सांगतो. 'ते बग, ती पयली हाय ना, ती पाटलीन. रेणुराई गोंधळ्यांच्यात रेणके, शिंदे पाटील घराणी. यांचा मान पयला. त्यात रेणक्यांचा मान मोठा, शिंदे त्यानंतर.'

आमचं बोलणं चालू असतं. तेवढ्यात मधेच म्हातारा गोंधळी गाणं बंद करतो. आन् अंगात आलेल्या माणसासारखं हातवारं करत म्हणतो, 'रेणुका अंबा अंबिके, महालक्ष्मी कालिके, तुळजाभवानी, सप्तशृंगी, चतुःशृंगी, अष्टभुजादेवी, जरीआई, मरीआई, साती आसराई, आई उदो ग अंबे उदो. पोरा लेकरांन्ला सुखी ठेव, पाचाचं पन्नास होऊ दे. आन् येल मांडवाला जाऊ दे. उदे, उदे, उदे.' लोकही मागं म्हणतात 'उदे, उदे, उदे,'

तर तिकडं बाया जेवायला सुरुवात करतात. आन् इकडे आबा, शिवा, सोनबा

आन् बाळकृष्ण रेणके गोंधळ्यांचा इतिहास सांगत असतात.

कवड्यांचा मोल मोठा. चौसट कवड्यांचा रुपाया. कवड्यांचचं दागिनं म्हणजी कवडीला मोल. म्हणून आजही आपण म्हणतो 'कवडी-मोलाच्या.' कंठे, माळा, देवीचा साज, सारं कवड्यांचंच. कवड्यांना गोंधळ्यांच्यात फार प्रतिष्ठा असते. रेणूराईची भाषा गुप्त आहे. तिला फारशी म्हणतात. गुप्त बोलण्यासाठी, बातम्या पोचवण्यासाठी या भाषेचा उपयोग होतो. शिवछत्रपतींच्या काळात गोंधळ्यांनीच महाराजांच्या हेर खात्यात मोठी कामगिरी केली आहे म्हणून महाराजांनी त्यानूला वतनं दिली. 'बारा गावचा वतनदार' म्हणजे गोंधळ्यांच्यात सगळ्यात मोठा मानकरी. आता बारा गावचा वतनदार म्हणजे बारा गावात भीक मागण्याचा, पोट भरण्याचा हक्क. हा बारा गावचा मान ज्या गोंधळ्याला असतो तो श्रेष्ठ पाटील. नऊ गावचा वतनदार मागता गोंधळी, देशमुख आणि सहा गावचा वतनदार मागता गोंधळी, निरोप्या. तर पाच गावचा वतनदार मागता गोंधळी, सामान्य गोंधळी. त्याशिवाय परगावचा गोंधळी, पोट भरायला वतनदाराच्या वतनात आला की तो आश्रित गोंधळी. समद्यांचे मानपान ठरलेले. पाटील गोंधळी सारे एकारान्त. रेणके, शिंदे, इंगळे, इग्वे, साळुंखे, ओसंडे सोनावडे, बडगे, उगळे, थिटे हे सारे पाटील. यांना मान मोठा. त्यातही प्रत्येकाची प्रतवारी त्याच्या त्याच्या वतनाप्रमाणं.

बाया जेवण करून उठल्या आन् बाकीचे लोक जेवाय बसले. त्यांची पंगत मदे गोल करून सारे रांगेने गोल बसले. पावणेरावळे, ज्याच्या त्याच्या मानाप्रमाणे आपसूकच बसले. बहुतेकजण लास होऊनच बसलेले. कोण काय, कोण काय बोलायचे. मधेच एकादा आई-बाईवर यायचा. वर्दळ वाढली तेवढ्यात आबाच्या म्हाताऱ्यानं उभं ऱ्हाऊन द्रोणात कुंकू घेतलं आन् मोठ्यानं म्हणाला, 'आई पंढरी ऐका.' कालवा शांत झाला. जसा कालवा शांत झाला तसं आबाचा म्हातारा म्हणाला, 'हे रेणके पाटील आल्यात. लई म्हाजूर हायत. मंबईवरनं आल्यात. त्यानला पैला मान दिवू का.' मंडळींनी एका सुरात 'हो' म्हणून माना हालवल्या. म्हाताऱ्याने रेणक्यांना टिळा लावला. त्याच गतीनं आबाचा म्हातारा सगळ्या मानकऱ्यांच्या नावाचा पुकार करायचा, 'ह्यांना मान दिऊ का?' विचारायचा, लोक 'हो' म्हणायचे, आन् मग म्हातारा टिळा लावायचा. अखेर टिळा लावण्याचं काम झालं. रेणकेनी निःश्वास सोडला. मला हळूच म्हणाला, 'एकातनं पार पडलो.' लोक गडबड करत असायचे. त्यात सगळेच पिलेले. मटणाचं पातेलं आलं. तसं आबाचा म्हातारा पुना म्हणाला, 'आई पंढरी रेबाटी आलीय, ही पयली नळी रेणके पाटलांना घालतो.' मंडळी पुन्हा 'हो' म्हणाली, म्हाताऱ्यानं नळी रेणक्यांच्या ताटात टाकली. पुढच्या नळीचा पुकार झाला. ती शिंदेच्या ताटात टाकली. रेणके सांगत व्हता, "माणूस मोठा चलाख म्हणून भांडण तंडण नाई. तो लोकांना विचारून टिळा लावतोय. तसंच, नळीचा मानही

विचारूनच वाढतोय. जर चुकूनमाकून मानकऱ्याशिवाय टिळा दुसऱ्याला लागला किंवा बकऱ्याच्या पायाची नळी चुकून जरी मानकऱ्याला सोडून दुसऱ्याच्या ताटात पडली तर लगेच बोंबाबोंब हुणार. जेवान बोंबलणार. ते सारं अन्न तसंच पडणार. आणि मान डावलणारा जो यजमान असतो त्याला काडी टाकणार. आता काडी टाकणार म्हंजी पंचात नवा पैसा टाकणार. आता माज्यात काय खोटं हाय ते सांग. मी काडी टाकली. पंचात तुला वडला. तू शाबीत कर, असं म्हणून एक काडी पंचाच्या म्होरं टाकणार. आता, ह्याच्यातनं बाचाबाची झाली, हंबरीतुंबरी झाली, भांडण वाढलं का मंग तुजी आई कोणासंगं गेली, आजी कोणासंगं गेली, हे लफडं सुरू. कुत्री रक्त पित्यात अन् मटनही खातात. एवढा केलेला खर्च कोल्ह्या-कुत्र्याच्या मुखी जातो. आमच्या जातीचा तिढा फार जुलमाचा अन् भयंकर हाय.

"खरं म्हणजे बारा घरचं शिळं तुकडं मागून खाणारी ही मागतकऱ्यांची भिकारी जात. खरं तर सारीच 'अंबुरा' खाणारी पण प्रतिष्ठेच्या कल्पना एवढ्या की जातीत आकर-मासे, बारा-मासे:करत बसतील. गोडाचे कडू करतील. सगळे भीक मागतील. खरं तर भिकाऱ्यान्ला लाज, अब्रू, शरम, काहीच नसतं. पण जातीचा पीळ एवढा की जसे सारे शहान्नव कुळीचे! एकानं जरी जातीचा कायदा मोडला तरी त्याला जातीच्या बाहेर काढतील. त्याला कारणही मोठं लागत न्हाई. आगदी किरकोळ कारण सुद्धा पुरेल. एकानं दुसऱ्याच्या वतनाच्या गावात भीक मागितली, का दंड, शिक्षा, वाळीत. एखाद्याची दिवटी कमी लांबीची असली, कवड्या कमी-जास्त घातल्या, अंगावर भोप्याचाणी मळकी कापडं घातली, की पुन्हा दंड, शिक्षा आहेच. एखाद्या बाईचा किंवा पुरुषाचा पाय वाकडा पडला की ती आकरमाशी. थोड-क्यात म्हणजे जातीच्या हिताला बाधा येईल, तिच्या आतल्या बळकट चौकटीला धक्का लागंल असं कायबी केलं की तो, जातपंढरीला मेला, त्याला जातगाव बसाड झाला."

मी त्याला मध्येच थांबवत म्हणालो, "अंबुरा म्हंजी काय रं?" यावर रेणके, आबा, आन् सारीच मंडळी हासली. रेणके म्हणाला, "लहानपणी अंबुरा तसा मी बी लई आवडीनं खाल्लेला हाय. आपली जात भिक्षाकरी. सतरा घरी भीक मागणार. बारा घरच्या बारा भाकरी. त्यात ज्वारीची, बाजरीची, आरगडीची, छंडीची, चपाती, पोळी. त्यातच झुणका, भाजी, मटकी, उडीद, उसळी, लोणचं. एखाद्या घरचं वरवाट, तर कुठं शेंवग्याच्या शेंगा. घावंल ते सारं एका झोळीत टाकायचं. सारं शिळंपाकं, इटल्यालं असतं. तर हे सारं खाण्यालायक नसतंच. झोळीत समद्यांचा काला झाल्याला असतो. हे सारं घरी आणतात. त्याचा आंवट वास येत असतो. काई भुरकटल्यालं असतं. काईला तारा आलेल्या असतात. त्यातलं ताजं बाजूला करायचं. लोणच्याच्या फोडी बाजूला करायच्या. निगत्याल तेवढी कोरड्यासं बाजूला

करायची. उरल्यालं चार-पाच दिस ऊनात खडंग वाळवायचं. खडखडीत वाळलं का ताकात दोन दिवस भिजायला घालायचं. दोन दिसानं ताकाला तांबडी मिरची लसणाची अन् मिठाची फोडणी दिली का झालं. आन् त्यालं असल तर मग नामीच. आजुनी तोंडाला पाणी सुटतं; म्हण सांगतो. लई भन्नाट लागतं. नुसत्या आठवणीनं बी तोंडाला पाणी सुटतं. तर हे आंबलेलं अन्न दोन दिवस ताकात आंबवायला घालणं म्हणजे अंबुरा घातलं म्हणत्यात. लहानपणी आईनं अंबुरा घातला का आमी दोन दिस सारखं महाराजावाणी अंबुऱ्याभवती घुटमळायचो. आजही मी आवडीनं अंबुरा खातो, पण गावाकडं गेलो तर."

"भिकारी आसला म्हण काय झालं? भीक मागणं तर आपला धर्म हाय. त्यात कमीपणा कोणता? आपल्या पायावर डोकं ठिवल्याबिगार बामणानं लावल्यालं शेतकऱ्याचं लगीन पुरं व्हत नाय. बामण सोडले तर बाकी समद्याला लगीन झाल्यावर गोंधळ घालावाच लागतो. आन् गोंधळानं डोक्यावरचा बोजा उतारल्याबिगार तेचा संसारच सुरू होत नाय."

रेणके जातीचं मोठेपण सांगत असतो. बाकीच्यांच्या माना हालत असतात. ऊर कसा अभिमानानं भरून आलेला असतो.

गोंधळाचा कार्यक्रम म्हंजी पयला भाग झाला. आता दुसरा भाग जेवनाचा. उपास सोडण्याचा. आमची जेवणं उरकत आलेली असतात. मंडळी पितळीत बरबाट वरपत असत्यात. झन्नाट रश्यानं माझं नाक आन् डोळे मेंदूला तिखटाची जाणीव देत असतात. तर कुणी कुणी रपाट्याच्यारपाट्या पितळी तोंडाला लावलेली असती. हा जेवनाचा दुसरा भाग संपत असतो. आणि तिकडं म्हातारा गोंधळी उत्तरार्ध चालू करतो. त्याला आईचा जागर म्हणतात. सारी बायापोरं, मोठी माणसं घोळका करून बसलेली असतात. संबुळ वाजत आसतं. तेवढ्यात स्थानिक मंडळीही मजेत येतात. आता करपल्लवी, नेत्रपल्लवी रंगात आलेली असते. आपल्या कुळांचा उद्धार चाललेला असतो. म्हातारा गोंधळी हाताच्या बोटाच्या खुणा करत असतो. आणि संबुळवाला गोंधळी, बरोबर नाव ओळखून त्या नावानं आईला दान पावलं म्हणत त्या देणाराच्या कुळाचा उदे उदे करत असतो. तेवढ्यात दोन तरुण पोरांनी संबुळाचा ताबा घेतला. एका पोराचे डोळे बांधले अन् दुसऱ्या पोराला नारळ डोक्यावर देऊन लांब अंधारात उभा केला. आता या डोळं बांदलेल्या पोरानं तो नारळ अन पोरगा हुडकून काडायचा. संबुळ वाजाय लागलं. अशा गतीनं तो वाजवायचा का सारे बगतच ऱ्हायले. मध्येच ठेक्यात बदल व्हायचा का डोळं बांदलेला पोरगा डावीकडं वळायचा. उजवीकडं चल, थोडा डावीकडं, दोन पावलं पुढं समोर चल, मागं फिर, दोन पावलं जा, पाय उचलून टाक, चार पावलं जा असं सारं संबुळवाला ठेक्यात बदल करून सांगत असतो. अन् डोळं बांदलेला पोरगा चालत असतो. तर ह्यो डोळं

बांदलेल्या पोरानं आंदारातला त्यो नारळ घेतलेला पोरगा शोधला अन् टाळयांचा एकच कडकडाट झाला.

तर गोंधळी ही हरहुन्नरी जात. आक्की बाराखडी पाच बोटात बसवलेली. त्याला करपल्लवी म्हणतात. तर डोळ्यांच्या बुबुळांच्या पापणीत बाराखडी वाचतात. नुसत्या खुणांनी. त्याला नेत्रपल्लवी म्हणतात. मोठी कलावंत जमात. गाणं-बजावणं, लोकांची आध्यात्मिक करमणूक करणं, मध्येच पोट भरायला नाहीतर भीक मागायला दूर-दूर मुलखाला जातील. कविता तर एवढ्या शीघ्र की समोरच्या माणसाचं हुबेहूब रूप कवितेत दिसंल. पण अज्ञान फार प्रचंड. काही झालं का नवस बोलणार. पोराला ताप आला, नवस. बायकोचं भांडण झालं, नवस. पोटाला मिळेना, तरी नवस. तर हा सारा भिक्षेकरी समाज नवस–सायास, करणी, भूत पिशाच्च, भानामती, असल्या अज्ञानाखाली. आधीच भिकाऱ्यांचा समाज, अधिक कर्जबाजारी होतो.

आबाची सारी तकतक संपलेली असते. आता तो जरा बूड टेकतो. " कशाच्या कला सायब, सारा धंदा बसला. आता माणूस बनेल झालाय. पयल्यावाणी कुठं वाढत नाय. पयलं, बांधाला गेलं, खळ्याला गेलं तर माणूस, शेतकरी, जीवाला जीव जाणत व्हतं. पायली, दोन पायली मिळायचे. मूठभर शेंगा घेतल्या तर कुणी बोलत नव्हतं. पर आता परतेकाला पैसा आला. गावगाड्याचं गाडं खुटलं. गावगाडा इस्कटला. काँग्रेसचं राज्य आलं. कुणी भीक वाढत नाय. त्यात जागजागी फॅक्टऱ्या आल्या. उसाचा पैका आला. चांगलं झालं, वाईटबी झालं. गोरगरिबाचा काटा निगाला. जो तो उठतो तो पुढारी झाला. मताच्या कालव्यात आमचा आवाज जिरून गेला. जमलं तर सुगीपुरतं लांब लांब जातो. पसाकुडता पोटापुरता मिळतो. आता गोंधळ पैल्यावाणी कोण ऐकत न्हाय. शनिम्याची गाणी लावत्यात. मोलमजुरी करायची तर तेबी कोण देतंय ? सायब सारा सुलूख बसाड पडाय लागला. पन्नास गोंधळ्यांच्या घरांचा गोंधळीवाडा शेणाच्या कुलपांनी बंद हाय. समदा समाज पोटामागं उधळला. कुणी पुनं गाठलं, कुणी मुंबई, कुणी कोल्हापूर. जिकडं जाईल तिकडचाच झाला. आता हे आमचं गाव ओस पडणार. सारी बारा बलुती, चौदा आलुती, आठरापगड जाती साऱ्यांची उटवळ होणार. नाईतरी बलुतं न्हायलंय कुठं ? मिळायचं चिपटं मापटं, पसा कुडता–तिथं खायच्या नुसत्याच लाथा. बरं झालं आपलं लोकबी शानं व्हत्याल, शेरात जात्याल."

मी ' गरिबी हटाव 'बद्दल बोलतो तर आबा म्हणतो, " सायब, गरिबीच व्हय, ती हटंल पर त्या अगुदर आमाला (गरीबाला) हाटंवल. मग श्रीमंताची गरिबी हाटंल. सायब तुमी नुसतं गरिबीचंच बोललाव. आबो आमी नुसतं, गरीब नाय, भिकारी हाय भिकारी. गरिबाची भिकारी कवा जाईल ते सांगा." माज्या डोक्यातल्या मुंग्या पायाकडं सरकायला लागतात. खरंच, भिकाऱ्याला आदी गरीब करता ईल का ? माजाच प्रश्न

माज्याच नरड्यात आडकला.

तर तिकडे धुपारती चाललेली असते. म्हातारा गोंधळी नवरा-नवरीच्या डोक्या-वरून सूप उतरून विचारत असतो 'उतारला का बोजा.' नवरी-नवरदेव 'उतरला' म्हणतात.

आन् मी वाकळेवर आडवा झालो. मनावर मनामनांचा बोजा घेऊन, मनामनांचा बोजा घेऊन...!

●

आम्हाला माणूस म्हणून जगू दे!

सकाळच्या पारी दारातच माशांचा सौदा चालल्याला असतो. शशी मासेवाल्यासंगं हुज्जत घालत असती. माझी धोकटी भरायची घाई, भाईची शाळेची घाई. तेवढ्यात पिस्तुल्या दारात हजीर. आता ह्यानं काय बिलामत आनली, म्हण माझ्या तोंडावर उंदीर नाचल्याला. तर पिस्तुल्या आंग चोरून दारात उभा. मला तशी आता सवय झालीया. आपली माणसं आशीच नुसती दबा धरून बसल्याली. आपुन शंभर गोष्टी सांगाव्या तवा बचाकभर बोलून चिमूटभर निघायचं. "हं काय पिस्तुल्या, कुठं काय भानगड बिनगड बिनगड केलीस की काय? न्हाय म्हंजी येवढ्या रामपाऱ्यात आलास म्हणशान इचारलं."

"न्हाय, हेच आपलं, उलीकसं आपल्यातलंच हाय."

"पर जरा उलगडून बोल की." "न्हाय सायबा, तुला का सांगू आपल्या

पंचातीचंच ह्ये."

"पंचाचं हायना? बस उलीकसा. मी आलोच" म्हणत आंगोळ उरकतो. शवनम आडकवतो. तवर शशीनं पिस्तुल्याला चा दिलेल्या असतो. माझा चा झाला आन् आमी घरातनं बाहिर पडलू.

तसं पिस्तुल्या सांगतू, "सायबा, उलीकसा घडीवर उभा न्हा. मी आलोच." म्हण गेला. मला वाटलं, आसंल काय काम. मी आपला रस्त्याच्या कडंला उभा. बगतावगता पिस्तुल्या गायब. दहा मिनिटं गेली, पंधरा मिनिटं गेली. तास व्होत आला. तरी ह्याचा पत्त्या न्हाय. मी आता वैतागलोच व्होतो. म्हंजी सकाळच्या पारी समदा इचका झाला. धड माझं काम न्हाय ना पिस्तुल्याचं. मी निघणार येवढ्यात पिस्तुल्या झपाझपा येताना दिससला. पर आता एकटा नव्हता. पाच-सात जण होते. तवा माझ्या धेनात आलं. पिस्तुल्या एकटाच घरी आला आसंल, पर बाकीचं गडी इस्कटून ठेवल्यालं आसत्यान. दगाकटका झाला तर काकरावं, म्हनशान सावधानता आसती.

तर पिस्तुल्या जवळ आला. "सायबा, समदे व्हाटीलात व्हते. म्या म्हनला तू घरात नसलाच तर? म्हण समदे व्हाटीलात बसल्यावती. चल आता. झपाझपा जाया पायजी. आपली समदी मुलकातली माणसं जमल्यात. आकलुजाचा काडतुशा आलाया. बारामतकर उकळ्या हाया. तुला म्हणू पंढरपूरचा बजरंग्या हाया. "फलटनाचा झवझब्या हाया. समदी टोळीवाली आल्यात. तुला बगायचं हाय. आज त्या आपल्या वकीलालाबी बगायचा हाय."

"त्यो तुला म्हणू आपला काय त्यो वकील बारामतीचा वकील."

"अरविंद गायकवाड वकील" मी मध्येच माहिती देतो. येरवी पिस्तुल्याचं येगळं आसतं. आपुन शंभर गोष्टी बोलाव्या आन् ह्यानं नुसतं हुंकारा भरावा. न्हायतर लईच खुदून खुदून इचारलं, तर एकांदा शब्द बोलावा, आसं आसतं. तर आज पिस्तुल्या भलताच खुशीत आसतू. आपुन सायबासंग कसं झोकात चालतुया, हे आपल्या जोडीदारानं बगावं म्हण त्याचा आटापिटा चालल्याला आसतू. मी इचारू ना इचारू, त्याजं कायना काय टुमनं चालूच आसतं. साताऱ्यात भर रस्त्यात आपल्या मागं म्होरं पोलीस न्हाय, कुणाचं भ्या न्हाय, की कुणाला आपुन भेत न्हाय, हे दाखवावं म्हण मला बोलायला संधी न देता त्यो बोलत आसतू. तर पिस्तुल्या भर वाटंनं रंगात आल्याला.

"सायबा, पर तुला काय म्हणू, कालचा फड लय मोठा झाला. समदा पारधी चितरावनी उडव्या हानत व्होता. लय मयंदाळ चेव आला व्हता बग त्यो तुला सांगू का त्याजं नाव ऽऽ" "समद्या," दुसरा माहिती पुरवतो. "बरोबर तर त्याचं खटला व्हता." मी नुसता हुंकारत चालल्यालू. आठची गाडी घावली पायजी म्हण माझं जराकसं

त्याच्या बोलण्याकडं दुर्लक्ष झाल्यालं आसतं. तर "तुला का म्हणूऽऽ" म्हणत पिस्तुल्या माझ्या आगदी बरुबर चालायचा प्रयत्न करत चऱ्हाट म्होरं वळतच असतो.

"तर दादा त्यानं त्याच्या पयल्या जनावरांचं देनं, चार पोरं झाली, पर फेडल्यालं न्हाय. दर बरसाला त्याजा कज्जा हाय, पर झालीव सुनावणी. सुताडच्यात गुताडा, त्यो कज्जा काय मिटायचा न्हाय. पर काल जवा मालकांनी सेवाटला तवा सुदीवर आला." आठदहा पारद्यान्ला बरोबर घिवून पोलिस टेसनाम्होरनं निघालेलो. वाटंत बरीच वळकीची माणसं बगायची. कुणी कुणी हायऽऽकरायची, कुणी 'कुटं निघाली वरात...' म्हण हिनवायचे, तर किमान दहा-बारा तरी पोलिस पिस्तुल्याच्या वळकीचं निगालं. त्यातल्या दोगा–तिगांना पिस्तुल्याला मागं थांबवून 'चहा पाज' म्हण आर्डर केली. पर पिस्तुल्या बनील, त्यो काखा झाडायचा, भर गर्दीत पोलिसाच्या 'सायबा' म्हणत पाया पडायचा, आन् पुन्हा गॅप भरून काढायचा. माझ्या वळकीचं कुणी भेटला का ह्योच चौकशी करायचा. आमी एस. टी. चं तिकीट काढलं तर समदी एस. टी. टवकरून बगाय लागली. 'चा भनं, ही काय भलामत सकाळच्या पारी,' आसा तोंडावर भाव. बायापोरं सावरून बसायची. आमाला जरा चांगली जागा मिळाली. गाडी सुरू झाली. पिस्तुल्याचं बोलणं साथीदारांसंगं चालू व्होतं. गाडी बरीच म्होरं आली. मी खिडकीतनं बाहेर बगत व्होतो. पिस्तुल्यानं त्याची जागा दुसऱ्याला दिली आन् सवता माझ्याजवळ येऊन बसला.

"तर तुला का सांगू, समद्यानं त्याच्या बायकूचं द्याज दिलं नव्हतं. म्हण मालकांनी काल त्याच्या दोगी लेकी त्याच्या बायकूच्या पोराला देजाऊ दिल्या. आता कमद्याला ते नगू हाय. त्यो म्हणतू, 'पॉर आंडील न्हाय. भितीला धरूनशान मुततया. आन् दोन पोरी कसा काय दिवू? मालक उलीकसा न्याय करा."

तर दुसरा म्हणतो, "सायब आसं न्हाय. आमची रीत हाय. वाडवडलापस्नं चालत आलीय. द्याज्यात बाय देत्यातच. मंग ती केवढीबी आसू दे."

त्याला माझा इस्वास नसतू. त्यो पिस्तुल्याला सारका डिवचत आसतू. आडवत आसतू. पर पिस्तुल्या त्याला मीठ घालत न्हाय.

मध्येच एस. टी. चं बारकं स्टँड आलं, तसा पिस्तुल्या खाली उतरला. आन् भला मोठा पुढा घिवून आला. पुढ्यात लाह्या-बत्तासं, शेवचिवडा, भजी, लाडू, जिलबी, गोडं फुटानं, कांड्या, फुटानं आन् शेंगदाणं. जवळ इवून बसला आन् 'सायबा, खा काय खातूस ती खा. आमीबी खातू.' मी नुसता ऐकतो.

तवर समदी गाडी बगत आसती. बगता बगता ह्या समद्या जिनसांची नुसती खिचडी झाल्याली. समदं गोडाचं, तिकटाचं एकाच जागी मिसाळल्यालं आसतं. मी नुसतं त्वांड उस्टावतो. लई वंगाळ चव लागती. मी आपला हात आकाडता घेतो.

मला ते आवाडल्यालं नसतं. मला बरं न्हाय म्हण मी सांगतो. तर पिस्तुल्याचं 'सायबा, खा आजचाच दिस. उद्या म्हणशील तर घावायचं न्हाय. सायबा तुला का म्हणू."

"आता काय डोंबाल खा?" ह्यात समद्याचा काला केलेला आन् सरळ खातबी न्हाय. बचक्कन तोबरा भरायचा. म्होरच्या शिटवर बसल्याला माणूस आपुनच उठून मागच्या बाकावर गेला. म्होरला बाक रिकामा झाला तर पिस्तुल्यानं गठुडं ठिवलं. आन् म्होरंच इवून 'खा' म्हण मागं लागला. "न्हाय, व्हय" करीत मीबी खाया लागलो.

पिस्तुल्याचं पुन्हा म्होरं चालू, "आवंदा आमची पब्लिक लय आलीय. समदा वाकडमाळ जतरंवाणी भरलाया. तुला घिवून याला मालकांनी सांगितला. पैका बी दिला. मी का माझ्या पदरचा मोडत न्हाय. तू खा" आन् समद्या एस. टी ला ऐकवत पंचायतीला पोहोचलो.

पिस्तुल्या आता सावारला. आता त्यो हाद्दीत आला. आता पायरीनं वागायचं म्हण त्यो त्वांड उगडंना. मी बोलता केला, तवा त्यो म्हणाला, 'सायबा, तुला का म्हणू. आवंदा लई केसी झाल्या. पै पैका दिल्याला, त्याजं व्याजबटा, देणं–घेणं, सावकारी चालली. तुला म्हण बायामाणसांच्यावर आल्याल्या केसीऽ" "एकांदी सांग की." "आता तुला म्हणू, आता नाव सांगू का?"

"नगं, नुसतंच सांग." "तर एक बाय आसती. तर तीजी न्हयात लई वंगाळ. ती ल्योक म्हणंना, का दीर म्हणंना, का भावकी म्हणंना, का तुला म्हणू, कायबी बगं ना. तवा तू कुणाला सांगू नगं." आता मातर त्याचा आवाज कातर झाल्याला आसतू, "सायबा, मांजर पिलाला खाती न्हवं? ही मांजर लेकाला खातीया, आन् हाडं पंचान्ला चारतीया. का सांगू, सायब पॉट पानी पिकलं तरी मांजराची गत ती ह्या बयाची गत. पर आमचा कायदा म्हंजी दुनव्यात मिळायचा न्हाय. दूध ती दूध आन् पानी ती पानी. बया म्हणाली, 'शान खाल्लं, नवरा जलमठेप भोगतुया. दुसऱ्याजवळ नांदावा तर लई तरास. बरं त्यो खाया जलमभर घालंलच कशावरनं? तवा आंदारात दुरीवर पाय पडला. आता मालक त्याला साप म्हण हानू नगा. आंदारात वाट घावली न्हाय. म्या मांजरीनला पदरात घाला.' समदी पंचायीत चितागती झाल्याली व्हती. नुसत्या काठ्यावर काठ्या उडत व्होता. पर मालकांनी वाट दावली. पंच उठले आन् जरा तुटाक लांब गेले. एका जाग्याला मातीचा बारका ढीक केला. त्याला वाटंला चांगला फुफाटा जमावला. आदी मोठा मालक त्यात मुतला, मंग समदं पंच मुतलं. मग बाकी म्होरके मुतले. आता पुन्हा समदे इवून पंचात म्होरं चालू झाली. त्या बयाला सांगितला, 'जा आन् त्यो मूत कालव. त्याल पाच उंडं कर आन् पंचात आन.' तवर एका पोराला ग्लासात मुतावला.

बाईनं मुताचा चिकूल कालावला. त्याजं उंडं पंचात आनलं, आन् पंचाम्होरं रडत, आकतत पाच भाकरी केल्या. आन् ग्लासातल्या मुतानं पंचाम्होरं हात धुतला. पर बाईचा मूत जर बाप्याच्या अंगावर टाकला तर 'पिसा' झाला म्हणत्यात. तर पिसा मंजी जातीच्या बाहीर वाळीत टाकून."

मी साफ उडालो व्होतो. मनाला ऊसंख्य इंगळ्या डसत व्होत्या. हे पशूंचं जीवन की माणसांचं ? मनाचा दाह असह्य झाला की, डोळे साथ करतात. पण आजकाल त्यांनाही दुष्काळच पडलाय. डोळ्यांचं पाणीबी करपून चाललंय. हे देशा, जिंदाबाद तुझी, तुझ्या माणूसपणाची !

पिस्तुल्याला काही बोलू द्यावं आसं खरं म्हणजे वाटत नव्हतं. एकदा तर आपणच निगून माघारी जावं आसंही वाटत होतं. पण ही घाण अटळ आहे. हाच कचरा अटळ आहे. हेच जगणं खरं आहे. पळायला जागा नाही. ज्यांच्या डोळ्याच्या खाचा झाल्यात त्या कायदा आणि सुव्यवस्था, विकसनशील वगैरे वगैरेंना माहीत व्हावं, आज ह्याचं खताचं सोनं करावं म्हणून मनावर मणभर बोजा ठेवून म्होरं चाललो होतो. पिस्तुल्या सांगत आसतू, " समद्या बायापोरं हे बगत होती. पंचांनी फर्मान काढली, 'ही मांजरीन हाय, आन् उलट्या पायाची हाडळबी हाय.' पोराला दंड बसविला. पंचाहात्तर शंभर रोक आन् चार डुयाला पंचाहात्तर हजार."

" बाप रे ! पिस्तुल्या, पर आरं हे फेडणार कवा ?"

" सायबा ह्याच्या पोरांची पोरं, त्याच्या पोरांची पोरं, त्याच्या पोरांची पोरं—जेवढी म्हण पोरं व्होत्यान् ती फेडत्याल. तर पोरी व्हत्याल, त्या पंच इकत्याल आन् त्यांच्या देजातनं रकमा फिटत्याल. पंचान्च्याशिवा पोरींची लग्नंच होनार न्हायीत."

" सायबा आमच्या कायद्यात लय वंगाळ हे." एकांदी बाय सिंदल निगाली तर पंच तिला जलमाची आद्दल घडिवत्यात. जिबंनं शिंदलकी केली, जिबंला डाग. उदबत्तीनं डागत्यात. कानानं सिंदलकी केली तर कानात तापल्याले त्याल बतत्यात. तर डोळ्यानं सिंदलकी केली तर डोळ्याला डागत्यात. आन् आबरूच नासिवली तर... इचारू नगं. बायामानसाचं आबरूचं वांगं करत्यात. वांगं कसं किरवाजतया तसं मायांग किरवाजतया. लय वंगाळ.

" बाय कबूल व्होत नसली तर परमान. तव्यावर तेलाची उकळी आनायची. समदे पंच बसल्याले असत्यात. आन् कोर्टाचा हुकूम झाला की, चवली-पावली उकळत्या तेलात टाकत्यात. बाई न्ह्यातीची आसंन तर पदर खवतीया, पंचांच्या पाया पडतीया, आन् डोळं झाकून तेलातला पैसा नजर लवती ना लवती तवर वर काढतीया. खऱ्याचं येनं आसंल तर खरं, खोट्याचं आसलं तर ते तेलातच हात घालत न्हाय. घातलाच तर हाताचा फोदरा उदास व्हतोय. पर खरं ते खरं न्हातय.

"बाप्याला परमान आसतीया ती येगळी. ती बायावानी न्हाय. बाप्यामानसांचं येगळं आसतंया. त्याजं का हाय, समदी पंचात दिवसभर गवऱ्या येचत्यात. गवऱ्याचा मोठा ढीग करत्यात. त्याज्या तळाला लोकांडाची पार ठिवत्यात. पंचांचा हुकूम झाला की, देवाला कवल लावत्यात. देवाचा कवल लागला की, गवऱ्या पेटवत्यात. नुसती आग आग भडका झाला की पार नुसती लाल इंगळावानी व्हतीया. तवर परमान करनारा बाप्या समद्यांच्या पाया पडतुया. आंगुळ करून वल्या कापडानं येतुय. तवर पंच. आपल्या, तुला म्हणू, रुईची पानं आनल्यात. त्याजी पूजा करत्यात. आन् परमान करणारा हाताला रुईची पान बांधतुया. देवाचं नाव घेतुया. आन् डोळं झाकून इंगळावानी पार समद्या म्होरं हातात उचलून पंचात आनतुया. खऱ्याचं आसन तर हाताला काय दिकून व्होत न्हाय. पर खोट्याचं आसन तर त्याजं हाताचं व्होत्यान. तुला म्हणू, कुणी खोटी आसन तर त्यो का घास ह्ये त्याजा?"

"तुमच्या पंचात आजून ही सजा करत्यात का? आतावी करत्यात का?"

"तुला का खोटा सांगतू? आईची आन, समदं खरं सांगतुया. तू का परका हाय?" तुला म्हणू, आमच्यात निराळं आसतंया. आरं बाबा तुझ्या कोर्टाला का कळतंया? तथं समदं खऱ्याचं खोटं व्होतंया. ज्याचा हात मोडला त्याच्या गळ्यात बांधला तर खरं पर तुझ्या कोर्टात सांगू, हात माजा मोडतुया आन् गळ्यात लोकाच्या बांधत्यात. आमची किती तरी मानसं आसराप झेलात जलमठेप भोगत्यात. आन् आमच्यातले खरे गुन्हेगार लोकबी मोकळे आसत्यात. जबरी चोरी खून ह्याज्या वहिमाखाली किती तरी मानसं जलमातनं तुझं कोर्ट उठीवतया. पर आमच्या कोर्टात खऱ्याचं खरं, आन् खोट्याचं खोटं व्होतया. नवरा झेलात जलमठेप भोगतू. त्यो आसराप आसतू. तर बाहेरचा खरा गुन्हेगार जातीला ठाव आसतू. जात त्याला झेलात आसन त्याज्या बायकान्ला पैका दिया लावतू. न्हाय तर फाशी झाली तर त्याज्या बायाशी लग्न लावाया लावती. जातीम्होरं छकापंजा चालतच न्हाय. एकांदा लागला छकापंजा करायला का गांड उदास व्हतीया."

"आता ह्या पंचाच्या म्होरं आसी एकांदी शिक्षा झालीया का?"

"का सांगू तुला, आता आवंदा न्हाय झाली पर गुदस्ता झाली व्हती."

आमी पंचायतीच्या आनखी जवळ आलू व्होतो, पर लांब लिंबाच्या झाडाखाली जावून बसलो. आता बाकी समद्याला म्होरं पिटाळलं. 'मी आलुया म्हण सांगा. थोड्या येळानं येतूच.'

बाकी समदीजनं गेली. पिस्तुल्या आन् मी. पुन्हा पिस्तुल्या सांगायला लागला. मी कधी कधी पिळवटून निघायचो, कधी कधी वैतागून जायचो. कधी आपल्याच थंडपणाची कीव यायची. तर कधी बाँब टाकून सगळंच नष्ट करून टाकावं असं

अती टोकाला जायचं.

हे सगळं असह्य झालं की, मी त्याला थांबवत व्होतो. पुन्हा चालू व्हायचं.

भाजी ती काय ? मी बी भीक मागुनच पिंड पोसलाय. चिगुळाची भाजी खाल्ली. पात्रीची भाजी खाल्लीय. गवताच्या बिया भरडून आईनं केलेला रगडा खाल्लाय. पण या पिस्तुल्यानं खाल्लेली भाजी कवाच खाल्ली नाय. आन् मानसं आसलं काही खातील आसंही वाटलं नाही. येलावाणीच पण एक दुसरा येल असतो. त्याचा उपयोग त्या येलाचा शेंडा तोडून नाकात घातला की खूप शिंका येतात, म्हणून त्याला शिकाईचा येल म्हणत्यात. तर या शिकाईच्या येलाची फुलं आन् पानं तवलीत शिजायला घातलेली असत्यात. बिरमुठं बी आसलीच असत्यात. दुसरी बाई मिरच्या ठेचत आसती दगडावर. मी ना व्हावून चुलीवरच्या तवलीतली भाजी काढून घेतली. आन् जगाला दाखवायला पिसवीत ठेवली. दुसरी चिमूट भरून तोंडात घातली ती आसली तुराट लागली की उभ्या हयातीत आसली चव घेतली नव्हती. थोड्या येळानं भडाभडा उलट्या झाल्या.

पिस्तुल्या 'सांगू तुला' म्हणत सांगत आसतू. "सायबा आमी कसली मानसं, आमी भूत हाय भूत. तू मानूस. कसं पचंल, गिळंल तुला ? आमी तेच खातू. लहानपणापास्नं खातू. चांगलीच आसतीया भाजी. उलीकसं मीठ लावलं की नामी.'

पिस्तुल्या एवढ्या सहज बोलत आसतो की, जसं सकाळपास्नं त्यानं घेतलेलीच असावी.

"तर सायबा काय म्हणू तुला, तुरंगात हयेत ना आमचे लोक त्यातलं लय थोडं लोक खरं गुन्हेगार हयेत, पर लई करून बेगुना लोकच तुरुंगात हये. आमी का करू ना करू, पोलिस आमावर उठत्यात.

"तुला सांगू, आमच्या एका पालावर माग आला. कशांचा सांग ? तर माग आला दळल्याल्या भाकरीच्या पिठाचा. एका गाववाल्याच्या घराहून आमच्या पालापातूर पिठाचा सांडल्याला माग आला. आमी बापे राकनीला गेल्यालू. घरी बायापोरं आन् म्हाताऱ्याकोताऱ्या. आता तू सांगावंस चोर भाकरीचं पीठ आसं पालापातुर टाकीत ईल का ? तूच सांग.

"पर तुला सांगू, पोलिसांनी माग आनला. 'आता माग आला तर कुठं ठिवलं पीठ' म्हण पोलिस माराया लागले. पावसाळ्याचं दिस. एका एका पोरीला बडवायचे. तरणी म्हणू नकू, गरती म्हणू नकू, म्हातारी म्हणू नकू. समध्यान्ला माराया लागले. समध्या बायांच्या अंगावरली लुगडी फेडून घेतली. समध्याजनी बोंब मारीत व्होत्या. सायबा, गडी म्हण घरी कुणी न्हाय. आन् पळून नागव्यानं कुटं जायाबी ईना. सायबा, सांगू तुला, आन् इनिसपेक्टर म्हणतुया 'खाली बसा.' म्हंजी आंगावर कापडाचा तुकडा न्हाय आन वर चिकलात खाली बसा, न्हायतर मार ! तुला सांगू सायबा, पर

आसं बी मरायचं आन् तसं बी मरायचं. आन् एक बाय बरीक लई बहाद्दर व्हती. तिजा जिवाचा तिळपापड झाला. ती जिवाचा थयथयाट करीत व्हती. समध्या खाली बसल्या. पोलिसांनी निरनाला चिमटं काढलं. बायांनी सोसलं, पर ह्या बायनं बंडावा केला. ती काय खाली बसंना, आता जिवाला ठिवून करावा तरी काय? गेला तरी गेला, पर खाली म्हण बसायचं न्हाय. आंगावं वळच वळ झालं. पर बाई तोंडातनं हूं का चूं करना का खाली बसंना."

पिस्तुल्याचा स्वर गदगदून आला. खरं म्हणजे त्याच्या अगोदर मी केव्हाच मुक्त अश्रू ढाळत असतो. त्यो डोळं पुसतो आन् सांगतो, "सायबा, भाकरीच्या पिठापाई काय करावा पोलिसांनी? सायबा, ही बाई लईच मस्तीला आलीया म्हण तिच्या निरनात हातातला दंडुका घातला. सायबा, ती बाय हाय दावतो चल." त्यानं त्या बाईला समोर केलं. बाई आन् माझी आई यात असलाच तर कापडाचा फरक आसंल, बाकी रंग, रूप, आन् वय, सारखंच. पन्नाशीच्या पुढं.

बाईला बिचारलं तर ती नुसती रडाय लागली. ती येवढंच म्हणाली, "सायब, कोर्टात मोठा कज्जा उडाला. मोठा वकील दिला. तवा त्या पोलिसाला कोर्टानं कामावनं काढला. आन शिक्षाबी झाली. सायब, त्यो दिसापास्नं पोलिसांनला हिनगत न्हाय. हातभर काठी सोसली. सहा महिनं उठायला का बसायला येत नव्हतं. आता मातर काही न्हाय. कवा बी मरायचं. पर चिकलात बसायचं न्हाय. ह्यो ठेका व्होता. आता सांग मोर्चा काढू, तुरुंगात जाऊ, पर तुझ्या सरकारला सांग आमाला उलीकसं घराला जागा दी. उलीकसं हाताला काम दी."

खरं तर आनखी किती आणि किती तरी दे. पण माझी झोळी रिकामी आहे हे तिला कोणत्या तोंडानं सांगू?

आता पिस्तुल्या आणि मी त्यांच्या पालावरनं पंचायतीकडं निगालो. दुपारचा १२–१ वाजून गेला व्हता. भूक अशी पोटात नव्हतीच. पिस्तुल्या म्होरं आन् मी मागं. भराभरा निगालो. बिराडांच्या जवळची वगलाट वलांडली आन् पायवाटंनं म्होरं गेलो. चारी बाजूला उसाचं मळं लांबलांब उभं. मधेच चार पाच आंब्याची डेरेदार झाडं. आंब्यांच्या चारी बाजूला चार-पाच एकर जागा नांगरून पडलेली. एकर-दोन एकर जमिनीत आंब्याची गर्द सावली पडलेली. आमी जवळ गेलो. तसं हजार दोन हजार पारधी एका जागंला जमलेले. बायापोरं, म्हातारेकोतारे सगळी असतात. शे-पाचशे माणसं. गोल बसलेली असतात. बाकीची गटागटात वाटलेली असतात. पोरं ढेकळात खेळत असतात. बाया एकमेकींच्या डोक्यातल्या उवा मारत असतात. कुणी मधेच मोठ्यानं ओरडत असतं. कुणी मोठ्यानं एक दुसऱ्याला हाका मारत असतो. तर कुणी आपसात मारामाऱ्या करत असतो. दोघांची मारामारी सुरू झाली की बाकी सगळे गोळा व्हत्यात. मग उकाळ्यापाकाळ्या चालू. दणकादणकी चालू. नुसता

कालवा असतो. माझ्याकडं अन् पिस्तुल्याकडं कोणाचंही लक्ष नसतं. आमी दोगं जवळ गेलो. मी खाली वाकून समद्यांना रामराम केला. तसं पन्नासीतला झवझब्या उभा ऱ्हायला. अन् त्याच्या भाषेतनं माजा परिचय करून द्याया सुरू केलं. मला काय कळत नव्हतं. साऱ्या पंचांनी मला म्होरं बोलवलं, हातावर चिमटभर माती ठेवली. 'माती उष्टव' म्हणाले. मी माती उष्टावली. राहिलेली त्यानं माझ्या कपाळाला लावली. म्हातारा पारधी म्हणला, "तू हतं आला नाय, तू काय ऐकला नाय, तू काय बोलला नाय, तू हतं आला नाय, हे समदं खरं हाय." मला काय कळत नाय. मी गप्पच असतो. माझ्या वतीनं झवझब्या उभा रहातो, "सायब, आपला पुढारी हाय. मी त्याह्या बाजूनं जामीन हाय. त्यानं काय ऐकला नाय, हे समदं खरं हाय." आता माझ्या डोक्यात प्रकाश पडला की, मी पंचात बसायला ही परवानगी होती. मी उठून उभा ऱ्हायलो. समद्यांना पुना रामराम घातला आन् पुन्हा खाली बसलो. आता कोर्टाचं काम म्होरं चालू झालं. पण सारं माझ्या डोक्यावरनं जात व्हतं. एखाद दुसरा शब्द सोडला तर काही कळत नव्हतं. मव्हाच्या पोळ्यावर दगड मारला की जश्या माश्या उटतात, धुधावतात, अन् पुन्हा जाग्यावर बसतात, तसं काम चाललं व्हतं. पेचाचा मुद्दा आला का कालवा उसळत असे. सारं दृष्टान्तामध्ये बोलणं असतं. एक एक जन बोलायला लागलं, की पंधरा-वीस मिनटं बोलायचा. मध्येच सारे हसायचे. क्षणात हसणं जायचं अन् आराडावरडी चालू व्हयची. आरडावरडी एवडी का डोकं उटायचं. मला काय कळत नव्हतं, तरी बसलो व्हतो. माझ्या डोक्यात दुसरंच काम चाललं व्हतं. पिस्तुल्यानं सांगितलेल्या त्या बाईला भेटायचं व्हतं. अन् पोलिसापुढं मान न तुकवणाऱ्या बाईलाही भेटायचं व्हतं. म्हणून पंचायत उठायची वाट बगत बसलो होतो.

दिस कलला, अन् त्या दिसाच्या पंचांचं काम संपलं. मी म्हाताऱ्या पारध्याकडे त्या बाईशी बोलायची परवानगी घेतली. झवझब्या, पिस्तुल्या, मी अन् निवडक पाच-सात माणसं लांब एका झाडाखाली जावून बसलो. तवर पिस्तुल्यानं त्या दोन बायका, त्या बाईचा मुलगा, साऱ्यांना जमा करून आनलं आता आमचं बोलणं चालू झालं. पन्नाशीच्या आसपासची बाई. तिला मी विचारलं, 'बाई, तुझं नाव काय?' बाई गप. मी पुना विचारतो. 'बाई तुझं नाव?' 'काडतुशी' 'तुझं सगळं नावं काय?' ती माझ्या तोंडाकडं बघते. मी पुन्हा तिला विचारतो, 'बाई तुजं समदं नाव काय?' झवझब्या पारधीतून तिला खडसावतो. 'काडतुशी बिड्या भोसले.' बाई गप. तिला कसं बोलतं करावं माझ्या पुढं पेच. म्हणून मी सारं मोकळं करण्यासाठी मी माझं काम, संघटना, अनेक पारध्यांचे किस्से सांगितले. बाई मोकळी होत गेली. पंचांची परवानगी घेतल्याचंही सांगितलं. बाई बोलायला लागली. "बाई तवा त्वा कंचा गुन्हा केला?" बाई ताडकन उभी ऱ्हायली. खांद्यावर

आलेला लुगडयाचा पदर कमरंला खवला अन् झनकाऱ्यानं म्हनली, " म्या गुन्हा केला हे पंच म्हणते. म्या गुन्हा केला, पर म्या कंचा गुन्हा केला ? तुला म्हणू म्या ही काकडी लावली, म्या खाल्ली. पर गुन्हा कंचा केला ? तुला म्हणू चिमणी घरटं बादतवं, अंडी घालतवं, पिलू काढतवं, पिल्लं मोठी व्हते आणि ती पिल्लं त्या चिमणीला परजा वाढवतंय. म्हण म्हणते म्या काकडी लावलंव म्या खाल्ला. माह्या हातानं खाल्ला, माह्या मनानं खाल्लाव. हे म्हणते, ' तू मांजरीनं पिल्लू खाल्लं. तू उपराट्या पायाची हाय.' खरं हाय. उपराट्या पायाची हाय. पर म्या का उपराट्या पायाची हाय ? तुला म्हणू, तू निवाडा कर. आता म्हाया डोकीला क्यास पिकलं तर न्याव कर. जीव कातला. उराची आग व्हती, नुसती आग. आता म्हाया दाल्ला म्हण करणार न्हाय परका बाप्या म्हण बगणार न्हाय. लई जुलूम झाला जुलूम. " बाईचा तळतळाट चालला व्हता. मध्येच खाली बसून ती पायाच्या टाचा घासत, हाताचे तळवे चोळत, तोंडात माती घालत–डोळे कोरडेच–मध्येच आवंढा गिळत व्हती. बाकी चितरावाणी गप. मी कासावीस होवून ऐकत होतो. बाई पुढं म्हणत व्हती, " तुला म्हणू, माह्या बापानं पैलं लगीन केलं तव्हा म्या तीन वर्सांची व्हते. ५० रुपयाला बापानं इकली व्हती. शानी व्हस्तवर माह्या बापाजवळ व्हते. नांदायला गेले तर बाप मरून गेला. ह्या नव्हऱ्याच्या पोटची मला चार वर्सांत चार प्वारं झाली. ह्यो थोरला पोरगा त्या नव्हऱ्याचा. समदा पोरांचा चिगूर व्हता. दोन पोरगे व्हते, दोन पोरी व्हत्या. त्या नवऱ्यानं मला इकली तवा ही दोन प्वारं माज्यासंगं आली. दोन पोरी नवऱ्यानं ठेऊन घेतल्या. दुसऱ्या नवऱ्यासंगं म्या सात वर्सं नांदले. त्याला तीन पोरं झाली. सात वर्सानं त्यानं मला तिसऱ्या नवऱ्याला इकली. ते समदं पोरगं हायत. इथं खेळत्यात. तिसऱ्या नवऱ्याजवळ म्या दोन वर्सं नांदले. ते असंच व्हतं. (हात हालवून दाखवते) त्याला काय झालं नाई. त्यानं मला दोन वर्सांनं चौथ्या नवऱ्याला इकली. धा वर्सं त्याज्या संगं परपंच केला. त्याह्या पोटाची मला पाच पोरं हाय. तो चौथा नवरा आता येरवडयाच्या तुरुंगात हाय. खून झाला. माह्या नवऱ्याला जलमठेप झाली. ह्यो माझ्या थोरला पोरगा (तिनं समोर हात करून दाखवला) आता माह्या पोरं किती झाली तू सांग. आता मी पाचवा नवरा करणारच न्हाई. पंच काई करो. मी उलट्या काळजाची म्हणतो. म्या काकडी लावली, म्या खाई हे भाडखाऊ हायत. म्या पाचवा नवरा केला तर पंच व्हय म्हणील. "

तिचा तळतळाट चालू व्हता. ती पंचांना शिव्या देऊ लागली तवा झबझब्या तिच्या अंगावर धावून गेला. क्षणात तिनं हातात ढेकळ घेतला का झबझब्या जाग्यावर गार झाला. माझ्यापुढं तमाशा नको म्हण पिस्तुल्यानं त्यांना थांबवलं. ही विलक्षण शोककथा ऐकून मी सुन्न झालो व्हतो. मुलाची बाजू ऐकावी म्हण मी त्याला विचारलं, " काय रे तुजं नाव ? " तो गप. खूप प्रयत्न करूनही तो नाव सांगत नाई. काळा

कुळकुळीत पंचविशीतला तरणाबांड पोरगा. कमरेला खाकी चड्डी, अंगात फाटलेला सदरा, नाका–डोळ्यानं तरतरीत. केसांच्या जटा इस्कटलेल्या. माती आन् कचरा-धुळा यानी सारं डोकं माखलेलं. त्याची आई त्याच्या बोलीत बोलते. आता पोरगा मोकळा होतो. नाव सांगतो, " बजरंग " " तुझी आई सांगते ते खरं हाय ? " तो मानेनंच हो म्हणतो. पुढं सरून पंचांना पटवावं तसं मला पटवत हाताची दोन बोटं दाखवतो आन् घुटमळत सांगतो, " दादा, आमच्या जिवांचं खरं नाय. रातंध्या कंचा टाईम कसा येईल ठावं न्हाई. सारकं झुकांड्या देत, हुलकावण्या देत, पळत न्हायचं. घावंल ते खायचं. वलं खायचं, कच्चं खायचं. मागून खायचं अन् म्होरं पळायचं. सारी जलमाची हाडं हाडं. पर हे पंच लई बाजिंदे हाय. आमी काय पाप नाई करत. आमच्यात कैक येळा असं झालं हाय. आमचे बापे लई करून जेलात असत्यात. बाया बाहेर असत्यात. खून–खराबा झाला तर बापे मरतात. " म्हण एकेकाला चार-पाच बायका असत्यात. म्हण राग–वैताग. कवा-कवा आसं व्हतं. पर त्यात इपरीत काय ? तो बाभळीचा काटा बगितला ? " तो पुन्हा बोटांची खूण दाखवतो. " तो एक मी हाय, एक माझ्या बाप हाय अन् हे मदी आई हाय. एक मी संभाळतो, नायतर बा संभाळतो. " माज्या अंगावर काटा सरसरून आला. माझं माणूसपण उद्ध्वस्त झालेलं असतं. मी क्षणभर तटकन उभं राहातो निघून जावं म्हणून. झबझब्या सांगतो, " सायबा, तुला बंगाळ लागंल पर आमी रानची पाखरं, तुमावाणी मानसं नाय. मी गुमान खाली बसतो. आता अत्याचार झालेल्या बाईला भेटावं, तिला काय विचारावं तिच्याकडून काही ऐकांवं असं खरं म्हंजे वाटत न्हाई. आम्ही बैठक संपवून उठतो. आणखी त्या अत्याचार झालेल्या बाईला काही विचारावं असं वाटत नाही. पन ह्या साऱ्या बाया सांगत असतात. 'आमाला उलीकसं घर दे. जागा जमीन दे. आम्ही एका जाग्याला ठिया मारतो. खरं तर आणखीन कितीतरी दे.' पिस्तुल्या पोचवायला गावात आला. साऱ्या गाडीवाटंनं, पायवाटंनं पिस्तुल्या सांगत असतो, त्यांच्या असंख्य व्यथा मांडत असतो. पोलिसापासून संरक्षण, खायला अन्न, घराला जागा, अंगाला वस्त्र, डोईवर निवारा, माणसासारखं जगायला. 'दादा, तू सांग. आमी काय पायजे ते करू. पर आमच्या बाया-पोरांची अब्रू राखली पायजे. आमीबी माणसं हाय. आमाला माणूस म्हण जगू दे. आमी संघटनेत येतो. तू कायबी सांग आमी करतो. पर उलीकशी जागा मिळवून दे. " मी एस. टीत बसतो. पिस्तुल्या आपल्या वाटेनं मागे जातो. माझं डोकं सुन्न झालेलं असतं. एस. टी. चालू होते. पिस्तुल्या दिसेनासा होतो. माझ्या डोक्यात नुसतीच गर्दी झाली आहे.

●

अंधारातून प्रकाशाकडे

रामदास अडके तसा लहानपनापासनंचा माजा दोस्त. शिडशिडीत अंगाचा, राम-काठीवाणी नुस्ता ढोल उंच. रंगानं काळासावळा, नाकाडोळ्यानं तरतरीत. उंची जरा अधिक, त्यानं पाठीत किंचित बाक आल्याला. रामदासकडं बगीतलं की काबाडकष्ट करणारा, करापलेला चेहरा, आन् एकूणच काटकपणा, राकटपणा लक्षात येतो. आला की उभ्या वाऱ्यासंगं येतो. जल्माची तकतक मागं लागलेली. आजही तो तसाच आला व्हता. " रामुसवाड्यावर बैठक ठिवतोया. समदी तयारी मी केलीया. परवाच्या दिशी दोनपारचाच ये. लई दिस झालं, आपले लोक तुला आणायला पायजे, म्हण मागं लागलेत. नाई म्हणायचं नाई. दोपारचाच ये. म्हंजी समदं जमून ईल. "

रामदास तसा भटक्या विमुक्तांच्यातला चांगला कार्यकर्ता. आता सरकारी

नोकरीत कामाला. समाजासाठी काही करावं ही खूप इच्छा. पण घरचं खाऊन लोकांच्या कुपाटाच्या काड्या कशाला वडायच्या म्हण खाली मान घालून चारचौघांसारखा राबणारा, बायकापोरांत रमणारा, चारचौघांत मिसळणारा. रामदास पेपरातली बातमी वाचून कामाला लागलेला असतो. हक्कानं घरी येऊन सांगून जातो. घरातनं जायच्या आधी तासभर स्वयंपाकघरात शशीला ऐकवून गेलेला असतो. येतो वाऱ्यासारखा अन् जातोही वाऱ्यासारखा. दुसऱ्या दिवशी पुना सांगावा असतोच. म्हणून मी यल्लपाला बरोबर घेऊन रामुसवाड्यावर पोचतो.

पाच-पन्नास घरांचा रामुसवाडा ध्यादुपारा वस पडल्याला असतो. समद्या घरान्ला कुलपं. पोरं कानापल्याली. काई-बायी झाडाच्या शेंड्यावर चढून शिट्ट्या मारत असत्यात. कायबाय पोरं गोट्यांचा डाव खिशात घालून फाटक्या आंगरटयाच्या लांबड्या भाईनं नाकं पुशीत, कंबरंखाली घसारल्याली चड्डी वर वडत, तुटाक, कानपून उभी असत्यात. तर जरा मोठेवाड पोर आपसांत म्हणतं, "शिब्ऱ्या दूतिवल्या कारं?" दुसरा म्हणतो, "दांडाळ्या आलाय." "शिब्ऱ्या कुठल्या, वैतायला जाया पायजे." तिसरा मधेच म्हणतो, "टांगवाला दांडाळ्या टैरा दिसतोय" बारीक, मोटी सारीच पोरं खो खो मोठ्यानं हसाया लागत्यात.

मी त्याच भाषेत विचारतो, "शिब्ऱ्या कुणी दूतवल्या रं? ए ऽ ऽ बाताड्यांनो, रामदास नाईक कुठ आसंन रं?"

पोरं आता चपापली. आपली सारी बोली ह्याला समाजतीया, माणूस आपल्यातलाच दिसतोया ह्यो हिसाब करून जरा जवळ आली. "रामदास्या कंचा? इट्टूबाचा का भुजाबाचा?" एक पोरगा जरा नेटानं विचारतो. "भुजाबाचा," मी म्हणालो. "त्यो सांचा ईल, कामाला गेलाय." 'पोरं दांडाळ्या कुणाला म्हणत्यात?" यलप्पा मला विचारतो. मी म्हणालो, "'दांडाळ्या' म्हंजी उराप्या, उराप्या म्हणजी कुलवाडी, आपल्या बाहीरचा. 'शिब्ऱ्या' म्हंजी भाकरी, 'टैरा' म्हणजे काना, तिरळ्या डोळ्याचा, 'टांगवाला' म्हणजे सडसडीत. त्यो तुला म्हणतोय," तर पोरं मोठ्यानं हसत असत्यात. मी रामदासचं घर गाठतो. दारातच एक म्हातारी बसल्याली आसती. मी पटकन ओळखतो. ती रामदासची आजी. नजर उलीकशी कमी आल्याली असती. मी जवळ जाऊन रामदासबद्दल इचारतो. तर म्हातारी आंगाला लावून घिना. मी नाव सांगितलं तरी उपेग न्हाय. मग डोक्यात येतं, आपलं डोस्कं बी भारीच की! "मी आनू कैकाडणीचा थोरला पोरगा लक्षा." "आगं बया! केवदानला रं झालायस! माजी नजार आता आंदुकलीया. बस, बस बाबा, कशी हायेतर आनू, बापू, पोरंलेकरं?"

"बरी हायती. रामदाश्या कुठं गेला?" मी. "त्यो व्हय? आसंन तिकडं वडग्याला. त्याच्या सासऱ्याचं रसायन बगाया गेला आसन."

मी खानाखुना पटवून घेऊन वड्याला निगालू. मिटींग सांची असती. येळ बराच असतो, म्हण वडा गाटला. सिताबायच्या डोंगरातनं निगाल्याला घाण्यारीचा वाकडा-तिकडा नागसपेटीवडा करवंदीच्या, घाणेरीच्या तापऱ्यानं तरारून उठल्याला असतू, वड्याच्या दोन्ही कडंला नुसती काटयांच्या झाडांची 'खैची' झाल्याली असती. बाजूनं काटेरी झुडपांचं बन, त्याला घाण्यारी आन् कावळीच्या, निळूंबीच्या येलानं नुसतं जकडल्यालं असतं. तर ध्या दुपारचं झाडंबनात नुसतं किर र ऽ ऽ ऽ झाल्यालं असतं. मधीच एकांच्या जाळीवर धुराचं लोट निघत असत्यात. त्याच्यावरनं वळकायचं असतं, त्या जाळीत भट्टी लागलीया. आसपास माणसं दबा धरून असत्यात. पोलिसवाला न्हायतर कुणीबी दांडाळ्या असला की इशारे होणार. माणूस बगून म्होरचं ठरणार, तर जवळ जावून मी मोठ्यानं परवलीचा शब्द म्हणतो. तसं जरा कुनबून कानावर येती. बिन्नळ्या बाहिर निगावा तसा एक जवान पोरगा बाहीर निघतो. मी यल्लपाला सांगितलेला परवलीचा शब्द आम्ही दोघं म्हणतो. आन वड्याच्या त्या कडंला आमाला तो घेऊन जातो. तीन-चार चुलवानं ढणढणत असत्यात. रसायनाची डबडी, पराती, स्टो, चुलीची लाकडं, नारळाच्या कवट्या, काड्यापेट्या, फुटाणे, आन सटार फटार चिल्लर सामान पडलेलं असतं, रामदासाच्या सासऱ्याचा हातभट्टीचा कारखाना असतो. रामदास सरपान आणायला गेलेला. आमची इकडची तिकडची बोलनी चालू असत्यात, तवर त्यो येतो.

आमाला बगताच त्याला आनंद होतो. पण नको तिथं आलास म्हणत त्यो जवळ येवून बसतू. मला गप्पा मारायच्या असत्यात निवांत, तर त्याला कसनुसं होत असतं.

गप्पा सुरू केल्या तवर दोन डबं उतराय आल्यालं. वाटलं, आपण बी जावं जरा पानीबीनी मारायला. पण पुन्हा रामदासला बरं वाटणार न्हाय म्हण बसलो. यल्लाप्पाला सारं नवंच होतं. त्यात त्यो जरा घाबरलेला. तेव्हा रामदासला इचारलं, 'रामदास, पावण्याला पोलिसाचं भ्या वाटतया.'

"पावनं, भ्याचं काम न्हाय. पोलिसाचा 'बा' बी हातं येणार न्हाय आन् आला तरी काय करणार न्हाय."

त्याचा सासरा मधीच माहिती पुरावतो, 'पावणं आमी काय शिकल्याली न्हाय. पर बामन पांडव-प्रतापात सांगतू एक गोष्ट भीमाची आन बकासुराची, त्या गोष्टीवानी हाये बगा. गाडीवर अन्न, एक रेडा आन् एक मानूस बकासुराला द्याया लागायचा. तसं आता आमचं हाय. आमाला पोलिस खातं म्हणजी बकासूरच हाय बगा. महिन्याला पाचशे रुपयांचा हप्ता. त्याजशिवाय रावंडातल पोलिसान्ला आन् त्याच्या संगं येत्याल त्या मानसानला प्यायला, पयल्या धारंची, फुकाट. दोन महिन्यांतनं एकदा रसायन जप्त आन सहा महिन्यातनं एकदा पंचनामा, आन मंग महिना

दोन महिनं सजा. तर आसं समद्या रामूस आळीला सूत लागल्याली हाय. तवा बिनघोर बसा. हाता मातर चुकला की आलीच बलामत."

दारू आणि तिच्यासंबंधीच्या गप्पा संपल्या आन मी विषय काढायचा म्हण उमाजी नाईकावर घसारलो. तसं एका इतिहासाला सुरुवात झाली. रामदासचा चुलता आन सासरा म्हंजी बोलाय नुसता फुटाण्यावाणी. लाह्या फुटाव्या तसं शाहिरी थाटात बोलाय लागले. उमाजी नाईक आणि त्याचं बंड, त्याच्या अपार पराक्रमाची वर्णनंही न शिकलेली, आंगटाबहादूर माणसं अशा बहारीनं सांगत असत्यात की जसं शाहिरांचं पोवाडं गातोय. उमाजी नाईक हा पहिला क्रांतिकारक, पण म्हारा-मांगांनी, रामुशांनी, वैदांनी, कैकाडयांनी केलेलं बंड म्हणजे दरोडेखोरी किंवा पेंढाऱ्यांचा उठाव, असा आपला इतिहास!

तर रामदासचा चुलता सांगता असतो त्याचा इतिहास. म्हणजे जसा सध्या प्रसंग घडतोय आणि त्या सगळ्या प्रसंगाना हा पट्ठ्या साक्षी आहे असा!

"पर उमाजी नाईक तसा नेकीचा. शब्दाचा पक्का. त्याजं सारं भांडण इंग्रजांसंगं व्होतं. ही पांढऱ्या पायांची मेंढरं आमच्यावर कसलं राज्य करणार, म्हण त्यो इंग्रजांसंगं लढला. आकिरी इस्वासघातानं गेला. भनीनंच इसवासघात केला बगा. न्हायतर त्याजं जंगलातलं राज टिकलंच आसतं. आन त्यानं इंग्रजाला घालवलं असतं." वगैरे.

तर शत्रूच्या गोटातनं बातमी आणणारे बहिर्जी नाईक, हिरोजी फर्जंद, छत्रपती शिवरायांचे खंदे बहादूर, तर ब्रिटिशांविरुद्ध १८५७ च्या लढाईत मारले गेलेले सातारचे चितरसिंग बेरड, खानदेशातला पयाजी नाईक, दिनो नाईक, भीमा नाईक, यांनी इंग्रजांचा अनेकदा पराभव केला. तर पुण्याला उमाजी नाईक, सत्तू नाईक यांनी भांबुर्ड्याची तिजोरी कशी लुटली, रामदासचा चुलता त्याच्या तरुणपणात पवाडे गायचा.

तर तो सांगत असतो, "रामुशी, नाईक, नायकवाडी, तलवार, बेरड, बेडर, वाल्मिकी, वाल्मीकी नायक, वाल्मीकी मक्कलू अशी नावे. रामुशी जातीची काही ठिकाणं आहेत तर रायचूर गुलबर्ग्याला ते संस्थानिक होते. त्यांना द्वरेर (राजा), द्वेरे, मक्कलू (राजपुत्र) तर आदिलशाहीत तलवार बक्षीस मिळाली म्हणून ते 'तलवार' झाले. चिंच दुर्गा सिमोड्याला ते वसूल करत असल्याने ते पाळगार बनले. काही ठिकाणी ते बेडर कन्नप्पाचे भक्त म्हणून ते कन्हैयाने मक्कलू. म्हैसूरला राजघराण्याशी संबंध म्हणून राजपरवीर, तर नागपूरकरांच्या पदरी असलेले नाईक नायकवाडी झाले." सारा इतिहास तोंडपाठ. आपलाच इतिहास कच्चा, त्याला काय करणार?

सारी दारूच्या भट्टीवरली मंडळी ऐकत असतात. गडी क्वचितच रंगात येत असावा. आपल्या जातीचा अभिमान ऊर भरून वाहत होता. ब्रिटिशांशी कशी

टक्कर दिली आन् बायाबापडी कशी आशीर्वाद देत होती, ते बायकांच्याच आवाजात सांगे. शिदनाक म्हाराची फितुरी कशी झाली आणि उमाजीनं मध्येच त्याचं शिर कसं उडवलं, आणि मराठेशाहीच्या अत्यंत विपन्नावस्थेत उमाजी नाईक हा मोठा हिराच अल्पकाळ चमकून गेला आणि या हिऱ्याने आपल्या तेजाने त्या काळातील निबीड अंधार किंचित काळ दूर सारला. त्याच्या तोडीचा सेनानायक नव्हता. स्वतःबद्दल निरीच्छ, पण शत्रूला कर्दनकाळ. त्यानं देशासाठी सर्वस्वाचं बलिदान केलं. इंग्रजांनी या बेडर लोकांना खूप छळलं. त्यांना देशद्रोही, चोर, लुटारू, दरोडेखोर, खुनी ठरवून त्यांना सेटलमेंटमध्ये टाकलं. १८४३ ला त्यांची वतनं खालसा केली. त्यांना हत्यारबंदी केली. तरी १८५७ च्या बंडात त्यांनी मोठा उठाव केला. त्याची शिक्षा १८७१ ला क्रिमिनल ॲक्ट पास करून बेरडांच्या पायात गुलामीच्या बेड्या ठोकल्या. त्यांना दिवसातून चार वेळा हजेरी लावली. त्यांना गुन्हेगार ठरवून त्यांच्या पुढच्या साऱ्या पिढ्या नष्ट केल्या.

" १८५७ च्या बंडात केलेल्या कामगिरीची यांना मोठी बक्षिसी मिळाली. अनन्वित छळ, उपासमार, बेकारी, पराभूत अवस्था, लाचारी, आणि भूक मागे लागली आणि रामोशी नाईक पोटासाठी चोऱ्या करू लागले. पण नसीब बगा ! या देशात जातीवर समदं ठरतंया. क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडक्यांच्या बरोबर त्यांचा सेनापती दौलत रामोशी फाशी गेला. त्याचं नावं तरी माहीत आसतं का ? आसं का व्हावं ? क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके हे क्रांतिवीर होतेच पण त्यांच्याबरोबर खांद्याला खांदा देऊन त्यागात जराही कमी न पडणारे बेरड, रामोशी मात्र गुन्हेगार, दरोडेखोर, असा इतिहास का सांगावा ? असहकाराच्या चळवळीत फार मोठी कामं आमच्या लोकांनी केली. इंग्रजांना एकाकी टक्कर देणारा वीर सिंदूर लक्ष्मण, (१९२०) चिकळदिनी, गुंडप्पा (१८९०) अशी किती तरी नावे. तात्या (रामदासचा चुलता) सांगत असतो. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र, सारा रामोशी जमातीचा इतिहास सनावळ्यासह तोंडपाठ सांगत असतो. ' आमची पोरगी नाचली की तमाशा, आन् त्यांची पोरगी नाचली की डिस्कू का काय म्हणत्यात ते. सायब, अशी लई रत्नं मातीआड घातलीत. आपुन जागं तर दिसणार ना ! पर जातीचा अभिमान कुठंय ? "

" आता समदीच उठत्यात की माजी सैनिक म्हण पेन्शन घेत्यात. क्रांतिकारक म्हण त्यांचं पुतळं दिसत्यात. आता मला आसा घोड्यावर बसल्याला आन् इंग्रज हापीसराचं शिर तलवारीला लावल्याला उमाजीचा पुतळा कुठं आक्क्या दुनियात दावता का ?

" तात्या, बरं आजचं काय ? आमचे पूर्वज लई पराक्रमी होते ते कळलं. पर आता काय गत हाय बोला. "

" सायब, मोलाच्या पोटी केरसुण्या, दुसरं काय ! पर जमाना येगळा व्हता बगा.

आपले लोक लई पराक्रमी. थोरल्या महाराजांच्या काळात आपल्या लोकानला इनामं, वतनं दिली व्हती. मॉप दिलं व्हतं. म्होरं मुसलमान आन् इंग्रजांच्या संगं लढले. त्यांनी समदं लुटलं. इंग्रज-मुसलमान वैरी झाले. आन् 'चोर लोकांची' म्हण आपल्या माणसांनीच तापल्या तव्यावर पोळी भाजली. सायब, गाव नाय, गावकुस नाय, शेत नाय, वाडी नाय, पोटापाण्याचा धंदा नाय, काय करावं?"

"सायब, काय सांगू? एकेक प्रसंग असा असतू की इचारू नका. दाताचं पाणी गिळत बसतू. पोरा-लेकरान्ला निवत नाय, आतडं तुटायला लागलं, पोरं अन्नासाठी रडायला लागली म्हणजे काय सुचत नाय बगा. घावंल ते वरवडायचं बगा. घावशेल-पावशेल, भंडारा उधळल्यावाणी उधळायचा. मंग भट्ट्या चालू दे, रोज मिळू दे, नायतर आणखी काय व्होऊ दे. पॉट लई बंगाळ हाय, सायब. ते भरलं नाही की काय वाट्टेल ते कराय लावतयं. मग आब्रूची आसू दे, गरतीची असू दे, सकी असू दे, निकी असू दे, वाळल्यासंगं वलं जळतया. कुणी चोऱ्यामाऱ्या करत्यात. कुणी उचलपाचल करतंय. समदी सारखी कशी असत्याल? पण पोलिस समद्यालाच चोर म्हणत्यात."

"पण जरा दरोडा कसा घालायचा ते सांगा की" मी.

तात्या जरा वेळ गप्प बसतो. "आता कशाचा दरोडा घालता सायब? हाता-पायाच्या मुळ्या कवाच ढळल्या. आन् माणूस बी लई हुशार झाला. आता सांदी कोपऱ्यात कशाला काय ठिवतया? टरंका गेल्या, उतरंडीबी गेल्या. कुठं राहिल्यात सुगडं-गाडगी? ठेसंला पोलिस, आन् माणूस असतंया. त्यात आता गावगना बँका निगाल्या सोसायट्या निगाल्या. माणूस लई हुशार झालाय. कशाचा दरोडा घालता? आता लयंच झालं तर चार शेतातली कनसं-विनसं कुणी कुणी आणत असत्याल. पण दरोडा म्हण कुणी आरल्यात तरी घालत नाय. चोराला का जात आसती व्हय? सायब, दारुड्याला जात नसतीया तशी चोरालाबी नसतीया. पण आपल्या कपाळावर सटवीचा टिका, त्याला का करावं?"

"तात्या, पण दरोड्याच्या काही जुन्या आठवणी आसतीलच की." तात्या पुन्हा एक चुटका सांगायला लागतो. रामदास चुलीला जळाण घालतो.

"आमी एका गावात गेलो होतो. दहा पंधरा गडी होतो. दरोड्याचं असं असतंया. काय गडद्यांनी नुसतं आंदारात रापायचं, काय गडद्यांनी भितीला भॉक पाडायचं. काय जणांनी आत उतरायचं आन् काय लोकांनी राकान करायची असते. तर का झालं, मी आंधारात उभा. माझा हात बगितला? तात्या हात दाखवतो. तो डावा हात जरा वाटकोळा असतो. तर ह्या हातानं मी गोफन भिंगरीवाणी फिरवायचो. एका टिपि-च्यात आडवं झालं पायजे. आता गोफण फिरवतो. पर ताण गेला. दगड लांब जात नाय. तवा तरणा व्हतो. नेम असा असायचा की गुंडा म्होरनं येणाऱ्यांच्या आकाळात बसायचा, की माणूस आडवा! तर मी राकाण करतो. म्होरनं माणसं यायाला लागली.

कालवा झाला. वायापोरांची ओरड चालू झाल्याली. तेवढ्यात मी चार गडी निजावल्यालं. घरात उतारलेल्या गड्यानूला सामान लांबवायला इशारा करतोय. तर ही बेनी नुसती गप्पच. वरं म्होरं मारा कमी करावा, तर आपला जीव जातोय. आखीर आई-भणीवरनं शिव्या हासाडल्या. तवा समदीजण अंधारातनं पशार झाली. तसा मी-बी जमिनीसंगं आडवा झालो. आसा रांगलो, की इचारू नका. पावंडं तर उठला नाय पायजे, माग तर घावला नाय पायजे. आन् आपला जीव तर निसटला पायजे. त्याला म्हणत्यात बहाद्दर. मोठ्या वगळटीत आलो तर हे दात काढत बसल्यात. दोघा-तिघांनी खारका खायला सुरुवात केलीया. म्या इचारलं तर म्हणत्यात कसं, जरा कळ काढली असतीस तर काय मेला असतास व्हयं लेका, बाळांतणीचं घबाड व्हतं घबाड. आक्का डेरा बरल्याला व्हता. नुसतं तूप, साकार अन् खारका. नुसती मजा व्हती. हाताला घावल तेवढं बरबाडलं म्हणत मला बी दोन खारका दिल्या.

" तर गोफन चालवू जाणं म्याच. आमचा इठल्या भिती चढायला लई पटाईत. फटच्या टाचनं भीत चढायचा. थकला आता. अजूनबी चढतो."

मी जरा आश्चर्य वाटून पुन्हा विचारलं. तात्या म्हणाला, "सांचं चढून दावू का ? आवं ती कला हाय. कोलाटीन तारंवर नाचतीया तसं आमी पाठीनं भीत चढतू. म्हंजी तोंड म्होरं राहतं. जीव बिनधुन्या न्हातो. उडी तर किती वरनं मारावी सांगा. मांज-रावाणी पायावरचं पडीन. आन् किरान घ्यायला सांगा, परुसभर भिंतीवरनं ताड दिसनी हरणावाणी उड्डून जाईन."

" पर आता गेलं ते दिस. आता काय उरलंया ? हेच बकासुरानला खाया मलिदा द्यायचा आन् आपलं पॉट जाळायचं. काय सुख नाय बगा. कामाला तर कोण ठिवतंय ? कितीबी न्ह्यातीनं वागलं तर कोन गिनतंय ? कानफट्या म्हंजी कानफट्या. चेअरमननं सोसायटी धुतली तर फरॉड का काय म्हणत्यात. आन् आमी सुतळी उचलली तरी चोरीच की. कुठं काय झालं की आम्ही हायच की. 'घावंना कुणाचं तर हाणा गुरवाचं.' तसं हाय."

"सायब, इंग्रजांनी समदी डाळ नासवली. आमच्या वाट्याला काटं आलं. आता सवराज आलं. गांधीबाबाचं राज आलं तर ते कशासंगं खात्यात ते आमाला ठावं नाय. आमी आपलं हाय तिथंच रकाडतोय. आमच्यातबी लई वंगाळ खोड्या हायत. आताशी कुठं नीट सोयरिकी जमत्यात. नायतर तुरुंगाची हवा खाल्ल्याबिगर गडच्याचं लगीनच व्हत नव्हतं. माणूस पोरगीच द्यायचं न्हाय. पर आता बरं हाय. लई भांडकुदाळ जात. कुत्र्याच्या शेपटीवाणी सदा वाकडी. लई कलागती बगा आपसात."

दिवस मावळतीला जावून अंधाराच्या सावल्या वडच्याच्या जाळीत पसरत चालल्या. आमाला बी बैठकीला जायचं असतं. रामदासच्या वस्तीवर बैठक चांगली झाली. लोक माना डोलवत असतात. दादही मिळत असते. पण डोळ्यांतल्या 'दांडाळ्या' च्या

खुणा पुसता येत नाहीत.

माळावरल्या भन्नाट वाऱ्यानं सायकली आपल्याच तालात पळत असतात. यल्लाप्पा, मी, रामदास परतीच्या वाटेवर असतो. यल्लप्पा सांगत असतो, "नाईक, नाईकवाडी, कर्नाटकात, म्हणजे जुन्या म्हैसूर इलाख्यात, शेडयूल ट्राईब आहेत; तर बेळगाव, विजापूर, धारवाड, या पूर्वीच्या मुंबई इलाख्यात ते बेरड आहेत म्हणून इतर मागासात बसतात. म्हणजे एका प्रांतातही, एका राज्यातही, एका जातीला एकच नियम नाही."

रात्री बराच उशीर झाला तरी माळ ओलांडतच होतो. निबिड काळोखातून मध्येच यल्लप्पा सायकलकरून धडपडतो. पुन्हा उठणं, पुन्हा इसावा, आता रस्ता पक्का लागतो. गावातल्या लाइटी दिसू लागत्यात. अंधारातनं प्रकाशाकडं सायकली जोर धरतात.

•

कंजारभाटांची सुहागरात

मुरचंद हरी भाट हे भटक्या विमुक्तांच्या चळवळीतले आघाडीचे कार्यकर्ते. कंजारभाट समाजात मुरचंदला मोठी मान्यता असते. कविचंद भाट, पी. सी. रावळकर आणि कितीतरी कार्यकर्त्यांचा आपला घरोबा. कंजारभाटांची पूजा मुरचंद, कविचंद, रावळकर, माचरेकर या मंडळींच्यामुळे जवळून पाहिलेली. असंच एके दिवशी सकाळी मुरचंद बहिनींना घेऊन सातारला धडकलेला. एका तांड्यावर जायचं असतं. मुरचंदनं सारा कार्यक्रम आखलेला. आला तोच मोठ्या घाईनं. "चला, चला, चला, समदे लोक आपली वाट बगून बसले असतील. एका छोकरीचं लगीनबी हाय. आपल्याच पावण्याची हाय. त्यानं सारी जमात जमंल. तुलाबी आवातन हाय. निघाया पायजे."

दिवस मावळतीला गेलेला. मुरचंदच्या मंडळींना माज्याकडेच ठेवून घेतलं.

मुरचंदनं मोटरसायकल चालू केली. मी मागे बसलो. मोटरसायकलनं वेग घेतला. पुणे–बेंगलोर हायवेवर गाडी वेगात चालली होती. रस्त्यानं सारं बोलणं चळवळीचं चालू होतं. तांड्यात पोहोचलो तर पार कडुसं पडलेलं होतं. खंडाळ्याच्या अलिकडचा बोडका माळ गजबजून गेला होता. वारं भन्नाट सुटलेलं. तांडा नुकताच उतरलेला. चारीबाजूनं कंजारभाट मंडळी जमत असतात. सातारा, सांगली, कोल्हापूर, इचलकरंजी, ठाणा, राशिवडा, हौसवडा, सांगावडा, घोडवडा, हळदी, खांडगाव, परिता, येरवडा, बारामती, नीरा, लोणंद, अशी मुलका-परमुलकातली मंडळी जमलेली असतात. पानकणसाच्या ताटकांच्या, तरटाच्या ताट्या तयार केलेल्या असतात. चार भिंती सारख्या, चारबाजूला भेका रवून दोरानं तिन्ही बाजूनं ताट्या बांदायच्या, वरनं एक ताटी टाकायची का झालं पाल. कुणाकडं घोडी तर कुणाकडं बैल, गाई, यांच्या पाठीवरच तांडा हालत असतो. कळा गेलेल्या घागऱ्यातल्या गोऱ्यापान, उंचापुऱ्या, देखण्या बायका. सडसडीत अंगाच्या, नितळ चेहऱ्याच्या. अप्रतिम सौंदर्य ही या बायकांना मिळालेली मोठी देणगी हाये. ताठ कण्याच्या गरेंवाज बायका. अगोदरच गोऱ्यापान, कंबरेला घागरा, त्याच्यावर सैलसा लांब बाह्याचा सदरा, डोक्यावर ओढणी, सुरेख भांग पाडलेला. कपाळाला मोठंच्या मोठं कुंकू. गळ्यात, जरमली चांदीचे दागिने, हातात हातभर कथलाच्या बांगड्या, तोंडामधे पानाचा विडा. त्यानं तोंड, दात, ओठ कायम रंगलेले. हे कंजारभाट समाजातल्या बाईचं प्रातिनिधिक चित्र. अंगावरच्या फाटक्या घागऱ्यानं झाकता येईल तेवढं झाकलेलं. माळावर सारा बाय–पोरांचा कालवा झालेला. मोटारसायकल तांड्याच्या जवळ गेली आणि एकच गिल्ला झाला. बारक्या पोरांची गर्दी मोटारसायकल बगण्यासाठी तर बायापोरांचा गराडा पडलेला मुरचंद भोवती. कुठून कुठून आलेले पाहुणे–रावळे यांच्या कोंडाळ्यामध्ये मुरचंद आडकतो. मी सारं न्याहाळत असतो. चारी बाजूनं अंधार वाढत असतो. आता आमाला बसायला ताटकार टाकलेलं असतं. मी, मुरचंद विसावतो. घाई नसतेच. तांड्यावर आजची रात्र काढायची, या विचारानंच आलेलो असतो. पण नक्की असं काई नसतं. घडेल तसं मंडळींच्या कलानं सारं चालावं लागतं. एका दहावारा वर्षांच्या पोरीनं आमाला चहा आणून दिला. मुरचंद लोकांच्या, माज्या ओळखी करून देऊ लागतो. "हे माचरेकर, आमच्या कंजारभाट समाजातले मोठे अधिकारी, सुपरेट म्हणजे आपल्या सुपरिंटेंडसारखे. यांचा लय मोठा मान असतो. हे दुसरे मलकेकर. ह्यांना आमी 'भाप्पा' म्हणतो. हे आमच्या तांड्याचे बादशहा. राजाच म्हण की. हे मुख्य, ह्यांच्या म्होरं कुणाची तमा चालत न्हाय." तेवढ्यात लांब असलेल्या माणसाला मुरचंद कंजारभाटांच्या भाषेतून हाक मारून बोलवतो. तो फाटक्या अंगाचा माणूस त्याच्या झुपकेदार मिशांनी लक्ष वेधून घेतो. त्याचाही परिचय मुरचंद करून देतो. "हे तमाईचे-

कर. आमच्यात ह्यानला गौनर म्हणत्यात. हे तांड्यावरचे न्यायाधीश हायत. ते न्याय–निवाड्याचे काम करतात. ते लांब उभे हायत ते लालूसाब." जाडयाले, उंच्याले, पागुटंवाले. त्यांना मुरचंद हाक मारतो, पण ते फार घाईत हायत. पंचायतीत झालेला कायदा आमलवजावणीचं काम लालूसाब करत असतो. तेवढ्यात एक माणूस मुरचंदच्या जवळ येऊन त्याच्या कानात कुजबुजत असतो. मुरचंद मान हालवतो. तो माणूस परत लालूसाबाकडं जातो. मुरचंद मला सांगतो, " हे आत्ता गेले ते गुमाने. आपन मराठीत त्यानला खबऱ्या म्हणतो. हा गुमाने, समाजाची सारी माहिती डोक्यात साठवून ठेवतो. पंचायतीत काई चुकलं माकलं तर सारे रीतिरिवाज गुमाने सांगतो. यांचं स्मरण फार चांगलं असतं. खडान् खडा माहिती या गुमान्याला असते. म्हणून त्याला आमी खबऱ्या म्हणतो. ते चुलीजवळ बसल्यात ना, तो बग तो चुलीत फुकतोयं खाली वाकलेला तो जो हायना तों मनकेकर. तो टपाल्या. आपल्या कोतवालासारखं ह्याचं काम. ह्या गावाचा निरोप त्या गावाला मनकेकर सांगायचा. "

एका बाजूला पोरांचा गिल्ला चाललेला. दुसऱ्या बाजूला पाचपन्नास तीन दगडांच्या चुली आणि तेवढ्याच बायका चुलीच्या धुरात आडकलेल्या. बापे चुलींना जाळ लावत होते, तर कुणी मधेच नरडं ताणू-ताणून बोलत होते. मधेच एखादी बाई चवताळून दुसरीच्या अंगावर जायची, कालवा वाढायचा, पुना सारं गप. एका बाजूला चार-पाच म्हातारे चकमकीनं चिलीम चेतवत असतात. चिलमीच्या मागं बारकं चिरगुट असतं. त्याला राधी म्हणत्यात. आदी मोकळ्या चिलमीत एक बारका खडा टाकायचा. तेज्यावर तंबाखू भरायची. तंबाखू गच्च भरली का तेज्यावर पानकणसाचा कापूस ठिवायचा. गारगोटीच्या चकमकीनं ठिणगी पाडायची का पानकणसांचा कापूस लगेच पेटतो. कापूस पेटला का राधी चिलमीला गुंडाळायची का चिलीम तोंडाला लावून सुरुवात करायची. चिलमीवर भकाभका जाळ होतो आन् तोंडातनंही भकाभका धूर निघतो. म्हणजे चिलीम पेटली. आता ती चिलीम वळीनं दम मारायला घ्यायची. तर तिकडे म्हातारे रंगात आलेले असतात. मुरचंद मला सांगतो, 'त्यो ऽ त्यो ऽ झुपक्यावाल्या मिशाचा म्हातारा दिसतोय ना, तो दिडेकर. त्यो आमचा लेटणी सायब हाय. त्यो कायद्याचा पंडित हाय पंडित. त्याला लेटणी सायब म्हण सोनेरी किताब हाय. त्याच्या जवळचा त्यो जो म्हातारा हायना, त्यो आत्ता चिलीम दिली त्यो, त्यो अभंगे. त्योबी निरोप्याच हाय. पर त्यो नुसता शुभशकुन सांगतो. चांगला निरोप सांगतो म्हण त्याला अभंग्या म्हणायचं. त्यो जरा फटकून हाय, त्यो म्हाताऱ्याच्या पलिकडचा पोरगा, त्यो नराळे. त्यालाबी मान असतो. पर त्यो मान येगळा हाय. तो तांड्यावर आला का बायापोरांची तारांबळ उडती. त्योबी खबऱ्याच हाय, पर मैतीची खबर देतो. म्हण लोक त्याला भित्यात. आता त्यो मदीच बसलेला म्हातारा हाय ना, त्याजी कापडं बग कशी हायत. रंगीबेरंगी, चट्यापट्याचा फेटा त्याला

मंदील म्हणत्यात. अंगात कोट, गळ्यात सोन्याचं लाकीट, बोटात सोन्याच्या आंगठ्या. त्याला नेतले म्हणत्यात. त्यो या तांड्याचा सावकार हाय. त्याला जहागीरदार म्हणत्यात. फार चांगला माणूस हाय तो. साऱ्या तांड्याचं रिन पाणी एकटा बगत असतो. त्याज्याजवळ त्यो वाकून बसलेला माणूस हाय ना, त्यो लालजी. त्याला 'घमंडे' म्हणत्यात. त्याचं या साऱ्या जमातीवर मोठं वर्चस्व असतयं. त्याज आईबडलांचं घराणं. म्हणजे, त्यो ह्या तांड्याचा आई-बापच असतो म्हण त्याला लालजी म्हणायचं.

मुरचंदच्या शेजारी माज्या डाव्या बाजूला एक तरतरीत जवान पोरगा बसलेला असतो. "हांऽ अरे ह्यांची वळख करून द्याची ऱ्हायली ना. हे तमाईचे म्हणजे प्रधान. आमच्या तांड्यावरचे प्रधान. असे लई मानकरी हाय. आठराकुळी जमात हाय आमची. हे तमाईचे, नेतले, ललूसाव, बोलतेन् तसा तांडा हालन्."

तर आता तामईचेकर बोलू लागतात. माजी वळख मुरचंदनं करून दिलेली असतेच. मी कंजारभाट समाजाची माहिती विचारू लागतो. प्रधान म्हणाले, "हे बगा, पूर्वीच्या काळापासून म्हणजे अता एक उदयसिंग राजा होता. त्याला भोमसिंग अन् तानसिंग असे दोन मुलगे होते. तानसिंग हे आमचे पूर्वज म्हणजे जमात मारवाड मधली. पर काय झाला, छपनीया काळामंदी मुलकावर मोठा संकाट आला. मोठा दुष्ट काळ पडला. तर या छपनीया काळामंदी आमचे वाडवडील, आजे-पंजे म्हणले, बाबा मुलाबाळाला खायला काय माती शिवाय, झाडपाल्याशिवाय ऱ्हायलं नाय. तवा छपनीया काळ काढायचा तर हेजापक्षा ज्या ठिकाणाला पिकल्यालं हाय तर हा देश सोडून दुसऱ्या देशात गेलं तर आपल्या पोरालेकरांचं निवारण लागंल. म्हणूनशान त्या देशातनं आमी लोक निगले. तवापासनं कुठं जमीन, जुमला, शेत, खेत, घर, वस्ती केलं नाय. म्हणजी हे गाव, ते गाव करत भीक मागायची. म्हणजी त्या टायमाला लोक डोकेबाज नव्हते. शानी नव्हती. आमची लोकं वाट घावंल तिकडं गेली. म्होरं ताडसाळं सरकारनं तार कंपाऊंड लावला त्या टायमाला आमाला हाजरी लागली. तार कंपाऊंड केला आन् आमा लोकान्ला बंद केला. सेटलमेंटात जुलमाचा काम आन् जाच होता. तांडसाळ सरकार गेला, हामीभी घोडा, बैल, गाई, घेतला आन फिराय लागलो. हामची सारी जात शिमग्याला जमती."

मधेच प्रधानाला कुणीतरी हाक मारली म्हणून तो उभा ऱ्हायला. तर तिकडे सारी बाया-पोरं, म्हातारी माणसं, एका पालाम्होरं एकत्र गोळा झालेले. आमच्या गप्पा चालू असतात. तिकडं साऱ्या तांड्यावरची जमात एकत्र जमलेली असते. प्रधान त्या कोंडाळ्यात जातो. मी, मुरचंद अजूनी तिथंच असतो. तेवढ्यात लालासाव, प्रधान काईबाई हातवारे करून बोलतात आणि त्यांच्या भाषेतनं मुरचंदला तिकडे बोलवतात. सारी पोरं री-री करत असतात. कुणी रडत असतं, कुणी वरडत असतं.

सारे बाया-पोरानीशी गोल बसलेले असतात. अजूनही चार दोन चुली धुपत असतात. तिथं तुरळक तुरळक बायका राहिलेलं काम उरकत असतात. आमाला बोलवणं आलं म्हण आमी बैठकीत गेलो. त्याला छेज म्हणतात. आमाला मधेच बसायला दिलं. सारे लोक गोल घोळका करून बसलेले असतात. आपसात बाचाबाची चालू असते. मुरचंद मला हळूच सांगतो, "आता आपण छेजमधे आहोत. आता गप्प बसून सगळं बघायचं, बोलायचं न्हाय. हे सगळं झालं की तुला सगळं मी या लोकांकडून सांगीन. आता मात्र गप्प बसायचं." सगळी म्हातारी मंडळी हारीनं आपआपल्या मानाप्रमाणं बसली होती. लालूसाब, दिडेकर, लालजी, तमाईचे सारे लोक 'करंट'मधे होते. लालासाब उभा न्हायला, त्याच्या भाषेतनं बोलाय लागला. मला थोडं थोडं कळत होतं, कारण कंजारभाटांची भाषा तशी थोडी हिंदी वळणाची आहे. हिंदी, गुजराथी, मराठी, मारवाडी या भाषांचं चमत्कारिक मिश्रण म्हणजे या लोकांची बोलीभाषा आहे. त्यामुळे आपल्याला थोडीफार कळते.

एक तरुण पोरगी म्हणजे साधारण दहा बारा वर्षांची. बायकांच्या घोळक्यात बसलेली. मुलीच्या अंगावर नवे कपडे असतात. डोक्यावरच्या पदरानं चेहरा दिसत नाही. नटून-थटून ती बसलेली असते. दुसऱ्या बाजूला तसंच पुरुषांचं कोंडाळं. तिथं मुलगा बसल्याला असतो. मुलगाही नटून-थटून बसलेला असतो. प्रधान उभं न्हाऊन कायबाय बोलतो. तसं सगळ्यांच्या चेहऱ्यावर कौतुक, आनंद असतो. माना डोलायला लागतात. एक म्हातारी बाई छेजमध्ये येते. तिकडून नवरामुलगा एक गाठोडं घेऊन येतो. त्याच्यातल्या ५–७ साडया बसलेल्या बाईच्या पाठीवर टाकतो. त्या लुगडयांना चुनडीयाँ असं म्हणतात, असं मुरचंद हळूच सांगतो. सासू उभी न्हाते. लुगडी गोळा करून ठेवते. तिनं येताना तिच्याबरोबर खारका, खोबरं यांच्या फुलांच्या माळांसारख्या माळा केलेल्या घेऊन आलेली असते. अशा दोन माळा सासू जावयाच्या गळयात घालते. याच्या अगोदर २५–२५ रुपये दोन्ही अंगानी जमा केलेले असतात. ते मेंदीचे म्हणून मुलीच्या बहिणीला दिलेले असतात. मेहुणीनं मेंदी लावल्याशिवाय नवरदेवाला छेजमध्ये बसताच येत नाय आणि २५ रुपये देऊन हट्ट पुरा केल्याशिवाय मेहुणी मेंदी लावत नाय, अशी परंपरा हाय. त्याच्या नंतर दोन्ही मालकांकडनं ७–७ रुपये जमा केले गेले आणि एका माणसाच्या हातावर ठेवले. तो माणूस पळत कोपटात गेला. मुरचंद हळूहळू मला सांगत होता. हे जे ७–७ रुपये गोळा केले त्याला लारेक म्हणतात. आता लग्नाचा विधी चालू होणार आहे. ७ रु. नवरा ७ रु. नवरी अशी दारू आणली गेली. पंचांनी ती ताब्यात घेतली. त्यांच्या भाषेतून काई बोलू लागले. मुलीचा मालक आणि मुलाचा मालक दोघांना जवळ बोलावलं. दोघांच्या हातात दारूची एक एक बाटली होती. दोघं काई म्हणत होते मंत्रासारखं. दोघांनी पंचांसमक्ष आपआपल्या बाटलीची तोंडं उघडली. दोन्ही बाटल्यांची तोंडं एकमेकांना चिकटवली आणि एकाच धारेनं

दारू जमिनीवर ओतली. दोघं काही बडबडत होते. मला काही कळत नव्हतं. मी मुरचंदला खुनवलं तो म्हणाला, "विधी सुरू होत आहे. देवांना, भुताखेतांना व दोन्ही घराण्यातल्या पूर्वजांना दारू अर्पण करण्याचं काम चाललंय." आधीं आधीं बाटली ओतल्याबर ओतण्याचं काम थांबलं. सारी जमात शांत बसली होती. मगाचा कालवा कुठेच निगून गेला होता. आता दोघांनी आपआपल्या हातातली बाटली आपआपल्या तोंडाला लावली. त्यानंतर मुलीच्या बापानं आपल्या दारूची उष्टावलेली बाटली मुलाच्या बापाला दिली. मुलाच्या बापानं आपली उष्टावलेली दारू मुलीच्या बापाला दिली. 'या विधीला अतिशय महत्त्व आहे,' मुरचंद म्हणाला. 'आता लग्न मोडू शकत नाही. पण ही लग्नाची सुरुवात आहे.'

पंच उभं ऱ्हाऊन 'माल्लेची बेटी विटूमधे दिली' असं मोठ्यानं म्हणतात. सगळे टाळ्या वाजवतात. पुन्हा प्रधान उभं ऱ्हातो. दोन्ही मालकांकडनं ७–७ रुपये घेतो. त्याचे तांदूळ आणतात. आता हे तांदूळ तांडयातल्या सर्व लोकांना लहान मुलांसह वाटी-वाटी वाटले जातात. इकडे बायकांच्यात गाणं सुरू होतं. एक बाई छान ढोलकं वाजवते. मोठं लयबद्ध गाणं आहे.

गाणे १ ले—

नंदकी चूडी चमक रहा चोबना
फुट गई चूडी बिखर गया चोबना
सय्या दूजे केवडा घडाया जो चोबना
नंदकी चूडी चमक रहा चोबना
सय्या तुजे असली घडाया जो चोबना
यौवना नंदकी चूडी चमक रहा चोबना
फुट गई चूडी बिखर गया चोबना

गाणे २ रे—

भनी भनी आ भलो रेऽ
भनी भनी आ भलो रेऽ
तुटलो या भलोऽरेऽ भलोऽरे मोरे सय्या
मारो रंग भरोया भलोऽमेन घाऊशेला
गरज कर लाई बना मुखसे बोलो
लाडी का दिल खोलो ॥ धृ ॥
ये भनी भनी या भलोरे
लढलोऽ याऽभलोरेऽ भलोरे मोरे सय्या
ये उदीया पारऽ रसोरे सचमोती याऽ
भलो भलो रे मोरे सय्या

शेला गरज कर लाई
या भलो भलो रेऽ मोरे सय्या

हे अर्थ न समजलेलं गाणं. पण सुरावट अतिशय छान. दुसऱ्या बाजूला हे जे तांदूळ वाटलेत त्याला पोवळं म्हणतात. हे तांदूळ वाटले का लग्न लागलं असं समजायचं. आता ७ रुपये धारेचे झाले. ७ रुपये पोवळीचे झाले. ७ रुपये चोटी, ७ रुपये बोडी-वान, २१–२१ रुपये पंचांचे, २५ रुपये ब्राह्मणाचे, असं ५२५ रुपयांमध्ये लग्न बसवलं. प्रधान उभं ऱ्हाऊन लग्न झाल्याचं जाहीर करतो. " लग्न लावायचं हे कर्तव्य आमी केला. नवरी तुमाला पसंत हाय, नवरा तुमाला पसंत हाय. आमी मध्यंतरी तुमचा येव्हार करणार, लग्न लावणार, त्याचं भागीदार ऱ्हाणार न्हाय. मग लंगडी असू दे, पांगळी असू दे. तुमाला येव्हार पटला, तुमी केला. " याच्यानंतर गाणी तशीच चालू ऱ्हातात. मंडळी पै-पावणे जमलेले असतात. दारू तर प्रत्येकाच्या पाचवीलाच पुजलेली असते. सगळ्या तांड्यात जवळपास प्रत्येकाच्या पालात दारूचा फुगा असतो. त्यानं बायका-पोरांशी पिनं आलं. सारे लोक दारू पितात. जेवण खाणं होतं. आता लग्नाचा शेवटचा भाग सुरू होतो. त्याला ' सुहागरात ' म्हणतात. तिथंच माळावर तांड्यापासून थोडं तुटक चारी बाजूनं बंद असलेले एक पानकण-साच्या तरटाचंच झोपडं उभारलेलं असतं. आता नवरा-नवरी या दोघांनाच त्या झोपड्यात जायला सांगतात. नवऱ्याची मेव्हणी, काई कुरवल्या त्या झोपडीच्या दारात उभ्या असतात त्या काई हाटत नाईत. नवऱ्याकडच्या कुरवल्या नवरदेवाला काई कानात सांगतात. नवरदेव आपल्या गळ्यातल्या खारका-खोबऱ्यांच्या माळा तोडून मेहुणीच्या हातात ठेवतो. मेहुणी आणि करवल्या, सगळ्यांचा एकच कालवा होतो. आता खारका-खोबरं वाटण्याचं काम चालू होते. पोरी हळूहळू तांड्यात येतात. नवरानवरी फक्त त्या कोपटात शिरतात. याला जागरण जात असं म्हणतात. आता सगळे लोक आपल्या आपल्या व्यापात लागतात. काई गरत्या बाया, म्हाताऱ्या बाया, म्हातारे पुरुष, रात्रभर नवरानवरी ज्या कोपटात गेलीत त्या कोपटाची राखण करतात एका अर्थानं सारा तांडाच राखण करत असतो.

हा प्रकार तसा मला थोडा नवीन असतो. जेवणखावणं झालेली असतात. मंडळी निवांत असतात. आमालाही खरं म्हणजे निघायचं असतं. हाच लग्नाचा कार्यक्रम पूर्वी चार दिवस चालत असे. पण आता परवडत नाही म्हणून उरकत असतात. आता मालकेकर, लालजी, प्रधान, रावळकर, माचरेकर, माज्या अ मुर चंदच्या भोवती कोंडाळं करून बसतात. मी या आगळ्यावेगळ्या सुहागरातबद्दल कुतूहलानं विचारतो. म्हणून माचरेकर म्हणतात, " आमच्या जातीमंदे काय हाय की मुली आमाला आगदी १०० टक्के सूद्द निगायला पायजे. आपला माल खराखुरा आपल्याला पायजे. खोटा माल चालायचा नाय. तशी आमच्या वाडवडलांची पुन्याई हाय.

म्हंजी ते काय आमच्या हातची नाय. किती काळ लोटून गेले असतील. पिढ्यान्-पिढ्या गेल्या असतील, पर आमची रीत बदालली न्हाय."

आता माल खरा का खोटा कसं कळणार? प्रधान सांगू लागतो, "सायब, त्याचं काय हाय, आमच्या जातीमंदी बस्ता घेताना ७ चुनडीया घेतात. म्हणजे त्याला मराटीत लुगडी म्हणत्यात. ७ लुगडी घेतात. दोन्हीकडचे वरबाप वरमाई, त्यांना कपडे घेतात, त्याच टायमाला बस्त्यातच पंचांसमक्ष, म्हाताऱ्या बायकांच्या समक्ष एक पांढरं धुवाट अर्ध्या वाराचं कापड विकत घेतात. हे कापड लय महत्त्वाचं हाय बगा.

"तुमी मगाशी बगितलं का ते कापाड नवरी मुलीच्या हातात त्या म्हातारीनं दिलं व्हतं. आता आमच्यात अशी रीत हाय, का ते नवं कापड नवरानवरीनं सुहाग रातीला संबंध झाल्यावर वापरायचं. नवरी मुलगी ते कापड जपून ठेवते. आन् रात-भर त्यान्ला राकानबी असते. ती हेजासाठी का नवरानवरी बदलू नाय. आता असं बगा, एखादा नवरा नपूंसक हाय. तर त्यो ह्या टायमाला बरोबर धावतो. आता नवरी हाय, तर नवरी खरी का खोटी हे त्या कापडावनं कळतंय. लग्नाच्या अगोदर जर नवरीचा कुणाशी अनैतिक संबंध आला असला तर त्या कोऱ्या फडक्यावर रक्त येणार नाय. म्हणजे तो माल खोटा हाय. सुहागरातीला फडक्याला रक्त लागलं तरच माल खरा समजत्यात. आन् असा खोटा माल निगाला का पुना पंच बसत्यात. नवऱ्या मुलाला पंच इचारतात, 'बाबा, तुजा माल तुला खरा मिळाला का खोटा?' माल खरा निगाला असला तर सारा जलमभर सुखाचा संसार करत्याल. पण माल खोटा निगाला आणि नवरा मुलगा म्हणाला, 'तुमी जातगंगा हाय, आन् ही वाहती गंगा हाय. चुकलंमाकलं असलं तर मी पदरात घेतो. माजी काय तक्रार नाय. तर मुलगी नांदायाला जाती. पर ही अशी नांदायला गेलेली मुलगी आयुष्यभर कलंकीत व्हाते. सगळ्यांना तिचा संशय येतो. तिच्या चारित्र्याचे धिंडवडे आयुष्यभर निघतात. आमच्यात अशी चाल हाय का घरात बाई वाईट वळणाची निघाली तर कुलदैवताचा कोप होतो. मग माणूस आजारी पडो, जनावर आजारी पडो—काहीही वाईट घटना घडली की त्या बाईचा छळ चालू होतो. या छळाला निरवा नाई. ती मरस्तोवर तिला जाच होतोच.

"पण जर मुलगा म्हणाला, 'च्याआयला, मी एवढा खर्च केलाय, अन् मला जर माल खोटा मिळालाय, तर ह्याचे नक्कीच कुठंतरी संबंध असणार. मला जर हे आदी माहिती असतं तर मी हे केलंच नसतं.' असं जर पोरगा म्हणला आणि त्यानं लग्न नाकारलं तर पुन्हा पंच बसतात. दोन्ही पाट्यांचे २५-२५ रुपये घेतात. संबंधाच्या वेळी वापरलेलं पांढरं कापड पंचांम्होरं तांड्यातल्या सगळ्यात म्हाताऱ्या बाईकडं ते देतात. साऱ्या बायका ते फडकं बगतात. त्या फडक्यावर रक्ताचा डाग

नसला तर तसं पंचांसमक्ष जाहीर करतात अन् असं जाहीर झाल्यावर पंच त्या मुलीच्या आई–बापाला 'छेज 'मधे खेचतात. त्या मुलीला लग्नाच्या आगोदर कोणा बरोबर संबंध आले, त्याचं नाव सांगावं लागतं. हे नाव सांगितल्याशिवाय त्या मुलीला गत्यंतर नाही. नाहीतर संसारच होणार नाही त्यांचा. अन् अशा संबंधांत एखादा जर नातेवाईक निघाला तर पंच कमिटी त्याला तत्काळ १०० रु. दंड बसवते. आणि तो दंड नवरदेवाला मुलीच्या आईवडलाकडनं भरावा लागतो."

प्रधान बोलत असतो. बाकीचे लोक नाराज असतात. सारखं त्यांच्या भाषेतनं हे बोलू नको ते बोलू नको, असा कालवा चालू असतो. प्रधान मधेच इतरांना तोडतो. याचा फायदा घेऊन मी त्याला बोलतं करण्यासाठी मधेच खडा टाकतो. "प्रधानजी, एक गोष्ट मला समजली नाई. मुलीच्या माया अंगाला पडदा असतो. तो अतिशय पातळ असतो. तो पहिल्या संबंधाच्या वेळंला फाटतो अन् रक्त येतं हे खरं हाय. पण जोरात पळाल्यानं, उड्या मारल्यानं, नुसत्या धावपळीनं, सायकल चालवल्यामुळं, असं कोणत्याही कारणानं तो फाटण्याची शक्यता असते." मला मधेच तोडत माचलेकर म्हणतो, "सायब, आमच्या देवादिकाची शपथ. तुमी हिथं असलं काय बोलायचं न्हाई. आमचे बापजादे पिढ्यान्पिढ्या करत आले. ते का गाढव होते का घोडे ? आवं जात बाटली तर रीत कशाला केली ?" प्रधान त्याला शांत करतो आणि पुढे सांगू लागतो. "सायब, त्याजं काय हाय, तुमी म्हणता ती गोष्ट खरी हाय. पर आमच्यामदी काय हाय, पोरगी शानी सुरती व्हयच्या आदी, तिला पदर याच्या आदीच लगीन करत्यात. आता आता कुठं १० वर्षापतूर ठेवत्यात. न्हाईतर बाळपणीच लगीन करत्यात. १० वर्षांची पोरगी म्हणजी मोठी झालीहो. त्यानं आमची रूढी बरोबर हाय."

"हां, तर तुमाला काय सांगत व्हतो– आमच्यात दोन जाती हायत. नाला अन् बागड. बागड बारा जमाती अन् नाला आठ जमाती. कंजार म्हणजी चोर, सायब. येगयेगळ्या मुलखात आमाला येगयेगळं लोक बोलतेत. गुजराथी मुलखात आमाला छारा बोलते. दिल्लीकडच्या मुलखात आमाला कैंजर म्हणते. आपल्याकडच्या मुलखात आमाला कंजारभाट म्हणतेत. सांगली-कोल्हापुराकडं तेलां कारवाणी म्हणतेत. कर्नाटकात लौल्यार म्हणत्यात. तर आमच्या दोन जाती. आमच्या भाषेत त्याला माल्हा व विठू म्हणत्यात. तर माल्हा बारा जाती हायत. तमाईची, मलकीयॉ, गुमाना, मेना, हाबंगे, अबवी, जूसी.—आणखी काई हायत पर आठवत न्हाय. अशा बारा जाती हायत. आता विठू मधी आठ जाती : रावळकर, इडेकर, नेकलेकर, इंद्रेकर, तारळेकर, माचरेकर, अशा जाती हायत. रोटीबेटी येव्हार व्होतो. पर आपसात न्हाय. विठूच्या पिढीचा विठूच्या पिढीशी नाय. अन् माल्हाच्या पिढीचा माल्हाच्या पिढीशी नाय. ते पाप. ती भावकी हाय म्हण तसा सोयर संबंध नाय. पर

चुकून माकून भावकीतल्या माणसाचा अनैतिक संबंध झाला अन् पंचाम्होरं आला तर पंच त्याला १०० रु. दंड मारत्यात अन् पहिल्यांदा जातीच्या बाहेर काढत्यात. त्याला १०० पासनं ४२० पावतर दंड मारत्यात, वाळीत टाकत्यात. असं वाळीत टाकलेल्या माणसाला शुद्धबी करून घेत्यात. तेजाकरता होम करत्यात. आपन शुद्ध व्हायला गंगेला जातो. तर आमच्यात त्याला पवित्र करून घ्यायला होम करत्यात. त्याला पांढरे कपडे घालाय लावत्यात. त्याला दूध-दह्याची आंगोळ घालत्यात. जानवं अडकवत्यात. असा बामणावाणी पोषाख करत्यात. दिवस उगवतानाच त्या माणसाला त्या तांड्याच्या बाहेर जिथं कुणी जास्त माणसं नाईत अशा ठिकाणी नेऊन तिथे 'देवविधी' करायला लावत्यात. तिथे 'देवविधीला' गोवऱ्याचा ढीग करून ठेवत्यात. त्या ढिगाखाली गव्हाच्या कणकीचे गोळं करून ठेवल्यालं असत्यात. रुईच्या झाडाच्या शिंगट्या आणून ठिवलेल्या असतात. अशा सात शिंगट्या लागतात. 'देवविधी' करताना गोवऱ्या पेटवतात. त्या पापी माणसाला पांढरं कापडं घालाय लावत्यात. ज्याच्याशी संबंध आला त्या माणसानं दुधानं आंगुळ घालायची. गंगंच्या पाण्यानं आंगोळ घालायची. स्वच्छ कपडे घालाय द्यायचे अन् त्या गवऱ्याच्या भवती २५ फेऱ्या घातल्यावर त्याला २५ पावलं पळायला लावायचं. अन् त्यो पळायला लागला का पेटलेल्या गवऱ्यातलं गव्हाच्या कणकीचं गोळं अन रुईच्या शिंगट्या काढून जसे आपन दगड फेकून मारतो तसं त्या पद्धतीनं त्या गोळ्यांनी त्याला मारत जायचं. मारायचं म्हणजी असं त्याला वर्मी मारायचं न्हाय. आता गरम झालेल्या शिंगट्या असत्यात. त्या शिंगट्या गरम केल्यावर येतासारख्या झालेल्या असतात. त्याचे फटके मारायचे. आता तो माणूस तसा उघडाच असतो. पांढरा कपडा असतो तो पातळ असतो. अंगोळ करून भिजलेला कपडा अंगाला चिकटलेला असतो. शिंगट्याच्या फोकांनी ज्याच्याशी संबंध आला त्या माणसानं ७ फटके, ९ फटके असे मारायला लावतात. हा विधी झाल्यावर तो माणूस शुद्ध झाला असं मानतात. त्याचं पाप नष्ट झालं असं पंच जाहीर करतात. हा विधी पंचांच्या शिवाय दुसऱ्या कोणाला करता येत नाही."

मी प्रधानला तोडत माझी शंका विचारतो. "प्रधानजी, पण अशा मुलीचा परक्या जातीतल्या माणसाशी संबंध आला तर काय करता?" "सायब, लायरीवर लायरी कवा धडकती. रोज धडकती? नाय कवचीत धडकती. तसं हाय. आमी त्या बाईला चुकलं माकलं म्हणून तिज्या आई-वडलाला मोठा दंड करतो. पर तिला माणसांतनं उठवत नाय. आता परक्या जातीच्या माणसाचं आपण काय करणार? आपलं जितराब आपल्या दावणीला बांदता आलं नाई. 'आपलं नाई धड अन् जगाला आणला कड' काय उपेग हाय का? पर हे बगा, जरी आमच्यातबी झाले तरी बाई कारी तर व्हात नाई. मग आमच्यातबी म्होतुर लावतोच की. आता म्होतराला काय किंमत

हाय का? आमी लग्नाबाणीच सारं करतो. सुहागरात तेवढी करत न्हाय. बाकी सारं झालं बगा."

वेळ बराच झालेला असतो. गप्पा चाललेल्या असतात. गाणीही चाललेली असतात. पोरंबाळं झोपलेली असतात. बाकी सारे जागे असतात नवरानवरीवर पहारा ठेवून. तसे हे जागरणच असतं, रात्र जागवायची असते. सेटलमेंट मधल्या अनेक आठवणी निघतात. कंजारभाट हा गावोगाव फिरणारा समाज. पूर्वी कधीतरी चोऱ्या करत होता, त्याही झाड-झगोरीच्या. खरं म्हणजे अन्नासाठीच साऱ्या चोऱ्या होत्या. ब्रिटिशांनी यांना गुन्हेगार ठरवले, आणि आजही समाज त्यांच्याकडे गुन्हेगार म्हणूनच पाहतो. जवळपास बारा आणे लोक हल्ली शहरांच्या आसपास खेड्यांमध्ये दारू गाळण्याचा धंदा करतात. हा यांचा परंपरागत व्यवसाय आहे. हा व्यवसाय ते मुलाबाळांनिशी करतात. दारूच्या भट्ट्या पुरुष चालवतात. अन् बायका विक्री पहातात. एका बाईला मी विचारलं, "या दारूड्यांच्या संगतीत, तुमाला भिती नाई वाटत?" तसं ती बाई म्हणाली, "दादा, त्याजं काय हाय, आपुन काय वाणी उदमी नाई. 'रोजचं मढं त्याला कोण रडं!' पाण्यात पडलं का पवायला शिकतयाच की. एखांद गिऱ्हाईक खरजुलं असतं. पर आमची जात सापावाणी हाय बगा. शेपटाला पाय लागला का आमी त्याला सोडत न्हाय बगा, मग त्याला पयल्या धारचा पयला कप फुकट. असं दोन कप घेतलं का त्याजा नुसता राडा व्हतोय. मंग वतायचं नुसतं पाणी. अन् साऱ्या जणी जमून त्याजा राडा करून टाकतो. मग पोलीस असू दे, मामलेदार असू दे, नायतर झंटलमन असू दे. म्हण दारूडेच आमाला भित्यात! आमी दारूड्याला भीत नाय. आमचं काम तसं जिवावर हाय. अब्रूवर बला ईल, असं वाटलं की आमी एकवटतो. पर आता आमच्यातबी काय कायणीची कणसं हायतं की, पर ते समद्यांच्यात हायत."

"मंग बक्कळ पैसा मिळत आसंल नाही?"

"हा ऽ, बक्कळ पैसा मिळतो! आन् मग आमी बोंबलत का फिरतू आता? दादा, तुला म्हणू सांगू सांगते. त्या पांडवपरतापातली गोष्ट हाय ना – त्यो एक राकीस असतो, त्याला म्हणं गाव रोजच्याला गाळा भर अन्न, एक रेडा, आन् योक माणूस एवढं द्यायचा, तवा त्यो राकीस शांत व्हायचा, आता तुला म्हणू आमाला बी एक राकीस हाय. त्यो गीरा, हा गिरा. राहू-केतू वाणी. त्यालाबी महिण्याला दोनचार माणसं, चारदोन रसायनाचं डबं आन् महिण्याचा हप्ता एवढं आळीपाळीनं दिलं तर ह्यो राकीस गप, न्हाईतर मग कायमचीच रेड. मंग कशाचा धंदा? धंद्याचा व्हतोय बांदा. मंग मागायची भीक. आमी कमावतो त्यातलं पोलिस, वकील अन् कोर्ट हेच एवडं खाऊन जातंय का दोन टायमाला खायाची बोंबाबोंब! आन् ह्याज्या शिवाय आब्रूचं खोबरं व्हायचं ते व्होतचं. काय करायचं? कर्माचा भोग! आता तुमाबाणी;

मुरचंदवाणी, कविचंदवाणी, उकिरडयावर म्वॉड उगवाय लागलं, तवा जिवाला ग्वॉड वाटतयं. आताकशी झुंजूमुंजू झालंय, फटफटीत झालंय. रात उडालीया. पर लेका आजून उगवायचं.

सकाळी उजाडलं. सारी रात जागूनच घालवली होती. पोरीचं नशीबबी जागलं. नवरा खुषीत होता. तिच्याही आयुष्यात तांबडं फुटलं होतं.

●

सस्ता बाजार

भर दुपारची वेळ. विलास वाडेकर घाई करत असतो. 'लवकर पोहोचलं पाहिजे. लोकांच्या बाजाराची वेळ झाली की, नाक पुसायला वेळ मिळत नाही, तर आपल्याशी कोण बोलणार ? लवकर गेलो नाही, तर उपयोग नाही. बाजारात माल लावावा लागतो. त्यात सारं घरदार बायापोरांशी राबत असतं. तेव्हा फार लवकर जाऊन उपयोग नाही. अन् उशिरा जाऊनही उपयोग नाही. माल लावून झाला पाहिजे, पण गिऱ्हाईक आलेलं नसलं पायजे, असा जरा वेळ असतो. तेव्हा पोहचू. मी ऑफिसात रजा टाकून येतोच. तूही पोहोच.'

विलास वाडेकर भटक्या विमुक्त जाती संघटनेचा, पुणे शहराचा सेक्रेटरी. काशीकापडी समाजातला. जुन्या बाजारात, त्यातही कापड-बाजारात, सारी आपली मंडळी भेटतील म्हणून सांगून जातो. शिवलाल जाधव टकारी भामटा समाजातला. तोही

बरोबर असतो.

गेली कित्येक वर्षे या जुन्या बाजारातल्या कापड बाजारवाल्या काशी-कापडी, जोशी, देस्की, गोंधळी आणि काही मुसलमान मंडळींची, भररस्त्यात मालाची विक्री चाललेली असते. दिवसभर उन्हात तळपत, अंगावरचा घाम पुसत मंडळी बसलेली असतात.

भर दुपारच्या वेळी मध्यमवर्गीय मंडळी वामकुक्षीला पडलेली असतात. आणि उन्हाच्या, पावसाच्या, थंडीच्या सगळ्याच ऋतूंत एक आवाज, नीरव शांततेचा भंग करीत गल्ली बोळातून चिरकत चिरकत वातावरणात मिसळत असतो. 'हाय का भांड्यावर मोडतोड', नाही तर, 'घ्यायची का भांडी ऽऽ' नाहीतर 'जुन्यापान्या कपड्यांवर भांडी, मोडतोड,' 'साखरेवर मोडतोड,' असल्या हाळ्या यायला लागतात. आणि या परिचित आवाजानं, निवांत झालेल्या महिला चटदिशी 'भोवारीण आली वाटतं' म्हणत हळूच दारातून बाहेर येतात. डोक्यावर भलीमोठी पाटी, पाटीत बरण्या, काचेचं सामान, नाहीतर ॲल्युमिनियमची, जरमलची भांडी, पातेली, वाट्या, पितळ्या, पराती, आसं किडूकमिडूक. फार तर एखादा तराजू, पारडी, वजन. पाटीच्या बुडाला डोक्यावर घट्ट बसेल अशी चुंबळ. आंगावर नऊवारी लुगडं, काचून घासलेला कासोटा आणि तेवढाच काचून काढलेला भरपूर पदर उजवीकडून डावीकडं खोचलेला. दाताला दातवान लावल्यालं किंवा पानानं लाल झाल्यालं तोंड. कपाळाला भरपूर मोठं कुंकू आणि मागं एखादं पोरगं. पायात वहाणांचा पत्ता नसतोच बहुधा, आसलीच तर फाटकी तुटकी. हातात भरपूर बांगड्या. अगदी याच वेषात चारसहा बाया गल्ली–बोळातून भांड्यांवर कपडे गोळा करीत असतात. आपली झोप मोडली म्हणून आपली नाराजी तर ज्या बायांना मध्यमवर्ग 'भोवारीन' असं म्हणत असतो, त्या या बायका काशी-कापडी, जोशी जमातीच्या. दिवसभर डोक्यावर 'गम्पा' घेऊन (गम्पा म्हणजे टोपली) फिरतात. पड पाडून फाटकं तुटकं कापडं, अंदाजानं किंमत करीत घेतात. आणि बदल्यात भांडी देतात.

या मंडळींच्या बाजारात जाऊन यावं असं अनेकदा ठरवलेलं असतं. पण जमत नाही. अनायासे एक चांगली गोष्ट पुणे महानगरपालिकेच्या कमिशनर साहेबांनी केलेली असते. गेले वर्षभर तरी आम्ही एक मागणी करत होतो. या जुन्या बाजारातल्या मंडळींना कायम स्वरूपी जागा मिळावी. कार्पोरेशनने गाळे बांधावेत. यांच्या बाजाराच्या ठिकाणी दिवाबत्तीची सोय व्हावी बाजारात जवळपास चार-पाचशे बायका जुन्या कापडाची दुकानं थाटून बसतात. त्यांच्यासाठी स्वच्छतागृहे बांधली जावीत, नळकोंडाळी बसवावीत, अशा अनेक मागण्या संघटना करीत होती. त्यासाठी आठ-नऊशे बायकांचा मेळावा झालेला होता. त्याला विद्या बाळ, नीलम गोऱ्हे, बाबा आढाव ही मान्यवर मंडळी आलेली होती. साऱ्या 'बोहारणी' मोठ्या आक्रमकतेने, पोटतिडकेने बोलल्या होत्या. समारोप करताना बाबा म्हणाले होते, 'लढाई करायची

तयारी आहेना ? तर जागा मिळेल.' शिष्ट मंडळ भेटले आणि कमिशनर साहेबांनी जागा मान्य केली. पण कागदावर. अखेर बोंगिरवार साहेब पावले. खरं म्हणजे त्यांचा सत्कारच करावा एवढ्या जिव्हाळ्यानं त्यांनी या प्रश्नाकडे पाहिलं. आणि आज रस्त्याच्या कडेला गजबजलेला मंगळवारातला जुन्या कापडांचा बाजार कार्पोरेशनच्या चांगल्या सहकार्याने रस्त्याच्या कडेला जरा साफसूफ केलेल्या जागेवर भरू लागलाय.

विलास वाडेकर, विलास पालकर, यशवंत, दिलीप, चंद्रकांत, नेताजी, शाम, विश्वनाथ आणि नजीर मुल्ला—सगळ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसडून वहात होता. कृतज्ञतेची चमक नजरेत दिसत होती. यमुनाबाई पालकर सांगत होत्या, "का सांगू सायेब, लय दिसाचं मोड उगावलं बगा, किती दिस पाणी घालघालून दमून गेला व्हता जीव. डोळ्याची झरा आटली. कवर वाट बगावी ? आता हे बगा, पयलं आमच्या बाजाराला का नाही 'गुजरी' म्हणत व्हते. तवा आमचं बापदादा त्या गुजरीत कापडं इकायचे. तवा गुजरी व्हती आयतवारात. तथं कायबाय झालं, तवा लोक म्हटलं, 'उठा !' झालं गुजरी मोडली. तिथनं उठलो ते आलो नानावाडच्याच्या आन् सनवार-वाड्याच्या अल्याडल्या वाटंवर. तथनं म्हणले, 'उठा !' पुन्हा उठलो आन् आलू सनवारवाड्याम्होरं. तवा नवा पूल झाल्याला नव्हता. आता पुन्हा म्हणाले, 'उठा !' उठलो. नव्या पुलाखाली, आता काँग्रेस भवन हाय, तिथं तथनं म्हणले, 'उठा !' उठलो. तवा कार्पुरेशनची बिल्डिंग नव्हती, तर तिथं. तथनं म्हणले, 'उठा !' उठलो. कार्पोरेशनच्या रस्त्यावर बसाय लागलो. तिथनं म्हणले, 'उठा ! आन् भांबुडर्याला जा.' आन् आकिर बसलो या मंगळवारातल्या रस्त्याच्या कडंला. आता हितनंबी 'उठा' म्हणतेल आसं सारकं वाटायचं. पर आपली पोरं शिकली. ती म्हणली ही जागा आता सोडायची न्हाय. पर जिवात जीव नव्हता. बाबांनी मनावं घेतलं. तुम्ही समद्यांनी केलं तवा आता ह्यो सवताचा, बाजारकऱ्यांचा जागा झाला."

रस्त्याच्या कडेच्या खड्ड्यात भर घालून कॉर्पोरेशनने ही जागा केलीय. रस्त्यावरनं बाजारात उतरायला चांगल्या पायऱ्या केल्यात. शेजारी नाला वाहतोय. तो तारेनं बंद केलाय. तारेच्या आतल्या बाजूला नंदीवाले, भांडीवाले, जोशी आणि काशीकापडी मंडळींनी आपआपल्याला पुरेल एवढी म्हणजे चार-चार फुटाच्या जागेत हारीनं जुना-नवा वाटावा असा माल लावलेला. जुने कोट, पँटी, सदरे, लुगडी, सहावारी, नऊवारी, दंडाची, धडुती, धोतरं आन् चोळ्या. झंपरपासून ते गटाळ्यापर्यंत. 'गटाळा' म्हणजे चिगूर, बारक्या पोरांची कापडं. एकावर एक बैजवार मांडून ठेवलेली. मध्ये बाई बसलेली. तिन्ही बाजूनं कपड्यांच्या घड्या. ओळीनं चार पाचशे बाया बसलेल्या. तर तारेच्या कडंन ओळीनं शंभर एक खाटा लावलेल्या. तारेला चिकटून खाट घातलेली. खाटेवर जरा चांगला माल म्हणजे पँटा, बुश शर्ट, नेहरू शर्ट, बनियन्स आणि वेगवेगळे कोट. जीनपास्नं पासुडीपर्यंत सारं ओळीनं मांडलेलं. तिकडं जरा पुरुष मंड-

ळींचा भरणा जास्त.

सारी बाजारकरी मंडळी आनंदात असतात. तशी भाड्याची, पण आता कुणी 'उठा' म्हणणार नाही, म्हणून स्वतःची झालेली जागा. एवढ्याच भरोश्यावर साऱ्या गैरसोई सहन करीत जगायची तयारी आहे.

यमुनाबाई, कृष्णाबाई, देवकाबाई, रत्नाबाई, आंबिकाबाई, टेकाडे, या कोमटी समाजातल्या बायका सांगतात, "इलास, मी सांगू आमी तं काय करावं ? देवानं दिलं मोप झालं." विलास विचारतो. "देस्की कुणी हायका बगारे. त्यांना बोलवा."

दुसरी बाई बाजारात चक्कर मारून येते. 'देस्की' काय भानगड आहे, ते काही मला कळेना. मी विचारलं तर तेवढ्यात मालनबाई आली. मी विचारलं तर ती म्हणाली, "सायब, देस्की म्हण आमची जात हाय. आमी बाया जुन्या बाजारात जुना माल घिवून बसतो. पर आमी 'भांडी घेता काय भांडीऽऽ' करत हाका मारत फिरत न्हाय. आमी मुंबईतनं माल आनतो. लय करून गटाळा आनतो. गटाळ्यात काय लय घावत न्हाय, पर पोटापुरत घावतं. आमी दारूदार जात न्हाय. उकत्ता माल घिवून इकतो. आमची जात लय हाय. त्येला आमच्याकडं देस्की म्हणतात. गोंधळ्याबाणीच्च पर आमी गोंधुळ घालीत न्हायी. आणि काशी-कापडच्याबाणी दारूदार फिरून कापडं घेत न्हाय. आसं आपलं आमी मदलीच हाय. म्हण आमाला 'देस्की' म्हणत्यात."

मी तिला थांबवीत विचारतो, तर बाई सांगते, "न्हाय, आमच्यातल्या आमच्यातच रोटी-बेटी येव्हार होत्यात. आमची सवताची जात हाय, देस्की. आमचं गोंधळी आन् काशीकापडीसंगं रोटी-येव्हार होतो. पर बेटी-येव्हार व्होत न्हाय. कुठं राह्यचं तर का म्हणू ? राहतो, कुठंबी. मागंही रहात व्होतो लांब, तकडं हाडापसराकडं. आता ऱ्हातो वडारवस्तीत झोपड्या घालून. आमी उपाशीतापाशी जीव कटंना म्हण जगतो अन् ह्यो गटाळ्याचा येव्हार करतो."

"केवढ्याचा इकता माल ?"

"ते का सायेब, घावंल तसं आसतंया. कवा एकांड्या डागामागं चार आणं घावत्यात. कवा आठ आणे घावतात. कवाकवा रुपादोन रुपयं घावत्यात."

"पर साडी केवढ्याला मिळती ?"

"साडी व्हय, साडी म्या इकत न्हाय, गटाळा इकतो" विलास सांगतो. "मोठ्या डागाचं गिराईक आमच्या लोकांच्याकडं."

यमुनाबाई मध्येच माहिती देत्यात. "सायब, साडी म्हणजी लुगडं कमीत कमी तीन रुपयाला आन् जरा लयच चांगलं आसलं तर धाबारा रुपयाला" खरं म्हंजी गर्दीचं रहस्य आता माझ्या लक्षात आलेलं असतं. जुनेर आसेल पण येवढ्या कमी किमतीत मिळतं यावर तसा विश्वास बसणार नाही.

"तुम्ही काय काय करता ?"

यमुनाबाई सांगतात, "सायेब, आपल्या जातीचा समदा धंदा बायांच्या जिवावर. बायांचा जलम म्हंजी पोत्यारा, कांद्यावाणी आसतंय. म्हणत्यात ना! 'कांद्याची पात, घातली लाथ, गेली वहात.' बापे आसत्यात मदतीला, पर काम करत्यात बायाच. हे बगा, माल आनायचा आपनच. बाजार तर आयतवार आन् बुधवार दोन दीसच भरतो. उरल्या दिवशी पाटंचं उठायचं, पोराबाळास्नी भाकर तुकडा करायचा, खाऊ पिऊ घालायचं, झाकपाक करून ठिवायचं. आन् डोक्यावर टोपलं उचलायचं. गाव-भर वनावना हिंडायचं. बसबसलेल्या कुत्र्यावाणी. मिळंल ती माल घियाचा. सांचं घरी आलं की जुनी कापडं धुवायची, वाळवायची, नीटकी करायची. शिवायची, रंगवायची, रिपीरी करायची, गंजी करायची, इस्तरी करायची, गठुळी बांधायची. ही कामं रोज आलटून करायची. बाजारा दिशी गठुली बाजारात डोस्क्यावरनं आणायची. समदी कामं बायामाणसं करत्यात. बापे मारवाडयाकडनं भांडी आणत्यात. आता कवा-कवा पैसा नसला की, लय हालत वाईट. पाउसकाळात तर का सांगावं? चार-चार दिस पोटाला अन्न मिळत न्हाय! मंग का करायचं? १० रुपये सेकड्यानं पैसं घ्यायाचं, याजावर याज चढत जातंया. कुणी तीन रुपये सेकडयानं पैसं देत्यात. कुणी पाच रुपये सेकडयानं पैसं देत्यात. न्हायतर कर्माला हात लावून बसायचं. मिळालं काम, धंदा झाला, तर खातू. उलीकशी दारूपाणीबी करत्यात. पर याज वाढलं की झालंच बगा समद्यांचं वाटुळं!"

"याजानं पैसं मारवाडी देत्यात का?"

"मागंदी देत व्होते, पर आता देत न्हाईत. आता म्हणत्यात 'डाग ठिवा.' आता आपल्या पशी डाग म्हंजी काय असतुया? मणी-मंगळसूत्र. कुठं चार भाराची एकांदी वस्तू. ती हजाराची वस्तू ठिवायची आन् शंभराचा माल घ्यायाचा. माल इक्कून पैसा मारवाडयाला दिला तर मारवाडी डाग मागारी देतुया. न्हाय दिला तर डाग 'डुलून' जातुया."

"आसं कुणाकुणाचं झालंय. मारवाडी पावती देतो का?"

"नाही. मारवाडयाचा धंदा इश्वासावर चालतू."

"मारवाडयाकडं म्हणजे सराफांकडं का?"

"नाही. पैका देनारा कुणीबी, त्याला आमी सावकार मारवाडीच म्हणतू." तेवढयात राधाबाई विलासलं म्हणते, "ई कृष्णा-आरं आतलू बंगारी– एदूथ आणल्या." (कृष्णाचा सहा आणे भाराचा डाग मारवाडयानं घशात घातला.) मागायला गेला तर ठिवलाच न्हाय म्हणला. पर गरजवंताला आक्काल न्हाय. म्हण मानूस पुना पुन्हा शेण खातंच की वो सायब. कमवायचं, कमवायचं आन् यापा-च्याच्या गारा भरायच्या."

शेजारपाजारच्या बाया येत असत्यात. उभ्यानंच काय चाललंय ते बगतात आणि

आपआपल्या दुकानावर जातात. त्यातल्या काही ओळखीच्या असतात. त्या नुसत्याच हासून जात्यात, तर म्हाताऱ्या बाया रेंगाळत असतात. गिराइकांची गर्दी वाढत असते, तसा कालवाही वाढत असतो. साधा सौदा नसतो. साडीचं वर्णन चाललेलं असतं. दोन आणे, चार आणे, दहा पैसे, इस पैसे, चार आण्यानं माल घासाघीस करून विकला जातो. गरिबातला गरीब माणूस या बाजारात आबरूदार माणूस असतो. तो गिराईक आसतो. त्याच्या मागं दुकानदार लागलेला असतो. तर सारी माणसं नुसत्या हाडांचे सांगाडे. जलमावनं रया गेलेली. त्यातल्या त्यात जरा बरी माणसं खाटांच्या बाजूला. तर आम्ही गलाटलेली माणसं गटाळ्याकडं अशी वाटणी असतेच.

"कोण कोण येतं बाजारात?" मी विचारलं तसं, विलास पालकर हे अध्यक्ष, ते सांगतात, "सायेब, हिथं समदे येतात. गुजर, मारवाडीपास्नं अठरापगड जातीपातुर सगळी येत्यात. कोण न्हायी असं न्हाय. समदे गरीब माणसं येत्यात. परवडत आसंल ते घेत्यात. आन् चांगले लोक दिकान येत्यात. पर ते जरा कडुसं पडताना येत्यात आन् माल घिवून जात्यात. गरिबातल्या गरिबाचा हितं संसार हाय. पैका नाही म्हण काय आडतच न्हाय. फाटकं तुटकं आबरू राकायला पायजी तर आमचा बाजार मंजी सस्ता बाजार. झोपडपट्टीतली माणसं ही हिथली हमखास गिराइकं."

"तुम्हाला किती पैसे सुटतात?"

"सायेब, आक्कं घर रावतं तवा बाजारात पन्नास–साठ रुपये सुटत्यात. त्यात जागाभाडं हाय. लाईट न्हाय, नळ न्हाय, काई दिकाल सोय न्हाय. पर आता तुमी उभे न्हायले तर समदं व्हईल. पर मागं लागाया पायजेल."

"तुम्ही काशीकापडी म्हणजे नेमकं कसं नावं पडलं आसंल?"

"सायब, त्याचं आसं हाय, आमचे मूळचे लोक काशीला जायाचे. गंगेचं पाणी घ्यायचे आन् खाली गोदावरीला यायचे. गोदावरीचं पाणी कन्याकुमारीपर्यंत न्यायचं. काशीचं पाणी तीर्थ म्हणून द्यायचं आन् त्याच्या बदल्यात कापडं घ्यायचे. म्हणून आम्ही काशीकापडी. तवापास्नं भीक मागायची, जुन्यापान्याचा धंदा करायचा, आन् पोट भरायचं, हा आमचा धंदा."

बाजारात रेटारेटी वाढलेली असते. म्हणून लोक हळूहळू बाजारात रंगून जातात. पोटा-पाण्याला लागतात. विलास, मी, शिवलाल पायऱ्या चढून वर येतो. आता भर रस्त्यात बाजार असतोच. फरक एवढाच की काशीकापडी खाली गेले अन् आत रस्त्यावर लोखंडवाले आले.

काय नसतं रस्त्यावर? लोखंडी खाटा, चिमटे, दिवे, सळ्या, सुतळ्या, गंजलेल्या सायकली, मोटारसायकल, स्कूटर, ट्रकपासून जुनं सामान असतं. तर मध्येच एखादा जोशी आपला पोपट घिवून गरिबीवरचा जालीम दवा देत असतो. गर्दीतून वाट काढीत रिक्षा, स्कूटर पळत असतात. तर तिखट, मीठ, मिरची, सौदा, भाजीपाला

कापड-चोपड, नवंजुनं, आंडी, मासे, सुकट बोंबील, सँडल, जुने बूट, जुन्या चादरी, रंग, सतरंज्या, जे जे बाजारात असते ते ते सारं या बाजारात असतं पण एकतर जुनं किंवा अगदीच टाकाबू, स्वस्त, पण सगळ्यांना परवडेल असं.

आता दोन आण्यांत प्लॅस्टिकची बादली, फक्त बुडाला जोड लावलेली. दोन-तीन रुपयांत बुट, पण जरा शिवलेला.

बाजाराची गिऱ्हाइकं वाढलेली असतात. सारी गोरगरीब जनता आपल्या गरजेच्या वस्तू घेत असते. मध्येच बाचाबाची वाढते. मारामारी होते. गोंधळ वाढतो. पोलिस येतात. पुनः शांत. एखाद्या बाईला पोलिस छळतात. कुणीतरी चोरीचा माल आणून विकतो. पोलिसांचं चांगभलं चालूच असतं. तर कार्पोरेशनच्या जागेत अनधिकृतपणे धनदांडगे डौलात राहत नांदत असतात. त्यांनीही भंगाराचा धंदा मांडलेला असतो. लक्षाधीश झालेले हे लोक इतरांना तर छळतातच, पण कार्पोरेशनच्या हातावरही तुरी ठेवतात. ह्यांचे हात लांब पोहोचतात. खरं तर हा रस्त्यावरचा बाजार. या धनदांड-ग्यांना हटवून बोंगिरवारसाहेबांनी या गोरगरिबांच्या बाजाराचं पुनर्वसन केलं तर सारेच बाजारकरी साहेबांना दुवा देतील. पण अधिकारी मंडळी 'चालू' असल्यानं हात ओले होत नसतील, असं कसं म्हणावं? बोंगिरवारसाहेबांनी लक्ष घालून काशीकापडींना थोडा न्याय दिलाय. आता अखिल बाजारकऱ्यांना, कष्टकऱ्यांना न्याय द्यावा. खरं तर मध्यमवर्गाचा 'अपना' बाजार असतो. तर यांचा 'सस्ता बाजार' का होऊ नये? यांना सवलतीनं बँका कर्ज का देत नाहीत? की बँकांना ही मंडळी दिसतच नाहीत? नियमांच्या सोवळ्यातून सुटलो तर खरंच यांचं पुनर्वसन शक्य आहे.

घटनेनं मत दिलं, पण पत कुठाय? तळागाळाच्या उद्धाराचा कानी कपाळी घोष हाय, पण माया कुठाय? असलंच गहाण ठिवायला तर बायकोच्या पलीकडं त्याच्या-कडं हायच काय? लोकशाही आली आन् माया गेली. बँकेच्या मंडळींना, सरकारी अधिकाऱ्यांना जमलंच तर मंत्र्या-संत्र्यांना जरा कणव आली, तर खरंच ही गोरगरीब जनता एका पायांव हात जोडून उभी न्हाईल. पण न्हाईच आलं कुणाच्या डोळ्याला आसू तर त्याच पायातली वहान काढून ह्यांच्या टाळूचं केस काडील.

●

गाढवगोती सोनार

वाईचा नाना चव्हाण तसा भटक्यांच्या चळवळीतला चांगला रावलेला कार्यकर्ता. घिसाडी समाजाची सातारा जिल्ह्यात त्यानं चांगली संघटना बांधलेली. म्हणून त्याला भेटावं आणि सातारच्या भटक्या-विमुक्तांच्या परिषदेचा बोभाटा करावा म्हण वाईला दाखल झालो. वाई तसं निसर्गानं वरदान दिलेल्या कृष्णामाईच्या काठावरचं टुमदार सुंदर गाव.

नानाच्या घरी पोहोचलो तेव्हा नाना, त्याची बायको, मुलं सारीच कामाला लागलेली. नानानं ऐरणीवर लालभडक इंगळासारखा लोखंडी कांबीचा तुकडा धरलेला तर चापून चोपून कासुटा घातलेली त्याची बायको पदराचा खोजा कंबरंला घट्ट खवून तोंडानं सू...सू...सू करीत भिंगरीवाणी मजबूत पायावर उभी राहून असा घण फिरवीत असती की, मी अवाक होऊन पहातच असतो. माझ्याकडं तसं कुणाचं

लक्ष नसतं. पोरं भाता वढीत असत्यात. एका हातानं लोखंडी कांबी घट्ट धरून दुसऱ्या हातातल्या चिमट्यानं घाव घालायची जागा दाखवत तोही तोंडानं काहीसा आवाज काढीत असतो. त्याचा खुनंचा हात बाजूला गेला की बरुबर बहादूर बाई त्या जागेवर घणाचा तडाखा हाणत असते. जसं काही संगीताचा बाजच जमून गेलाय. नानाचं लक्ष माझ्याकडं गेलं तसं 'घिसाडघाई चाललीया, सायब उलीकसं टेका' करत खूण करत असतो.

वहिनीनं मागं वळून पाहिलं, "आगं बया तुमी व्हय. येवढाबली मोठी माणसं झालायासा. आमा गरिबाची वाट कशी चुकलाव तुमी?" मी नुसताच हसण्यावारी नेत म्हणालो, "आलू असाच. भावजला लई दिस बगीतली नव्हती म्हण." नानानं पोत्तं म्होरं सरकावलं. वळक आसतीच. पण मधी लई काळ गेलेला. लहानपण ताजं होऊन म्होरं येतं. वऱ्याच गप्पा होतात. तान्या–शिव्या–संभ्या, नाना, मी आसं लहानपणी निरगुडीत खेळल्यालू आसतो. द्वारकी, धुरपी, या घिसाड्याच्या पोरी तवा बारक्याच आसत्यात. नानाची बायकू त्यातलीच एक. भात्यावर बोलता बोलता 'चा' झाला. 'चा' घेत मी येण्याचं कारण सांगतो. "साऱ्या भटक्या–विमुक्तांची संघटना बांधतोय. त्यासाठी पालं, वस्त्या, बिराडं, तुडावतोय. आपून समद्यांची मोट बांधली पायजील," म्हणत नानाला बरोबर चलण्याचं सांगतो. नाना तंबाखूचा बार तोंडात घालीत वहिनीला कायबाय सांगतो. आमी शेजारच्या वस्तीकडं निघतो. तवर नानाची बायको आशी मोठ्यानं हाळी हाणती की, इचारू नगा. मैला–दोन मैलांवरचं माणूस पळत ईल, येवढा मोठा आवाज. ती पोरांला गप्प बसायला सांगत आसती. सहज बोलत्याल तर कानठळ्या बसाव्यात. कामाचा ठोकाठोकीचा परिणाम आसंल, म्हणत रस्त्याला लागलो.

नानाच्या बिराडाम्होरंच, रस्त्याच्या दुसऱ्या कडंला वळीनं घिसाड्याची पालं आसत्यात. पालांच्या म्होरं एकादं म्हसरू उभं आसत. त्यानं केलेली घाण, पालाम्होरच्या बैलानं केलेली घाण, वैरणीच्या पाल्याची त्यात भर, वर चिरचिर पावसाचा मारा—नुसता घाणीचा, चिखलाचा राडा झालेला असतो. त्यातच जोशांची, घिसाड्यांची, कोल्हाट्यांची, बारकानली पोरं खेळत असत्यात. म्होरं एक बारकासा पूल. त्यातनं पाण्याचा वघूळ घळाघळा वाहत आसतो. त्याच्यावरनं उडी मारून म्होरच्या बाजूला गेलं की ही झोपडपट्टीवाणी पाच पन्नास पालं पडलेली असत्यात. दिवसानं सकाळपास्नंच काळं केलेलं आसतं. पावसाची एकांदी चळक आली की, झाडाखाली थांबायचं.

नाना सांगीत असतो. "सायब, ही पालं लय दिस झालं हितच हायेत. मीबी आता कायमचा न्हातोया. ह्यासनिबी न्हावा म्हण मागं लागलुया. पर जात चार घर मागून खानार, तवा पॉट भरणार. एका घरचं खावून पॉटच भरत न्हाय."

"हे कोणत्या जातीचे लोक हायेत?"

नाना सांगतो, "आवं हे आपलीच गाडावगोती हायेत. तसं आता कशी गाढवं कमीच झाल्यात. हे गाढवी सोनार."

मी कानापतो. "आयला, सोनार ठाव हाय, पर 'गाढवी सोनार' ही काय भानगड हाय, नाना?" मी कुतूहलानं इचारतो. तसं बिराडांकडं जात लोकास्नी हाक मारत नाना सांगतु, "सायब आव तुमी इसारला. जावूंदे..आपून त्यानास्नीच इचारु की."

नाना हाका मारून पालांच्या मधल्या दोऱ्या वलंडत, उड्या मारीत पालांच्या गिच-मिटीत शिरतो. मी मागं आसतूचं. पालानला जरा मजबुती आनलेली आसती. दोऱ्या जरा जोरात आवाळल्या आसत्यात. तसं दोन मेड्यांचा खेळ. दोन मेडचा उभ्या करायच्या. एक आडवा लाकूड आसलं, तर आसलं, नसलं तर नसलं. आडवार लाकूड नसलं तर चऱ्हाट बांधायचा. त्याज्यावर रकटं, वाकाळ, पोतं, पोत्यांची किलतानं, ठेकी. फाटकं-तुटकं लुगडयाचं, धोतराचं धडपं कवचीत एकांद्याला ताड-पत्रीचा टुकडा, एकाद्याला धडकी गोधडी. पावसाचा काळ म्हंजी तर मरणाची तयारी. पावूस काळ जगून काढला तर म्होरचं साल वगायचं. न्हाय तर गपगुमान उलथंपालथं व्हायचं. पालावरल्या गळतीला थांबवायला पांढरा प्लास्टिकचा कागद घालायचा. ह्या कागदाला पावसाळ्याला पालकऱ्यांच्यात लई मागणी. ज्याला आसा मोठवाड रुंद कागुद घावंल त्यो त्या दिशीचा राजा. पालाच्या कोपीत गळती थांबवायची खटपट समदी बापे माणसं करीत असत्यात, तर बाया मानसं कोपटातनं आतल्या आंगान चिखलाची वळी घालत असत्यात. आसली चिकलाची वळकांटी घातली की, जमिनीवरून केवढं-बी पाणी आलं तरी पालांत पाणी शिरत न्हाय. जमीन कोरडी व्हाती. म्हण वळ्या घालायच्या. आमी उड्या टाकत गेलो तर बिराडकरी त्याचा पार इस्कटून टाकल्याला परपंच पालात विऊन जात आसत्यात. एकांदं चांगलं लेपाट, चांगला डबा, कोळव्याचा डबा, आगुदर वळीतनं आत न्याचा. पावसाच्या लढाईला जोर जसा चढंल तसं पालकऱ्याचं हाल कुत्रा खात न्हाय. तर समदी बायापोरांशी माणसं कामाला लाग-ल्याली असत्यात. मधीच नाना एकांद्याला दोरी धरू लागतो तर एकांद्याला 'तुझ्या आयचं येड्या आवलादीचं' म्हणत बिराड उचलाय लागतो. नुसती घाई झाल्याली आसती. आमी दुष्काळात तेरावा महिना म्हण आल्यालू. पावूस काळात पावणा म्हंजी दुष्काळात तेरावा महिनाच आसतुया. पावन्यावनं आठवलं म्हणत नाना गमतीनं म्होरच्या मानसाला म्हणतू. "हिरव्या मिरच्या हायेत ना रं! पावनं आल्याती. लई मोठं पावनं हायेत. जराकशी हिरव्या मिरच्या सुधून ठिवा." आसं म्हटलं की, शान्या मानसानं वळकायचं आसतं. लई येळ थांबायचं न्हाय. मुक्काम तर न्हायच न्हाय. बिराडं लावायची घाई चाललेली असती. मीबी कवा त्यांच्यातलाच एक झालू, सम-जलंच न्हाय. त्यांच्या गटान्यांत माझा गटाना. झालं एकदाचं. मानसांनी आपआपली

पालं शेकारली. वरनं झिमझिम पावूस सारका लागल्याला आसतूच. पाय ठिवायला जागा नसती. समदा चिकुल. त्यात चुलीतली राक आन भात्याची राक त्यानं नेहमीच्या चिखलापरास ह्यो चिकुल जरा येगळा आसतो. आकिर आमी एका बिराडात कोपटात बसतो. कोपटाच्या दारात भाता लावल्याला. भात्यामागं कोळशाचा डबा, त्याच्यामागं हात्यारांचा डबा. एका बाजूला लाकडांच्या बारक्या बुंद्यावर पोलादाची आयरन. त्याच्या म्होरं आनकीन एक धाकटी आयरन. जमीन समदी वली झाल्याली. पोत्याच्या पटकुरावर एक पन्नाशीतला मानूस बसल्याला. नानासंगं कुणी परका मानूस हाय म्हणल्यावर समदी पोरं बिराडाला विऊन उभी. दारात नुसती रेटारेटी. बाया लांबनंच 'काय लचांड हाय' म्हण बगत आसत्यात. गरती बाया जरा म्होरं येऊन पोरांच्यावर खिकसून आत डोकवायच्या. तर कुणी कुणी आतच. उलीकसी जागा आसली तर सरकून बसायच्या. एकांदी लयच आवघाडली तर आंग चोरून बसायची. आतली बाहिर आली की, बाहेरची आत यायची. आत पालात तसं कामच चालल्यालं आसतं. आमी बसलो होतो पोत्यावर. संगाप्पा सांगत आसतो, गाढवी सोनारांची जात. कवा कवा एकांदी गोष्ट मला आजिबात उमजायची न्हाय. म्या पुन्हा इचारली की, समदी मानसं हासायची. एकाद्या आडाणी माणसावानी माझी गत व्हायची.

तर संगाप्पा सांगत आसतू. " आमच्या जाती तीन हायेत. आमच्यामंदी सवनिशी हाय, परधान हाय, पाटील हाय, शिपाय हाय, कोतवाल हाय, गरड हाय, परधानी हाय, आमच्यातबी का झालीनं मुधलाजी हाय, आशी सात परकारची जात हाय. पर आमी तसं लाड सोनार हाय. आमासनी रजपूत लाड सोनारबी म्हणत्यात आन् आहीर लाड सोनारबी म्हणत्यात. तर आमची वाडवडलापास्नं चालत आल्याली बादशाही जात हाय. गावात न्हात्यात ती पांचाळ सोनार त्यांचा आमचा सोयर संबंध आजिबात न्हाय. त्ये जानवं घालत्यात, उदम्याची कामं करत्यात. ते लई मालदार सोनार हायत. बामनावाणी बोलत्यात. त्यांची चालचलन समंदी उदम्यावाणी न्हाती. आन् कामबी उदम्यांचीच करत्यात. त्यानं लयकरून सोनार म्हणला की मालदार दिसतू. पर आमावाणी भिकाऱ्यागत नसत्यात. सक्की भन सोडायचं न्हाईत. लगुलग डावं-उजवं करत्यात. तोळा, मासा मिसळ घालत्यालच तवा डागाला फुंक घालत्यात. आता भनीला सोडत नाहीत मंग लोकांचं तर कां सांगावं ? पर तळं राकील त्यो पाणी चाकील, का न्हाय. ?

त्यानं लय मालदार न्हात्यात. आपल्यावाणी दाताचं पाणी गिळत बसत्यान व्हय ते ?

" पर आता आपलं कसं आसतंया, आपून मास मासकाट खाणारी माणसं. सागुती आसल्या बिगर आपल्या जिवाला चैन लागायचा न्हाय. गाढवाच्या पाटकुळी

बिऱ्हाड बांधल्याविगार आपलं निभायचंबी न्हाय. आता आमी गाढवाच्या मांगं फिरतुया म्हण आमी लाडवाणं. आता लाडवानचं झालं गाडवान. आन गाडवानाचं झालं 'गाडवी सोनार' आता ह्या गाढवांची संगत पंगत लागलीया, तर लोक म्हणत्याल गाढवी सोनार. तर त्यांचं काय चुकलं ? वाडवडील गाढवं सांभळीत व्हतं. तवापास्नं आमाला 'गाढवी सोनार' म्हणत्यात.

" पयले आमचे बापदादा लय कसवी व्हते. बाळ्या, बुगड्या, भोकरी, बांगडी, माळा, बोरमाळ म्हणू नको, वजरटीक म्हणू नको, कोलापुरी साज म्हणू नको, चप्पलहार म्हणू नको, नुजतोड, जोडवी, मासुळ्या, करंगळ्या, पयंजान, म्हणू नको. पोरांचं वाळं, सऱ्या, नती काय, काय सांगू ? हार जिन्नस घडवायचे. सोन्याचं, चांदीचं, तांब्याचं, रुप्याचं दागिनं बनवायचे. जुनं दागिनं उजळायचे. नवं घडवायचे. सायबा, तवाचा वकत नेटा व्हता. माणसात न्हयात व्हती. सायबाचं राज व्हतं. रागू नगस, पर मुला खरं सांगतू. सायबाच्या राज्यात माणसात न्हयाती व्हती. इसवास व्हता. माणसान्ला इसवास घावत व्हता. आताच्यावाणी सारक्या टोप्या बदलत नव्हत्या. तवाचा आन् आताचा टायम येगळाच हाय. आता भाव भाव बगंना, भाव भन बगंना, आई ल्योक म्हणंना. आता का सांगावं तुला, आम लोकातबी न्ह्यात न्हाय. भनी भावंडं न्हयातीनी न्हाय. तर ह्यो आसं उलट्या पायाचा काळ आलाय. पावस पडंना. म्हागाय नुसती रक्ताडलीया दुकभरीवाणी. तवा का सांगतुया, आयकतुयास न्हवं ? सायबाच्या टायमाला चांगलं व्हतं. माणसाला न्हयात व्हती. माझा बा सांगायचा. आमी तवाबी गरीबच व्हतो. तालीबार कवाच नव्हतो. पर बाया-पोरांनी माल आणून दिला तर चोक बंदा रुपाया येव्हार व्हायचा. एक गिन्नीचा फरक पडायचा न्हाय. का हिकडचा दाणा तिकडं व्हायाचा न्हाय."

संगप्पाची टकळी कवा महागाई, कवा माणसा माणसांचे संबंध, कवा नियती, कवा नशीब, तर कवा, मागल्या जन्माचं पाप आसं चालू व्हती. मी निमताला हुंकार भरत व्हतो. तर नाना पुस्ती जोडायचा. तर एकांदी बाई मधीच ठिगाळ मारायची, तर एकांदा बाप्या शिवायचा. तर दुसरा पूरतवाणी लावून लांबवायचा. बाहीर आंधार पडत व्होता. आतनं चिरचिर चालूच आसती. तेवड्यात राकीलासाठी धावधाव चालू व्होती. परतेकाला उलीकसं सांच्यापुरतं राकिल पायजील व्होतं. ज्याच्याकडं नाय आसन त्याच्याकडं पळापळी व्होयाची. आमच्या कोपीतबी आंधारच आसतो. संगाप्पाच्या बायकुनं चूल पेटवली व्हती. त्यानं जरा आंधाराला चिरचिरत धुगधुगीचा उजीड पडला होता. धड दिसत नव्हतं. शिरडीच्या शेपटावाणी लाजबी झाकत नव्हतं आन् माशीबी उठत नव्हती. बाहीर पालापालाम्होरं बिराडं उबीला चुलवानाजवळ जमली व्हती. त्यानं कालवा वाढतच व्होता. आन् आत संगप्पा रंगात आला व्होता. आपून नुसतं चऱ्हाटाला पुरतवणी जोडायचं की संगाप्पाचं चऱ्हाट म्होरं सुरू !

"तं काय सांगत व्हतो लेका, दिस फिरलं, घरासंगं वासं फिरलं. समदी न्हयात खराब झाली. मानुस मानसांजवळ ईना, का माणसाला माणूस वळकंना. बाबा म्हणत ह्ये: ज्या जल्माला आण गाढव वझ्याला. माणूस आपलं पायताण जवळ करतंया पर लोकांचं प्वार जवळ करीना. मंग आपून तर आशी वसवशी. समद्यांवरनं उतरून उतारा टाकल्यावाणी टाकल्याली माणसं. कोण आपल्याला गिनतंया, कोण इसवास टाकंल ? भाव भावाचं वैरी व्हतोय तर सोनंनाणं आमाला कोण देणार ? समदी न्हांत बदालली. माणूस गुवातंला पैसा उचलून घिया लागलं. पैक्यापायी आय, भन, बायकू कशाची आवरू न्हायली न्हाय का कशाचं काय न्हाय. पैक्यापायी सतरा गाढवाच्या अठरा खेपा हुया लागल्या. तवा आमाला हे दिस आलं. जवर न्हयात व्हती, माणूस इसवासानं काम देत व्होतं, तवर आमी सोनारकामं करीत व्हतो. पर सायब गेला आन् हे आसं झालं. सोनं बगत व्हतो, तथं गवऱ्या येचायची बारी आली. समदा धंदा बसला. माणूस इसवासानं माल दिना. दिला तर इसवास ठिवंना. एकांद्या बाया बापड्यानं किडूक मिडूक आनून दिलं आन् कुणाच्या घेनात आलं तर आपल्यालाबी प्वाटभर मार आन् सासरवासणीचं हाल. पर म्या येकल्या-पुरतं सांगू ? कुणाचं कवा काय तोळा मासा खाल्लं आसंन तर तुझा गू खाल्ला आसन् बग. कंदी कुणाचं काय घितलं न्हाय. पर हाताच्या बोटानला बराबरी हाय का ? एकांदं तरी खंडीच्या वरणात मुतणारच. आता एकांदयानं चोरी केली, तरी समदी जात गंगा खराब झालीच. आत आमच्या बापदादांचा पिढ्यान् पिढ्यांचा धंदा पार बसून गेला बग."

संगप्पाचा अवतार फारच वाईट झाला व्होता. त्वांड आंबाट करून इनामदारानं पडक्या वाडयाचं मढं पुन्हा पुन्हा उकरावं तसा तो गेल्या गोष्टी उकरत व्होता. पर पोरं कालवा करत आसत्यात. त्यांज्यावर खेकसत, कवा बायकूवर डाफरत त्याजं आपलं चालूच आसतं. मी मध्येच थांबवावं असा इचार करत असतो. पर पाण्याच्या पयल्या लोटावाणी मनाला ईल ते त्यो सांगतच आसतू.

"आता आमाला कुणी सोनार काम देत न्हाय. पयलेबी भीक मागायचोच. पर आब्रू घाण ठिवत नव्हतो. खोटं का सांगू ? पॉट माणसाला काय वाट्टंल ती कराया लावतंया. दीस लय वंगाळ आलं. आता भाता चालंना. तर कटलरीचं सामान इकतू. कुणी कागाद गोळा करत्यात, तर कुणी किडुकमिडूक करत्यात. आजूनबी पयल्यावाणी जोडवी, मासुळ्या, करंगळ्या, तांब्याच्या आंगठ्या लोकांडाचे चिमटे बनावतो. भंगाराच्या दुकानातनं पतरा आणायचा, आटवायचा, चिमटे बनवायचे, कानकोरणी करायची. कवा कवा एकांद्या माणसानं इसवास ठिवला आन डागडागिनं दिलं तर त्याज्या समक्षी डाग उजळून द्यायाचे."

संगप्पा मधेच त्यानं लोखंडी पत्र्याची केलेली कानाकोरणी दाखवतो. नक्षीदार

कानकोरणी तयार करून संगप्पा विकतो. नव्या दहा पैशाला एक. चार-पाच रुपये सुटतात. संगप्पाच्या डोळ्याला पाणी आलेलं आसतं. बारकी पोरं लेकरं, बायको, आन् संगाप्पा पावसाळ्यात जगणार आहेत-या दहा-दहा पैशांच्या कान कोरण्यांवर.

"पावसाळ्यात धंदा बसला तर काय करता?"

"काय करणार, क्वार कुटका मागून आनुनशान जीव जगवायचा. आपून आर्धमुर्दं खायाचं. पोरास्नी घालायचं. कवा कवा लयच वाईट दीस आला तर पोरानूला धा लागण आपुन पाणी पियाचं. न्हाय तर इटकार चुलीच्या राकत घालायचं आन् पोटाशी घिऊन निजायचं."

"निजायला जागा असती का कोरडी?" "नाय लेका, काय सांगू तुला? म्हाताऱ्या माणसाचं तर लई बंगाळ हाल हायत. बिराडात पाणी आलं की साळंच्या पडवीला जायचं. पर बिराडं सोडून कसं जावा म्हण पोरास्नी धाडतो. मोटी माणसं, थोरले बापे, बाया परातीनं पाणी भरभरून बाहेर टाकतो. हात्तीची पड असली का पाणी ऐकत न्हाय. पाण्याचा नुसता ढू होतो. मंग का सांगू तुला, मरणाचं हाल हुत्यात बग. आता आशा टायमाला का करतो. झेपंल त्यो धोंडा आणायचा. मग धोंडा आणून तेच्यावर बसायचं. दोन-दोन दगड बास होत्यात. आगुंदर एकावर बसायचं, आन हारीनं पायजीत तीत दुसरा दगुड ठिवायचा. एकांदा डबा घियाचा हाताला, आन मान टेकवून रात काढाची. कवा-कवा झोप लागती. पण लई करून लागतच न्हाई."

संगप्पाची बायको आतापर्यंत शब्द बोललेली नसती. मदीच डोळं पुसूनशान पोरांच्या पाटीत धपाटा घालती. पालात धुराचा डोंब झालेला असतो. आता ती पावसाची परवड सांगाया लागते. "दादा, पावसकाळ आला की जराक्शी सिमींट मिळवून दे. भुईसारा घेताना सिमींट घातलं म्हणजे पाणी वर येत न्हाई बग. आन् जरा साखणं सुकलं की बाळलं खडंग होतं. मंग कसलाबी पाऊस आला तरी भ्या नाही. पर का करावं, आपल्या कर्माचा भोग भोगायचा! हितं राकेलाचा पत्त्या नसतोया तर आमा गरिबास्नी सिमेट कोण दील रं? दादा, तू जरा नानाला सांग. म्हणावं, उलीस सिमेंट दे. म्हंजी हयू काळ निगंल."

बाईला सिमेंट भाकरीएवढ्या मोलाचं वाटतं हे तिच्या बोलण्यावरनं मला उमगलेलं असतं.

संगप्पा तिला एक झन्नाट शिवी हासडतो. "च्या आयला येडझवी रांड, बाया-मानसानं सुदीनं वागावं. बाप्यांच्यात आसं त्वांड घालू नाई लुबऱ्या कुत्र्यावाणी. बळबळती जीब हासडली म्हंजी समजंल." बिचारीची दातखीळ बसल्यावाणी ती गप झाली.

जशी ती गप झाली तसं संगाप्पा म्होरं सांगाया लागला. "किती डुया झाल्या

आमी कोण, कुठलं, कुणाचं, हे एका देवाला ठावं. आमी या देशाला आलो त्याला कैक सालं झाली आसत्याल. आमची किडमिडी बोली म्हंजे काय कुणाला ठावं. कंची भाषा आमची आसंल वं? देवाला म्हाईत बाबा. आपल्याला तर काय ठावं न्हाय. पर दादा, तुला सांगू, आपण सम्दी गाढवगोती तीन दगडांच्या चुलीचं भाव हाय. आपल्या समद्यांची एका आळ्यानं पेंडी बांदली पायजे. आपन एक झालो न्हाय म्हणून आपली परवड व्हती."

मी तोडत मधेच त्याला विचारतो. "संगाप्पा, आपन तीन दगडांच्या चुलीचं भाव हे तर खरंच हाय. आन् आपुन एकबी व्हायला पाहिजे तेबी खरं हाय. पर एक कसं हुनार रं संगाप्पा? तुमच्यातबी खालचं वरचं हायचं की!" संगाप्पा, गडबडला आन् हात झाडत म्हणला, "आमच्यात तसं लई न्हाई. मोगलाजी म्हण एक जात खालची हाय. आमी रोटी–व्हेवार करतो, पर बेटी–व्हेवार आजून होत न्हाय. आता काय हाय, ते जरा कमीतले हायत. आक्करमासे म्हण जमत न्हाय. आमी बारामासे. आमचा बाप परधान व्हता म्हण आमी परधान पाटील हाय. समदं हायत. न्याय-पंचात हाय. कोरट हाय, पोलिस हाय, तलाठी हाय, कुलकर्णी हाय. तुमावाणी समदं हाय."

संगाप्पा सारं सांगत असतो. कोर्टातल्या शिक्षा जात पंचायतीचं काम, पंचायतीचा जुलूम, लग्न, मृत्यू, पाठलावण, ज्याला ते 'दरा' म्हणत्यात. दऱ्याबद्दल बिचारलं तर संगाप्पाचं डोळं किलकिललं. तो गप व्हायला. मनातल्या मनात जुळवाजुळव करत सांगावं का नको, सांगावं का नको, आसं करत तो दऱ्याबद्दल सांगू लागला, "दुसावट्याच्या लग्नाला दरा म्हणत्यात. आमोशाच्या दिशी दुसावट्याच्या बाईला आन् बाप्याला पंचाम्होरं बोलीवत्यात. त्या दिशी आमच्या बिराडावर दिवा लावत न्हाईत. उजीडात बाया आन् बाप्या–ज्यांचा दरा हाय त्यांचं त्वांड कुणी बगत न्हाय. पाटील रूईच्या झाडासंगं आदी त्या बाप्याचं लगीन लावतो. आता लगीन म्हणजे काय, तर त्यो समद्यास्नी म्हांजूर करतो. ह्यो बिजवड्याचा न्हवरा रुईचा न्हवरा झाला आसं म्हांजूर करतो. मंग ज्या बाईसंगं त्याचा म्होतूर होणार, त्याला आमच्यात दरा म्हणत्यात– पाटील त्या बाईच्या कपाळाला गाईचं शान लावतो. तिच्या कपाळाला गाईचं शान लावलं का बाप्याला जवळ बोलावतो. त्याच्या कानात सांगतो. आसं झालं का बाकीची पंच, जमल्याली माणसं तुटक जाऊन बसत्यात. मंग त्यो बाप्या त्या बाईला उचलून काखंत घेतो. आन् पाटलाला म्हणतो, 'जात गावा, तुज्या पायाची आण. ह्यो सनांग म्या उचलला. पत्कुर घेतला.' आसं म्हणून चार पावंडं म्होरं चालतो आन् बाईला सोडतो. मंग समदी जात जमती. चुली पेटत्यात. दिवं लावत्यात. दऱ्याचं जेवाण व्हतं. लग्नाचं आसं न्हाय. लगीन चार-चार आठ-आठ दीस चालतं. पहिल्या दिशी मोटी हाळद आसती, दुसऱ्या दिशी लहान हाळद आसती.

दोन दीस नुसती हाळद चालती. पोरीच्या हाळदीला बारीक हाळद म्हणत्यात. ती दोनपारापावतर चालती. पोराची हाळद मोठी. ती रातरातभर चालती. समदी लहान मोटी बायापोरं हाळद लावत्यात. तसं बाज्या नसतो, बँड नसतो, पिकर (लाउड स्पीकर) नसतो. बाशिंग आस्तंया, पण काटकांचं. घरीच करत्यात. अक्षीत्या टाकत्यात. बामण बोलवत न्हाईत. लई आनंद असतो. जेवायला तेलच्या, चोंग, न्हायतर सांड आसत्यात. तेलच्या आसत्यात, तसं कंदुरी बी आसत्यात. पाठवणीला जातगंगला तिकटानं न्हाया घालायचं आसतं. लग्नाचं गोडाचं आसतं. एक बरीक सांगतो. आमच्यात हुंडा न्हाय, धोंडा न्हाय. पोरानं पोरीला द्याचा न्हाय, पोरीनं पोराला द्याचा न्हाय. पोरगा काय नि पोरगी काय, धा महिण्याचं कोणी न्हाय. समदी नऊ म्हयने नऊ दिसाचं आसत्यात न्हवं. आमच्यात हुंडा तेवढा न्हाय. लग्नात पोराच्या आईचा मान मोटा आसतो बग. वरमाई, वरबाप मानाचं. त्यानूला बस्त्यातच कापडं काडत्यात. जातगंगा म्हणलं तर धुतला तांदूळ, नाईतर बंगाळ गढूळ. म्हांजूर करस्तोवर लगीन पक्कं न्हाय. पाटलानं नाम वडलं का म्हांजूर झालं आसं म्हणत्यात."

तर ही गाढवी सोनार जमात महाराष्ट्रात कोल्हापूर, सोलापूर, सांगली, सातारा अशा अनेक ठिकाणी विखुरलेली. संगाप्पा बोलत आसतो. आम्ही ऐकत असतो. नानाला घरी जायची घाई असते. रात्रीचे धा तरी वाजले असतील. मी जेवायला न्हायी असे सांगतो तर या मंडळीचा आपमान झाला असे त्यांना वाटते. संगप्पा कालवा करतो. बायापोरांचा कालवा होतो. मी गुमान खाली बसतो. नानाच्या हाताला धरून खाली बसवतो. बसल्या बसल्या हातावरच चतकोर भाकरी आन् हिरव्या मिरच्यांचा खरडा घेतो. तोंडाचा जाळ झालेला असतो. वास नरड्यात अडकत असतो. पण तसाच घशाखाली घालतो.

बाहेर काळोख किट्ट असतो. माझ्या मनातही काळवंडून येतं. नाहीतरी गेंड्याची कातडी पांघरून जगणं कठीण आहे परिस्थिती इतकी भीषण आहे.की यांना संघटित कसं करणार आन याची "अंधारी मरणं" डोळ्यावर कातडी बडून बघण्यापलीकडं करता तरी काय येईल ? फार तर दोन टिपं ! ही माणसं कुणाचं नाहीतरी किती वाकडं करू शकतील ? किती डोळ्यांच्या धारा थांबवता येतील ? अन्न, वस्त्र, निवारा, हाताला काम, या साध्या माणसाला लागणाऱ्या गोष्टी इथं मिळत न्हाईत. संगप्पा काय, बरबाद्या काय, नाना काय, दौलतराव भोसले काय, की झवझब्या पारधी काय, त्यांचं दोन वर्षांचं गुन्हेगार पोरगं काय. 'हे देशा, कधी काळी चुकून माकून हा ढो रेंदाळला आणि तुझ्याशी बेइमान झाला, तर एवढंच लक्षात असू दे का आमी याच धरतीची लेकरं आहोत. एवढीतरी नोंद तुझ्या डायरीत असूदे !'

मनातले सल ठोचू लागले की, कविता करावी असं वाटतं पण कवितेच्या सामर्थ्यानं

उलथून पडेल एवढं हे प्रस्थापित ठिसूळ हाय ? नाही, मीच माझं सांत्वन करत होतो. नानाचा निरोप घेऊन स्टँडवर आलो. आजून पावूस होताच. आतबाहेर पावूस मरणकळा घेऊन घोंगावत कोसळत होता. डोळ्यापुढं मागची पालं नाचत होती. संगाप्पा व त्याचा निराधार तांडा, नाना व त्याचा घिसाडघांचा तांडा, त्यांची पोरं आणि आसंच. सातारला येईपर्यंत कितीदा आवंढा गिळला कुणास ठाऊक ! घरी आलो तर मी वक्ता व शशी श्रोता होती. कित्येकदा आम्ही दोघं गलबलून डोळे पुसत असायचं. माझं सारं लहानपणच उघडं नागडं होऊन डोळ्यापुढं नाचत होतं. कितीतरी वेळा...!

•

समाज हा बंद दरवाजा किलकिला करील !

या मुक्कामावर थांबत असताना थोडं मागं वळून पाहण्याचा प्रयत्न करतो आहे. सुरुवातीला मला हे मान्य केले पाहिजे, की कुणाही भटक्या विमुक्त नसलेल्या माणसाएवढा मीही अडाणी होतो. माझी जात सोडता, अन्य जमातीबद्दल माहिती नव्हती. आणि असलीच तर जुजबी स्वरुपाची. फोर्ड फौंडेशनच्या निमित्तानं मी मला आणि माझ्याबरोबर भटक्या-विमुक्तांना तपासत गेलो. जसं पाहिलं तसं आपल्या समोर ठेवण्याचा प्रयत्न केला. कित्येकांना तो अतिशयोक्त वाटेल, कित्येकांना तो अप्रस्तुत वाटेल, तर काहींना आता यात नवं काहीच नाही, तेच ते येत आहे असं वाटेल. मला मात्र तसं वाटत नाही. गोंधळी तर मी लहानपणापासून पहातोय, पण छत्तीस कवड्यांचा गोंधळी आणि चौसष्ट कवड्यांचा गोंधळी, हातभर मशालीचा भोत्या आणि बीतभर मशालीचा भोत्या, एकारान्त गोंधळी आणि उकारान्त गोंधळी

हे सगळं नवीनच होतं. त्यांचा खावा लागलेला गोड, आंबट, तिखट, आंबुरा चवीनं खाल्ला. शिळंपाकं अन्नही ते कसं चवीनं खातात ते पाहिलं. कानफाटे गोसावींच्या मारामाऱ्या पाहिल्या. केवळ भगवी कापडं घातली आणि 'अलक निरंजन' म्हटलं, म्हणून कोणी गोसावी होत नाही. त्याला मंत्रांच्या भाषेतच बोलावं लागतं. समोरच्या गोसाव्यानं विचारलेल्या मंत्राचं उत्तर देता आलं नाही तर तो भोंदू गोसावी समजून त्रिशुळानं मारामारी होते, आणि लक्षात येते, भीक मागणही तसं सोपं नाही. भिकेचंही शास्त्र पाळावं लागतं. ते पाळलं नाही तर जीवघेणा संघर्ष आहे. बाबा, बैरागी, नाथपंथी, डवरी, गोसावी, त्यांतले पंथ, उपपंथ, आणि जाती, उपजाती. प्रत्येकाप्रमाणं भिकेचा प्रकार बदलतो. मसणजोगी तर मसणवट्यातच राहतो. त्याला गावात यायला भीती वाटते. गावात आलाच तर भिकेसाठी. आणि भीक मागून म्हणजे फक्त पाचच घरं मागून मिळेल तेवढं खायचं. सहावं घर मागायचं नाही. पुन्हा मसणवट्यातच राहायचं. अंगाला राख फासायची. मृत माणसाच्या नातेवाईकांनी ठेवलेले जिन्नस घ्यायचे, त्या उपर संसार नाही. 'अल्लक निरंजन' करत बसायचं. त्याचे आचार विचार पुन्हा पंचांनी नियमित केलेले.

पोटासाठी दाहीदिशा फिरणाऱ्या या जमाती हातावरच पोट भरतात. गोपाळ ही अशीच जमात. नुसत्या दोरीच्या तुकड्यावर थरारून सोडील असं कसबी कसरतीचं, काम करतात. दोन महिन्यांच्या मुलाला गरागरा फिरवतील आणि केस पिकून गळू लागले तरी कसरत चालूच राहील. एखादी चवळीसारखी पोरगी वघता वघता तारेवरून पटकन् जाईल. आपल्या छातीचा ठोका चुकेल एवढं कसब असतं. एशियाड झालं त्याच काळात पुण्यात भटक्या विमुक्त जाती संघटनेचं शिबीर होतं. त्याला काले (ता० कराड) येथील बाबुराव चव्हाण हा गोपाळ समाजातला कार्यकर्ता आलेला. त्यानं रस्त्यानं कुठंतरी टीव्हीवर जिम्नॅस्टीक पाहिलं. अन् तावातावानं सांगू लागला, "सायेब, ही वाण्या-ब्रामणाची पोरं कसली कामं करत्यात. त्यांना धरायला लोकांडी नळी आसतीया. मला नुसती दोरी द्या. मी समदं करून दाकिवतो. लोखंडी खांबावं तर कुणीबी करंल!" मला थोडं आश्चर्य वाटलं. लोकसंख्येनं दुसरा असलेला हा देश एशियाडमधे कितव्या नंबरावर आहे? चीन, जपान जे करू शकले ते आपण का करू शकलो नाही? खंडप्राय देश पाचव्या सहाव्या नंबरवर कसा असतो? खरंच या गोपाळ कोल्हाट्याला संधी मिळाली तर काय होईल? जिम्नॅस्टिकच्या इतिहासाला हादरे बसतील. पारधी अनेक रेकॉर्ड मोडतील. पाठीवर पोलीसांची जीप, मोटार सायकल असते. आणि पारधी हरणासारखा पुढे पळत असतो. त्याला जर संधी मिळाली तर पारधी कुठे पोहोचेल? असे कितीतरी प्रकार सांगता येतील.

पण यांचं अज्ञान भयानक आहे. साधं 'तुझं नाव काय?' हा प्रश्न विचारला

तरी अवाक् होतात. कारण तुझं नाव काय, हा प्रश्न त्याला कुणी विचारतच नाही. आणि विचारलाच तर पोलिस किंवा न्यायाधीश विचारणार आणि वाट्टेल ते झालं तरी या दोघांपुढं तोंड उघडायचं नाही, मग कितीही मार बसो! तोंडातून शब्द काढायचा नाही, असं, त्यांचं असतं. एकाला नाव विचारलं तर बाकीचे हसू लागतील. "झबझब्या, तुझं नाव काय!" असं विचारलं तर तो कितीतरी वेळ माती टोकरीत बसेल आणि बाकीचे त्याचेकडं वेगळ्या नजरेने पाहतील. त्यानं उत्तर दिलंच तर वडिलांचं नाव माहित असतंच असं नाही. कारण खरा बाप माहितच नसतो. आईलाही सांगता येत नाही, इतक्या वेळा नवरा बदललेला असतो, तिला विकलेलं असतं. म्हातारी बाई सहज सांगते, "ह्याज्या पोटची येवढी, त्याच्या पोटची एवढी." त्यानं बहुतेक वेळा बापाचं नाव माहितच नसतं. साधं नाव सांगता येत नाही आणि सांगितलं तरी सुऱ्या, पिस्तुल्या, बंदुक्या, हातुड्या, बिचव्या, काडतुस्या, झबझब्या असं बायांची नावं तशीच. हत्यारी, तवली, चवली, पावली, सुरी, दगडी, बायडी अशी. भटक्या जमातीत सगळ्यात आडाणी आणि समाजाच्या अन्याजाला वळी पडणारी ही पारधी जात. यांच्या दोन-दोन वर्षांच्या पोरांवर महाराष्ट्रात खटले चालू आहेत. शासन आणि पोलीस असंच समजतात की पारधी जन्मतःच गुन्हेगार असतो. बायापोरांसह लोक निदान निम्मं आयुष्य तरी तुरुंगातच काढतात. चोरी केली असो की नसो, केवळ संशयावरून पारध्याला अटक करता येते, हद्दपार सुद्धा! नवऱ्याला एक जिल्हा बंद तर बायकोला दुसरा जिल्हा बंद. नवरा-बायको एकत्र राहू शकत नाहीत. त्यातून टोळ्या तयार होतात. आणि हेही खरं की मालकाच्या मिठाला जागणारी ही मुकी माणसं. समाजातल्या गुंडांच्या हातातली बाहुली बनतात. चोऱ्यामाऱ्या करणं आणि इतर बेकायदा कामं करणं सर्रास सुरू होतं. मालक पोलिसांपासून संरक्षण करतो. चोरीचा माल पुन्हा चिरीमिरीनं विकावा लागतो. चार-चार आण्याला ठुसी, बजरटीक, पुतळ्या विकतात. पुन्हा आडाणीपणा एवढा की त्यातच खुष! त्यानं खरे खुनी, दरोडेखोर बाहेर आणि खरीखुरी निरपराध असलेली कित्येक माणसं जेलमधे. आणि खरा गुन्हेगार जातीला माहित असल्यानं जात त्याला शिक्षा करते पण शासन करू शकत नाही. एका जागेला म्हणून झोपणार नाही. रात्री पाच दहा जागी झोपंल. पालात राहाणार नाही. उघड्या जागेवर राहतील. प्रपंच करायचाच नाही. भीक मागून आणतील, पण आजचं अन्न दुसऱ्या दिवशी खाणार नाहीत. विचारलं तर सांगतील, "लोकांनी कितीबी दिसाचं दिलं तरी चालतंया, पण आपल्याजवळ आन्न राहिलं तर माज येतो. त्याला दिवस दावायचा न्हाय. दिस बुडला की त्या दिसाचं अन्न दुसऱ्या दिशी नाही." चूल पेटवली तर ती केव्हातरी नावाला. पोरांना काही करून द्यायला. एरवी पारधी चूल पेटवत नाहीत. आणि स्वयंपाक ही भानगड नाही. शिजवून खाणार नाहीत, कच्चं खातील. सशासारखं

हळूचं शेतात जातील आणि हाताला लागेल ते खातील अशी ही पारधी मंडळी पाहिली सेलू (जिल्हा परभणी) येथल्या पारधी परिषदेला आलेली. खसखशी अजून नजरेपुढनं हालत नाही. खसखशी परिषदेला सोलापुराहून आली होती. जवळ पै–पैका नाही. आणि आपली सारी जात जमणार तर आपुनबी गेलं पायजे. पाच दिवसांत तिनं परभणी गाठली. तिनं चालत आलो म्हणून सांगितलं तर माझा विश्वास बसला नाही. पाठीच्या खोळीतलं तिचं पोर टुकूटुकू पहात असतं. पारधी हे अतिशय धाडसी, बेडर आणि हिम्मतबाज आहेत. रोजचाच संघर्ष अटळ असल्यानं आपसातही तेवढच वैर आहे. कधी पोलिस गोळ्या घालतात, कधी आपसातल्या वैरानं चाडं होतात, कटून मरतात.

पारध्यांच्या नंतर ज्या तेरा गुन्हेगार म्हणून समजलेल्या जाती आहेत त्यांचंही असंच. कुत्रं हाल खात नाही. केवळ टकारी असणं, उचल्या असणं, मांग-गारुडी असणं अपराध समजला जातो. पोलिसांचं तर काय सांगावं! स्वदेशातले पोलीस आणि परक्यांचे पोलीस यात कोणताच फरक नाही. लोकशाहीतही केवळ संशयावरून पोलिस कस्टडीत ज्या प्रचंड मारहाणी होतात, त्या केवळ ऐकून अंगावर काटा येतो.

चव्हाण नावाचा ऐन पंचविशीतला पोरगा रजपूत भामटा समाजातला. मुंबईच्या नेहरूनगर, कुर्ला येथल्या झोपडपट्टीत रहाणारा. चांगला पाचपन्नास बिराडांचा हा तांडा कागद चिंध्या वेचून, बाटल्या विकून, पोरावाळांचं पोट भरणारा. हा चव्हाण मालाड पोलीस–स्टेशनच्या एरियात संशयास्पद फिरताना पोलिसांना सापडला. पोलिसांनी त्याला संशयीत म्हणून रिमांड घेतला. २१, २२, २३ एप्रिल १९८४ अशा तीन दिवस बेदम मारला. तुरुंगात गेला तेव्हा ठणठणीत होता. त्याला पोलीस-कस्टडीत ठेवला होता. तेवीस तारखेला त्याच्या बायकोला कळवलं गेलं, ' सदर इसम मेला असून त्याचं प्रेत उत्तरीय तपासणी नंतर कारोनर कोर्टातून घेऊन जावे. नातेवाईकांनी आडाणीपणानी, की अन्य गैरमार्गानी त्याच्या बायकोला गप्प केलं. संघटनेचे कार्यकर्ते पोचले तेव्हा उशीर झाला व्हता. मालाड पोलीस–स्टेशनचं म्हणणं असं, " जमावानं त्याला मारला. " प्रेताच्या अंगावर माराच्या भयावह जखमा होत्या. पोलीसांनी दिलेले चटके, अवघड जागेवरचा मार याची नोंद झालेली नव्हती. संघटनेनं बोंब मारली, पण ' हाक ना बोंब ' कुणीच गंभीरपणे काही केलं नाही.

बायांना मारू नये. पण कायद्याचे रक्षकच नराधमासारखे वागतात कितीतरी बायांना रिमांडबद्दल विचारलं. पहिल्यांदा बोलत नाहीत. पण नंतर सांगतात. त्या कथा नुसत्या ऐकल्या तरी तळपायाची आग मस्तकाला जाऊन भिडते. संताप अनावर होतो. पण मुकी बिचारी करणार काय ? खरंच यांनी तरी काय करावं ? या देशात कुणाचं सरकार आहे, आणि महागाई का होते काहीही माहिती नसतं. मानवी बेटांच्या या पुंजक्यांचा काळ इसवी सनाचं कितवं शतक असेल बरं ? गोपाळ धन-

गरांना विचारत होतो. तर त्यांना अजून गांधी बाबाचंच राज्य आहे, असं वाटत होतं. इंदिरा गांधी, पंडित नेहरू ही नावं सुद्धा कित्येकांना माहित नाहीत.

बायकांचे तर एवढे हाल विचारू नये ! बाळंतपणाच्या कळा जिथं येतील तिथंच खाली बसतील. जिवाचा आटापिटा करतील की झाली मोकळी. सोपाबाई गारुडी सांगत होती. "नाळ कशानं तोडावी ? आता आयत्या येळंला कुठलं आणायचं काय ? इळा, कोयता घावंल त्यानं तोडायची आन् न्हायचं. आन् रानावनात झाली एकांदी बाळांत तर घावंल तो हिरवा पाला कचाकचा चावायचा, त्याजा रस आन् चोता नाळंवर थुकायचा आन् दाताच्या हिसक्यानं नाळ तोडायची. का झालं रिकामं." बाई एवढ्या सहज सांगत व्हती, जसं काही विशेष नाही. नेहमीच करावं लागतं. "कुठला डाकतर आन् दवा ? त्याला पैका कुठनं आणणारं ?" तर अशा अनेक गोष्टींनी डोकं चक्रावून जातं. 'उपरा' हा मीच माझा घेतलेला शोध होता. एका अर्थानं तो एका माणसाचा शोध होता आणि गेलं दीड वर्ष मी माझ्याबरोबरच भटक्या विमुक्तांच्या उपरेपणाचा शोध घेतोय. इतकं विलक्षण जग ! दुःख, वेदना, दारिद्र्य आणि अश्रू यांशिवाय त्यांच्या वाट्याला काहीही आलेलं नाही. केवळ ऊर बडवून घेण्यासाठी हे सांगत नाही. निमित्तानं माझंही उपरेपण अनेकदा जाणवलं. एवढी शिसारी यायची की पुन्हा पालात म्हणून जाऊ नये, असं वाटायचं. लहानपण याच जगात गेलं. इथंच लहानाचा मोठा झालो. पण आज मीही मला परका झालोय. अशा जगात फिरतोय, जिथं आरोग्यशास्त्राचे साधे नियमही पाळता येत नाहीत. आणि पाळावे म्हटलं तरी ते शक्य नाही. पालावर जावून, तांड्यावर जावून न खाता-पिता आलो तर मनाला बोचणी असतेच. 'सालं आपणही नाळ तोडतोय का ?' म्हणून पुन्हा हट्टानं खाणं आलंच.

भाषा समजून घेतानाही प्रचंड तारांबळ उडते. तशी ग्रामीण मराठी माझी भाषा आहे. पण कधी कधी त्यातलं सौंदर्य वाडीवस्तीवर, तांड्यावर, पालावर लक्षात येतं. लोक बोलू लागले की लोकसाहित्याचा नुसता पूर येतो. "जमीन हाय का तुमला ?" असं विचारलं की लगेच "हाय की, थुक्यानं भिजवायची आन् चांदण्यात वाळवायची." नाहीतर अशी काही म्हण, उखाणा फेकतील की ते एका तासाच्या भाषणानं सांगता यायचं नाही. पण हे लोकजीवन इतरांनी कधी आपलं मानलं नाही. त्याला सामावून घेतलं नाही. त्याचा लोकांशी आणि लोकजीवनाशी काही संबंधच राहिलेला नाही. माणसं दुःखी असूनही किती हसू शकतात ! हसतानाही कसं हादरून सोडतात ! किती प्रकार सांगावेत ? मुलगी मेली याच्या दुःखापेक्षा मुलीवर बळजबरी झाली, याच्यापेक्षा पोरगी नाचायला राहिली नाही, फड मोडला, तमाशात आता काहीच राहीलं नाही, या कारणानं तडफडणारे पाहिले. तर केसांचा कितीही गुंता झाला तरी केसाला पाणी न लावणाऱ्या लमाण बंजारा बायाही पाहिल्या,

त्यांच्याशी बोलताना लक्षात येतं, या लोकांचं जगही पुन्हा वेगळं आहे. रंगात आल्यावर या गोरगरीब रयतेचा जगण्याचा प्रकार लक्षात येतो. हसतील, चोरी करतील, शिक्षा सोसतील. पण निर्मळ मनानं. खाली धरिणीचं हाथरून, वर आभाळाचं पांघरून, बस ! ऊन, वारा पाऊस खात जगणारी ही माणसं कुणाच्या लेखी भिकारी, कुणाच्या लेखी गुन्हेगार कुणाच्या लेखी काहीच नाहीत ! यांच्या जीवनाला काही किंमतच नाही. मान नाही, सन्मान नाही, प्रतिष्ठा नाही, संपत्ती तर बाळगायचीच नाही.

कऱ्हाडचा बाबुराव चव्हाण हा गोपाळ समाजातला कार्यकर्ता सांगत असतो, ते ऐकून हादरून गेलो. आजही खेडेगावात बहुतेक वेळा लोक संडासाला पाणी नेत नाहीत, दगडाच्या खडयांचा वापर करतात, हे मला ठाऊक आहे. पण बाबुराव सांगत असतो ते मोठं विलक्षण आहे. " पाच दिवस जात पंचायतीचा फड पडला होता आन् दावा व्हता, एका माणसानं संडासला पाणी नेल्याचा. " बाबुराव म्हणत व्हता, " आमच्या जातीत संडासला पाणी न्हेणं हा आमच्या जात पंचायतीनं गुन्हा ठरवलाय. बायकांचं जिणं तर अतिशय भयावह आहे. तिनं कवा विंचरावे, आंगोळ कवा करावी, कशी करावी, धुतलेलं फडकं कसं वाळवावं...पारध्यांच्या मधे वळणीवर वाळायला घातलेल्या लुगडयाखालून, लुगडं वलांडून कुणी जाणार नाही असा जर कुणी परका पुरुष गेला तर जात पंचायत त्याला गुन्हेगार ठरवते. बाईच्या वाळत घातलेल्या लुगडयाला तिच्याशिवाय, तिच्या नवऱ्याशिवाय, तिच्या मुलाबाळांशिवाय कुणीही स्पर्श करू शकत नाय. असा स्पर्श केला का कज्जा होतो. या उलट बाई ही इतकी अपवित्र आहे. तिचं मूत्र जर कुणी अंगावर टाकलं तर पिसा झाली आसं म्हणतात. आन् ज्याच्या अंगावर ते पडतं, त्याला वाळीत टाकतात. " अशा कितीतरी दुष्ट रूढींनी हा लक्षावधी लोकांचा जनसमूह आजही खुरटत, खरडत, जगतो आहे.

यांचेसाटी चार टक्के जागा राखीव, पण शिक्षण शून्य टक्के. आणि तरीही लोक भरले जातात. बोगस प्रमाणपत्रांचा नुसता सुळसुळाट. काहींनी तर धंदाच मांडलाय. नाव भटक्या विमुक्ताचं आणि सवलती तलाठी दाखला देईल त्याच्या ! जातीच्या नावांतील साधर्म्यांचा एवढा फायदा घेतला जातोय, तेवढा क्वचितच दुसऱ्या कशाचा घेतला जात असेल. तेल्याचा तिळवण तेली होतो तर लिंगायताचा लिंगडेर होतो. रजपुताचा रजपूत भामटा होतो तर जोशाचा कुडमुडा जोशी होतो. भटक्या विमुक्तांच्या नोकऱ्यांचा शासनानं खरोखर अभ्यास करून पहावा. त्यांच्या शिक्षणासाठी मी अनेकदा भटक्या शाळांची सूचना केलीय. पण लक्षात कोण घेतो ? स्वकीय नोकरशाही आणि लोकप्रतिनिधी यांना कवडीची माया नाही. एरवी बंद दरवाजावर आतापर्यंत सहा-सात चौकशी कमीट्या कशाला नेमल्या असत्या ? सोलापूरच्या

सेटलमेंटमधली जमीन कुणाकडं आहे? आणि तेथील ३६ खोल्यांची शाळा का उध्वस्त झाली? याची माहिती ना सत्ताधारी पक्षाला, ना विरोधी पक्षाला. आंधळं दळतंय, कुत्रं पीठ खातंय. भटक्या विमुक्तांच्या पुनर्वसनासाठी एक पैही शासनानं ठेऊ नये? गेले दीड वर्ष सातत्यानं मागणी केली तेव्हा भटक्या विमुक्तांसाठी महामंडळ घोषीत झालं. पण वर्ष उलटून चाललंय तरी महामंडळ काही कार्यवाहीत येत नाही.

या जमातींना घटनेनं कोणतंही संरक्षण दिलेलं नसल्यानं यांना राजकीय सबलती नाहीत. त्यामुळं यांचा कोणताही प्रतिनिधी कायदे मंडळात नसतो. त्यामुळे कार्यवाहीचा प्रश्नच नाही. एखादादुसरा प्रतिनिधी शासन नियुक्त असतो. पण तो तोंडात मिठाची गुळणी धरून गप्प असतो. खरं तरं या जमाती अस्पृश्य आहेत, यांना गावात कुणीही पाणी भरू देत नाही, वाढलंच जातं. शिवूनही घेत नाही. हे तसे गावाच्या वाऱ्यालाही थांबत नाहीत. पूर्वी इतकी अस्पृश्यता यांच्या स्पर्शाबद्दल नसली तरी ती असतेच.

हे आदिवासींसारखेच टोळ्या करून त्यांच्याच उपसंस्कृती मध्ये जीवन जगत असतात. सांस्कृतिक अलगता, भाषिक वैशिष्ट्य, भौगोलिक अलगता, या आदिवासींना लावलेल्या कसोट्याही यांनाही लागतात, अस्पृश्य किंवा आदिवासी या दोन्हींपैकी एका परिशिष्टात त्यांना घालायला हवे होते. एकच जात वेगवेगळ्या विभागात वेगवेगळ्या यादीत असते. वडार, कैकाडी, काशीकापडी, कंजारभाट, लमाण बंजारा, आणि कितीतरी जाती, एका राज्यात अनुसूचित जातीत, तर दुसऱ्या राज्यात अनुसूचित जमातीत समाविष्ट केल्या आहेत. या जमाती अखिल भारतीय आहोत, असा माझा दावा आहे. पण या संदर्भात अभ्यास करावा असे विद्यापीठ, समाजशास्त्रज्ञ, बुद्धीवंत, विचारवंत, शासन यापैकी कुणालाच वाटत नाही. एवढंच काय एकाच प्रांतात, एकाच जातीला एकच नियम नाही. विदर्भातला कैकाडी समाज अस्पृश्य तर बाकी महाराष्ट्रात ते गुन्हेगार जमातीत. लमाण-बंजारा जमातीचेही तेच. माझा एक पावणा अस्पृश्य, दुसरा आदिवासी आणि तिसरा गुन्हेगार जातीत आहे.

असा सारा जुलमाचा रामराम चालू आहे.

भटक्या विमुक्तांना व त्या बाहेरच्यांनाही हा दरवाजा या लेखांमुळं किलकिला झाला, आत येण्याची मंदशी आशा दिसली तरी हा सोशिक समाज कळ काढील. पण तो किलकिला झाला नाहीच तर?



REFBK-0024402